# आयुष्याचा सदुपयोग.

(लार्ड आव्हेबरीच्या यूस ऑफ् लाईफचें मराठींत
भाषांतर.)

**शामराव रामचंद्र धराधर, एम्. ए.**
आर्यन एज्युकेशन सोसैटीच्या हायस्कुलचे माजी
प्रिन्सिपाल ह्यांनीं केलें,

तें

**राणा ॲण्ड ब्रदर्स,**

पब्लिशर्स, बुकसेलर्स इ० इ०.

**गिरगाव,**

ह्यांनीं

**मुंबईंत,**

**जावजी दादाजी यांच्या**

निर्णयसागर छापखान्यांत छापवून प्रसिद्ध केलें.

---

सन १९०१.

DECCAN VERNACULAR TRANSLATION SOCIETY
डेक्कन व्हरनॅक्यूलर
ट्रॅन्सलेशन सोसाइटी, पुणें.
१८९४.
POONA. 1894

# पुस्तकार्पण.

हा लहानसा ग्रंथ सद्गुरुचरणीं

प्रेमानें अर्पण केला असे.

# प्रस्तावना.

व्यापारादि निमित्तानें राष्ट्रांचा एकमेकांशीं संबंध होऊं लागला ह्मणजे परस्परांच्या पोषाखपेहरावांची, खाण्यापिण्याच्या पदार्थांची, चालीरीतींची, आचाराविचारांची अनुक्रमें अदलाबदल होत जाते. त्या अदलाबदलींत कमीजास्तपणा वारंवार दिसून येतो. जें राष्ट्र संपत्तीच्या, सत्तेच्या, किंवा विद्वत्तेच्या मानानें श्रेष्ठ तें कमी योग्यतेच्या राष्ट्रांपासून फारसें घेत नाहीं. तथापि, ती क्रिया कांहीं प्रमाणानें तरी होत असते. ह्या अदलाबदलीचें आदि कारण मनुष्यस्वभाव होय. केवळ नूतनपणाचा हव्यास मनुष्यास असल्यामुळें बरें वाईट ह्मणून नवीन दिसेल तेवढें शक्त्यनुसार मनुष्य स्वीकारितो. ह्या अदलाबदलीचा प्रभाव कोणत्याही राष्ट्राचा इतिहास बारीक दृष्टीनें वाचल्यास सहज लक्षांत येऊन चुकेल. पुरातनकाळीं आर्यांचा ज्यांच्यांशीं संबंध घडला त्यांच्यापासून त्यांनीं काय काय घेतलें हें सांगण्यास एक स्वतंत्र निबंध पुरा होणार नाहीं; तेव्हां फार लांबच्या काळचा विचार न करितां, मोंगलाईचें उदाहरण घेऊं. मोंगलाईच्या वेळीं हिंदुलोकांनीं राज्यकर्त्यांच्या बऱ्याच चालीरीती उचलल्या. त्यांत गोषा हें ढळढळीत उदाहरण होय. बाकी खाण्यापिण्याच्या पदार्थांत, पोषाखपेहरावांत, फार तर काय व्यवहार, भाषा, धर्म इत्यादींत देखील मोंगलाईचें वारें दिसून येतें. शब्दव्युत्पत्तीचा जर अभ्यास केला तर ह्या संबंधाचा परिणाम विशेष लक्षांत येईल. असो; १७ व्या शतकापासून युरोपीय लोकांशीं आपला संबंध होऊं लागला. पुढें कालावसानेंकरून इतर सर्व युरोपीय लोक पराभूत झाल्यामुळें देश सोडून गेले. फक्त इंग्रज

लोक आपल्या बाहुवीर्याच्या, विद्वत्तेच्या, कदाचित् आपल्या श्रेष्ठ राजनीतीच्या जोरावर सत्ताधीश होऊन बसले. व त्यांनीं इंग्रजी शिकण्याच्या शाळा घातल्या. त्यांचा आमच्याशीं व्यापारनिमित्तानें संबंध झाला तेव्हांपासूनच पूर्वीं निर्दिष्ट केलेली अदलाबदलीची क्रिया सुरू झाली होती. पण, इंग्रजी भाषा शिकविण्याच्या शाळा सुरू झाल्याबरोबर त्या क्रियेस मोठें प्रोत्साहन मिळालें, व ह्या अदलाबदलीस जोर आला. आरंभीं लोक फक्त पोषाखपेहरावाच्या, खाण्यापिण्याच्या पदार्थांस लुब्ध होऊन त्यांचेंच अनुकरण करण्यांत सुख मानूं लागले. बिस्कुटें खाणें, चहा पिणें, पाटलोनी घालणें ह्यांत त्या वेळीं नवीनपणा होता. असला प्रकार कांहीं वेळ चालल्यावर आचारविचार, रीतिरिवाज इत्यादींचें द्वंद्व होऊं लागलें. त्यांत बरेच रीतिरिवाज आह्मीं घेतले आहेत, ह्यांत संशय नाहीं. आचारविचारांचें द्वंद्व आजकाल चाललेंच आहे. त्यांचा निकाल काय लागेल हें निश्चयानें सांगणें कठीण झालें आहे. पोषाखपेहराव, खाणेंपिणें, इत्यादींवर राष्ट्राचें राष्ट्र ह्या नात्यानें असणारें जीवित अवलंबून नसतें. राष्ट्राचें जीवित आचारविचार, धर्म, इत्यादींवर सर्वस्वी अवलंबून असतें. तेव्हां आजकालचा प्रश्न केवळ जिवाशीं आलेला आहे. आचारविचारांत प्राच्य व पाश्चात्य असे मोठे विभाग पडले आहेत. इतर साऱ्या गोष्टींत कदाचित् पाश्चात्य आपल्या नूतनत्वाच्या जोरावर प्राच्यांचा पाडाव करितील. पण, आचारविचार व धर्म ह्या बाबतींत कसें व्हावें हा प्रश्न आहे. कारण आर्य जुन्या धर्ममतांचे कट्टे अभिमानी आहेत. राज्यक्रांतीचे अनेक प्रसंग जरी येऊन गेले तरी त्यांनीं आपला सनातन धर्म सोडिला नाहीं. तेव्हां ह्या बाबतींत प्राच्य व पाश्चात्य ह्यांचें मोठें झुंज होणार ह्यांत संशय नाहीं; व त्या रणसंग्रामाचा आरंभ

स्वामी विवेकानंद, बिसान्टबाई इत्यादींनीं मोठ्या कडाक्यानें केलाच आहे. पुढल्या शतकांत त्या रणसंग्रामाचा दुंदुभी युरोप-खंडभर दुमदुमून राहील. कारण, प्राच्यांच्या व पाश्चात्यांच्या विचार-सरणींत मोठा विरोध आहे; व तोडजोड होऊन मेळ पडण्याची शक्यताच नाहीं. आमच्या मतें ज्ञान मोक्ष मिळविणारें, त्यांच्या मतें ज्ञान भ्रष्ट करणारें, निदान ज्ञान मिळविण्याच्या यत्नामुळें माणूस भ्रष्ट झाला, ज्ञानद्वारा ईश्वराला मिळवावें हें त्यांना कबूल नाहीं. आह्मी दुसरें काम नसल्यास ईश्वराचें नांव घेत बसतों; त्यांच्या मतें ईश्वराचें व्यर्थ नांव घेऊं नये. आमच्या मतें हा संसार झूट आहे, व मोक्ष सर्वथा साधनीय होय; त्यांच्या मतें हें जग खरें आहे, व ह्यांतच खटाटोप करून नांव मिळवून घ्यावें. आमच्या मतें प्रत्येकानें आपापला धर्म पाळावा; त्यांच्या मतें स्वतःच्या धर्माशिवाय इतर सर्व धर्म हाणून पाडावे. अशा रीतीनें बारीक दृष्टीनें विचार केल्यास बऱ्याच गोष्टींत त्यांचा आमचा विरोध सांपडेल.

आतां गीतेंत किंवा आमच्या इतर धर्मपुस्तकांत कर्माशिवाय सुटका नाहीं, कर्म करावें असें सांगितलें आहे. पण साधारणपणें ह्या तत्वांचा परिणाम जनतेवर उलट झाला आहे, व मनुष्याचें लक्ष प्रवृत्तीकडून माघार घेऊन निवृत्तीकडे वळलें आहे. त्यामुळें पाश्चात्यांच्या हृदयांत अहंबुद्धि ज्याप्रमाणानें वागते त्या प्रमाणा-नें आमच्या आर्यांच्या हृदयांत वागत नाहीं. अतएव आह्मी बुद्धीनें सम असूनही बऱ्याच वेळीं आमच्या हातून सारख्या धोक्याचीं कामें होत नाहींत. आह्मी भक्तीकडे जास्त वळूं, किंवा मृत्यूस मोठ्या शौर्यानें तोंड देऊं, पण व्यावहारिक बाब-तींत आमचा पाश्चात्यांबरोबर टिकाव लागत नाहीं त्यामुळें सध्यांच्या युरोपीय लोकांच्या मतांस तोंड देण्याचें त्राण आमच्यांत

नाहीं; व व्यावहारिक बाबतींत बहुतां ठिकाणीं आह्मांस अपयश येतें, व राष्ट्राला इतर राष्ट्रांशीं समतेनें वागतां येत नाहीं. उत्क्रान्तीच्या नियमाप्रमाणें प्रवृत्ति विशेष पाहिजे असली, तर उत्कृष्टतमाची सरशी व्हावी ह्या न्यायानें पाश्चात्यांचा सर्व बाबतींत जय आहे तो सारखा चालत जाईल. राष्ट्रीय दृष्ट्या प्रवृत्ति आह्मांस विशेष हवी किंवा निवृत्ति हवी, राष्ट्र बलाढ्य धनाढ्य व्हावें किंवा नुस्ती आध्यात्मिक उन्नति पुरे आहे इत्यादि प्रश्नांचा मला निकाल लागला नाहीं, सद्गुरुप्रसादानें जेव्हां लागेल तेव्हां लागेल, सध्यां मात्र त्यांचें द्वंद्व माझ्या मनांत चाललेलें असतें; व कदाचित् माझ्या सारख्या इतर अज्ञांच्या मनांत चाललें असेल. त्याचा निकाल लावावयास राष्ट्र तयार झालें ह्मणजे लागेलच, पण त्याची तयारी ह्मणून हा ग्रंथ भाषांतररूपानें सुज्ञांपुढें मांडिला आहे. ह्या ग्रंथांत पाश्चात्यांचीं संसाराबद्दलची कल्पना स्पष्टपणें व्यक्त होते, व त्यांच्या मोठमोठ्या लोकांचे विचारही सांपडतात. ह्या कल्पनेशीं आपली कल्पना ताडून पाहून राष्ट्राच्या उन्नतीस कोणती विशेष जरूरीची आहे हें ठरविणें सोपें पडेल.

हा ग्रंथ भाषांतर करण्याची परवानगी लबक साहेबांकडून १८९६ च्या सुमारास आणविली होती. पण, अभ्यास, दुखरे डोळे, इतर व्यवसाय इत्यादींमुळें भाषांतर करण्याचें काम बरेंच लांबणीवर पडलें. होतां होईल तों भाषांतर मराठी शब्द घालून करण्याचा यत्न केला आहे. कांहीं ठिकाणीं निरुपायास्तव संस्कृत शब्द घालणें भाग पडलें. कांहीं ठिकाणीं भाषांतर चांगलें वठलें नाहीं, हें माझें मला कळतें आहे. पण, माझ्या हातून जितकें चांगलें झालें तितकें मीं केलें आहे. मूळ ग्रंथांत आलेले कवीचे उतारे गद्यांत उतरविले आहेत. एक तर कविता करण्याची शक्ति ईशाच्या अवकृपेनें माझ्या ठिकाणीं नाहीं. आणखी कविता कर-

ण्याचा यत्न करून मुळांतला अर्थ कमी करण्यास माझें मन घेईना. कांहीं ठिकाणीं इंग्रजी कवींचें व आपल्या कवींचें विचार-साम्य आढळून येतें; त्या ठिकाणीं आपल्या कवींचे उतारे दे-ण्याचा मानस होता; पण तसें करण्यांत बराच वेळ जाईल असा विचार मनांत आल्यामुळें तो तसाच ठेवावा लागला.

माझ्या अल्प समजुतीप्रमाणें प्रेसच्या अधिकाऱ्यांच्या सहा-य्यानें ग्रंथ जेवढा शुद्ध छापवितां आला तेवढा छापविला आहे. कांहीं चुक्या राहिल्या असल्यास त्यांचा दोष सर्वस्वी माझ्याकडे आहे. सुज्ञ लोक हंसक्षीर न्यायानें गुणग्रहण करितील अशी आशा करून हा लेख पुरा करितों.

१५ मे १९०१<br>मुंबई.

शा. रा. ध.

# आयुष्याचा सदुपयोग.

## भाग १.

### मोठा प्रश्न.

ह्या आयुष्यांत शिकावयाची मोठी गोष्ट ह्मटली ह्मणजे हें आयुष्य कसें घालवावें ही होय. मनुष्यप्राणी आपल्या जिवास जितका जपतो तितका कशासही जपत नाहीं. तरी पण त्याचें चांगलें जतन करण्याकडे तो जितकें दुर्लक्ष्य करितो तितकें कशाकडेही करीत नाहीं. ही कांहीं लहानसहान गोष्ट नव्हे. हिपोक्रेटीस आपल्या "आयुर्वेदी सूत्रां"त ह्मणतो–

**अनन्तपारं किल शब्दशास्त्रं स्वल्पं तथायुर्बहवश्च विघ्नाः ।**
**सारं ततो ग्राह्यमपास्य फल्गु हंसो यथा क्षीरमिवाम्बुमध्यात् ॥२॥**

ह्या जगांत क्षेम व बरकत असणें हें आपल्या वस्तुस्थितीवर अवलंबून नसतें. तें आपल्या उद्योगावर अवलंबून असतें. "दुसऱ्यांच्या हातून धुळीस मिळालेल्या माणसांपेक्षां आपल्या हातून आपला नाश करून घेणारीं माणसें अधिक सांपडतील. वादळांच्या योगानें किंवा भूकंपांच्या योगानें जितकीं शहरें व घरें जमीनदोस्त झालीं असतील त्यांपेक्षां जास्त मनुष्यप्राण्यानें धुळीस मिळविलीं असतील." ह्या जगांत प्राणिमात्रांचा दोन रीतींनीं नाश होतो; एक कालावसानेंकरून व दुसरा स्वहस्तेंकरून. इतर सर्व वस्तूंच्या नाशापेक्षां मनुष्याचा नाश जास्त दुःखप्रद वाटतो. सेनीकाच्या मताप्रमाणें मनुष्याचा मोठा शत्रु ह्मणजे त्याचें मन हाच होय. लाब्रुअर ह्मणतो—"पुष्कळ लोक इतरांस कष्टी करण्यांत

आपला बहुतेक वेळ घालवितात." ऱ्याच उदाहरणांवरून आपणांस असें आढळून येतें कीं,—"[1]तारुण्याच्या धुंदींत केलेल्या गोष्टींबद्दल म्हातारपणीं गात्रें शिथिल झालीं म्हणजे मनुष्यास पश्चात्ताप करीत पडावें लागतें." "[2]जें एकदां होऊन चुकलें तें क्लॉथो देवीला देखील आपल्या दैवरूपी जाळ्यांत पुनः गोंवितां येत नाहीं किंवा ॲट्रोपा देवीला परत आणितां येत नाहीं. मनुष्याला स्वतःबद्दल फाजील काळजी असते पण ती शहाणपणानें नियमित झालेली नसते."

"तुम्ही इष्टवादी आहांत" हा आरोप मजवर कधीं कधीं आणितात. पण आरोप आणणाऱ्या लोकांनीं पक्कें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, ह्या भवसागरांत संकटें व दुःखें नाहींतच किंवा तीं क्षुल्लक आहेत असें मीं म्हटलें नाहीं, माणसें सुखी आहेत असेंही मी कधीं म्हणालों नाहीं. मात्र सर्व माणसांना सुखी रहातां येईल असें माझें मत आहे. तसेंच माणसांना सुख जें मिळत नाहीं तें त्यांच्याच अपराधामुळें. आपणांपैकीं बरींच माणसें फक्त थोड्याच सुखांचा अनुभव घेतात; व त्यांपेक्षां जास्त सुखांचा ते अव्हेर करितात असेंही माझें मत आहे; व ह्यामुळेंच मनुष्यप्राण्याला सुख मिळत नाहीं ही गोष्ट अधिक वाईट [3]वाटते. "जिव्हेनें उच्चारलेल्या व लेखणीनें लिहिलेल्या औदासिन्यप्रदर्शक सर्व उद्गारांपेक्षां 'असें झालें असतें' हा उद्गार फारच दुःखप्रद होय."

पुष्कळ ठिकाणीं ज्याला आपण दुःख म्हणतों तें खरोखरी सुख असून त्याचा वाईट रीतीनें उपयोग केल्यामुळें किंवा अतिरेक झाल्यामुळें दुःखाप्रमाणें वाईट वाटूं लागलेलें असतें. यंत्रांतील एकच चक्र किंवा एकच खिळा जर निखळला तर सर्व यंत्र बंद पडतें. त्याचप्रमाणें सृष्टीच्या प्रकृतिनियमांशीं विरोधभावानें आपलें

१. लिली. २. लूशन ३. व्हिक्टर.

वर्तन असलें तर त्या वर्तनानुरूप आपल्यास दुःख सोसावें लागणारच. धैर्य अतिशय असलें ह्मणजे माणूस उफराट्या काळजाचा होतो. फाजील प्रेम हें एक प्रकारचें व्यंगच होय. अति काटकसर ह्मणजे धनतृष्णा. जें एका माणसास पोसतें तें दुसऱ्यास विषवत् जाचतें ही एक ह्मणच पडून गेली आहे. सृष्टीच्या नियमांत अमुक फेरफार केला तर माणसास जास्त सुख होईल असें अद्यापि कोणीं सिद्ध करून दाखविलें नाहीं. मनुष्य पडलें ह्मणजे त्याचा पाय मोडतो हें खरें आहे, पण गुरुत्वाकर्षणाच्या नियमांत कोणताही फेरफार केला तर फायदा होणार नाहीं.

सुखाधिकारी दूत आर्मझ्झ व दुःखाधिकारी दूत आहरीम ह्यांकडे सुखदुःखाच्या वांटणीचें काम आहे असें इराणी लोक मानितात. पण खरें पाहिलें असतां ह्या जगांतील दुःखें आपल्या प्रमादामुळें आपण आपल्यावर ओढवून घेतों. प्रमाद हा शब्द द्व्यर्थक आहे. अमुक गोष्ट वाईट आहे असें आपणांस माहीत असतांना ती करणें, अथवा अजाणतेपणामुळें चुक्या घडणें. ह्या दोन्हींमुळें माणूस सारखींच संकटें ओढवून घेतो. पहिल्या वर्गांतील प्रमाद टाळण्याविषयीं ह्मणाल तर कधीं न चुकणारा मार्गप्रदर्शक ईश्वरानें आपल्या हृदयांत स्थापलेला आहे. ह्मणून आपल्या हातून वाईट झालें तर तें जाणून बुजून आपण केलें असें ह्मटलें पाहिजे. कारण जाणून बुजून वाईट केलें नसलें, किंवा तें करितांना मुद्दाम डोळ्यावर कातडें ओढून घेतलेलें नसलें, तर आपल्या हातून वेडगळपणाचें वर्तन घडलें असें मात्र होईल. पाप घडलें असें कदापि होणार नाहीं.

दुसऱ्या वर्गांतील प्रमाद टाळण्यास आपणांस आपल्या विचारशक्तीवर सर्वस्वीं अवलंबून राहिलें पाहिजे; किंवा आपले आईबाप, वाडवडील अथवा मित्रमंडळी यांचा विचार व

सल्ला हीं घेतलीं पाहिजेत, अथवा शिक्षणाच्या योगानें किंवा प्रकृतिस्वभावाच्या योगानें हे दोष आपणांस टाळितां आले पाहिजेत.

आपलें शिक्षण हा आपल्या शरीराचा एक भाग मानिला पाहिजे. सदोदित प्रत्येक माणसाला निदान एका शिष्याला—ह्मणजे स्वतःला—तरी शिक्षण व वळण द्यावयाचें असतें.

स्वतः शिकलेल्या गोष्टी जशा आपल्या होतात तशा दुसऱ्यांनीं शिकविलेल्या होत नाहींत. म्हणून शाळा सुटली ह्मणजे आपलें शिक्षण पुरें झालें असें नव्हे. तर त्या वेळीं शिक्षणाला कोठें नुक्ताच आरंभ झालेला असतो इतकेंच. शिक्षण आयुष्यभर चाललेलेंच असतें. सेनिका ह्मणतो—"मनुष्यें आपल्या शरीराला जसा व्यायाम करवितात त्याप्रमाणें मेंदूला करवितीं तर किती चांगलें झालें असतें ? त्याचप्रमाणें क्षणिक सुख मिळविण्याकरितां जितकी मेहनत घेतात तितकी सद्गुण संपादण्यासाठीं घेत असतीं तरी किती चांगलें झालें असतें ? मनुष्यवर्गांतील कांहीं जाती दैववादी आहेत. सर्व कांहीं ईश्वरानें ठरवून ठेविलेलें असतें, भवितव्यता चुकत नाहीं, मग मनुष्य यत्न करो वा न करो, मनुष्य कळसूत्री बाहुला आहे, त्याला ईश्वर वाटेल तसा नाचवितो असें त्यांचें मत आहे. ह्मणून विचार करण्याजोगता मुद्दा हा. इतर शास्त्रांप्रमाणें संसारशास्त्र आहे किंवा काय ? संसारांतील सर्व बऱ्या वाईट गोष्टींस मर्यादित करणारे असे कांहीं नियम आहेत कीं काय ? आपलें जहाज ह्या कालसमुद्रांत इच्छित ठिकाणीं नेतां येईल किंवा वाऱ्याच्या आणि लाटांच्या जोरानें जेथें जाईल तेथें खरें ? ह्या प्रश्नांचें उत्तर स्पष्ट आहे. "मनुष्य हा मानवी प्राणी आहे आणि त्याला दैव आपल्या कह्यांत ठेवितां येईल." व जर ठेवितां आलें नाहीं तर दोष

त्याच्या पदरीं. "ज्या स्थितीस आपण येऊन पोंहचावें अशी आपली इच्छा असते त्या स्थितीस आपण येऊन पोंहचतों. कारण आपल्या संकल्पशक्तीचें सामर्थ्य इतकें विलक्षण आहे कीं तिच्या जोरावर ईश्वर अनुकूल असल्यास ज्या स्थितीस येऊन पोंहचावें असें आपणांस मनापासून वाटतें त्या स्थितीस आपणांस पोंहचतां येतें."

आपल्या दैवावर जर आपला इतका दाब आहे, तर आपणांस ह्या जगांत येऊन करावयाचें काय, त्याचप्रमाणें ह्या आयुष्यरूपी देणगीचा सदुपयोग करावा कसा हे प्रश्न मनाला विचारणें महत्वाचें ठरतें. कांहीं मनुष्यांस ह्या जगांत एक नेमका हेतु साध्य करावयाचा असतो व कांहींना नसतो. आपल्या हातून होण्याजोगतें असेल तेवढें करणें व साध्य असेल तितकी स्वतःची उन्नति करणें हा आपला मुख्य हेतु असला पाहिजे.

हम्बोल्ट ह्मणतो—"वाढीच्या मानानें संगतवार अशा प्रकारचें वळण देऊन सर्व शक्ती पूर्णपणें विकसित करणें हें आपलें मुख्य काम असलें पाहिजे." अथवा पॉल जीन रिक्टर[१] ह्मणतो त्याप्रमाणें, "आपल्या अंगीं जी करामत असेल ती बाहेर व्यक्त होईल असा आपण यत्न करावा. मात्र हें केवळ स्वार्थबुद्धीनें करण्याचा यत्न करूं नये. नाहीं तर अपयश यावयाचेंच." बेकन ह्मणतो—"स्वार्थबुद्धीनें दौलत मिळविणें हें ह्या जगांत जन्म घेऊन करण्याचें योग्य काम नव्हे. प्लेतो, ॲरिस्तॉतल, बुद्ध, सेंट पॉल इत्यादि मोठ्या मनाच्या माणसांचें स्वार्थबुद्धीनें स्वतःला पूर्णतेस आणण्यांत समाधान झालें नसतें."

तर मग परार्थबुद्धीनें स्वतःची सुधारणा केली पाहिजे असें आपण धरून चालूं. हें जर धरून चाललों तर आपणांस

---

१. जीन पॉल रिक्टर.

मोठेंच मनोरंजक काम करावयाचें आहे असें दाखवितां येईल. टॉमस ब्राऊनचे आयुष्यांत फारशा घडामोडी, किंवा संताप करणाऱ्या गोष्टी घडल्या नव्हत्या. त्याचें आयुष्य बहुतेक संथपणांत गेलें होतें. तरी पण आपल्या आयुष्यक्रमाचें पुढें लिहिल्याप्रमाणें तो वर्णन करितो—“माझें तीस वर्षांचें आयुष्य ह्मणजे एक चमत्कार होऊन गेला. तो जर सांगूं लागलों तर तें चरित्र असें वाटणार नाहीं तर एकादें काव्य आहे, अथवा एकादी कल्पित गोष्ट आहे असें वाटेल.”

रेहॉबोअमचे काळापासून तों लॉर्ड चेस्टरफील्डच्या काळापर्यंत लोकांना उपदेश करण्याचें काम ह्मणजे शिव्या खाण्याचें होय. न्यूझीलंडमधील बाव्यावर जो वाईट प्रसंग गुदरला तो मी विसरलों नाहीं. त्याच्या विषयीं त्या लोकांच्या राजानें एका पाद्र्याला असें सांगितलें, “तो आह्मांला इतका उपदेश करूं लागला कीं, आह्मीं त्याला शेवटीं ठार मारिलें.” “जे लोक पहिल्यानें बऱ्या बोलानें फुकाचा उपदेश घेत नाहींत त्यांना शेवटीं पश्चात्ताप फार महाग घ्यावा लागतो” हें खरें आहे, ह्मणून ज्यांना स्वतःच्या जन्माचें सार्थक्य करावयाचें असेल व आपली उन्नति करावयाची असेल किंवा ज्यांना नांवारूपास यावयाचें असेल त्यांना त्यांच्या हितास्तव कांहीं सूचना करणें हा माझा मुख्य उद्देश आहे.

मनुष्यें योग्य संधि कशी फुकट घालवितात, हें पाहून खरोखरी वाईट वाटतें. ईश्वरानें दयेनें दिलेल्या देणग्या बेपरवाईनें फुकट घालवितात. त्या न घालविल्या तर किती लोक सुखी होतील! तुह्मी जीं सुखें ह्मणून मानितां तीं परिणामीं खरीं सुखकारक आहेत, व काल्पनिक नाहींत हें ठरविण्याची खबरदारी घ्यावी. आपण पुष्कळ गोष्टी, सुखें मानिलेलीं आहेत, ह्मणून करितों, परंतु त्यांनांच जर दुसरीं नांवें दिलीं असतीं तर आपण

त्यांचा मनापासून तिटकारा केला असता. पुष्कळ लोकांना आपण पुढें मागें उपयोगीं पडण्याजोगतें कांहींच करीत नाहीं हेंच आपण सुख भोगीत आहोंत असें वाटतें. कांहीं लोक कर्मेंद्रियांचीं सुखें हाच सुख ह्या शब्दाचा अर्थ घेतात. परंतु खरें पाहिलें असतां, मनाला होणारें सुख हें चिरस्थायी असून, अगदीं उत्कृष्ट आहे.

आपणास एक शरीर असतें, त्याची पण आपण हयगय करितों, अथवा बेपर्वाईनें त्याला इजा करून घेतों. आणि मनाची संपत्ति बहुतेक अंशीं शरीरसंपत्तीवर अवलंबून असते. कला-कुसरीच्या वस्तूंपासून जितकें सुख व्हावें त्याचें अर्धें देखील सुख आपणास मिळत नाहीं; नॅशनल गॅलेरी (चित्रमहाल) पहाण्यास लंडनामधील किती लोक गेले असतील कुणास माहीत? निर-निराळ्या शास्त्रांचा उत्कर्षापकर्ष कळण्याजोगतें वळण आपण स्वतःला देत नाहीं. इंग्लंडांतील पदार्थसंग्रहालय किती लो-कांनीं पाहिलें आहे? अथवा त्याची योग्यता कळण्यापुरती तयारी किती लोकांची आहे? ह्या भूतलावरील किंवा डोकीवर असलेल्या आकाशांतील सुंदर पदार्थांपासून आपलें चित्त जेवढें रमावें तेवढें रमत नाहीं. एवढें खरें कीं आपण गायनकलेपासून बरेंच रंजन करून घेतों, तरी पण जितकें घ्यावें तितकें घेत नाहींच. प्राण्यांना फक्त उपजतबुद्धि असते व मनुष्य मात्र विचारी प्राणी आहे अशी आह्मी शेखी मिरवितों तरी पण आमच्या बढाई मारलेल्या विवेकबुद्धीपासून माणसाच्या सुखास आह्मीं भर ती किती पाडली? तारतम्यभावानें विचार केला तर आपणास मन असणें हें एक तोटा करणारें पिढिजाद आलेलें वतन आहे कीं काय, व सुख तर राहिलेंच पण दुःख देणारा हा एक झरा आहे कीं काय, असा संशय उत्पन्न होतो, व असला प्रश्न सिनीक लोकांनीं केला देखील आहे.

जनावरें मात्र स्वतःला दुःख करून घेत नाहींत, पण मनुष्य करून घेतो. "मनुष्य लटक्या मायेंतून चालला आहे. आणि कारणाशिवाय स्वतःला त्रास करून घेतो." आपण संशय, भीति, चिंता इत्यादींनीं स्वतःला ग्रासून घेतों. आपण सर्व बाजूंनीं रहस्यानें वेढलेले आहोंत. परंतु त्याला त्रासतां कामा नये.

आपण त्याला त्रासतां कामा नये. पण सावध रीतीनें वागलें पाहिजे. ज्या ठिकाणीं फारशी चुकी होणार नाहीं असें वाटतें त्या ठिकाणीं देखील सावध असलें पाहिजे. लार्ड चेस्टरफील्ड म्हणतो—"आपले सद्गुण योग्य आटोक्यांत ठेवण्यास जितकी खबरदारी ठेवावी लागते त्यापेक्षां प्रतियोगीभावानें असणारे दुर्गुण टाळण्यास कमी खबरदारी लागते. दुर्गुणाचें खरें स्वरूप इतकें ओंगळ असतें कीं, तो पाहिल्याबरोबर मनांत तिटकारा उत्पन्न होतो. व सद्गुणाच्या रूपानें तो आरंभीं आपणास भासला नाहीं तर आपलें मन त्याकडे ओढावयाचेंच नाहीं." अंगीं मुळचें सौजन्य असून ज्यांनीं आपलें हृदय निर्दय व कठोर करून घेतलें आहे असे लोक सर्वांना आढळतात. लार्ड पामर्स्टननें, सर्व मुलें जात्या चांगलीं असतात असें ह्मणून, धर्मविद् लोकांची खरमरीत टीका आपणावर ओढवून घेतली होती. तरी पण मनुष्य अगदीं दुष्ट होण्यास खरोखर बराच वेळ लागतो.

"[१]जगांतील खोटसाळपणाच्या व्यवहारानें मनुष्य एकदम बिघडत नाहीं. आपला जन्मस्वभाव बदलण्यास बराच वेळ लागतो, व बरेच श्रम पडतात, ही एक ईश्वराची मोठी दया होय. ज्याप्रमाणें व्हल्कन आकाशांतून एका दिवसांत भ्रष्ट झाला त्याप्रमाणें आपण सद्गुणांपासून एकदम हरत नाहीं."

ह्याप्रमाणें आपण व्यक्तीचा विचार केल्यावर जातीबद्दल

---

१ सर टामस ब्राऊन.

विचार करूं लागलों ह्मणजे, अनुकूल गोष्टींची जी आपण हयगय करितों ती अधिक आश्चर्यकारक वाटेल. अद्यापि मनुष्यजातीला न्यूटनप्रमाणेंच ह्मणावें लागत आहे,—" आह्मीं सर्व ज्ञानसमुद्राच्या किनाऱ्यावरच मुलांप्रमाणें खेळत आहोंत, व मधून मधून नेहमींपेक्षां अधिक सुंदर शिंपा, अधिक नाजूक गवत गोळा करीत आहोंत एवढेंच. बाकी ज्ञानाचा तो अज्ञात महासागर आमच्या पुढें तसाच पसरलेला आहे." ज्याचे सर्व उपयोग व सर्व धर्म आपणांस माहीत आहेत असा एकही पदार्थ नाहीं. सकाळपासून संध्याकाळपर्यंत आपण खपत असतों. पण पदार्थांचे गुण, धर्म, व सृष्टीचे स्वतःसिद्ध नियम ह्यांचा पूर्ण उपयोग करून घेतां आला असता तर एक दोन तास श्रम करून आपल्या शरीरास लागणाऱ्या व अवश्यक सर्व गरजा पुऱ्या झाल्या असत्या, व आपल्या मनाची व मनोभावांची उन्नति करण्यास पुरेसा वेळ राहिला असता.

वाफेचा आपण जेवढा उपयोग करून घ्यावा तेवढा करून घेत नाहीं. आह्मी लहान असतांना विजेचा उपयोग लोकांना माहीत नव्हता. आतां तरी तो नुक्ताच कोठें कळूं लागला आहे. अद्यापि नद्यांचा वेग फुकट जात आहे. माणसाला बेशुद्ध करण्याची युक्ति पूर्वीं सांपडली असती तर किती असह्य दुःखें कमी करितां आलीं असतीं. असल्या प्रकारचीं उदाहरणें घेऊं लागलों ह्मणजे तीं संपविण्यास एक निराळा ग्रंथ लागेल. हजारों नवीन शोध पुढें लागणार आहेत किंवा लागण्याच्या सुमारांत आहेत असें कोण कबूल करणार नाहीं ? हा अफाट ज्ञानसागर आपल्या पुढें अज्ञात असा पसरलेला असतांना, एकमेकांचा नाश करण्यांत, आणि मुलुखांकरितां पशूंप्रमाणें भांडण्यांत कोट्यावधि रुपये ख्रिश्चन ह्मणवून घेणारीं राष्ट्रें खर्चीं घालतात—निव्वळ

पाण्यांत टाकितात—हें आश्चर्यकारक नव्हे का? गेल्या पिढींत पुष्कळ मुलें शिकल्या सवरल्याशिवाय राहिलीं तरी आह्मांस चालत असे. आतां देखील, शिक्षण फार झालें असें ह्मणतांना कांहीं लोकांना आपण ऐकतों. परंतु सध्यांचें शिक्षण लोकांच्या आयुष्यक्रमास उपयोगी नाहीं हा बहुतेक उदाहरणांत त्यांच्या बोलण्याचा अर्थ असतो, व हेंच त्यांत तथ्य असतें. ज्यांना शिक्षणामागें होणारा खर्च आवडत नाहीं असे कांहीं लोक अद्यापि आहेत. परंतु अज्ञानापासून अंतीं जास्त खर्च होतो हें त्यांना कळत नाहीं. आपल्या बहुतेक सर्व मुलांना सध्यां थोडें तरी शिक्षण मिळतें. मात्र आपली शिक्षणपद्धति योग्य आहे किंवा नाहीं ह्याबद्दल दोन मतें असण्याचा संभव आहे. परंतु त्या वादांत ह्या ठिकाणीं शिरूं इच्छित नाहीं. इतकें मात्र ह्मणतों कीं,—आह्मी शाळेंतून नीतिशिक्षणाची अयोग्य हयगय चालविली आहे. ह्याचा एक परिणाम असा झाला आहे कीं, ईश्वराच्या दहा आज्ञा मोडल्या तर वाईट काम होतें, व केव्हां केव्हां त्यापासून इतरांस दुःख होतें, हें खरें आहे, तरी त्यापासून आपणांस ऐहिक सुख होतेंच व चांगली स्थिति येते. आपमतलबीपणा, कंजूसपणा, दारूबाजी, आळस इत्यादि ख्यालीखुशालीचे दुर्गुण अन्याय्य खरे व त्यापासून लोकांचा तोटा होतो, तरी स्वतःचा नफाच व्हावयाचा. "आपल्या स्वतःबद्दलचाच विचार केला तर आयुष्य चैनींत घालवावें अशी इच्छा माणसास साहजिक होते. आपल्या अंगीं चांगले गुण आणणें व सद्गुणी होणें हें किती जरी चांगलें असलें, त्यांत किती जरी मोठेपण असलें, तरी त्यांत अपायहीन अशा करमणुकीच्या गोष्टींस देखील फांटा द्यावा लागतो; आणि सर्व आयुष्याचा व्यापक विचार केला तर असलें

आयुष्य ह्मणजे परार्थाला वाहिलेलें कडकडीत व्रतच होय." इ० इ० नवीन मतें उत्पन्न झालीं आहेत.

"सतत श्रम करून अपमानकारक व कुणबटास योग्य असा धनगराचा धंदा पत्करण्यांत, व दुःसाध्य सरस्वतीचें वायफळ ध्यान करण्यांत काय फायदा? ज्याप्रमाणें शृङ्गारी लोक गर्द छायेमध्यें अमरिलिसबरोबर क्रीडा करितात, अथवा नीरेच्या केशपाशाशीं खेळत असतात त्याप्रमाणें केलेलें बरें नाहीं काय ?[१]"

पण खरी गोष्ट ह्याच्या उलट आहे. दुर्गुणाला बन्धनाशिवाय व मर्यादेशिवाय राहण्याचा हक्क आहे हें खोटें आहे; इतकेंच नव्हे तर दुर्गुणी माणसांना अगदीं दुष्ट अशा धन्याच्या ह्मणजे स्वतःच्या मनोविकारांच्या बंदेगुलामींत असावें लागतें.

आणखी—कांहीं तरुणांना वाटतें कीं, छंदांत पडणें ह्यांत मर्दपणा आहे. पण कोणत्याही गयाळ मूर्खाला दुर्गुणी होतां येतें. मात्र सद्गुणी होण्यास अंगांत मर्दुमकी हवी. सद्गुणी होणें ह्मणजे सर्व बन्धनांतून मुक्त होणें होय. दुर्गुण ही खरी गुलामी. अमुक एक वर्तनक्रम वाईट ह्मणून आपला अपकर्ष होतो असें नव्हे. तर त्यापासून अपकर्ष होतो ह्मणून तो वाईट. नीतीच्या तत्वांमध्यें जर एकादा विलक्षण फेर झाला व वाईट तें चांगलें ठरलें तर त्यापासून मनाची शांतता नष्ट होईल.

पाप आणि दुःख हीं एकमेकांशीं कार्यकारणभावानें चिकटलेलीं असतात, ही प्रतिज्ञा सिद्ध करून दाखविण्याकरितां एकाद्या वेदांत्याचें वार्तिक आणित नाहीं. असल्या मुद्याबद्दल लॉर्ड चेस्टरफील्डसारख्या व्यवहारांत कसलेल्या माणसाच्या पुराव्यावर माझी जास्त भिस्त आहे. तो आपल्या मुलास पाठविलेल्या पत्रांत उपदेशाच्या आणखी कांहीं गोष्टी बोलल्यावर शेवटीं असें

१ मिल्टन.

लिहितो—" सद्गुणांस असलीं बक्षिसें नेहमीं मिळतात. ह्मणून तुला मोठें व सद्गुणी व्हावयाचें असेल तर असल्या शुद्धवर्तनी लोकांचा कित्ता घ्यावास. सुखी होण्यास हाच एक रस्ता आहे."

डेकार्टनें व्यवहाराबद्दलचे सर्व नियम चार वचनांत आणिले आहेत. वचन पहिलें—ज्या देशांत व ज्या धर्मांत आपण जन्मास आलों त्या देशाच्या व त्या धर्माच्या कायद्याप्रमाणें वागावें. दुसरें—कृति करण्याची वेळ आली ह्मणजे आपल्या अल्प बुद्धीप्रमाणें चटकन् काम करावें व मनास फारशी हुरहुर लावून न घेतां काय निष्पन्न होतें तें पहावें. तिसरें—आपल्या इच्छा मर्यादित करण्यांत सुख मानावें, त्या तृप्त करण्यांत सुख मानूं नये. चवथें—सत्याचा शोध करणें हेंच आपल्या जन्माचें सार्थक मानावें.

लिली आपल्या इफ्यूस नांवाच्या पुस्तकांत आपला उपदेश थोडक्यांत अशा रीतीनें सांगतो. (हें पुस्तक एकदां फार लोकप्रिय होतें.) "सूर्यास्तीं निजावें, कोंबड्याच्या आरावाबरोबर उठावें, नेहमीं आनंदी व विनयशील असावें, गांभीर्य अंगीं ठेवावें, पण दुर्मुखलेलें नसावें. अंगीं शौर्य असावें, पण साहसांत पडूं नये. पोषाख चांगला करावा. पथ्यकर अन्न खावें. पण फाजील खाऊं नये. ज्याच्या योगानें खरोखर करमणूक होईल अशा गोष्टी कराव्या. वेळ खरोखर मनोरंजनांत घालवावा. कारणाशिवाय कोणाबद्दल संशय घेऊं नये, पण पुराव्याशिवाय कोणत्याही गोष्टीवर विश्वास ठेऊं नये. प्रत्येकाचें मत घेण्याएवढें आपलें मन हलकें नसावें. तरी पण आपलेंच खरें इतकें हट्टी असूं नये. ईश्वराची सेवा करावी. ईश्वराची भीति बाळगावी. त्याच्यावर प्रीति करावी. ह्मणजे तुमच्या इच्छेनुरूप व तुमच्या मित्रांच्या इच्छेनुरूप तो तुह्मांला आशीर्वाद देईल."

विचारशून्य, आपलपोटे, आणि दुष्ट असेच लोक कांहीं गोष्टी

आपल्या हिताच्या मानून त्या मिळविण्याकरितां बिनदिक्कत झटतात, व अशा रीतीनें आपल्याला व आपल्या बरोबर इतर लोकांना दुःखार्णवांत टाकितात असें केवळ नाहीं, तर पुष्कळ चांगलीं माणसें व चांगलीं पुस्तकें, चांगल्या इराद्यानें—ह्यांत तिळप्राय संशय नाहीं--बहुतेक असलीच चुकी करितात. त्यांनीं पापाचरणांत घालविलेलें आयुष्य ह्मणजे सुखाचें, सद्गुण ह्मणजे आत्मनाश, व देहदंडन ह्मणजे धर्म असें लिहिलें आहे. इन्कीझिशन हें असल्याच प्रकारचें तत्व विकोपास गेल्याचें उदाहरण होय. इन्कीझिशनमधील बरेच लोक फार चांगले होते. ते स्वभावानें फार दयाळु, व क्षमाशील होते ह्यांत संशय नाहीं. मात्र ख्रिस्ती धर्माचें खरें तत्व समजण्यांत त्यांची चुकी झाली होती. जगांत सुखकारक ह्मणून जेवढें तेवढें धर्मदृष्ट्या वाईट असलें पाहिजे. धर्माची खरी वृत्ति माणसाचा स्वभाव तिरसट, तुसडा, व दुर्मुखलेला करिते. त्याचप्रमाणें ही तेजोमय सूर्यकिरणांनीं प्रकाशित, आपल्याला वेष्टून असणारी सृष्टि अपकारकारक वस्तु आहे, व त्यांत सुख मुळींच नाहीं. ती माणसास वारंवार मोह व्हावा ह्मणून पापरूपी सैतानानें उत्पन्न केलेली आहे. शुभस्वरूपी ईश्वरानें आपणांवर ज्या सुखकारक वस्तूंचा वर्षाव केला आहे त्यांपैकीं ही नव्हे. असें ह्मणणारीं चांगलीं शहाणीं सुर्तीं माणसें नेहमींच्या परिचयांतलीं आहेत. कूपरनें ह्याचेंच सुंदर कवितेंत वर्णन केलें आहे. तें असें:—"जेथें दुःख मुळींच नाहीं अशा लोकाप्रत नेणारा मार्ग दुःखानें परिपूर्ण आहे, व तोच तेवढा मार्ग होय."

दुःख पाहिल्याशिवाय आपलें आयुष्य जाईल असें कधीं होणार नाहीं हें खरें आहे. जेथें प्रकाश आहे तेथें सांवली असलीच पाहिजे. आयुष्याच्या मर्यादितपणामुळें आपल्या आवडीचीं माणसें परलोकवासी झालीं, ह्मणजे आपणांवर जीं दुःखें ओढवतात

तीं घटकाभर एकीकडेस ठेविलीं तरी हें आयुष्य इतकें घोंटाळ्याचें आहे, हें जग अजून इतक्या तारुण्यावस्थेंत आहे, आपल्या जीवितास किती गोष्टी आवश्यक आहेत ह्याबद्दल आपणांस इतकी थोडी माहिती आहे, त्याचप्रमाणें आपल्या सभोंवार पसरलेल्या पदार्थांचें, त्यांच्या गुणावगुणांचें, व धर्माचें आपणांस इतकें कमी ज्ञान आहे कीं, पुष्कळ दुःखें व संकटें गुदरणार हें आपणांस लक्षांत ठेविलें पाहिजे. परंतु विपत्तीनें भरलेल्या असल्याच रस्त्यानें स्वर्गास जातां येतें, ह्मणून येथें आयुष्य जर आनंदांत काढिलें तर परलोकीं आपणांस दुःख भोगावें लागेल, असें कूपर कवि खात्रीपूर्वक सांगतो. ह्या अगदीं चुकीच्या समजामुळें पुष्कळ विचारशील व धर्मभीरु माणसांना दुःख व काळजी वहावी लागते. पुष्कळ आनंदी स्वभावाच्या तरुणांस आपणांला सुख होतें, ह्मणून स्वतःला दोष लावून व त्रास करून घ्यावा लागतो. वास्तविक पाहिलें असतां ही आनंदी स्वभावाची देणगी ईश्वरानें दिली, एतदर्थ त्यांनीं ईश्वराचे आभार मानिले पाहिजेत. दुःखामुळें व दुखण्यामुळें ज्यांच्या हृदयांतील आनंदाचा व सुखाचा झरा सुकून गेला असेल, अशा माणसांचा आयुष्यक्रम सुखाचा करून देण्याचा अमूल्य हक्क आपणांकडे दिला आहे, असें वरील प्रकारच्या माणसांस वाटलें पाहिजे. कूपर हा स्वतः प्यूरिटन नव्हता. तरी त्याच्या लिहिण्यांत प्यूरिटन लोकांच्या मतांची थोडी बहुत भेसळ आहे. मेकॉले ह्मणतो—"प्यूरिटन लोकांनीं अस्वलें झुंजविण्याचें बंद केलें तें त्यांना इजा होते ह्मणून नव्हे, तर त्यापासून पाहणारांना आनंद होतो ह्मणून."

ह्या जननमरणाचें गुह्य काय हें शोधून काढण्यांत पुष्कळ लोक स्वतःला त्रास करून घेतात. तरी "शहाण्या व धार्मिक माणसाला कधीं कधीं जगाचा संताप येतो, व कधीं कधीं त्याला

जगांत घडणाऱ्या गोष्टींबद्दल वाईटही वाटतें. परंतु ज्यानें जगांत येऊन कर्तव्यकर्म बजाविलें, अशा कोणत्याही माणसाला जगाचा कंटाळा येत नाहीं[१]. "

" ईश्वर दयालु आहे अशी ज्याची अनुभूति, त्यालाच ह्या संसाराचें गुह्य उमजलें[२]. " सेनिका ह्मणतो—" जें केल्यापासून आपणांस सुख होत नाहीं असें कोणतेंही कर्तव्यकर्म नाहीं; किंवा ज्याचा प्रतिकार करितां येत नाहीं असा एकही मोह नाहीं. " मिल्टन ह्मणतो—" सृष्टीला दोष देऊं नकोस, तिनें आपलें काम बजाविलें आहे; आतां तूं आपलें काम कर. " ह्या सृष्ट पदार्थांचा आपण पूर्णपणें उपभोग घ्यावा अशी जर ईश्वराची मर्जी नसती, तर त्यानें सृष्ट पदार्थ डोळ्यांला सुंदर वाटण्याजोगे व कानांला गोड लागण्याजोगे कां उत्पन्न केले असते? त्याचप्रमाणें सन्मार्गानें चालून मनुष्य जें सुख मिळवितो, व इतर लोकांस जें स्वास्थ्य देतो, त्याची किंमत करणें अशक्य आहे.

माझ्या मतें, होऊन गेलेल्या सर्व युगांत सध्यांचें युग पुष्कळ अंशीं आश्चर्यजनक, लोकांना मनोरंजक वाटणारें, व शिक्षित दशेस आलेलें आहे असें जर ह्मटलें, तर तें केवळ आपल्या नशिबानें झालेलें आहे; स्वतःच्या मेहनतीमुळें नव्हे. ह्मणून त्याबद्दल आपणांस डौल मिरवावयास नको. त्याबद्दल आपण ईश्वराचे आभारी असलें पाहिजे.

त्याबद्दल आपण कृतज्ञ असावें, व जगांत सुखोपभोगाच्या ज्या असंख्य गोष्टी आहेत त्यांचा पूर्णपणें आस्वाद घ्यावा. तथापि आपणांवर दुःखें येऊं नयेत, किंवा आपणांस कशाची काळजी नसावी, ही आशा मनांत वागवितां कामा नये. " विचारी माणसांस हा संसार आनंदमय वाटतो, व विकारबद्ध लोकांस तो

---

१ साउथी. २ व्हिटिअर.

शोकपर्यवसायी वाटतो " असें वॉलपोलनें संसाराचें वर्णन केलें आहे. पुष्कळदां संसार आनंदमय वाटतो. बऱ्याच वेळीं तो शोकमय वाटतो. परंतु संसार आपणांस वाटेल तसा मानितां येईल, असा साधारण नियम आहे. सॉक्रेतीस असें ह्मणतो—" चांगल्या माणसास, ह्या संसारांत जिवंतपणीं काय, व मेल्यावर काय, कोणतेंही दुःख नाहीं. " आणि खरोखर संसार शोकपूर्ण आहे असें सांगत फिरणाऱ्या विद्वानांपेक्षां तो आनंदमय आहे असें सांगणाऱ्या लोकांचें ह्मणणें अधिक खरें ठरतें. आपणांस दुःखाचा व शोकाचा एकेक क्षण मोजण्याची संवय आहे. पण सुखांत घालविलेलीं वर्षांचीं वर्षें मोजतांना गाळण्याचा संभव आहे.

आपणांस नेहमीं यश येईल असें वाटतां कामा नये. सृष्टीचे नियम कधीं कधीं व्यर्थ होतात. पण "[1]ज्वानीच्या भरानें व लक्ष्मीच्या मदानें आपण फुगूं नये, किंवा पडता काळ आला ह्मणून बऱ्याबद्दल निराश होऊं नये." बैबलमधील सर्वांस माहीत असलेल्या भागांत असें सांगितलें आहे—"मनुष्यास नाशाप्रत नेणारा रस्ता मोठा आहे, व त्याचा दरवाजाही मोठा आहे. व त्या रस्त्यानें जाणारे लोकही पुष्कळ आहेत; कारण सदाचरणाचा रस्ता फार अरुंद असून त्याची देवडी लहान आहे, व तेथें जाणारे लोकही थोडे आहेत."

परंतु लोक ह्या उताऱ्याचा वारंवार भलताच अर्थ करितात. सदाचरणाचा खरा रस्ता बिकट व संकटमय आहे, असा ह्या उताऱ्याचा अर्थ नव्हे. त्याचा इतकाच अर्थ कीं, तो लहान आहे व सहज मिळण्याजोगा नाहीं. हा खरा रस्ता एकच आहे. पण त्यापासून दोन्ही बाजूंस फुटणारीं बरींच वळणें आहेत. समुद्रांतून प्रवास करणाऱ्या गलबतास एकच खरा रस्ता असतो.

---

१ बोइथिअसचें आल्फ्रेड राजानें केलेलें भाषांतर.

होकायंत्रानें दर्शविलेल्या इतर दिशा गलबतास ज्या बंदरास जावयाचें असेल त्याहून भलतीकडे नेतात. हें सर्व खरें. पण खरा रस्ता ह्मणजे फार बिकट असतो, व इतर रस्त्यांपेक्षां त्यांत जास्त संकटें येतात, असें ह्यावरून निघत नाहीं.

वाईट व मूर्खपणाचें वर्तन अनेक वेळां मजेदार वाटतें व कधीं कधीं त्यापासून सुखही होतें, हें खोटें ह्मणतां येत नाहीं. व तसें ह्मणणेंही चुकीचें होईल. तें, ह्या जगांत मोह ह्मणजे नाहीं, असें ह्मणण्यासारखें होय. मला इतकेंच दाखवावयाचें आहे कीं, असल्या मोहपाशांत पडून जें क्षणिक सुख आपण मिळवितों, तें पुढील दुःखाचा मोबदला ह्मणून होय. सारासार विचार केल्यावर जो फायदा कःपदार्थप्रमाणें वाटेल, असल्या फायद्याकरितां खऱ्या फायद्याच्या गोष्टींस आपण आंचवितों. इसोनें ज्याप्रमाणें आपली वडिलोपार्जित संपत्ति कांजीच्या पेल्याकरितां विकली, त्याप्रमाणें आपण करितों. सध्यां मी ह्या जगाबद्दल विचार करीत आहें, तेव्हां, ह्या जगांत सुख मिळावेंसें वाटत असल्यास, आपलें आचरण शुद्ध असलें पाहिजे असें ह्मटलें तर अतिशयोक्ति केल्याप्रमाणें होणार नाहीं. मनोविकारांस वश झाल्यामुळें जें सुख मिळतें, त्यापेक्षां जास्त सुख आत्मसंयमनामुळें मिळतें.

संपत्ति व सुख एका ठिकाणीं असतात असें नव्हे. ज्यांच्या योगानें ह्मणून सुख व्हावेंसें वाटतें, अशा सर्व गोष्टी अनुकूल असतांनाही दुःखी असलेलीं माणसें पुष्कळ आहेत. "दैव आपणांस पुष्कळ देतें, पण तें दिलेलें पुरेसें वाटण्यास मनाची शांति पाहिजे[१]." "माझें मन मला सार्वभौम राष्ट्राच्या किंमतीचें वाटतें, कारण त्यापासून मला प्रत्यक्ष भासणारें सुख मिळतें[२]."

---

१ बॉईल. २ डायर.

व्हावेनारगूस ह्मणतो—"संपत्ति, मानमरातब, मोठमोठे हुद्दे इ० मिळणें माणसाच्या हातीं नसतें; पण उदार, शहाणें, व चांगलें होणें हें प्रत्येकाच्या हातीं असतें." आपणांजवळ जें वित्त असतें ती आपली खरी संपत्ति नव्हे; आपल्या अंगीं जें कांहीं असतें ती आपली खरी संपत्ति होय. आपणांस इतर माणसांपेक्षां ज्या जास्त सवलती असतात, त्यांचा मोबदला[1] ह्मणून आपल्या शिरावर त्या मानानें जास्त जोखीमही असतें. क्रायसोस्तम साधू ह्मणतो—"हा संसार रंगभूमीवर आणलेल्या नाटकाप्रमाणें आहे; व माणसांचें काम पात्रांच्या कामाप्रमाणें आहे. संपत्ति, आपत्ति, राजे, प्रजा व ह्यांसारख्या इतर गोष्टी नाटकांत दाखविलेले अंक होत. जेव्हां हा संसार आटपेल, तेव्हां हें नाटकगृह बंद होईल; व सोंगांचे पोषाख उतरवून ठेवावे लागतील. नंतर प्रत्येकाची त्याच्या कर्मासकट तपासणी होईल. तेव्हां त्याच्या संपत्तीचा, त्याच्या हुद्याचा, त्याच्या अधिकाराचा विचार व्हावयाचा नाहीं; तेव्हां फक्त त्याच्या कर्माचा विचार होईल." आपलें कर्म कसोटीस उतरेल अशी आपण आशा करूं या.

आतां आपलें कर्म कसून पाहण्याची सहाण कोठली? आपण किती गोष्टी केल्या हें आपल्या कर्माचें माप नव्हे, तर किती गोष्टी करण्याचा यत्न केला हें माप होय. आपण ह्या जगांत नांव मिळविलें किंवा नाहीं हें खरें माप नव्हे, तर नांव मिळविण्यास आपण खरे लायक होतों कीं काय? "ज्याला दुसऱ्याच्या मर्जीवर अवलंबून रहावें लागत नाहीं, ज्याचें रक्षणाचें कवच ह्मणजे शुद्ध विचार, ज्याचें चातुर्य ह्मणजे खरें सांगण्याची इच्छा, त्याचा जन्म किती सुखाचा! त्याचें किती चांगलें शिक्षण!"

वास्तविक पाहिलें तर खरें सुखी आयुष्य ह्मणजे शहाणपणानें

---

१. वाटन.

व सद्गुणांत घालविलेलें होय; दुर्मार्गानें व मनोविकारांच्या आधीन होऊन घालविलेलें नव्हे. पाप हें खरोखर आत्मघाताप्रमाणें आहे.

सालोमन ह्मणतो—" माझे मुला, माझे कायदेकानू तूं विसरूं नको; माझ्या आज्ञा तुझ्या मनांत नेहमीं वागूं देत; त्यामुळें तूं चांगले दिवस पाहशील, व तुझें आयुष्य उदंड होऊन तुला शांति मिळेल. "

---

१. प्रॉव्हर्ब्स.

# भाग २.

## अंगचातुर्य.

ह्मा जगांत बरें करून घेण्यास बुद्धीपेक्षां आंगच्या चातुर्याची जास्त जरूरी लागते. परंतु ज्यांना तें स्वभावतः नसतें, त्यांना तें सहज प्राप्त होत नाहीं. तरी पण, प्रायः इतर लोकांना काय वाटतें ह्याचा विचार केल्यास, तें थोडेंबहुत अंगीं येणें शक्य आहे.

इतर लोकांस खुश करण्याची संधि कधीं दवडूं नका. सर्वांशीं सभ्यपणानें वागा. लेडी मांटेग ह्मणते—"सभ्यपणानें वागण्यास दोन द्यावे लागत नाहींत, पण त्यापासून सर्व कांहीं साध्य होतें." सभ्यपणापासून जें साध्य होतें, तें पैसा ओतला तरी साध्य होत नाहीं. म्हणून, ज्याशीं ज्याशीं तुमचा संबंध घडेल त्याला आपलासा करून घेण्याचा यत्न करा. बर्लैनें एकदां इलिझाबेथ राणीला असाच उपदेश केला होता—"प्रजेचीं मनें आपलींशीं करून घ्या; ह्मणजे त्यांचा पैसा व त्यांच्या मनोवृत्ती तुमच्याच झाल्या."

बळजबरीचें जेथें चालत नाहीं असलीं कामें वारंवार अंगचातुर्यानें करितां येतात. सूर्य आणि वारा ह्मा कल्पित गोष्टीचा लिलीनें आपल्या पुस्तकांत उतारा दिला आहे. तो असा—"सूर्य आणि वायु ह्यांच्यामध्यें श्रेष्ठत्वाबद्दल जो वाद झाला, तो फार चांगल्या रीतीनें लिहून ठेविलेला आहे. एक गृहस्थ रस्त्यांतून चालत असतां, त्याचा आंगरखा उडवून न्यावा असें वायूच्या मनांत आलें; ह्मणून जोरानें वाहून तो उडवून नेण्याचा वायु प्रयत्न करूं लागला. तेव्हां तो आंगरखा त्या गृहस्थाच्या अंगाला जास्तच चिकटूं लागला. कारण वाऱ्याचा जोर जसजसा

वाढे, तसतसा आंगरखा त्याच्या शरीराभोंवतीं जास्तच गुरफटे. नंतर सूर्य आपल्या प्रखर किरणांनीं प्रकाशूं लागला. त्याबरोबर त्या गृहस्थाला उष्मा होऊं लागला. त्या उष्म्यानें काहली होऊन त्यानें आपला आंगरखा काढून टाकिला; इतकेंच नव्हे, तर बंडी देखील फेंकून दिली. हें पाहून सूर्य जिंकला असें वायूनें कबूल केलें."

समजूत पडल्यामुळें माणूस जितकें निमुटपणें काम करितो, तितकें त्याच्यावर अधिकार चालवून तो करीत नाहीं हें नेहमीं लक्षांत ठेवावें. केव्हांही अधिकार चालविण्यापेक्षां उपदेशाच्या चार गोष्टी सांगणें बरें.

"इष्ट काम गोड शब्दांनीं करून घ्यावें; तें सिद्धीस नेण्यास तरवारीचा उपयोग होतां होईल तों करूं नये."[१] राज्यकारभार करतेवेळीं देखील अधिकाराचें जूं जितकें कमी जाचेल तितकें चांगलें, हा नियम पाळण्याजोगा आहे. ज्यांच्याशीं तुमचा सहवास त्यांचा विश्वास तुमच्यावर बसेल, व त्या विश्वासाला तुह्मी लायक असाल, अशी खबरदारी ठेवा. नुसत्या हुशारीपेक्षां सद्वर्तनावरून विशेषतः पुष्कळ माणसांचें लोकांत वजन पडतें. फ्रान्सीस हार्नरला राजाच्या पदरीं मानाचा हुद्दा वगैरे कांहीं नव्हता. तरी राष्ट्रांच्या मसलतींत त्याच्या खुद्द मताचें फार वजन होतें. ह्मणून सिडनी स्मिथ त्याच्याविषयीं ह्मणे कीं, ईश्वराच्या दहा आज्ञा जणूं त्याच्या चेहऱ्यावर उमटलेल्या होत्या.

योग्य रीतीनें व न्यायास अनुसरून लोकांच्या मर्जीप्रमाणें वर्तन ठेवण्याचा यत्न करा. पण "अमुक गोष्ट आह्मांस आवडत नाहीं" असें ह्मणण्यास घाबरूं नका.

होस हो देण्याचें काम कोणालाही करितां येतें. तरी मनांत

---

१. शेक्सपीयर.

विषाद न बाळगितां एकाद्या गोष्टीस होकार देण्याचें सर्वांनाच साधत नसतें; पण नकार देणें त्याहीपेक्षां कठीण आहे. नाहीं ह्मणण्यापुर्ती भीड मोडत नाहीं ह्मणून किती लोकांचें मातेरें झालें आहे? प्लूतार्क ह्मणतो, एशिया मायनरचे लोक परागंदा झाले ह्याचें कारण एकच होय; तें हें—त्यांना "नाहीं" हीं दोन अक्षरें बोलतां आलीं नाहींत. ह्या संसारांत नाहीं ह्मणण्याची आवश्यकता आहे असें ठरलें, तर तो शब्द लोकांचीं मनें न दुखवितां बोलतां येणें हें कमी जरूरीचें आहे असें नाहीं. ज्याशीं ह्मणून आपणांस व्यवहार करावयाचा असेल त्याला तो आपल्याशीं करणें गोड वाटेल, व एक संपल्यावर दुसरा करण्यास यावें अशी इच्छा होईल, अशा रीतीनें वागण्याची खबरदारी आपण ठेविली पाहिजे. पुष्कळांस वाटतें त्यापेक्षां पैशाच्या व्यवहारांत मानापमानाचें व आवडीनावडीचें गोंवें जास्त असतें. आपणाशीं लोकांनीं ममतेनें व सभ्यपणानें वागावें असें प्रत्येकाला वाटतें. ह्मणून अर्धा टक्का अधिक देऊन जें काम होतें, त्यापेक्षां गोड शब्दांनीं व सरळपणानें तें जास्त लवकर होतें.

मनांत असल्यास प्रत्येक माणसाला गोड शब्द वापरतां येतील. "लोकांना खुष करण्याच्या नुसत्या इच्छेच्या योगानें, ती युक्ति जवळ असून जो फायदा होतो, त्याच्या निम्मेनें तरी होतो.[१]" त्याचप्रमाणें ज्यांची इतरांस खुष करण्याची इच्छा नाहीं, त्यांच्या हातून तें काम व्हावयाचेंच नाहीं. तरुणपणांत जर ही मोठी देणगी तुह्मीं संपादिली नाहीं, तर मोठेपणीं ती संपादणें अधिक जड जाईल. आंगच्या खऱ्या गुणांपेक्षां फक्त सालसपणामुळें पुष्कळ माणसांचें ऐहिक कल्याण झालेलें आहे. खरोखर पूजार्ह, दयालु, व परोपकारी माणसांना बेपर्वाई वर्तनामुळें पुष्कळ शत्रु

---

१ चेस्टरफील्डचीं पत्रें.

उत्पन्न झाले आहेत. लोकांना खुष ठेवितां येणें हें एक स्वतः-सिद्ध सुखच होय. तसें करण्याचा यत्न करा; त्यांत हिरमोड होणार नाहीं.

नेहमीं सावधगिरीनें वागावें, व डोकें शांत ठेवावें. ज्याप्रमाणें मन कोंवळें असावें, त्याप्रमाणें डोकेंही शांत असावें. व्यवहारा-संबंधीं बोलण्याचालण्यांत शांतस्वभावाचा व आत्मसंयमनाचा अमूल्य उपयोग होतो; व प्रसंगीं ह्या दोन्ही गुणांच्या योगानें संकटांतून व अडचणींतून आपणांस पार पडतां येतें.

आपणांपेक्षां कमी योग्यतेच्या माणसांबरोबर गांठी पडल्या, तरी त्यांना तुच्छ मानण्याचा आपणांस अधिकार नाहीं. वंशपरं-परेनें आलेल्या मोठ्या मिळकतीबद्दल गर्व वाहण्यांत जसा अर्थ नाहीं, तसाच बुद्धिसामर्थ्याबद्दलही वाहण्यांत अर्थ नाहीं. त्या मिळकतीचा व बुद्धिसामर्थ्याचा योग्य उपयोग केला तरच त्यांत पुरुषार्थ आहे. पुष्कळ माणसें दिसतात त्यापेक्षां जास्त हुशार असतात. माणसांची परीक्षा करण्यापेक्षां पुस्तकांची परीक्षा करणें अधिक सोपें आहे. माणसांच्या स्वभावाची परीक्षा करण्यास डो-ळ्यांची जरूरी लागते. "जेव्हां डोळ्यांवरून माणसाचा उद्देश एक दिसतो, व बोलण्यावरून तिसराच वाटतो तेव्हां शहाणे लोक डोळ्यांनीं प्रदर्शित केलेल्या भाषेवर जास्त विश्वास ठेवितात[१]."

अतिशय सख्याविषयींच्या वल्गनांवर फारसा विश्वास ठेऊं नका. प्रथमभेटीबरोबर पुरुष पुरुषांवर व स्त्रिया स्त्रियांवर प्रीति करावयास लागत नाहींत. बहुतेक, परका मनुष्य जर सलगी दाखवूं लागला व लघळपणा करूं लागला तर त्याच्या बोलण्या-वर विश्वास ठेऊं नका. कारण जरी त्याची लबाडी नसली तरी ब-हुतकरून तो आपल्या शक्तीपलीकडे करीनसें ह्मणतो, किंवा आपला

१ एमर्सन.

कार्यभाग साधण्याची त्याला अपेक्षा असते. अत एव एकाद्यानें मित्रत्वाचा केवळ आव घातला तर त्याला मित्र मानूं नका, किंवा सबळ पुराव्याशिवाय एकाद्यास शत्रु असेंही समजूं नका.

आह्मी बुद्धिमान् व विवेकी प्राणी आहोंत अशी आह्मांस आढ्यता आहे. पण मनुष्यें नेहमींच विचारशक्तीच्या अनुरोधानें वागतात असें मानणें चुकीचें होईल. मनुष्य हा चमत्कारिक व विसंगत वर्तनाचा प्राणी आहे. त्याच्या वर्तनांत मेळ नसतो. मनोविकारांच्या किंवा पक्षपातांच्या आधीन होऊन मनुष्य पुष्कळ वेळां वर्तन करितो. ह्याचा परिणाम असा होतो कीं, माणसांचे मनोविकार जागृत करून त्यांना आपलेसें करून घेतां येतें, पण त्यांच्या विचारशक्तीची खात्री करून त्यांना आपलेसें करून घेतां येत नाहीं. हें व्यक्तिमात्रापेक्षां समाजास जास्त लागून आहे.

वादविवाद करणें हें नेहमीं धोक्याचें काम असतें. त्यापासून गैरसमज किंवा स्नेहामध्यें वितुष्ट वारंवार येतें. वादविवादांत तुमचा मुद्दा खरा ठरेल, पण त्यामुळें तुमचा मित्र तुटेल. मित्र तुटून मुद्दा खरा होणें ही साधारणपणें चांगली अदलाबदल नव्हे. वादविवाद करणेंच असेल, तर प्रतिपक्षाचें जितकें तुह्मांला कबूल करितां येईल तितकें कबूल करा. जे मुद्दे सुटले असतील ते दाखविण्याचा यत्न करा. वादविवादांत आपली हार केव्हां झाली हें थोड्यांनाच कळतें, व कळलें तर तें त्यांना खपत नाहीं. आणखी हरलों असें त्यांना कळलें, तरी आपलें मत चुकीचें आहे अशी त्यांची खात्री होत नाहीं. वादविवादानें एकाद्याची खात्री करण्याचा यत्न करणें कुचकामाचें आहे, हें ह्मणणें खरोखर फारसें अतिशयोक्तीचें होईल असें नाहीं. आपलें ह्मणणें स्पष्टपणें व थोडक्यांत सांगावें, व त्यामुळें प्रतिपक्षाला स्वतःच्या मताबद्दल संशय

येऊं लागला तर तुह्मांला जें पाहिजे तें मिळालें. हा पहिला गड सर झाला.

चांगलें संभाषण करितां येणें ही एक कलाच आहे. ज्यांच्या जवळ सांगण्याजोगें पुष्कळ आहे, त्यांना संभाषण चांगलें करितां येतेंच असें नव्हे. तरी पण "डेकार्टीस किंवा सर ऐझॅक न्यूटन ह्यांच्यापेक्षां संभाषण करण्यांत जास्त तरबेज नाहींत असे पायदळावरील कप्तान थोडेच असतील," हें लार्ड चेस्टरफील्डचें बोलणें अतिशयोक्तीचें होय.

चांगलें भाषण करितां येणें जितकें कठीण आहे, तितकेंच तें सावधानपणें ऐकून घेणें कठीण आहे असें मी ह्मणणार नाहीं. परंतु कांहीं झालें तरी तें सोपें नाहीं हें खरें; व बहुतेक तें पहिल्याएवढेंच महत्वाचें आहे. सांगितलेली प्रत्येक गोष्ट टीकाकार किंवा न्यायाधीश ह्या नात्यानें तपासणीस लावून घेऊं नका. आपलें मत न देतां बोलणाऱ्याचा अंतर्गत भाव ओळखण्याचा यत्न करा. तुह्मी लोकांशीं ममतेनें वागलां, किंवा त्यांच्याविषयीं कळकळ दाखविली तर लोक तुमची सल्ला वारंवार घेतील; व दुःखाच्या किंवा संकटाच्या वेळीं पुष्कळांस आपण मदत केली, व त्यांचें समाधान आपणांस करितां आलें ह्या विचारांपासून उत्पन्न होणारें सुख तुह्मांला मिळेल. लहान वयांत लोक आपल्याकडे लक्ष्य देतील अशी वेडगळ आशा बाळगूं नका. धीर धरा, ऐका, बारीक दृष्टीनें सर्व गोष्टींचें अवलोकन करा. प्रेक्षक मंडळीस खरा तमाशा दिसतो अशी एक ह्मण आहे. तद्वतच तुह्मांला फारसें कोणी विचारीत नसलें, ह्मणजे तुह्मांला सर्व गोष्टींकडे चांगलें लक्ष्य देतां येतें. अन्तर्धान पावण्यास साधनीभूत अशी एकादी टोपीच तुमच्याजवळ आहे असें ह्मटल्यास चालेल. विचार करण्याचा

त्रास पडूं नये, (व विचार करणें बहुतेकांस कंटाळवाणें वाटतें) ह्मणून लोक तुह्मी स्वतःची जी किंमत कराल ती खरी मानितात.

स्वतःला शत्रु करून घेऊं नका; ह्यापेक्षां अधिक वाईट गोष्ट तुमच्या हातून होणार नाहीं. "मूर्खाला त्याच्या मूर्खत्वास योग्य असें उत्तर देऊं नका; नाहींतर तुह्मी देखील त्याच्यासारखेच व्हाल."

नम्रपणानें उत्तर दिलें ह्मणजे राग शमतो, हें लक्ष्यांत ठेवा. पण रागाच्या उत्तरापेक्षां खोंचून बोलणें अधिक वाईट. लोकांनीं शिव्या दिल्या किंवा एकादी दुखापत केली तरी खपते, पण त्यांनीं हिणविलेलें ज्यांस रुचत नाहीं अशीं दहांत नऊ माणसें सांपडतील. असलीं माणसें कोणत्याही दुःखाच्या गोष्टी बहुतेक विसरतील, पण आपला उपहास झाला ही गोष्ट विसरणार नाहींत.

आपण फसलों असें कळण्यापेक्षां फसण्यांत अधिक आनंद वाटतो. त्रॅसिलावस नांवाचा एक अथेन्समधील माणूस वेडा झाला, व पिरसमध्यें असणारीं जहाजें माझीं आहेत असें त्याला वाटूं लागलें; पण क्रितोनें जेव्हां त्याला बरें केलें, तेव्हां तूं मला सर्वस्वाला नागविलेंस असा तो अत्याक्रोश करूं लागला. लॉर्ड चेस्टरफील्ड ह्मणतो—"थट्टेमुळें एकादा मित्र गमावणें हें मूर्खत्व होय." पण माझ्या मतें, थट्टेवरून एकाद्या तिऱ्हाईत उदासीन माणसाचा शत्रु करणें हें मूर्खत्व कमी प्रतीचें नव्हे.

लोक आपला अपमर्द करितात, आपणांस हंसतात, असें क्षुल्लक कारणावरून समजूं नका; अथवा बोझ स्ट्रॅटेजम नांवाच्या पुस्तकांतील स्क्रब पात्राप्रमाणें "लोक खो खो हंसतात ह्मणून खरोखर ते मलाच हंसतात" असें मानूं नका. उलटपक्षीं, लोक तुमची थट्टा करूं लागले, तर आपणांस त्यापासून मुळींच दुःख होत नाहींसें दाखवा. लोक तुमची थट्टा करूं लागले व त्या

थट्टेंत तुह्मीही त्यांना मनापासून जाऊन मिळालांत, तर उलट तुह्मांला त्यापासून फायदा होईल. आपली थट्टा झाली असून थट्टेंत मिसळून जो स्वतःच हंसतो, तो माणूस प्रत्येकास आवडतो; आणि तें बरोबर आहे. कारण त्यामुळें आपला स्वभाव मनमिळाऊ आहे व आपणांस समज आहे असें दिसतें. आपण स्वतःचीच थट्टा केली, तर लोक आपली थट्टा करण्याचें बंद करितात.

स्वतःचीं मतें कबूल करण्याचें धैर्य अंगीं असूं द्या. लोक तुह्मांस मधून मधून हंसतीलच हें तुह्मी समजून असलें पाहिजे. आणि त्या हंसण्यापासून कांहीं तोटा होत नाहीं. तुह्मी खरोखर आहांत तसे बाहेर दिसलां, तर त्यांत उपहासास्पद कांहीं नाहीं. पण तुमच्या अंगीं जें नाहीं त्याचा आहे असा बळेंच आव घालणें ह्मटलें ह्मणजे बरेंच उपहासास्पद होय. नाहीं त्याच दुःखाच्या गोष्टी कल्पून लोक स्वतःला त्रास करून घेतात, संतापतात, व इतरांबरोबरची मैत्री गाळीत जातात.

मोकळ्या मनानें वागा, पण अंतर खोल ठेवा. स्वतःविषयीं फारसें बोलूं नका, व स्वतःबद्दल बाता मारूं नका. स्वतःच्या वर्तीनें किंवा स्वतःला उणेपण येईल अशा रीतीनें बोलूं नका. लोकांना स्वतांविषयीं जितकें वाटेल तितकें बोलूं द्या. ते स्वतःबद्दल बोलतात याचें कारण त्यांना तसें करणें आवडतें हेंच. तुह्मी त्यांचें ह्मणणें ऐकून घ्याल, तर तुमच्याबद्दल त्यांचें सर्वस्वीं चांगलें मत होईल. एकाद्या माणसाला तुह्मी त्यास मूर्ख किंवा दगडोबा समजतां असें कळूं देऊं नका. निदान तसें सांगणें तुमचें कर्तव्यकर्म नसलें तर सांगूं नका. जर तसें केलेंत, तर तुमच्या नांवानें दगड फोडण्याचा त्याला अधिकार आहे. तुमचें

मत कदाचित् चुकलें असेल, व तुमच्याबद्दल त्याचें मत तसेंच होईल; आणि तें कांहीं वावगें नाहीं.

बर्क एकदां असें ह्मणाला कीं, मी सर्व राष्ट्राला वाईट ह्मणणार नाहीं. नियमित वर्गाला किंवा नियमित धंद्याच्या लोकांना दूषण देणें अन्याय्य व मूर्खपणाचें आहे. व्यक्तिमात्र असलीं दूषणें विसरतात व त्याबद्दल क्षमाही करितात; परंतु समाज तसें करीत नाहीं. व्यक्तिमात्र नुकसान केल्याबद्दल सहज क्षमा करितात; तशी अपमान केल्याबद्दल करीत नाहींत. मला मान खालीं घाला वयास लाविली ही गोष्ट व्यक्तिमात्राच्या मनाला टोंचत असते. लोकांना चिडवून किंवा त्यांची थट्टा करून तुह्मांला आपलें काम करून घेतां येणार नाहीं. गयेथी "एकरमनबरोबरचें संभाषण" नांवाच्या पुस्तकांत इंग्रज लोकांची प्रशंसा करितो. ह्या लोकांचें समाजांतील संमेलन व वर्तन इतकें उजू व दमदार असतें कीं, हे लोक जेथें जातील तेथें राजे होतील, आणि हें जग त्यांचेंच आहे असें एकाद्यास वाटतें. एकरमननें उत्तर केलें—खराखर तरुण इंग्रज लोक तरुण जर्मन लोकांपेक्षां हुशारीनें, शिक्षणानें, किंवा मनानें मोठे नसतात. गयेथी ह्मणाला—हा खरा मुद्दा नव्हे. त्यांचें मोठेपण असल्या गोष्टींत नाहीं; त्यांच्या जन्माच्या मानानें किंवा संपत्तीनें ते मोठे नाहींत; त्यांचें मोठेपण वाजवी रीतीनें पाहिलें असतां ह्यांतच आहे—सृष्टीनें त्यांना जसें बनविलें तसें राहण्याचें त्यांच्या अंगीं धैर्य आहे. तीं माणसें अर्धवट नाहींत; पूर्णतेस आलेलीं आहेत. इंग्रज लोक कधीं कधीं अगदीं मूर्खपणानेंही वागतात हें मला मनापासून कबूल आहे; पण तसें वागण्यासही धैर्य लागतें, व त्याचें तेज पडतें.

कामाकाजांत व देवघेवीचीं बोलणीं चाललीं असतां अधीर होऊं नका. तुह्मी प्रथम आमची गोष्ट ऐका, मग हवी तर

कबूल करूं नका असें पुष्कळांस वाटतें. गोष्ट संपूर्ण ऐकून घेतल्यामुळें प्रतिपक्षाचें भांडण्याचें अवसान नाहींसें होतें.

विशेष सांगण्याचें एवढेंच कीं डोक्यांतून जाऊं नका, व गेलांत तर जीभ आवरून धरा; पण राग आला असें लोकांस दाखवूं नका. " राग सोडून द्या व डोकें ठिकाणावर ठेवा. आपल्या हातून वाईट गोष्ट होईल इतका संताप करून घेऊं नका."[1]

कारण, " नम्र भाषणानें रागाचें शमन होतें, पण टोंचणाऱ्या शब्दांनीं राग प्रज्वलित होतो. "

जेथें तुम्ही नकोसे असाल, तेथें आगंतुकाप्रमाणें जाऊं नका; इतर पुष्कळ ठिकाणें आहेत. जेम्स राजा माशीला उद्देशून ह्मणतो—" माझीं तीन राज्यें नाहींत का ? तर तूं माझ्या डोळ्यांतच उडावें!" कांहीं लोकांना भलत्याच गोष्टी बोलण्याची, किंवा ज्याच्या योगानें मनांत दुःखकारक गोष्टींचें स्मरण जागृत होतें, अथवा मतभेद उद्भवतो अशा गोष्टी बोलण्याची खोड असते.

माणसाची ओळख पटणें ह्या ज्ञानापेक्षां जास्त उपयोगाची अशी शास्त्राची कोणतीही शाखा नाहीं. कोणावर विश्वास ठेवावा, कोणावर ठेवूं नये, तसेंच कोणत्या माणसावर किती ठेवावा, व कोणत्या गोष्टींबद्दल ठेवावा ह्याचा शहाणपणानें निश्चय करितां येणें फार महत्वाचें आहे; व हा निकाल लावणें सोपें काम नाहीं. आपल्याबरोबर जे काम करणार, व आपल्या हाताखालीं जे काम करणार त्यांची चांगल्या रीतीनें निवड करणें महत्वाचें आहे. ह्मणजे योग्य स्थळीं योग्य माणसाची नेमणूक करणें. " एकाद्या माणसाबद्दल संशय असला तर त्याची योजना करूं नका; व योजना केली तर त्यावर संशय घेऊं नका."[2]

---

१ स्तोत्रें. २ कॉनफ्यूशस.

"जे लोकांवर विश्वास ठेवितात ते, जे विश्वास ठेवित नाहींत अशा लोकांपेक्षां, जास्त अंशीं बरोबर असतात."

विश्वास ठेवणें तो पूर्णपणें ठेवावा, पण तो फसेपर्यंत नसावा. "विश्वास ठेवावयाचा तर सर्वस्वी ठेव नाहींतर ठेवूं नकोस" असें व्हिवियनचें भाषण मूर्खपणें खरें मानून मर्लिन शहाणा होता तरी मेला.

दूरवरचा विचार करून वागा, व आपले विचार आपले जवळ ठेवा; तुमचे विचार तुह्मांला मनांत ठेवितां आले नाहींत, तर लोक ठेवितील असें समजूं नका. शहाण्या माणसाचें तोंड त्याच्या हृदयांत असतें, पण मूर्खाचें अंतःकरण त्याच्या तोंडांत असतें, कारण, जें जें त्याला कळतें व वाटतें तें तें तो बोलून दाखवितो.

डोकें खर्चा, व आपल्या बुद्धीची सल्ला घ्या. बुद्धीमुळें चूक होणार नाहीं असें नाहीं. पण तिची सल्ला घेतली असतां चूक घडण्याचा संभव कमी असतो.

बोलणें रुप्यासारखें दीपविणारें असतें, निदान असावें; पण चुप रहाणें हें सोन्याच्या किंमतीचें आहे.

बोलावयाजोगें पुष्कळ आहे ह्मणून बरेच लोक बोलतात असें नव्हे, तर त्यांना बोलणें आवडतें ह्मणून बोलतात इतकेंच. बोलणें डोक्याचें काम असावें, जिव्हेचें नसावें. ह्मणजे बोलणें विचारपरिप्लुत असावें, नुसती वटवट नसावी. चघळपणा किंवा बोलण्याची फार हौस ह्यामुळें जगांत वर येण्यास आडकाठी येते. बोलण्याच्या भरांत माणसांस भान रहात नाहीं. मनांत बोलावयाचें असतें त्यापेक्षां निराळेंच बोलून जातात; व नंतर बोललों नसतों तर बरें झालें असतें असें त्यांना वाटतें. अथवा बोलण्याच्या नादांत जिव्हेस कांहीं काम पाहिजे ह्मणूनच कीं काय, दुसरें तिसरें कारण नसतां माणसें अयोग्य गोष्ट बोलून जातात.

हा अनियंत्रित फाजील बोलकेपणा आयुष्यांत अगणित दुःखांला व त्रासांला कारणीभूत होतो. याच्या योगानें ज्या माणसाबद्दल आपण गोष्टी करितों, त्याच्या मनांत रागाचा आविर्भाव होतो. इतर मंडळींत हा तंटेभांडण उपस्थित करितो, व बारीक सारीक त्रासांचीं व अपमर्दांचीं कलमें, जीं एऱ्हवीं विसरून गेलीं असतीं, तीं विकोपास नेतो.

डेमारातसबद्दल प्लुतार्क अशी एक गोष्ट सांगतो—एकदां सभेमध्यें त्याला विचारिलें, तूं मूर्ख ह्मणून स्तब्ध बसला आहेस, कीं बोलतां येत नाहीं ह्मणून? त्यावर त्यानें उत्तर केलें—"मूर्खांचें तोंड कधींही त्याच्या स्वाधीन नसतें." सालोमन ह्मणतो—विचार केल्याशिवाय बोलणारा माणूस तुला माहीत आहे काय? असल्या माणसापेक्षां एकाद्या मूर्खाची देखील सुधारण्याची आशा पुष्कळ असते.

आह्मी काय ते शहाणे आहों असें दर्शविण्याचा यत्न करूं नका. आपण हलक्या प्रतीचे आहों असें कळल्यामुळें माणसाला जितकें वाईट वाटतें, तितकें दुसऱ्या थोड्याच गोष्टींनीं वाटतें.

बोलतांना आपल्या मतांच्या खरेपणाबद्दल हेका धरून बसूं नका. तुमचें मत खरें आहे असें किती जरी तुह्मांला वाटत असलें, तरी तें चुकीचें असेल. स्मरणशक्ति आपणांस फशीं पाडते, व कधीं कधीं आपण भलतेंच ऐकतों व पाहतों. आपलीं मतें जरी आवडीचीं असलीं, तरी त्यांना सबळ आधार नसेल. आणखी तुमचें ह्मणणें बरोबर असलें, तरी त्याबद्दल पूर्ण खात्री आहे असा हेका न धरल्यानें तुमचें नुकसान होत नाहीं.

कामकाज करितांना देखील फाजील खात्री असूं देऊं नका. व आलेली संधि फुकट दवडूं नका. "पेला हातीं घेतला तरी तो तोंडाला लावण्यापूर्वीं काय काय होईल."

ह्मटलें आहे कीं, ज्यांना धीर असतो त्यांना सर्व कांहीं साध्य होतें. तर वाहत्या गंगेंत हात धुऊन घ्या. एकादी गोष्ट करितां येते तेव्हां जो ती गोष्ट करीत नाहीं, त्याला जरूर असेल तेव्हां ती गोष्ट करितां येणार नाहीं. एकदां संधि फुकट घालविली तर ती पुनः कधीं येणार नाहीं.

"माणसाच्या कामाकाजाचाही भरतीसारखा वेळ असतो. त्या भरतीचा उपयोग केला तर दैव उघडतें. जर ती फुकट घालविली तर ह्या संसारांतला सर्व प्रवास दुःखकारक व दुर्गम होतो. असल्या भर समुद्रांत आपण आहोंत, आणि ह्मणून प्रवाहाचा उपयोग करून घेतला तर बरें; नाहीं तर, आपल्या कार्यांत अपयश येणारच."

सावधगिरीनें वागा, पण संशयी असूं नका. हातून चूक होईल त्याची विशेषशी काळजी बाळगूं नका. ज्याच्या हातून कधीं चूक झाली नाहीं, त्याच्या हातून कांहींच व्हावयाचें नाहीं. नेहमीं चांगला पोषाख करा. पोषाख करणें जरूर आहे; ह्मणून तो चांगला करावा, पण भपकेदार नसावा. तो करण्यांत व्यर्थ पैसा खर्चूं नये, व वेळ मोडूं नये; पण कापड चांगलें वापरण्याची काळजी घ्यावी. पोषाखावरून माणसाची किंमत लोक किती करितात हें पाहून आश्चर्य वाटतें. ज्यांशीं ज्यांशीं तुमचा संसर्ग होतो, ते ते लोक बहुतकरून प्रत्येक माणसाची बाह्यस्वरूपावरून किंमत करणार; व पुष्कळ माणसांना तुमची किंमत करण्यास बाह्यस्वरूपाशिवाय दुसरें साधन नसतें. डोळे व कान ह्यांच्या साहाय्यानें अंतरंग लोकांना कळतें. शंभर लोक तुह्मांला भेटले तर एकादा मनुष्य तुह्मांला ओळखील. तशांत स्वतःबद्दल निष्काळजीपणानें वागत असलां, व तुमची ठाकठीक नसली, तर तुह्मी

१ शेक्सपियर.

इतर गोष्टींतही तसलें वर्तन कराल असें अनुमान करणें जरी अगदीं बरोबर नाहीं, तरी केल्यास फारसें वावगें होणार नाहीं.

समाजांत मिसळतांना ज्यांचें वर्तन गोड असतें त्यांचें अनुकरण करा. एक जुनी ह्मण असें सांगते–"वागणुकीवरून माणूस ओळखतां येतो." "ह्यांत थोडीशी अतिशयोक्ति आहे, पण तथ्यही बरेंच आहे.[१]" "मोहक चेहरा असणें हें सततचें वशिलापत्रक होय." सद्वर्तन प्रत्येकास महत्वाचें आहे, व कांहींजणांस तेंच आदिकर्तव्य होय. "आंगचे गुण व ज्ञान ह्यानेंच फक्त लोकांचीं मनें आकर्षून घेतां येत नाहींत, लोकांचीं मनें आपलीं करून घेतल्यावर तीं तशींच ठेवण्यास मात्र हीं फार उपयोगीं पडतात. आपल्या बोलण्याची ढब आणि अभिनय ह्यांनीं लोकांचे नेत्र आपल्याकडे ओढून घ्या; लोकांचे कान आपल्या गोड व सुस्वर भाषणानें रिझवा; मग अंतःकरण खात्रीनें (माझ्या मतें बहुतकरून) तुमचें होईल.[३]" प्रत्येकाला कानाचा व डोळ्याचा उपयोग करितां येतो, पण चांगला समज थोड्यांनाच असतो. हें जग एक रंगभूमीच होय; व आपण सर्व पात्रें आहोंत. नाटक चांगलें उतरणें, किंवा न उतरणें, पात्रांचें काम जसें वठेल त्यावर अवलंबून असतें, हें सर्वांस माहीत आहे.

लॉर्ड चेस्टरफील्ड आपल्या मुलाविषयीं बोलतांना असें ह्मणतो–"जेथें जेथें त्याला लोक ओळखतात, तेथें तेथें तो सर्वांना आवडतो असें लोक मला सांगतात. मला हें ऐकून आनंद वाटतो. पण लोकांनीं त्याला ओळखण्यापूर्वीं तो लोकांस आवडूं लागला, व नंतर त्याच्यावर ते प्रीति करूं लागले तर बरें. × × × × ह्या गोष्टी फारशा महत्वाच्या नाहींत असें तुह्मांला वाटत असलें, तर मनुष्यस्वभाव तुह्मांला थोडाच अवगत आहे.

---

१ बेकन. २ मिल्टन. ३ चेस्टरफील्ड.

ह्या गोष्टींकडे जितकें लक्ष्य द्यावें तेवढें थोडेंच. मनें आपल्याकडे ओढतात तीं ह्यांनींच. व विचार हे मनापासून उत्पन्न झालेल्या बुडबुड्याप्रमाणें होत."

वाग्देवता माणसास आयुष्यांत जेवढी मदत करिते, तेवढीच सौंदर्यदेवता करिते. आवडत्याचें मसण गोड हें आपणांस माहीत आहे. ह्याचें कारण काय? तर एकास काम गोड रीतीनें करितां येतें. दुसरा तेंच वाईट रीतीनें करितो. मदन व कलाकौशल्याभिमानी देव मर्क्युरी (त्वष्टा) ह्यांचें देखील रतीच्या मदतीशिवाय भागत नाहीं.

# भाग ३.

## पैशासंबंधीं.

इंग्लंडांत लोकांना काटकसरीचें महत्व कळत नाहीं असें मला वाटतें. आमचे देशबांधव अतिशय श्रम करितात, व पुष्कळ पैसा मिळवितात; परंतु इतर राष्ट्रें काटकसरीच्या कामांत आह्मांस मागें टाकितात. एक ह्मातारा क्केकर ह्मणे—"माझ्या मुला, तूं श्रीमंत किंवा गरीब होणार ह्याचा निर्णय तूं जें कांहीं कमावशील त्यावरून करितां येत नाहीं, तर जो कांहीं खर्च करिशील त्यावरून करितां येणार आहे." "थ्रिफ्ट" हा शब्दच आपला अर्थ व्यक्त करितो. "थ्राईव्ह" ह्मणजे भरभराटीस येणें ह्या शब्दापासून त्याची व्युत्पत्ति झाली आहे.

श्रीमंत होण्याचा प्रश्न एकीकडे ठेविला तरी देखील शिलकेस टाकणें हें शहाणपणाचें व योग्य काम आहे. त्यामुळें पुढील गरजेच्या वेळची तजवीज होते. "गरीबी दरवाज्यांतून आंत आली कीं, प्रीति खिडकींतून भरारी मारून जाते," ही ह्मण नीचपणाची आहे. पण बायकापोरें ह्यांनीं अन्नान्न करावें, व कपड्यालत्त्यांसाठीं, औषधपाण्यासाठीं, विश्रांतीसाठीं अथवा हवापालट करण्यासाठीं रसताळत असावें, हें पाहून वाईट वाटतें; व जर आपण योग्य मेहनत केली असती, व अपायरहित असोत, पण जरूरीच्या नव्हेत अशा कांहीं सुखाच्या गोष्टींस फांटा दिला असता, तर त्यांना दुःखांतून व चिंतेंतून सोडवितां आलें असतें हा विचार मनाला दुःखकारक होतो. केवळ पैसा पुजून ठेवण्यासाठीं खर्चांत हात आंवरता धरणें हें नीचपणाचें कृत्य आहे.

परंतु स्वतंत्र होण्याकरितां काटकसर करण्यांत मर्दुमकी आहे व तें योग्य कृत्य होय.

नेहमीं हिशेब ठेवीत जावा, व तो मोठ्या काळजीनें ठेवावा. अर्धीन् अर्धीचा हिशेब ठेवण्यांत हांशील आहे असें माझें ह्मणणें नाहीं. पण पैशाचा व्यय किती होतो, व कोणत्या वस्तूस किती पैसे पडतात, हें जेणेंकरून आपणांस कळेल असा हिशेब ठेवावा. ज्या मनुष्याला ह्मणून आपलें उत्पन्न काय, व आपण व्यय किती करितों हें कळतें, तो उधळपट्टी करणार नाहीं. उधळे लोक आपण काय करीत आहोंत ह्याबद्दल डोळेझांप करून उधळपट्टीस आरंभ करितात. डोळे उघडे ठेवून नाशरूपी कड्यावरून कोसळण्याचें धाडस कोणी करणार नाहीं. करितां, तुह्मांला कसाही खर्च असला तरी तो आपल्या उत्पन्नाच्या आंतच ठेवा. प्रत्येक वर्षीं, अगदीं थोडें कां होईना, पण कांहीं शिलकेस टाका. कांहीं करा, पण कर्जबाजारी होऊं नका. डिकन्स ग्रंथकर्ता ह्मणतो (हे विचार जरी तो मिकॉबर नांवाच्या माणसाच्या तोंडून वदवितो, तरी ते शहाणपणाचे आहेत)—"माणसाचें वार्षिक उत्पन्न २० पौंड असलें, व खर्च १९ पौं. १९ शि. ६ पे. असला तर त्याला सुख होतें. उत्पन्न २० पौंड, व खर्च २० पौं. ० शि. ६ पे. असला तर परिणाम दुःखें." आणि पाहूं गेलें तर अंतर काय तें एका शिलिंगाचें.

कर्ज ह्मणजे गुलामगिरी असें ह्मटलें तर अतिशयोक्ति होत नाहीं. "जो कर्ज काढितो तो दुःखांत पडतो." आयुष्यांतील पुष्कळ गोष्टी आवडण्याजोग्या नसतात. हॉरेस ग्रीली ह्याला जगाचा अनुभव फार होता. त्यानें ह्मटलें आहे तें वाजवी व खरें आहे. तें असें—"क्षुधा, थंडी, फाटकीं चिरगुटें, मेहनतीचें काम,

१ डेव्हिड कापरफील्ड.

लोकांत तिरस्कार, संशय, खोटे नाटे दोष, ह्या सर्व गोष्टी कडू वाटतात; पण कर्ज ह्या सर्व गोष्टींपेक्षां अतिशय कडू आहे. कधीं कर्ज काढूं नका. तुह्मांस फक्त ५० सेन्ट्स मिळत असले, व आठवड्यांतून दुसरें कांहीं मिळण्याचा संभव नसला तर धान्य टिपरीभर विकत घ्या, तें भाजा व खाऊन रहा; पण कोणत्याही माणसाचें एका डॉलरचेंही कर्ज काढूं नका."

कॉब्डन ह्मणतो—"ह्या जगांत नेहमीं माणसांचे दोन वर्ग झालेले असतात. एक वर्ग पैसा जवळ बाळगून असणाऱ्या लोकांचा, व दुसरा वर्ग पैसा खर्चून टाकणाऱ्या लोकांचा: काटकसरी व उधळे लोकांचा. घरेंदारें, गिरण्या, पूल, जहाजें वगैरे बांधण्याचीं कामें, ज्यांच्या योगानें माणूस ऊर्जित दशेस येऊन पोंहचला आहे आणि सुखी झाला आहे अशीं कलाकुसरीचीं सारीं कामें काटकसरी लोकांनींच केलीं आहेत; आणि उधळपट्टी करणारे लोक त्यांचे गुलाम बनले आहेत. असें व्हावें हा सृष्टिनियम व ईश्वरी नियमही आहे. कोणत्याही वर्गांतील लोकांना उधळपट्टी करून, आळसांत वेळ घालवून, किंवा अविचाराचें वर्तन करून तुमचें कल्याण होईल असें जर मीं सांगितलें, तर मी खोटा ठरेन."

प्लुतार्क ह्मणे—"इफिसस् येथील आर्तिमिस् देवीच्या देवळांत जे कर्जबाजारी आश्रय घेत असत, त्यांची आपल्या कर्जदारांपासून सुटका होई व त्यांस आसरा मिळे. पण काटकसरीचें देऊळ व आश्रयस्थान धीरमनस्कांना सर्वदा उघडें आहे; व तें त्यांना आनंद, मान, व मनाची बरीच शांतता देतें; तर कर्ज काढूं नका, व कुणास देऊं नका. केवळ देवधेवीचा धंदा करावयाचा असल्यास द्या. कर्जी दिलेला तुमचा पैसा परत मिळणार नाहीं, व त्याबद्दल बरा बोलही मिळणार नाहीं. कारण, कर्जबाजारी लोकांस

आपला नाहक छळ होतो असें नेहमीं वाटतें. जेवढें देण्याची तुमची ऐपत असेल तेवढें मोठ्या मनानें द्या. पण तें परत मिळण्याची आशा करूं नका.

आरंभीं पैसा थोडा मिळतो ह्मणून धैर्य खचूं देऊं नका. पैसा मिळण्याचा रस्ता लांब आहे, परंतु त्याला वळणें नाहींत. यदाकदाचित् पैसा पहिल्यानें पुष्कळ येऊं लागला तरी तो सर्व खर्चूं नका. तर अडचणीच्या प्रसंगासाठीं तो थोडा राखून ठेवा. कारण, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, ज्याप्रमाणें वाईट मार्गाला वळणें असतात, त्याप्रमाणें चांगल्या मार्गालाही असतात. व जसजसे तुह्मी मोठे व्हाल, तसतशीं तुमच्या पिशवीला जास्त छिद्रें पडूं लागतील. व्यापारधंद्यांतले पुष्कळ लोक आरंभीं बरेंच यश आल्यामुळें धुळीस मिळाले आहेत.

श्रीमंत होण्याची घाई करूं नका. रस्कीन ह्मणतो–"जर केवळ बाजारभावावर चित्राची किंमत ठरवूं दिली नाहीं, तर कांहीं वेळानें चित्रास वाटेल ती किंमत येईल."

पैशाविषयीं विशेष फिकिरींत असूं नका. श्रीमंत होण्याची आशा जरी थोड्यांनाच असते, तरी उद्योगानें व काटकसरीनें कोणालाही पोटापुरतें मिळवितां येईल. पैसा प्रामाणिकपणानें न मिळविल्याचीं उदाहरणें नेहमीं आपल्या ऐकिवांत असतात; परंतु वस्तुतः गरीबी देखील आपल्या हातीं नाहीं अशा कारणांनीं क्वचितच येते. ज्याच्याजवळ थोडें तो गरीब नव्हे, तर ज्याच्या वासना जास्त तो गरीब.

सर जेम्स पेजटनें आपल्या मनोरंजक व्याख्यानांत स्वतःच्या शिष्यवर्गाविषयीं आंकडे दिले आहेत. त्यांच्या आयुष्यक्रमाचा त्यानें नीट तलासा ठेविला होता. प्रत्येक हजारीं दोनशांनीं उद्यो-

गधंदा सोडिला. त्यांना आयती पुंजी मिळाली, किंवा ते अकालीं मेले. बाकीच्या आठशेंपैकीं सहाशें जणांची—कांहींची साधारण व कांहींची बरीच—बढती झाली. फक्त छप्पन असामी अगदीं बुडाले. ह्यांपैकीं पंधरा असामी परीक्षेंत मुळींच उतरले नाहींत. दहा अनियमितपणामुळें किंवा बाहेरख्यालीमुळें खचले. व हजारांपैकीं फक्त पंचवीस हातचीं नव्हत अशा कारणांमुळें नाशास पावले. वैद्यकीच्या धंद्याप्रमाणें इतर धंद्यांतही तुह्मी उपयोगाचे असलांत, तरच लोक तुमचा उपयोग करून घेतील, ह्याविषयीं खात्री असूं द्या.

वस्तुतः शरीरास खरोखरी जरूर असणाऱ्या वस्तूंबद्दल कोणासही फारशी काळजी वाहावयास नको. शरीरप्रकृति चांगली रहाण्यास थोडें लागतें, व सृष्टि पुष्कळ देते. चैनीचे पदार्थ फार खर्चाचे असतात. व फ्रँकलीननें तसेंच ह्मटलें आहे—"एका दुर्गुणामागें जेवढा पैसा लागतो, तेवढ्यांत दोन मुलें पोसतां येतील."

ड्यूक वेलिंग्टन जें शहाणपणानें ह्मणाला तें ध्यानांत ठेवा. "फार व्याज मिळणें ह्मणजे पैसा सुरक्षित असण्याची खात्री कमी."

अनेक धंदे एकाच वेळीं करण्याचा यत्न करूं नका. तुह्मांला कितीही चांगली माहिती मिळालेली असली, एकादी गोष्ट तुह्मीं कितीही बारकाईनें पाहिलेली असली, तरी असें कांहींनाकांहीं घडण्याचा संभव असतो कीं, ज्यामुळें पूर्वीं केलेली अटकळ चुकते. शहाणे ह्मणविणारे व्यापारी व पेढीवाले चुका करितात. कामकाजांत वापरलेला समंजस माणूस आपला अजमास बहुतकरून बरोबर असावा इतकीच इच्छा करितो. दोन आणि दोन मिळून चार होतात हें आपण अगदीं लहानपणीं शिकतों; पण दोन आणि

दोन मिळून बेवीस देखील होतात. गणिताच्या दृष्टीनें २+२ चार होतात हें अगदीं बरोबर आहे; पण संसारांत तें चुकतें. ह्या धड्याचा भलत्याच ठिकाणीं उपयोग केल्यामुळें पुष्कळ होतकरू माणसें नाश पावलीं आहेत.

जें कांहीं होतें तें सर्व शांतपणें सोसा. चेहरा काढीपर्यंत लॉर्ड ब्रूहमला स्थिर बसतां येत नसे, ह्मणून त्याचा फोटोग्राफ नेहमीं बिघडे, असें सांगतात. बॅगहाट ह्मणतो कीं, धंद्यारोजगारांत गुंतलेल्या बऱ्याच माणसांना एका खोलींत स्वस्थ बसतां येत नाहीं ह्मणून अपयश येतें. धंद्यारोजगारांत पडण्याची इच्छा नसली, तरी प्रत्येक माणसामागें एका अर्थीं कांहीं तरी धंदा लागून असतोच. आपणां सर्वांना कर्तव्यकर्मैं आहेत. कोणाला घरसंसार पाहावयाचा असतो, तर कोणाला खर्चवेच करावयाचा असतो. व मोठ्या गोष्टी जशा कठीण व त्रासदायक असतात, तशाच कधीं कधीं लहानसहान गोष्टीही असतात.

धंदारोजगार चांगल्या रीतीनें चालवितां येणें हें बुद्धीपेक्षां व्यवहारिक ज्ञान, खबरदारी व लक्ष्य ह्यांवर विशेष अवलंबून आहे. “दुकान चालवा, ह्मणजे तें तुमची पोटगी चालवील” अशी एक जुनी ह्मण आहे. क्झेनोफन अशाच अर्थाची एक गोष्ट सांगतो. “एक देखणा घोडा लवकर लठ्ठ व्हावा अशी इराणच्या बादशहाची मर्जी लागली. तेव्हां ह्या विषयाबद्दल ज्यांना माहिती असावीसें वाटत होतें, अशांपैकीं एकाला त्यानें घोडा कोणत्या प्रकारें अति लवकर लठ्ठ होईल असें विचारलें. त्यावर त्यानें उत्तर दिलें, त्याच्या धन्याच्या लक्षेंकरून.”

रोखचोख व्यवहार ठेवण्याची संवय वाढत वाढत लावून घेणें फार महत्वाचें आहे. थोडक्याच काळापूर्वीं माझ्या एका मित्रानें सांगितलें कीं, चांगले बुद्धिमान्, शुद्ध वर्तनाचे, तरी पण व्यव-

हारांत मागें पडलेले पुष्कळ लोक मला माहीत आहेत. त्यांच्याबद्दल विचार केला तेव्हां मला असें आढळून आलें कीं, ते मागें पडण्याचें मुख्य कारण ह्मटलें ह्मणजे ते धरसोडपणा करीत, व अनियमितपणें वागत. सर्वांशीं मिळून काम कसें करावें हें त्यांना माहीत नसे, व ते बारीकसारीक गोष्टींबद्दल हेका धरून बसत. सारांश, त्यांच्या अंगीं व्यवहारज्ञान कमी होतें.

लहानमोठ्या सर्व गोष्टींत व्यवस्था व शिस्त ह्यांची विशेष जरूरी आहे. योग्य ठिकाणीं योग्य वस्तु लावून ठेवणें हा नियम अमूल्य आहे. वस्तूचें काम झाल्यावर ती जागच्या जागीं लावण्यास थोडी मेहनत घेतली, ह्मणजे पुनः जेव्हां ती लागते तेव्हां बराच वेळ वांचतो. क्झेनोफन ह्मणतो—"ज्याप्रमाणें एकाद्या शेतकऱ्यानें धान्याच्या कोठींत गहूं, बाजरी, वाटाणे इ० एकाच ठिकाणीं ओतून ठेवावे, व गव्हांची चपाती, बाजरीची भाकर, किंवा वाटाण्याची आंबटी करावीशी वाटली कीं, एकएक दाणा निवडून काढावा, तसाच प्रकार अव्यवस्थेचा आहे.[१]" तोच ग्रंथकर्ता उदाहरणार्थ एका जहाजासंबंधीं उतारा देतो. "ईश्वरी सत्तेनें समुद्रांत वादळ सुरू झालें कीं, जें पाहिजे तें शोधण्यास व ज्याचा उपयोग करणें कठीण पडतें तें देण्यास वेळ नसतो; कारण, देवांना निष्काळजी माणसांचा राग येतो व त्यांना ते शिक्षा करितात; आणि ज्यांच्या हातून मुळींच चूक झाली नाहीं अशांचा देखील जर ते नाश करीत नाहींत, तर त्यांत त्यांनीं आनंद मानिला पाहिजे. व ज्यांनीं सर्व वस्तु व्यवस्थेनें लावून ठेविल्या आहेत अशांना शिक्षा झाली नाहीं, तर त्यांनीं ईश्वराचे आभार मानिले पाहिजेत." ह्यास्तव प्रत्येक वस्तु व्यवस्थेनें लावून ठेवा.

आरिस्तातलपासून तों कार्लाइलपर्यंतच्या सर्वांनीं नव्हे, तरी बहु-

१ क्झेनोफनचे इकॉनमिक्स.

तेक तत्वज्ञांनीं व्यापारउदीम करणारांस नांवें दिलीं आहेत. निदान ते व्यापारउदीम ह्यालाच मुळीं हलक्या प्रतीचा व बहुतेक हीनत्व आणणारा मानीत असें ह्मटलें पाहिजे. प्लेतोनें आपल्या कल्पित प्रजासत्ताक राज्यामध्यें व्यापाऱ्यांना नागरिक जनांचे हक्क दिले नव्हते. असला नीचप्रतीचा धंदा कोणीं करूं नये, व कोणास करावासा वाटलाच तर तो परदेशीयांनीं करावा असा त्याचा समज होता. व्यापारधंदा करण्याची पुष्कळ लोकांस जरूरी आहे; तेव्हां स्वभावावर त्यापासून घडणारे संस्कार जर अवश्य अपायकारक असले, व बुद्धीच्या वाढीस चालणारे नसले तर ही एक फारच वाईट गोष्ट होय. पण ते संस्कार वाईट नाहींत हें एक सुदैवच ह्मणावयाचें. आतां इतकें मात्र खरें कीं, व्यापारधंद्यांत गुंतलेल्या माणसांना फुरसतीच्या वेळीं मात्र इतर गोष्टींकडे लक्ष देतां येतें. भाषाज्ञान व शास्त्रें ह्यांचा अभ्यास करणाऱ्या माणसांचीं फक्त उदाहरणें घेतलीं, तरी धंदा संभाळून अभ्यास करणारीं माणसें बरींच आढळतात. नॅसमिथ हा कारखानदार असून त्याला खगोलविद्या अवगत होती. ग्रोट हा पेढीवाला असून त्यानें इतिहास लिहिला. सर जे इव्हॅन्स हा कागद तयार करणारा होता; तरी प्राचीनशास्त्रकलोद्दीपक समूहाचा तो अध्यक्ष व रॉयल सोसैटीचा तो खजीनदार होता. प्रेस्टीच हा व्यापारी असून ऑक्सफर्ड येथील विश्वविद्यालयांत भूगर्भशास्त्राचा अध्यापक होता. रॉजर पेढीवाला, पण त्याला कवित्वशक्ति होती. त्याचप्रमाणें ग्रेड हा होता. आत्मश्लाघेचा दोष येत नसला तर माझ्या पूज्य वडिलांचें नांव सांगावयास हरकत नाहीं. ते पेढीवाले असून त्यांना गणित चांगलें येत असे, व ते पुष्कळ वर्षेंपर्यंत रॉयल सोसैटीचे उपाध्यक्ष होते. अशीं आणखी उदाहरणें देतां येतील.

माल स्वस्त मिळेल तेथें विकत घ्यावा, व जास्त किंमत येईल तेथें विकावा, ह्या तत्वाविरुद्ध कार्लाइल आवेशानें बोले. त्याला असें वाटे कीं, टिपून सांगतां येत नाहीं अशा रीतीनें कापसाची "कमींत कमी किंमत" ठरवून ठेवावी. त्याचप्रमाणें इतर पदार्थांची किंमत टरवून ठेवावी असेंही त्याचें मत असावेंसें दिसतें. व आपण ह्मणावें कीं, "सध्यां कापसाची किंमत कमी करण्याची आमची इच्छा नाहीं." आपण इतर राष्ट्रांपेक्षां कमी किंमतीला पदार्थ विकूं नये. "गडे हो, आपण कमी दरानें पदार्थ विकणार नाहीं, इतर राष्ट्रांच्या दराप्रमाणें पदार्थ विकण्यांत आपण तृप्त असूं." हें अशक्य आहे इतकेंच नव्हे तर खोटें आहे. सुती कापडाचा खप कमी झाला तर आह्मांला दाणा कमी घेतां येईल. कार्लाइल असें गृहीत धरितो कीं, कमी दर असला तर माल पुष्कळ संपेल; ह्मणून त्याच्या मताप्रमाणें चाललों तर पुष्कळ माणसें कपड्याशिवाय रहातील; तरी कपडे विकत घेण्यास ठरीव किंमत देण्याइतके पैसे त्यांच्याजवळ असणार नाहींत. त्याच्या मताप्रमाणें तोटा झाल्याशिवाय आह्मांला कापड कमी दरानें विकतां आलें, तरी आह्मीं विकूं नये. ह्मणजे इतर लोकांस कापडाशिवाय व आपल्या लोकांस अन्नाशिवाय ठेवावें. आपणांस जो पदार्थ स्वस्त तयार करितां येतो तो देऊन स्वस्त तयार करितां येत नाहीं तो घ्यावा, हा व्यापाराचा नियम आहे. ह्यास्तव जेथें माल स्वस्त मिळेल तेथें घ्यावा, व ज्यास्त किंमत येईल तेथें विकावा, हा नियम व्यापारास आवश्यक आहे; इतकेंच नव्हे, तर तो सर्वस्वीं फायदेशीर आहे. कारण, त्यामुळें ज्यांना माल विकावयाची जरूरी असते त्यांच्याजवळून तो आपणांस विकत घेतां येतो; व ज्यांना विकत घ्यावयाची जरूरी असते त्यांना विकतां येतो. दुसऱ्या रीतीनें व्यापार करणें ह्मणजे घाटावर नेऊन मिर्च्या विकावयाच्या ह्या ह्मणीप्रमाणें व्यर्थ होय.

पुष्कळ मोठे, उत्तमप्रतीचे व सुखी झालेले लोक गारिबींत होते. वर्डस्वर्थ व त्याची बहीण हीं बरींच वर्षेपर्यंत आठवडा तीस शिलिंगांवर काढीत असत. आणि मला वाटतें त्यांचा हाच सर्वांत सुखाचा वेळ होय. जरी श्रीमंत होण्याचें तुमच्या नशिबीं नसलं, तरी सहवासामुळें व आवडीमुळें एकादी साधी जागा, एकादें लहानसें झोंपडें, एकादें सुस्वभावाचें माणूस, हीं सर्व जगाच्या किंमतीचीं तुह्मांस वाटूं लागतील. महंमद ह्मणे कीं, "ईश्वर पैगंबर करण्यास माणसें गरीब धनगरांतून निवडून काढितो." हें बोलणें जरी आपणांस सर्वस्वीं कबूल नाहीं, तरी ह्या जगांत किती मोठे लोक गरीब होते हें पाहिलें ह्मणजे खरोखरीच आश्चर्य वाटतें. पैशामुळें काय हवें तें होतें अशी अतिशयोक्ति करणें साधारणतः चुकीचें आहे.

पोटापुरतें अन्न मिळण्यास दौलत हवी काय ?

श्रीमंत मनुष्याला जर निरोगी रहाणें असेल, तर त्यानें गरीब लोकांसारखें अन्न खाल्लें पाहिजे. चहा, कॉफी, लोणी, रोटी, एकाददुसरें अंडें, एकाददुसरा हेरिंग मासा, आणि थोडासा मध ह्यांशिवाय सकाळच्या न्याहरीला आणखी दुसरें काय हवें ? रोटी, चक्का आणि बीर दारू ह्यांशिवाय दोनप्रहरच्या न्याहरीस काय पाहिजे ? साधें जेवण तें पण चांगल्या रीतीनें शिजविलेलें असलें ह्मणजे त्यापासून लॉर्ड मेयरनें राजवाड्यांत दिलेल्या मेजवानीपासून होणारा आनंद होतो. खाण्यास पथ्यकारक उत्तम वस्तूंस त्यांच्या हंगामाच्या वेळीं थोडीच किंमत पडते. हंगाम गेला ह्मणजे त्यांस रुचि कमी असते. अंडें बहुतेक मिष्टान्नासारखेंच आहे, व केव्हां केव्हां तर तें त्याच्याहीपेक्षां जास्त रुचकर लागतें.

पुस्तकें विकत घेण्यास दौलत हवी काय?

वाचतां येतील इतकीं पुस्तकें विकत घेण्याचें ज्याला सामर्थ्य नाहीं, तो खरोखर अगदीं गरीब असला पाहिजे. उत्तम उत्तम ग्रंथ, बैबल, शेक्सपीयर, मिल्टन इ० आतां अगदीं कवडीच्या मोलांत मिळतात.

दौलतीमुळें आरोग्य, बुद्धि, मित्र, सौंदर्य व सुखी आश्रम हीं मिळतात काय?

कॉनफ्युसिअस् ह्मणतो—ड्यूक ऑफसे फारच श्रीमंत होता; पण तो कोणालाही आवडत नसे. पेकी उपासमारानें मेला; व लोक अद्यापि त्याच्या मरणाबद्दल हळहळतात.

विशेष—

दौलतीमुळें सुख मिळतें काय? जगाचा अनुभव घ्या. बाहेरून आनंदी दिसणारीं किती माणसें दुःखी असतात! पैसेवालीं किती माणसें दुःखांत असतात! मला असल्या माणसांचा बडेजाव नको व त्यांचें दिखाऊ सौख्य नको, किंवा अंतस्थ दुःखावरलें तें भपकेदार आवरणही नको.[१]

बेकन ह्मणतो—संपत्तीच्या धुंदींत असलेल्या माणसांना स्वतःचें भान रहात नाहीं; व ते व्यवहारांत गढून गेले असतां त्यांना मानासिक व शारीरिक संपत्तीकडे लक्ष देण्यास फुरसत नसते.

बिड्या त्या बिड्याच; मग त्या सोन्याच्या कां केलेल्या असेनात. लक्ष्मीपासून मनाला पुष्कळ आधि लागतात, ह्यांत कांहीं संशय नाहीं. गरिबींत जशी माणसास काळजी असते, त्याचप्रमाणें श्रीमंतींतही निराळीच काळजी असते. पुष्कळ श्रीमंत लोक लक्ष्मीचे दास बनलेले असतात; लक्ष्मी त्यांची दासी होत नाहीं.

---

१ यंग.

बिशप वुइलसन् ह्मणतो—"लक्ष्मी जवळ असली ह्मणजे बहुधा माणसाला काळजी लागते इतकेंच नव्हे, तर यातना उत्पन्न होतात."

लक्ष्मीमुळें पुष्कळ माणसें निःसंशय धुळीस मिळालेलीं आहेत. तारतम्यदृष्टीनें विचार केला तर गरीबांपेक्षां श्रीमंतांस पैशाबद्दल विशेष काळजी वाटते. पैशापासून फक्त शहाण्या माणसांनाच सुख होईल, इतरांस होणार नाहीं. ज्याला पैसा मिळविण्याची फाजील उत्कंठा, तो सदाचा दरिद्री. रस्किन ह्मणतो—"लहानशा खोपटांत राहून आश्चर्य उत्पन्न करणारी वस्तु ह्मणून वॉरीक राजवाडा असावा हें, वॉरीक राजवाड्यांत राहून आश्चर्य वाटण्याजोगा पदार्थच जगांत नसावा, ह्यापेक्षां अधिक चांगलें होय."

लक्ष्मीचा खरा उपभोग घ्यावयाचा असला तर तिच्यावर विशेष आसक्ति ठेवूं नका. सादी ह्मणतो–"पोटास पुरेसें अन्न असलें तर तें तुह्मांला वाहून नेईल; जास्त असलें तर तें तुह्मांला वाहून न्यावें लागेल."

"मी उंटावर कधीं बसत नाहीं खरा, पण माझ्या मनावर कसलें ओझें नाहीं. मला प्रजा नाहीं, किंवा मी त्रासांत पडलेला नाहीं; पण मी कुणाला धनी ह्मणत नाहीं. मला उद्यांचा विचार नाहीं, अथवा गत दुःखाची मी आठवण करीत बसत नाहीं. अशा रीतीनें जीवनकलहांतून मुक्त होऊन मी शांतचित्त रहातों.[१]"

बेकन ह्मणतो–"वासना करण्याजोग्या वस्तु थोड्या असणें व भयप्रद वस्तु पुष्कळ असणें असली मनाची स्थिति फार वाईट होय."

"जरी तूं श्रीमंत असलास तरी तूं गरीबच. कारण, सोन्याच्या

१ सादी.

भारानें वांकणाऱ्या गाढवाप्रमाणें तूं आपली संपत्ति फक्त प्रवासापुर्ती वाहून नेत आहेस; व मृत्यु तें ओझें उतरवून घेण्यास तयार आहे."[१]

"पुढें उपयोगीं पडेल ह्मणून कवडी कवडी करून पैसा सांठविण्याच्या काळजींत आपलें आयुष्य कां घालवावें? व्याधीनें पीडित झाल्यावर कंटाळलेल्या हृदयास त्यापासून काय आनंद व आराम होणार? त्यामुळें आयुष्य एक पळ तरी वाढेल काय? अथवा मरणाचा वेळ सुखाचा येईल काय?[२]"

पैशामुळें लोभ वाढण्यास सूट मिळते. ऑलिव्हर वेन्डेल होम्स हा त्याच गोष्टीचें खोंचदार वर्णन करितो.

"मला सोन्याची किंवा मालमत्तेची फारशी जरूरी नाहीं. एकाददुसरें गहाणपहाण असावें, बँकेंत बराचसा पैसा असावा, प्रॉमिसरी नोटस् असाव्या, अथवा रेल्वे कंपनीचे लहानसहान शेअर्स असावे ह्मणजे झालें. आपल्याला पुरून उरण्याजोगें नशीबानें द्यावें ह्मणजे आपली भूक निवाली."

सेनिका ह्मणतो—"गरीब माणसाला पुष्कळ गोष्टी हव्या असतात, परंतु लोभ्याला सर्वच हव्या असतात."

ह्या जगांत नाणीं नसतीं, किंवा हांजी हांजी करण्यास लोक नसते, तर एकमेकांवर उपकार करणारे लोक बरेच निपजले असते अशी एक वक्रोक्ति आहे.

बेकन ह्मणतो—"पैसा मिळविण्याचा सारखा व अश्रांत यत्न करण्यांत ज्यांना मोठमोठालीं कामें करावयाचीं असतात त्यांचा बराच वेळ मोडतो." जिवाला सुखाची भर झाली तर पैसा बरा; पण पैशाला भर घालणारें आयुष्य नको. गरीबी ही विद्याव्यसनी लोकांची भार्या मानिली आहे.[३] "ज्यांच्याजवळ सपक्ष रथ

---

१ शेक्सपीअर. २ गे. ३ एमर्सन.

(विचार) आहेत, त्यांनाच मात्र पैशानें लादलेल्या खेंचरास रज देतां येते."

पैशाबद्दलचे आपले उद्गारच अन्वर्थक आहेत. तो मनुष्या पैसा करितो आहे, अमुक असामीनें पैसा केला आहे, अथवा तो संपत्तींत लोळत आहे इ० आपण ऐकतों. पण अमुकजण "संपत्ति भोगीत आहे" असें आपण कधीं ऐकिलें नाहीं. जे कोणी पैसा करितात तो त्यांच्या स्वतःसाठीं नव्हे. "तो पैशाच्या राशी करितो; पण तो कोण भोगील हें त्याला कळत नाहीं."

क्झेनोफनच्या जेवणाच्या वर्णनांत कार्मायडीज असें प्रतिपादन करितो कीं, संपत्तीपेक्षां दारिद्र्य बरें. कारण, आपण सुरक्षित आहोंत हा विचार जिवाची भीति बाळगण्यापेक्षां बरा, हें सर्वांस कबूल आहे. त्याचप्रमाणें गुलामगिरींत असण्यापेक्षां स्वतंत्र असणें बरें. आपल्या देशानें आपणांवर विश्वास ठेवावा हें, आपणांवर विश्वास ठेवूं नये, ह्यापेक्षां बरें. परंतु मी जेव्हां ह्या शहरांत श्रीमंत होतों तेव्हां माझें घर कोणी फोडील, अथवा माझे पैसे लुटील, किंवा इजा करील, ही मला पहिली काळजी होती. आतां मला स्वस्थ झोंप येते. मला पॅरिसचें काम करावयास नको. मी इतका श्रीमंत नाहीं, तेव्हां सरकाराला माझ्याबद्दल वहीम यावयास नको. वाटेल तर शहरांत रहावें, नाहींतर निघून जावें, अशी मला पूर्ण मोकळीक आहे. मी श्रीमंत होतों तेव्हां सॉक्रेतिसाबरोबर अथवा इतर कोणा विद्वानाबरोबर मैत्री केली ह्मणून लोक मला नांवें ठेवीत असत. आतां मला वाटेल त्याला मीं सोबती ह्मणावें. कारण, मी गरीब झाल्यामुळें कोणी माझी पर्वा करीत नाहीं. जेव्हां मजजवळ फार पैसा होता तेव्हां मी फार दुःखी होतों. कारण, नेहमीं माझें कांहींनाकांहीं जात असे. आतां मी गरीब झालों आहें. मजजवळ कांहीं नसल्यामुळें

माझें कांहीं जात नाहीं, व असें असूनही मला कांहीं मिळेल ह्या आशेनें माझें समाधान होऊन मला आल्हाद होतो.

कार्मायडीज जें ह्मणाला त्यांत तथ्यांश बराच आहे; पण तें सर्वांशीं खरें नाहीं. व जेव्हां तो हें बोलला, तेव्हां तो जेऊन तृप्त झालेला होता व गाणें ऐकून गार झालेला होता.

पैशाचा शहाणपणानें उपयोग केला तर बराच फायदा होतो. कनक ही एक आदिशक्ति होय. एका विनोदी फ्रेंच गृहस्थानें ह्मटलें आहे—"पैसा राजाचा राजा आहे." जें हवें तें मिळवून देण्यास पैसा हें साधन आहे. स्वच्छ हवा, चांगलें घर, पुस्तकें, गायन इत्यादि वस्तु भोगार्ह आहेत असें कबूल केलें तर पैसा त्या मिळवून देतो. फुरसत असणें फायदेशीर आहे; ती पैसा मिळवून देतो. पृथ्वीवर प्रवास करणें सुखकारक आहे; तो प्रवास पैशानें करितां येतो. आपल्या मित्रांस मदत करणें, दुःखितांचें संरक्षण करणें इत्यादि गोष्टी विशेष हक्कासारख्या आहेत; त्या पैशामुळें शक्य होतात. स्विफ्ट ह्मणे—" पैसा बाळगून ठेवा. पण डोक्यांत, हृदयांत ठेवूं नका."

कृपण पैशाचा पैसा ह्मणून लोभ करितो. तो काटकसर विकोपास नेतो. तो माणूस लोभ करणाऱ्या एकाद्या यंत्राप्रमाणेंच होय. ह्या जगांतील लहानसहान व क्षुद्र चिंतेपासून अलग रहावें. ह्याच धडा जगांत आपणांस शिकावयाचा आहे. पैशाचा लोभ करणें हें अतिक्षुद्र होय.

पैशाचा शहाणपणानें उपयोग करण्यांतच कर्तबगारी आहे. सॉलोमन ह्मणतो—"कांहीं लोक पैसा पाण्यासारखा खर्चितात तरी त्यांचा वाढतो, व कांहीं पैशाला वाजवीपेक्षां फाजील जपतात तरी त्यापासून दारिद्र्य येतें."

एडवर्ड कोर्टनेचा अर्ल ऑफ डेव्हन शिअरच्या कबरीवरील प्रसिद्ध लेख पुढें लिहिलेला होय.

"जें आपण दान दिलें तें आपलें होय. जें आपण खर्चिलें तें आपलें होतें. जें आपण मागें ठेविलें तें फुकट गेलें."

हेंच निराळ्या रीतीनें पुढील वचनांत सांगितलें आहे:—

मीं जें शिल्लकेस टाकिलें तें फुकट गेलें. मीं जें खर्चिलें तें भोगून चुकलों. मीं जें दान केलें तें अद्यापि मजजवळ आहे.

मन उदार असूं द्या; तरी पण उधळपट्टी करूं नका.

पुष्कळ पैसा जमवूनही भिकारीं अशीं कांहीं माणसें आहेत, व स्वतःला गरीबी आणूनही श्रीमंत अशीं देखील कांहीं आहेत.

जो गोरगरीबांवर दया करितो तो ईश्वराला ऋणी करितो. कारण, ज्यानें लोकांला दिलें त्याला ईश्वर देईल.

ख्रिस्तानें श्रीमंत तरुणाला केलेला उपदेश त्याच माणसाला लागून होता असें ह्मटलें तरी चालेल. कारण, आपणांला आपल्या मुलांबाळांकडेही पाहिलें पाहिजे व गरीबांकडेही पाहिलें पाहिजे. स्वतः कमावलेली मिळकत तुमची खुद्द; पण वाडवडिलांकडून आलेली मिळकत तुमची खुद्द नव्हे. ज्यांच्या जवळ पैसा ते ईश्वराचे दास. बैबलांतील दृष्टांतरूप कथेंत सांगितल्याप्रमाणें त्यांच्या जवळ पैसा ठेवीदाखल ठेविलेला आहे; त्यांना त्याबद्दल हिशेब द्यावा लागेल; व हें एक मोठें जोखमाचें काम त्यांच्यावर सोंपविलेलें आहे. जीबद्दल गर्व वहावा असली वस्तु पैसा नव्हे.

"ह्या जगांत जे श्रीमंत आहेत त्यांना अशी आज्ञा सांगा कीं, तुह्मी पैशाबद्दल गर्व करूं नका, नश्वर वित्तावर फारसा विश्वास ठेवूं नका, फक्त जागृत ईश्वरावर विश्वास ठेवा. तो उपभोगाच्या सर्व वस्तु अघळपघळ देतो."

---

१ प्रॉव्हर्ब्स.

आणखी एक आज्ञा त्यांना आहे—"तुह्मी चांगलें करा; सत्कृत्यरूपी संपत्ति तुमच्या जवळ असूं द्या; आपलें वित्त इतरांस देण्यास तयार असा; व इतरांशीं चांगल्या भावानें वागण्यास तयार व्हा."

"शाश्वत लोक मिळावा एतदर्थ भावी कालाचा पाया ह्मणून चांगली तयारी करा."

"संपत्तीची तृष्णा हें पापाचें मूळ, संपत्ति पापाचें मूळ नव्हे असें पवित्रशास्त्र सांगतें. पैसा वाढूं लागला ह्मणजे त्याबद्दलचा लोभ वाढूं देऊं नका."

पर्वतावर ख्रिस्तानें आपल्या शिष्यांस दिलेल्या सर्मनमध्यें देखील पापाचें मूळ तेंच सांगितलें आहे.

"इहलोकांतील संपत्ति मिळवून ठेवूं नका; येथें तिला वाळवी लागते. नाण्यांना गंज चढतो; किंवा चोर पेट्या फोडितात व लुटतात."

"स्वर्गांतील संपत्ति मिळवून ठेवा. तेथें वाळवीही लागत नाहीं, किंवा गंजही चढत नाहीं. चोर पेट्या फोडीत नाहींत, किंवा लुटीत नाहींत. ज्या ठिकाणीं तुमची संपत्ति त्या ठिकाणीं तुमची आशा गुंतलेली."

# भाग ४.

## करमणूक.

अति काम व करमणूक मुळींच नाहीं असें झालें, ह्मणजे मुलगा मंद होतो अशी एक ठरींव ह्मण पडली आहे. आणि तें काम घरांत बसून करावयाचें असलें, तर मग मुलगा नाजूक प्रकृतीचाही होत जातो व तारुण्याच्या भरांत देखील निःसत्व रहातो. खेळांत घालविलेला वेळ फुकट घालविलासा होत नाहीं. खेळ शरीराच्या वाढीस उपयोगाचे आहेत. विशेषेंकरून छातीकडला व बाहूंकडला भाग त्यांच्या योगानें विस्तृत होतो. आपल्या नेहमींच्या कामकाजानें छाती व बाहू भरण्याऐवजीं आकुंचित होत जातात.

खेळांच्या योगानें माणसाची शरीरप्रकृति चांगली रहाते इतकेंच नव्हे, तर त्यांपासून काम करण्यास हुशारी येते. बारीकसारीक गोष्टींत आपलेंच घेऊन न बसणें, सचोटीनें वागणें, व ऊंस गोड लागला ह्मणून मुळासकट न खाणें इत्यादि लोकांशीं व्यवहार करण्याच्या गोष्टी खेळांपासून कळतात.

खेळांपासून आरोग्य प्राप्त होतें, तशीच नीति कायम रहाते. साहस, सोसकपणा, आत्मसंयमन, व मनमिळाऊ स्वभाव, जे पुस्तकी विद्येनें प्राप्त होत नाहींत व शिकवितां येत नाहींत, ते खेळांमुळें अंगीं येतात. वॉटर्लूची लढाई जिंकली ती इटन शाळेच्या मैदानांत जिंकली असें वेलिंगटन ह्मणाला तें बरोबर आहे. सार्वजनिक शाळेंत जाऊन मुलें जे उपयोगाचे व महत्वाचे धडे शिकतात, त्यांपैकीं बरेच खेळण्याच्या मैदानांत शिकलेले

असतात. खेळ केवळ करमणुकीदाखल खेळा, जन्माचें कर्तव्य ह्मणून खेळूं नका.

आरोग्य राखण्यास खेळ किती महत्वाचे आहेत हें दाखविण्याकरितां शारीरशास्त्रावर अधिकारानें बोलणाऱ्या दोन मोठ्या विद्वानांच्या मतांचे उतारे देतों. सर जेम्स पेजट ह्मणतो—"करमणुकीच्या गोष्टींस कारणीभूत होणारे सर्व मुख्य गुण खेळांत विशेष रीतीनें सांपडतात. परंतु ह्याखेरीज कामधंद्यांत व नेहमींच्या व्यवसायांत त्यांपासून मनाला अप्रत्यक्ष रीतीनें बहुमूल्य असें नेकीचें वळण येतें. कारण, संघानें पैसा मिळविण्याची इच्छा न होतां किंवा क्षुद्र हेतु मनांत नसतां केवळ मनोरंजनासाठीं लहान मोठे एकत्र जमून जुटीनें काम करितात; इमानानें मन लावून काम करणाऱ्या भागीदारांबरोबर सत्कर्में करण्यास खेळ लहानमोठ्यांस शिकवितात; आयुष्यांतील प्रत्येक स्थितींत एकोप्यानें काम करण्याची योग्यता ही एक बढती करणारी मोठी शक्ति होय; ही शक्ति खेळांपासून अंगीं येते. जरी स्वभावतः नव्हे, तरी प्रघात पडून गेल्यामुळें खेळांपासून माणूस न्यायानें वागण्यास शिकतो. कोणत्याही खेळांत कशीही चढाओढी असली, तरी लबाडीचा खेळ सर्वांच्या मतें लज्जास्पद ठरलेला असतो; आणि ज्यांना खेळांत न्यायानें वागण्याची संवय असते, ते व्यवहारांतही त्याचप्रमाणें वागण्यास अधिक प्रवृत्त होतात. करमणुकीच्या गोष्टींत सचोटीचें मान मोठें असलें, तर ज्या बारीकसारीक वाईट गोष्टी कायद्याचे तडाक्यांत सांपडत नाहींत अशांचा तिरस्कार करण्यास लोकांना शिकविण्यांत खेळ बरेच सहाय्यकारक होतात. आतां ज्या विशिष्ट गुणांवर मर्दुमकीच्या खेळांचा उपयुक्तपणा मुख्यत्वेंकरून अवलंबून असतो, अशा गुणांचा विचार करूं लागलों तर त्यांमध्यें पुढील गुणांपैकीं एक

दोन तरी मोडतातच असें आढळून येईल. ते गुण १ अनिश्चितपणा, २ विस्मयास जागा, ३ नित्यनेमाच्या धंद्याशिवाय इतर गोष्टींत कौशल्य प्रकट करण्यास अवकाश हे होत. ह्या तिन्ही गुणांचा योग्यपणा मुख्यत्वेंकरून पुढील गोष्टींमुळें ठरतो. त्यांच्या योगानें शारीरिक श्रम करणाऱ्या बहुतेक लोकांच्या नेह्मींच्या व्यवसायांत अगदीं भिन्न असें मनाला गोड वाटणारें क्रमान्तर होतें; व नेह्मीं फारसा उपयोग होत नसल्यामुळें ज्या शक्ति व जो आनंदी स्वभाव कमीकमी होत जाऊन शेवटीं समूळ नष्ट होण्याचा संभव आहे, त्यांना प्रचलित करण्यास अवकाश सांपडतो."

रॉयल सोसैटीचा चिटणीस प्रोफेसर मायकेल फॉस्टर नुकेंच दिलेल्या रीडव्याख्यानांत असें ह्मणतो—"शारीरिक श्रम केल्यामुळें जो थकवा येतो, तो मुख्यत्वेंकरून मेंदु थकल्यामुळें येतो; आणि ज्याशीं स्नायूंचा फारसा किंवा मुळींच संबंध नाहीं असा मेंदूचा थकवा असतो हेंही आपणांस माहीत आहे. मेंदूच्या व्यापारामुळें, तसेंच स्नायूंच्या व्यापारामुळें, शरीरांतील रसायनद्रव्यांत फेरफार होतात; मेंदूमध्यें जे रसायनद्रव्याचे फेरफार होतात, तसल्याच प्रकारचे स्नायूंमध्यें होतात; कदाचित् बारीकसारीक गोष्टींत थोडासा भेद असेल; व स्नायूंतील फेरफारांबरोबर मेंदूंतील फेरफारांची तुलना केली तर मेंदूंतील फेरफार कमी दिसतात; परंतु मेंदूंतील मज्जातंतुमय द्रव्याच्या अतिशय नाजूकपणामुळें तो कमीपणा भरून निघतो, किंवा त्यांचें मान ज्यास्त होतें. एवढेंच कायतें आपल्या सर्व ज्ञानावरून आपणांस कळतें. "काम करण्याच्या शक्तीचा सांठा पुनः लवकर भरून निघावा, व शरीरास इजा करणारे त्यांत उत्पन्न झालेले पदार्थ बाहेर निघून जावेत, अतएव स्नायू सजीव राहण्यासाठीं कमी यो-

ग्यतेच्या इंद्रियांनीं कार्यसाधकरीतीनें जुटीनें काम करून शुद्ध केलेलें पुरेसें रक्त त्यांस हवें हें जितकें खरें आहे, तितकेंच तें मेंदूस हवें हेंही खरें आहे. तशांत, जीवनकलहामुळें मेंदूस पुढारीपणा आला आहे, व तो नेहमीं गरीब मदतनीस जीं इतर इंद्रियें त्यांस मागें टाकितो. उत्तम व्यवस्थित काटकसरीनें मेंदूचा उपयोग केला, तरी हें अचाट यंत्र सुरू केल्यापासून तों थकवा येई त्या क्षणापर्यंत खऱ्या कामाचा वेळ अगदीं मर्यादित असतो. मीं आपल्यापुढें जे विचार मांडिले आहेत त्यांत सत्यांश असल्यास, तो वेळ वाढविण्याचा खरा मार्ग मेंदूस जास्त तरतरीत करणें हा नव्हे, तर अंगीभूत जीं इतर इंद्रियें, त्यांस उत्तेजन देऊन त्यांच्या कार्यसाधक सहाय्यानें थकव्याचा वेळ लांबणीवर टाकणें हा होय."

मृगया करणें, निशाण मारणें, मासे धरणें इत्यादींस नेहमींच्या बोलण्याच्या प्रचारांत क्रीडा असें मानितात. आमच्यापैकीं जे लोक शिकारी कुत्रे बरोबर घेऊन पारधीस जात नाहींत, किंवा बंदुकीनें शिकार मारण्यास जात नाहींत, अथवा मासे धरीत नाहींत व अशा रीतीनें व्यायाम आणि करमणूक करून घेत नाहींत, त्यांचें देखील मन त्यांकडे ओढतें. ही इच्छा आपल्या पूर्वजांपासूनच आपणांत खिळून गेलेली आहे. पूर्वीं बऱ्याच प्रमाणानें आमचे लोक शिकार करून आपली उपजीविका करीत; व शिकार करणें ही इतिकर्तव्यता मानीत इतकेंच नव्हे, तर पुढील लोकांत तेंच उत्तम सुख समजत. ओसिअन ह्मणतो.—"रानडुकर त्यांचीं थडगीं तुडवीत जातो, पण त्यामुळें त्यांचा विश्रांतिभंग होत नाहीं; तारुण्यांतला हा खेळ त्यांना अद्यापि आवडतो; व मोठ्या आनंदानें वायुरूपी अश्वावर ते आरूढ होतात."

शुद्ध पाण्याचे आपण किती ऋणी आहोंत ह्याबद्दल बरेंच लिहून गेलें आहे; पण शुद्ध हवेचे आपण तितकेच ऋणी आहोंत. हवा किती आश्चर्यजनक आहे! हवा आपल्या शरीरांत भिनून गेली आहे. तिनें आपल्या कांतडीभोंवतीं इतकें नाजूक आंतरिक द्रव्य पसरलें आहे कीं, तें आहे किंवा नाहीं ह्याचें आपल्यास भान नसतें. तरी त्या द्रव्याच्या अंगीं इतका जोर आहे कीं फलपुष्पांचा सुगंध आपल्या खोलींत तें वाहून आणितें; त्याच्यामुळें आपलीं गलबतें समुद्रांत चालतात, व पर्वतावरील आणि समुद्रांतील स्वच्छ हवा आपल्या अगदीं शहरांत येते. हवा शब्दप्रचालक होय. ज्यांच्यावर आपण प्रीति करितों त्यांचे शब्द व सृष्टींतील मधुर ध्वनि ती आपल्या कानांवर पाडिते; पृथ्वीवर जल वर्षणाऱ्या मेघाचा ती एक खजिना होय. हवा दिवसां सूर्याचा ताप कमी करिते, व रात्रीं थंडी कमी करिते; निळ्या रंगाच्या कमानीसारख्या प्रकाशमान नभोमंडलानें ती आपणांस व्यापून टाकिते; आणि प्रभातसमयीं व संध्यासमयीं आकाशास रक्तिमा आणिते. ती अनुपम रीतीनें मृदु, शुद्ध, तशीच सौम्य असूनही इतकी उपयोगी आहे कीं, सृष्टीनें निर्माण केलेल्या सर्व भूतांपेक्षां एरियल भूत अतिशय नाजूक, आल्हादकारक व मनोहारक आहे ह्यांत आश्चर्य नाहीं.

जेफ्रीज ह्मणतो—"सर्व वस्तूंमध्यें आरामकारक हवेसारखी दुसरी गोड वस्तु नाहीं. ती ॲफ्रोडाइट देवतेच्या बाहूंप्रमाणें वेष्टून असणारें व सर्वत्र पसरलेलें असें एक मोठें पुष्पच होय. जणूं काय घुमटाकार हें आकाश घंटाकृति पुष्पाप्रमाणें असून तें आपल्या डोक्यावर लोंबकळत आहे; व त्याचा मनोवेधक मकरंद पृथ्वीचा सर्व पृष्ठभाग भरून टाकीत आहे. वन्यपुष्पांचा गंधवाह सर्वांत मधुर होय. आपल्या जीवनहेतूच्या उदात्त क-

ल्पना मनांत खेळत असल्यामुळें ताऱ्यांप्रमाणें शोभणारीं पुष्पें नदीकिनाऱ्यावर आपलीं डोकीं वर करून पहात आहेत; जणूं काय मार्गांत अडथळा करणाऱ्या तृणराजीच्या संसर्गापासून दूर राहण्याची त्यांची इच्छा आहे. कुशाग्रबुद्धीच्या लोकांस असल्या अडचणींस सतत तोंड द्यावें लागलें आहे. तो साधा रस्ता नानातऱ्हेच्या विचारांमुळें मला सुंदर भासत असे, व नभोमंडळांत तारागण चमकूं लागले ह्मणजे नदीकांठीं मी नेहमीं येऊन बसत असें.

"एकाच रस्त्यानें मी कां जाईं, व पालट करण्याची मला कां जरूरी वाटली नाहीं हें पुष्कळ वर्षें माझ्या लक्षांत आलें नाहीं. मला नवीन वस्तु नकोत; परिचयांतल्या आवडत्या वस्तु मला हव्यात. मला तींच वन्यपुष्पें, तेच वृक्ष, कोमल ॲश झाडांची हिरवीचार वनराजि, पारवे, व कावळे आवडतात; व शंकुयंत्रावर कांट्याची छाया पडण्यापुरता उजेड असेपर्यंत जो गागा गातो तो सोनारपक्षी मला आवडतो; कारण, त्याच्या गाण्यांत माधुर्य तसेंच आहे. विशेष, ह्या सर्व वस्तु मला त्याच ठिकाणीं हव्यात. वसंतऋतूपासून ग्रीष्मऋतूपर्यंत येणारी सजीव प्राण्याची परंपरा व ग्रीष्मऋतूंतील सृष्टीचा चित्रमहाल हीं मला आवडतात. प्रत्येक वर्षीं तीच परंपरा मीं पहावी अशी माझी इच्छा आहे."

स्विझर्लॅन्दमधील कुरणांत जशीं असंख्य जातींचीं फुलें असतात, तशीं आपल्या येथें नाहींत; पण मधून मधून आपल्या येथील कुरणें बटरकप पुष्पांनीं द्योतित झालेलीं असतात.

"व तीं रुप्याप्रमाणें चकाकणाऱ्या लेडीस्मॉक फुलांनीं गजबजून गेलेलीं असतात[१]," आणि अरण्यें तर अधिक सुंदर व मनोवेधक

---

१. शेक्सपीअर.

वाटतात, व देखावा इतका आश्चर्यभरित आणि वन्य दिसतो कीं, स्वप्नावस्थेंतल्या रंभाअप्सरादिकांच्या निवासस्थानाप्रमाणें तो वाटतो.

हवा बिघडली आहे असें आपण वारंवार ऐकतों, पण वस्तुतः वाईट हवा ह्मणून नसतेच. हवा सर्वस्वीं आनंदकारकच असते, मात्र ती निरनिराळ्या रीतीनें आनंदकारक वाटते. हवा केव्हां केव्हां शेतकऱ्यांस किंवा शेतीभातीस वाईट असते, पण मनुष्यप्राण्यास सर्वप्रकारची हवा चांगलीच. सूर्यप्रकाश आल्हादकारक वाटतो, पावसानें माणूस ताजातवाना होतो, वाऱ्याच्या योगानें अंगांत कुवत येते, बर्फामुळें मन उल्लसित होतें. रस्किन ह्मणतो—"वाईट अशी हवा मुळींच नाहीं; निरनिराळ्या प्रकारची चांगली हवा असते एवढेंच."

विश्रांति ह्मणजे आळस नव्हे. ग्रीष्मऋतूंत एकाद्या झाडाखालीं पाण्याचा झुळझुळ आवाज ऐकत, किंवा निळ्या आकाशांतून तरंगणारे ढग पहात, गवतावर पडलें ह्मणजे वेळ फुकट दवडिला असें कदापि होत नाहीं.

आणखी, व्यायाम बहुशः उघड्या हवेंत घ्यावा, ह्मणजे दोहोंपासून होणारे फायदे तुह्मांस लाभतील. घोड्यावरच्या मांडीसारखा शरीराच्या आंतील रचनेस फायदेशीर असा दुसरा व्यायाम नाहीं. रोज निदान दोन तासपर्यंत मोकळ्या हवेंत रपेट करणें हें प्रत्येकानें आपलें पहिलें पवित्र कर्तव्यकर्म मानिलें पाहिजे.

स्वच्छ हवेपासून शरीरास जेवढा फायदा होतो तेवढाच मनास होतो. मनुष्यमात्रास कांहीं गुप्त गोष्ट सांगावयाची आहे ह्मणूनच कीं काय सृष्टि माणसांबरोबर बोलावयास पहातेशी नेहमीं भासते. आणि तिला गुप्त गोष्ट सांगावयाची आहे हेंही खरेंच.

पृथ्वी, आकाश, अरण्यें, माळरानें, सरोवरें, नद्या, पर्वत,

समुद्र इत्यादिक उत्तम शिक्षक होत. पुस्तकांतून आपणांपैकीं कांहींस जेवढें शिकतां येईल, त्यापेक्षां हीं जास्त शिकवितात. आणि विशेष हें कीं, तुह्मी खेड्यापाड्यांत हवापालट करण्यास गेलां, होडींत बसून नदींत फिरलां, अरण्यांत फुलें वेंचिलीं, खाड्याखुड्यांतून खनिज द्रव्यें गोळा केलीं, समुद्रकिनाऱ्यावर शिंपा व जलज वनस्पति हीं जमा केलीं, क्रिकेट किंवा गोल्फ खेळलां, अथवा इतर कोणत्याही प्रकारचा व्यायाय केला व शुद्ध हवा घेतली, ह्मणजे तुमची शरीरप्रकृति सुधारलेली दिसेल इतकेंच नव्हे, तर तुमची चिंता, काळजी, व दुःख हीं नाहींशीं झालेलीं, निदान बऱ्याच प्रमाणानें कमी झालेलीं तरी दिसतील. सृष्टि आपणांस शांत करिते, आपलें डोकें थंड करिते, व आपणांस हुशारी आणिते. ती आपलें मन अधिक शांत व आनंदी करिते.

ऐषआराम व करमणुकीच्या गोष्टी ह्यांतच नुसतें आयुष्य घालवूं लागलों, तर स्वार्थाकडे लक्ष दिलें असें होईल इतकेंच नव्हे, तर त्यांत अगदींच चव रहाणार नाहीं. खेळ ह्मणजे आयुष्यांतील इतिकर्तव्यता असें कदापि मानितां कामा नये, पण बेताबातानें उपभोगार्ह वस्तूंचा उपभोग घेणें ह्मणजे आळसांत वेळ घालविणें असें नव्हे.

करमणुकीच्या गोष्टींत मुळाशीं काय पाहिजे ? ह्या जगांत सुखेंही आहेत व सुखाभासही आहेत. प्लेतोनें प्रोतार्कसकडून सॉक्रेतिसाला प्रश्न करविला आहे. तो असा—"सॉक्रेतिसा, खऱ्या सुखाच्या गोष्टी त्या कोणत्या ?" त्यावर सॉक्रेतिसानें उत्तर केलें—"सुंदर मानिलेले रंग व आकृती पाहून जें सुख होतें तें, नानाप्रकारचे गंध घेऊन व आवाज ऐकून ज्या सुखभावना होतात त्यांपैकीं बहुतेक, ज्या पदार्थांचें अस्तित्व आपणांस

भासतें, व जे जवळ असले ह्मणजे आनंद होतो, पण जवळ नसले ह्मणजे वाईट वाटत नाहीं व दुःखही होत नाहीं अशा पदार्थांपासून उत्पन्न होतें तें; ह्या सर्वांस खऱ्या सुखाच्या गोष्टी ह्मणतात."

इंद्रियांपासून खरें सुख मिळतें, पण तें मिळविणें सर्वांस मोठी भूति नव्हे. फ्लेतो आणखी असें लिहितो—"पेलिबस प्रतिपादित करितो कीं, चैन, मौज, आनंद व त्यांसारख्या इतर भावना मनुष्यमात्रास फायदेशीर आहेत खऱ्या; परंतु शहाणपण, ज्ञान, स्मरणशक्ति, तत्सदृश खरीं मतें, खरीं प्रमाणें इत्यादि गोष्टी ज्यांना त्यांचा आस्वाद घेणें शक्य आहे, त्यांना सुखापेक्षां जास्त श्रेयस्कर व इष्ट आहेत. तसेंच आज हयातींत असलेल्या व पुढें जन्मास येणाऱ्या सर्व मनुष्यप्राण्यांना त्या सर्वांत फायदेशीर आहेत."

खरीं सुखें बहुतेक अगणित आहेत. सोयरींधायरीं व मित्रमंडळी, शिळोप्याच्या गोष्टी, पुस्तकें, गाणेंबजावणें, कविता, कलाकुसरीचे पदार्थ, व्यायाम व विश्रांति, सृष्टिसौंदर्य व सृष्टिवैचित्र्य, ग्रीष्म व शरदृऋतु, प्रातःकाळ व सायंकाळ, दिवस व रात्र, सूर्यप्रकाश व वादळ, अरण्यें व शेतें, नद्या, सरोवरें, समुद्र, प्राणिमात्र व वनस्पती, झाडें व फुलें, पानें, फळें हीं खऱ्या सुखांपैकीं केवळ कांहीं होत.

"ईश्वरी प्रसादद्योतक पृथ्वीजन्य वस्तु आह्मांस मिळाव्या, ह्मणजे आह्मी त्यांचा उपभोग घेऊं अशी, जेव्हां आपण करुणा भाकितों, तेव्हां ईश्वराजवळून आपण सामान्यसा वर मागतों असें नव्हे." "तशांत माणसाला सध्यां माहीत नाहींत अशा नव्या सुखांच्या गोष्टी पुष्कळ असणें देखील शक्य आहे. त्या सुधारणेच्या उत्तम मार्गानें जातां जातां त्याला सांपडतील.[१]"

---

१. मॉन्टेगा ह्याचें आयडीयल्स ऑफ लाईफ.

हें आयुष्य आपण सुखावह करून घेतलें नाहीं तर अपराध आपलाच. रस्किन ह्मणतो—"सर्वांस आयुष्यांत सुख मिळवितां येईल; मात्र थोड्यांनाच एकादें मोठें कृत्य करितां येईल."

आरबी भाषेंतल्या सुरस गोष्टींतील सर्वांत उत्तम भारलेला पदार्थ ह्मणजे जादूची सतरंजी होय. तीवर मनुष्य बसला ह्मणजे वाटेल तेथें त्यास जातां येई. सांप्रत रेल्वेनें आपणां सर्वांस तसें करितां येतें; व "ज्या मानानें दृश्य पदार्थांचा टप्पा वाढत जातो, त्या मानानें आपल्या कल्पनाशक्तीची धांव वाढत जाते[१]."

आणखी ह्या जगांतील सुखांमध्यें चांगल्या संभाषणास उच्चपद द्यावेंसें मला वाटतें. तें एक उद्दीपक द्रव्यच असून शरीर व मन ह्या दोहोंसही पुष्टिकारक होतें. बेनजान्सनपासून आपला बराच फायदा झाला हें हेरिक आपल्या चटकदार भाषेंत कबूल करितो, व आपल्या भोजनसमारंभाचें असें वर्णन करितो—जेव्हां आह्मी एकत्र जमत असूं, व परस्परांवरील प्रेमातिरेकानें केवळ वेडे न होतां स्वतःस विसरत असूं, तेव्हां देखील तुझी प्रत्येक कविता मांसाहारापेक्षां व निशा आणणाऱ्या मद्यापेक्षां अधिक गोड वाटे.

संध्याकाळचा वेळ आनंदांत गेला असें सांगावयाचें असलें कीं, "महाराज, आह्मी सुरेख गोष्टी करीत होतों" असें जॉनसन ह्मणे. डार्विन, लायल, किंग्स्ले, रस्किन, हूकर, हक्स्ले, अथवा टिंडल, ह्यांच्या संगतींत घालविलेला एकाददुसरा तास स्वच्छ हवेच्या झुळकेप्रमाणें मला वारंवार ताजातवाना करितो.

---

१ रस्किन.

संभाषणकलेमध्यें माणसांत जितका कमीजास्तपणा दिसून येतो, तितका इतर गुणांमध्यें दिसून येत नाहीं. ज्यांच्या बरोबर संभाषण केलें असतां मन रमेल अशीं पुष्कळ हुशार माणसें माझ्या माहितींतलीं आहेत; पण त्यांच्या पासून ज्ञान निवळ काढून घेतल्याशिवाय मिळावयाचें नाहीं. चांगलें संभाषण करणारा माणूस नेहमीं हवासा वाटतो. इतर गोष्टींप्रमाणें ही कला देखील व्यासंगानें कमावितां येते. अभ्यास केल्याशिवाय कोणालाही नीट रीतीनें संभाषण करितां येणार नाहीं.

सर वुइल्यम टेम्पल ह्मणतो—"चांगलें संभाषण चार गोष्टी मिळून झालेलें असतें"—पहिली गोष्ट—सत्य, दुसरी—समज, तिसरी—सुस्वभाव, चवथी—नक्कल करण्याची शक्ति. ह्यांपैकीं पहिल्या तीन गोष्टी कोणाच्याही अंगीं असणें शक्य आहे. तरी पुष्कळ लोकांनीं बरेंच ज्ञान संभाषणापासून मिळविलेलें असतें. बेकन ह्मणतो—"जो वारंवार प्रश्न करील त्याला पुष्कळ ज्ञान मिळेल, व त्याचें बरेंच समाधान होईल. परंतु विशेषेंकरून ज्याला प्रश्न करावयाचे त्याच्या ज्ञानाला अनुलक्षून प्रश्न विचारले तरच तें प्राप्त होईल. कारण, त्याच्या योगानें ज्याला प्रश्न विचारावयाचे त्याला उत्तर देण्यास आनंद वाटेल, व जिज्ञासूंस सारखें ज्ञान मिळत जाईल."

सौंदर्याचें खरें स्वरूप ओळखण्याची शक्ति मुलांत तर काय, पण आपणांत देखील आणण्यास पुरेसा यत्न आपण करीत नाहीं. व वास्तविक पाहिलें तर इतकें शुद्ध, अनायासानें साध्य होणारें, मोल न पडतां मिळणारें, व नेहमीं आपल्या ठिकाणीं वास करणारें असें दुसरें तें कोणतें सुख! सृष्टींतील देखावे, वृक्ष, दाट पालवी, फलपुष्पें, निळें आकाश, लोंकरीसारखे दिसणारे ढग, चकाकणारा समुद्र, सरोवरावरील वीचितरंग, नदीपात्रांवरील

किरणांची चकाकी, गवतावरील छाया, चंद्र व रात्रीं दृष्टीस पडणारे इतर तारागण इत्यादि पाहण्यांत एकाद्याला अत्यंत सुख वाटतें. दुसऱ्या माणसाला त्यांचें कांहीं वाटत नाहीं. अशा माणसाला चंद्र व तारे ह्यांची मातब्बरी नाहीं. पक्षी, कीटक, तरुगण, पुष्पें, सरित्समूह, सरोवरें, समुद्र, चंद्रसूर्य, तारे ह्यांच्या पासून त्यास सुख होत नाहीं. कारण, "शरीरास आत्म्याचें वळण असतें; आत्मा हा सांचा होय, व शरीर तदाकार बनतें.[१]"

"क्षुद्र अहंकारी मानवास भपका दाखविण्याकरितां कृत्रिम रंग पुरे आहेत. परंतु नश्वर अभ्रमालेच्या किंवा रानटी बदकाच्या एका पिच्छाच्या रंगाबरोबर साम्यता करण्याइतक्या योग्यतेचे ते नाहींत.[२]"

रस्किन ह्मणतो—"आणखी एकजातीचा प्रकाश आहे. तो प्रकाश सौंदर्याची जास्त अनुभूति झाल्यामुळें डोळ्यांस एकसारखा पहावासा वाटतो. तो प्रकाश कोणता, तर अरुणोदयसमयींचा किंवा संध्यासमयींचा, व क्षितिजावरील निळ्या आकाशांत दिवट्यांप्रमाणें दिसणाऱ्या आरक्त अभ्रमालेचा." आकाशांतील रंगांनीं पृथ्वी प्रकाशित झालेली दिसते, व "पलीकडलें नारिंगी दिसणारें पश्चिम गिरिशिखर अस्तास जाणाऱ्या सूर्यकिरणांचें परावर्तन आज हजारों वर्षें करीत आलें आहे." सूर्यास्ताची शोभा इतकी असते कीं, स्वर्गद्वारांतून स्वर्गाचीच जणूं शोभा आपण पहात आहोंत असा भास होतो.

जुन्या करारावर टीका लिहिणाऱ्या लोकांनीं असें सांगितलें आहे कीं, 'माना' प्रत्येकाला आपल्या आवडीच्या पदार्थाप्रमाणें

---

१ स्पेन्सर. २ हॅमर्टन.

वाटला. तसेंच सृष्टीमध्यें देखील इच्छुजनांस आपल्या मोठ्या आवडीचे पदार्थ सांपडतील.

तथापि, खऱ्या सौख्यजनक गोष्टींची लांबलचक यादी, नांवें सांगून, संपविण्याचा यत्न करण्याचा माझा मानस नाहीं. व आनंद देणाऱ्या अशा अपायरहित पुष्कळ गोष्टी असतां अशुद्ध, किंवा ज्यांच्या शुद्धतेविषयीं निदान संशय असेल अशा गोष्टी कां निवडाव्या? होतां होईल तों शुद्ध आनंदजनक गोष्टींचा उपभोग घ्या. मग इतर गोष्टींबद्दल विचार करूं.

ज्यांनीं ह्मणे जगाचा बरावाईट अनुभव घेतला, किंवा जे आह्मांस जग कळतें असें ह्मणतात त्यांची मोठी चूक होते. ह्या जगांतील खऱ्याखुऱ्या गोष्टी कोणाही गांवढ्याला कळतात तितक्या देखील त्यांस कळत नाहींत. व हा गांवढ्या आपल्या गांवाच्या बाहेर कधीं गेलेला नसतो; पण त्यानें गांवांतच राहून आपल्या डोळ्यांचा नीट उपयोग केलेला असतो. आपल्या विषयवासना तृप्त करण्यांत घालविलेलें आयुष्य, ज्यास "आनंदाचें आयुष्य" असें चुकीनें ह्मणतात, तें सुखाचें समजणें ह्मणजे सुख ह्या शब्दाचा कुत्सित रीतीनें उपहास करण्याप्रमाणें होय. त्यास बळी पडलेले लोक स्वतःकडे दोष येत असतांही जगाबद्दल कुरकुर करूं लागतात. डी मुसे ह्मणे—"मी तरुण आहें, व आयुष्याचा फक्त अर्धमार्ग मीं आक्रमिला आहे; तरी मी तितक्यांतच त्रासून पुनःपुनः वळतों व मागें पाहतों." ह्या बोलण्यांत किती औदासीन्य दिसून येतें! त्यानें आपलें आयुष्य शहाणपणानें घालविलें असतें, तर गतकालाबद्दल त्यानें ईश्वराचे आभार मानिले असते, व भावी कालाबद्दल त्याला मोठी आशा रहाती.

आयुष्यक्रमाची किंमत नीतिदृष्ट्या ठरवावयाची. "आणखी,

जेव्हां आत्मा देहावर योग्य दाब ठेवितो, अथवा मोठ्या ममतेनें आपली ताबेदारी चालवितो, देहाचा फायदा होईल अशी त्याची काळजी घेतो, त्याकरितां विपुल संग्रह करितो व भागीदार असून हलक्या प्रतीचा जो देह त्याची कींव बाळगून वर्तन करितो, तेव्हांच देह व आत्म्या ह्यांच्या संयोगानें पूर्ण मनुष्य होतो. परंतु उद्यां जर देह अम्मल चालवूं लागला, व वासनातिरेकानें बुद्धीस भ्रम करून संकल्पशक्ति व आवडनिवड करण्याची शक्ति ह्यांस त्यानें अंकित करून ठेविलें, तर देह व आत्मा ह्यांची चांगली जोडी जमली नाहीं असें होतें, व माणूस मूर्ख व दुःखी होतो. आत्मा शास्ता नसला तर तो देहाला योग्य जोडीदार नव्हे. तो शास्ता असला पाहिजे, किंवा त्यास गुलाम तरी झालें पाहिजे.[१]"

---

१ जेरेमी टेलर.

# भाग ५.

## आरोग्य.

आत्मा मनुष्याचा उच्च अंश खरा, पण निदान सद्यस्थितींत तो शरीरद्वारें क्रिया करितो. ह्याचें विनोदपर उदाहरण ह्मटलें ह्मणजे आपला प्रख्यात देशबांधव फॅरडे ह्याच्या प्रत्ययास आलेली गोष्ट होय. लहान वयांतच त्यानें गांध्याच्या दुकानांत पोटगीच्या धंद्यास सुरुवात केली. त्याला एकदां एका गिऱ्हाइकाकडे पाठविलें; त्यानें घांट वाजविली, पण कोणी जबाब देईना. घरांत कोणी आहे किंवा नाहीं ह्याचा निर्णय करण्यास त्यानें आपली मान कठड्यांतून आंत घातली, तों त्याच्या मनांत प्रश्न उद्भवला कीं, आपण खरोखरी कठड्याच्या कोणत्या बाजूस आहोंत? विचार करून त्यानें ठरविलें कीं, ज्या बाजूस माणसाचें डोकें त्या बाजूस तो असला पाहिजे. इतक्यांत, त्याला मागें सरण्यास अवकाश मिळण्यापूर्वीं दरवाजा एकाएकीं उघडला, व त्याचा पाय कठड्यांत सांपडून चेंगरला; आणि "डोकें व इतर अवयव" ह्या जुन्या कल्पित गोष्टीचें तात्पर्य खाडकन् त्याच्या डोळ्यांपुढें उभें राहिलें.

आपल्या आयुष्याच्या वस्तुस्थितीमुळें आरोग्याकडे लक्ष पुरविणें विशेष महत्वाचें झालें आहे. आपले वाडवडील गांवढ्यांत जाऊन जास्त वेळ रहात, जास्त वेळ मोकळ्या हवेंत फिरत, व कृषिकर्मांत जास्त प्रमाणानें गुंतलेले असत. आपण अधिक प्रमाणानें शहरांत गोळा होऊन रहातों, पूर्वींपेक्षां जास्त काम घरांत बसून, दुकानांतून आणि कारखान्यांतून, करितों. आपलीं सारीं कामें एकजागीं बसून करण्याचीं असतात; व तीं

करितांना आपणांस नेहमीं वांकावें लागतें. त्यामुळें मेंदूस व स्नायूंस जास्त श्रम घडतात. शहरांतून राहणारे लोक आपल्या पूर्वजांपेक्षां जास्त नेभळे झाले आहेत ह्याबद्दल क्वचितच संशय उद्भवेल, असें मला वाटतें. शहरांतून, किंवा मोठाले कारखाने जेथें आहेत अशा इतर गांवांतून गाडींत बसून एकादा फिरला, तर पुरुष व स्त्रिया ह्यांची फेंक दिसणारीं तोंडें, आकुंचित छात्या इत्यादि परींनीं व्यक्त होणारा कमकुवतपणा त्याच्या लक्षांत आल्याशिवाय रहाणार नाहीं. आणखी, आरोग्यसंरक्षणासाठीं केलेल्या तजविजीमुळें एका प्रकारें अनर्थ ओढवला आहे. कारण, त्यामुळें अशक्त ह्मणजे जगांत रहाण्यास अयोग्य व रोगी माणसें देखील वांचूं लागलीं आहेत. दुखण्याची विपत्ति क्षुल्लक कारणांमुळें आपणांवर ओढवते. हीं कारणें, थोडीशी काळजी घेतल्यास, व आरोग्यसंरक्षणाचीं प्राथमिक तत्वें माहीत असल्यास, निवारण्यासारखीं आहेत.

ज्या युगांबद्दल ऐतिहासिक माहिती थोडीशी तरी उपलब्ध आहे त्या युगांत देखील शहाणे मुत्सद्दी आरोग्यविषयाकडे लक्ष देत असत. शरीर निरोगी तर मन निरोगी ह्याचें खरें महत्व त्यांना उमगलें होतें.

शरीरसंपत्तीचें जतन करणें हें आपलें पवित्र कर्तव्य होय. आरोग्यसंरक्षणाचे नियम मोझेजच्या धर्मोपदेशाचा बराच मोठा भाग होय, असें कधीं कधीं ह्मणतात. हें खरें असेलसें वाटत नाहीं. आपल्या धर्मपुस्तकांतही नियमसंहिता दिलेली आहे. तींत समाजविषयक, धर्मविषयक व राजनीतिविषयक नियम आहेत हें लक्षांत ठेविलें पाहिजे. तथापि, आरोग्यविषयक नियमांचा जरी धर्मांत न्यायानें समावेश होत नसला, तरी ते बहुतेक धर्मविषयक नियमांच्या तोडीचे नेहमीं मानिले जातात.

"काय! ईशस्वरूपीं आत्मा जो तुमच्या देहांत वास करितो त्याचें देऊळ ह्मणजे तुमचें शरीर होय, हें शरीर तुह्मांस ईश्वराकडून मिळालें, त्यावर तुमचा हक्क नाहीं, हें तुह्मांस माहीत नाहीं?"[१] मध्ययुगांतले लोक शरीरास तुच्छ मानीत; इजिप्तियन लोक त्यासच पूज्य मानीत, व त्यांचें हें मत अधिक शहाणपणाचें दिसतें. कारण, चिंध्या व शरीरावर चढणारा मळ ह्यांमध्यें अंतस्थ गुण नाहीं; वस्तुस्थिति खरोखर त्याच्या उलट आहे.

"मानसिक शिक्षणपद्धतीचें जसें ग्रीक लोकांचें एक शास्त्र होतें, तसेंच शारीरिक शिक्षणपद्धतीचेंही होतें; व ते दोहोंचाही सारखाच अभ्यास करीत. त्यांच्या स्त्रिया शरीरास शोभा येईल असा व्यायाम करीत, व कांहीं तर तालीमही करीत. उघड्या व निरोगी अशा ठिकाणीं राहून त्यांनीं आपल्या शरीरांस इतकें वळण आणिलें होतें कीं, त्यांच्या आकृती कल्पांतींही ज्यांची बरोबरी होणार नाहीं, अशा मानवी सौंदर्याच्या केवळ मूर्तिच होऊन बसल्या आहेत."[२]

जिणें चिरकालिक नाहीं, आह्मांस जिणें हवें. मरण नको. अधिक आयुष्य पाहिजे; तें देखील चिरस्थायी पाहिजे.

मनाच्या निर्मळपणाची खालील पायरी शरीराचा निर्मळपणा होय, अशी एक जुनी ह्मण आहे. वैद्यशास्त्रांत झालेले सांप्रतचे शोध हिलाच पुष्टीकरण देतात. इतकेंच नव्हे, तर असें कां व तेंच कारण कां असावें ह्याचा स्पष्टपणें उलगडा करितात.

पुष्कळ रोगांचें मूळ स्नायूंच्या रोगटपणांत नसतें; रोग इतर जंतूंच्या आगंतुकीमुळें जडलेले असतात. पटकी, देवी आणि कदाचित् इतर पुष्कळ रोग आपोआप उद्भवत नाहींत. तर,

---

१ सेंट पॉल. २ किंग्स्ले.

त्यांचे जंतु आपल्या शरीरांत शिरले असले पाहिजेत. ह्मणून, आपण स्वतः शुद्ध असावें इतकेंच नव्हे, तर रहाण्याचें आपलें घर, वापरण्याचे कपडे, पिण्याचें पाणी आणि श्वासोच्छ्वास करण्याची हवा, हीं सर्व स्वच्छ असावींत हें महत्वाचें आहे.

मनुष्याचा देह खरोखर एक सततची दैविक चमत्कृति होय. मेंदूमध्यें किती विलक्षण ज्ञान रहातें त्याचाच विचार क्षणभर कराना! इच्छेच्या अनुरोधानें स्नायु किती तत्परतेनें वागतात तें पहाना! सर जेम्स पेजटनें आपणांस सांगितलें आहे कीं, एकाद्या नेहमीं तालीम घेणाऱ्या गवयाला पियानोवर एका सेकंदास २४ सूर काढितां येतात. प्रत्येक सुराच्या वेळीं मेंदूतून बोटाकडे स्नायूंस गति देणारा प्रवाह गेला पाहिजे, आणि तोच बोटाकडून मेंदूकडे गेला पाहिजे. प्रत्येक सुरास बोट तीन वेळ हालविलें पाहिजे; एकदां सुराची पट्टी दाबतेवेळीं, एकदां ती सोडते वेळीं, आणि निदान एकदां तरी मिश्रसूर काढिते वेळीं; ह्या रीतीनें एका सेकंदास कमींत कमी ७२ वेळां चलनवलन होतें. प्रत्येक चलनवलनाच्या वेळीं इच्छेची एकएक क्रिया घडते; व प्रत्येक वेळीं, बिनचूक, नियमित अवसानानें, नियमित त्वरेनें, व नियमित ठिकाणीं गतीचा प्रवाह जातो.

त्वचा हें एक नाजूक व फार करामतीनें बनविलेलें इंद्रिय होय. त्याला लक्षावधि छिद्रें आहेत. त्यांत शेंकडों मैल लांबीच्या धमन्या, नाड्या, स्नायु, अतिसूक्ष्म छिद्रें आहेत. हें इंद्रिय वारंवार नवें होत जातें; व ह्यानें आपलीं कामें यथायोग्य करावीं, ह्मणून त्याची योग्य तरतूद ठेवावी लागते, व पुष्कळसें पाणी वापरावें लागतें. आणखी, केंसास जशी फणी तसा शरीरास ब्रश होय. हें आश्चर्यकारक इंद्रिय निरोगी ठेवण्यासाठीं त्याचे निरनिराळे भाग नेहमीं वापरण्यांत आले पाहिजेत.

"फार स्वस्थता हें त्याच्या रोगाचें कारण होय" असें मिल्टन हॉबसनबद्दल ह्मणे. हेंच ह्मणणें पुष्कळ रोगी माणसांस लागू पडतें. "ज्या हॅनिबॉलला बर्फानें जिंकिलें नाहीं, किंवा आल्प्स पर्वतानें हटविलें नाहीं तो हॅनिबॉल कॅम्पेनियामधील चैनीच्या पदार्थांपुढें हटला. जो शस्त्रविद्येंत अजिंक्य तो चैनबाजीस हार गेला[1]."

इंद्रियांपासून पुष्कळ अपायरहित सुखें आपणांस मिळतात. परंतु त्यांच्या कह्यांत जर आपण वागूं लागलों तर, ज्याप्रमाणें पुरातनकाळच्या नागकन्या खलाशांस खडकांवर किंवा भोंवऱ्यांमध्यें बुडवून मारीत असत त्याप्रमाणें तीं आपणांस ह्या भवसागरांतील भोंवऱ्यांत बुडवून निःसंशय मारितील.

जेवण्याखाण्यांत चुका करून आपण बरेच रोग जडवून घेतों. पेय ह्या शब्दाचा अर्थ वारंवार दारू असाच घेतात. व दारू हा पदार्थ उत्तरेकडील राष्ट्रांची मूलव्याधीच होय. कांहीं ठिकाणीं सुरा रामबाण औषधाप्रमाणें उपयोगीं पडते. पण सुरादेवी इतकी जबरदस्त मोहिनी आहे कीं, आपल्या देशबंधूंचीं जवळ जवळ अर्धीं दुःखें, पापें, व यातना ह्यांचा उद्भव तीच करिते.

शुद्ध साधें पाणी फारच उत्तम. त्यानें कोणाचीही प्रवृत्ति पापाकडे केली नाहीं; गुन्हा हा मद्याचा अर्क होय, असें बहुतेक ह्मटलें तरी चालेल. एक यहुदी ह्मण अशी आहे कीं, " जेथें सैतानास स्वतः जातां येत नाहीं तेथें तो सुराआक्काला पाठवितो." एकदां का पिशाच्च आंत घुसलें आणि घरांत त्यानें ठाणें दिलें कीं, शांति, आशा, आनंद ह्यांचें ठाणें उठलें[2].

प्लिनी ह्मणतो—"सुराआक्काच्या प्रभावानें हातांस कांपरें

---

१ सेनिका. २ चालीस.

सुटतें, डोळ्यांतून पाणी गळूं लागतें, रात्रीं अस्वस्थ वाटतें, भयंकर स्वप्नें पडतात, सकाळीं तोंडास घाण मारते, व सर्व गोष्टींचा अगदीं विसर पडूं लागतो." सर वॉल्टर रॅले ह्याचा उतारा देऊन आणखी असें ह्मणतो—"ज्याची सुराआक्कावर भक्ति बसली त्याजवर कोणीही विश्वास ठेवित नाहीं. कारण, त्याजवळ गोष्ट गुप्त रहात नाहीं. सुरा माणसास पशुवत् वर्तन करण्यास लाविते; इतकेंच नव्हे, तर त्याकडून वेडे चाळे करविते. जर तुला ती आवडूं लागली तर, तुझी खुद्द बायको, तुझे मित्र, तुझीं मुलेंबाळें तुझा तिरस्कार करितील."

मद्याचा निषेध करणारे उत्तम उद्गार कवि शेक्सपीयरच्या नाटकांत बरेच आढळतात. अरेरे विचारशक्ति नाहींसा करणारा शत्रु माणसांनीं घशांतून आंत येऊं द्यावा; मोठ्या आनंदानें टिऱ्या पिटून, लोळून त्यांनीं पशुप्राय बनावें हें किती लाजिरवाणें आहे! "समजूतदार असून माणसानें क्षणांत मूर्ख, क्षणांत पशु बनावें ना?" तरी असें बोलणें ह्मणजे पशूंना उगाच दूषण दिल्यासारखें होय.

उलटपक्षीं मिताहारापासून किती विलक्षण फायदा होतो तो पहा! जरी मी ह्मातारा दिसतों, तरी मी बळकट असून माझ्या अंगांत कुवत आहे. कारण, तरुणपणीं मी उष्ण व मादक पेयांचा माझ्या रक्ताला स्पर्श होऊं दिला नाहीं. * * * * ह्मणून माझें उतार वय रोगरहित हिंवाळ्याप्रमाणें आहे. त्यांत धुकें आहे, पण शरीराची तरतरी कायम आहे[१].

दारूबाजीच्या अनिष्टाचा शुभवर्तनांत व्हावा तितका निषेध झालेला नाहीं, ह्याबद्दल कधीं कधीं लोक आश्चर्य करितात. पण हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, तें उष्ण देशांत लिहिलें होतें.

---

१ शेक्सपीयर.

दारूबाजी हा दुर्गुण मुख्यत्वेंकरून शीतदेशांतला होय. तरी सालोमननें त्याचा निषेध केलेला आहेच.

कोणांवर संकटें येतात ? तंटेबखेडे होणें, असंबद्ध बडबड करणें, निष्कारण जखमा होणें, डोळे लाल असणें, इत्यादि प्रसंग कोणांवर गुदरतात ? जे दारू झोंकित बसतात त्यांच्यावर; ज्यांना भेळसेळ दारू पाहिजे त्यांच्यावर. दारू भांड्यांत लाल जर्द दिसते तेव्हांच तिचा रंग पाहून आनंद मानूं नकोस. अंतीं ती नागिणीसारखी डसते, व सर्पासारखी दंश करिते[1].

दारूबाजीचा दुर्गुण दिवसेंदिवस कमी होत चालला आहे असें मानण्यास थोडासा आधार आहे. बुद्धीचें काम करण्यास जसजशी जास्त संधि मिळूं लागली, गायन जसजसें जास्त उपलब्ध होऊं लागलें, चित्रें, पुस्तकें हीं जसजशीं मिळूं लागलीं, तसतशीं मान राखून राहणारीं सुखवस्तू लोकांचीं घराणीं दारू पिण्याच्या नेमस्तपणास उत्तेजन देऊं लागलीं आहेत.

परंतु ज्याप्रमाणें मद्यापासून होणारीं अनिष्टें अधिकाधिक स्पष्ट होऊं लागलीं आहेत, त्याप्रमाणेंच अधाशीपणें खाण्यापासून होणारीं अनिष्टें देखील उघड होऊं लागलीं आहेत. प्रत्येक दहा माणसीं नऊ आहारापलीकडे व प्रकृतीस मानेल त्यापेक्षां जास्त अन्न खातात. मधून मधून एकादी मेजवानी केल्यास वावगें नाहीं. पण रोजरोज जें नियमानें आकंठ खाणें तें अपायकारक होतें; व त्यापासून मांद्य येतें. आहाराबाहेर खाणें फार सोपें आहे. आणि माणूस पोटास हवें त्यापेक्षां कमी खाईल अशी भीतीच नको.

मिताहार आयुष्यभर ठेवावा. वस्तुतः मिताहार ज्ञानरूपी व उत्साहरूपी सुवर्णास शुद्ध करितो; दोघांची किंमत दसपट करितो;

---

१ प्रॉव्हर्ब्स.

शक्ति कायम ठेवून अंगीं सौम्यपणा आणितो. आवेश मर्यादित करितो. ह्या जगांत बेरें करून घेण्याचें गुप्त असें मोठें साधन मिताहार होय[१].

मिताहार हें सामर्थ्याचें आदितत्व होय; क्षीणत्वाचें नव्हे. त्यामुळें आत्मसंयमन करितां येतें.

जेवतेवेळीं रेंगाळत बसूं नका; तरी पण जेवतांना घाई करूं नका. जेवून उठतेवेळीं नेहमीं थोडी भूक राखून उठावें असें ह्मटलें आहे. पोट गच्च भरलें तर मेंदूला काम होत नाहीं. 'जेवणानंतर थोडा वेळ स्वस्थ बसावें' हा नियम चांगला आहे. एक जेवण होऊन दुसरें होईपर्यंत कांहींच काम करितां येणार नाहीं इतकें खाणें हा आयुष्यक्रम अतिक्षुद्र होय. जीवधारणा होईलशा बेतानें खा; केवळ खाण्याकरितां जीवधारणा करूं नका. फार वेळ जेवित बसणें ह्मणजे मरण लवकर ओढवून घेण्यासारखें होय.

रानटी लोक जेव्हां वैदूच्या धंद्यास आरंभ करितात तेव्हां त्यांची पहिली तयारी ह्मणजे बऱ्याच दिवसांचें उपोषण होय. त्याचा परिणाम असा होतो कीं, ज्ञानतंतूंस अधिकाधिक चेतना येत जाते; ह्याला ते ईश्वरी प्रसाद समजतात. ते ही गोष्ट विकोपास नेतात ह्यांत संशय नाहीं. तरी पण आहार कमी केल्यास मेंदूचें काम जास्त करितां येतें हें प्रत्येकास शोधांतीं कळून येईल.

आणखी, पोट रिकामें असलें ह्मणजे मनुष्यास हुशारी असते. फार खाल्लें ह्मणजे मनुष्य मंदावतो. इतर एकंदर सर्व रोगांमुळें जितकीं माणसें आजारी पडतात, तितकींच एका अजीर्णामुळें आजारी पडतात.

बेकन ह्मणतो—"खाण्यापिण्याच्या मुख्य पदार्थांत एकदम

---

१ मिस सिव्हेल.

फेरफार करूं नका. पण जरूरी असल्यास कराच, व बाकीच्या गोष्टींचा त्या मानानें बदल करा. जेवतेवेळीं, निजतेवेळीं, व व्यायाम करतेवेळीं आनंदांत असणें व मोकळ्या मनानें वागणें हेंच दीर्घायुष्यास उत्तम औषध होय."

ॲबरनेथी ह्मणतो—"तुह्मांला निरोगी रहाणें असलें तर दिवसा सहा पेन्सांवर उपजीविका केली पाहिजे; व ते सहा पेन्स स्वतः मिळविले पाहिजेत." ह्या बोधप्रद ह्मणींत खाण्यापिण्यास व व्यायामास आवश्यक असणाऱ्या गोष्टी थोडक्यांत सांगितल्या आहेत. ह्या स्वस्ताईच्या दिवसांत सहा पेन्सांत चांगलें पुरेसें पौष्टिक अन्न विकत घेतां येईल; पण दारू पिऊन बेहोष होतां येणार नाहीं, आणि अधाश्यासारखें खातां येणार नाहीं. ही ह्मण व्यायामास देखील जितकें महत्व द्यावें तितकें देते.

सध्यांच्या वस्तुस्थितीप्रमाणें, उघड्या हवेंत कितीही वेळ घालविला तरी तो फुकट खर्चिला असें होत नाहीं. अशा घटका आयुष्यक्रमांत मोजल्या जाणार नाहींत, इतकेंच नव्हे, तर त्या तुमच्या आयुष्यास भर घालितील—इहलोकींचें आयुष्य लांबविण्याकडे त्यांचा कल असेल. रोमन लोकांची एक उत्तम ह्मण आहे; ती ही कीं, घराबाहेर कितीही वेळ असलांत तरी त्यापासून तोटा नाहीं.

स्वच्छ हवेप्रमाणें स्वच्छ पाणीही जरूरीचें आहे. आंतून व बाहेरून पाणी जेवढें घेववेल तेवढें घ्यावें. थंड सोसलेंच तर बरें. दांत साफ ठेवणें इत्यादि गोष्टी क्षुल्लक वाटतील, तरी त्यांमुळें देखील शरीरसुखांत थोडा कमीपणा येतो असें नव्हे.

आरोग्य बहुतकरून आपल्या संवयी व अन्न ह्यांवर अवलंबून असतें; औषध घेण्यावर नसतें. आपले पूर्वज रोगांपासून मुक्त रहाण्यास औषधें घेत असत. वैद्यांच्या पाठशालांतून तसला

उपदेश होत असे इतकेंच नव्हे, तर बेकननें देखील औषध घ्यावें असें सांगितलें आहे. पण तें तत्वतःच चुकीचें होय. ती चूक आहे असें दाखवून देणारा पहिला इसम लॉक असा-वासा वाटतो. ओषधिशास्त्र ह्या नांवावरूनच ओषधींचा उपयोग करावा असें निघतें. पण सावधगिरीनें वागलों तर औषधामागें आपणांस फार थोडा खर्च करावा लागेल.

सृष्टीला आपल्या क्रमानुसार वागूं द्या. तिच्या वाटेस जाऊं नका. 'सृष्टीच्या जागृत तत्त्वांविरुद्ध वर्तन करूं नका, तिला स्वरक्षण करूं द्या, कोणत्याही औषधापेक्षां हें जास्त फायदेशीर होईल' असें नेपोलियन ह्मणे.

बरीचशी शुद्ध हवा, बरेंचसें पाणी व मिताहार ह्यांच्या योगें बहुतेकांस आपल्या अंगीं आरोग्य व शक्ति हीं खेळत आहेत अशी आनंददायक भावना होईल, व अगदीं ह्मातारपण येईपर्यंत त्यांच्या अंगांत तारुण्याची तरतरी राहील.

परंतु आरोग्य हें केवळ शरीरावर अवलंबून नाहीं. 'क्रोध, मत्सर, दुःख, भीति इत्यादि विकार चेतनाशक्तीचा नाश करणारे होत. उलटपक्षीं, आनंदीस्वभाव, मनमिळाऊपणा, व मनाचें स्वास्थ्य हीं आयुष्याचीं बलवत्तर अंगें होत.'

लायकर्गसनें प्रत्येक भोजनगृहांतून हास्यरसाभिमानी देवतेचा पुतळा स्थापिला होता असें सांगतात. बफून ह्मणे 'पुष्कळ लोकांस जास्त वर्षें जगतां आलें असतें. पण ते ताठ्यामुळें व जळजळीमुळें मरतात.' हें तो आपल्या देशबांधवांविषयीं ह्मणत असे; पण तें इतर लोकांसही लागू आहे. जेव्हां आपल्या शरीरप्रकृतींत चल-बिचल होते तेव्हां आपणांस त्रास होतो; क्षुल्लक गोष्टी भयंकर संकटाप्रमाणें भासूं लागतात. असें झालें ह्मणजे, विश्रांति व शुद्ध

---

१ डॉ॰ रिचर्डसन.

हवा आपणांस हवी असें खात्रीपूर्वक समजावें. मुलांवर कामाचा फार बोजा पडतो असें आपण वारंवार ऐकतों, व मोठीं माणसें श्रमातिशयानें मरतात असेंही आपण ऐकितों. पण मला वाटतें असलीं उदाहरणें फारच थोडीं असतील. बहुतेक उदाहरणांत आरोग्य नष्ट होतें तें नुसत्या श्रमानें नव्हे, तर संताप, दगदग आणि चिंता इत्यादि गोष्टींमुळें होतें. आळस, बाहेरख्याली, स्वैराचरण ह्यांच्या योगानें पुष्कळांचा अंत झाला आहे; तसा खऱ्या मेहनतीच्या कामामुळें झाला नाहीं. ज्याप्रमाणें स्नायूंस व्यायाम पाहिजे त्याप्रमाणें मेंदूसही पाहिजे. लवकर निजण्याची व मिताहार करण्याची संवय लावून घेतली व इतर चांगल्या संवई जडवून घेतल्या, तर अतिशय मेहनतीचें काम देखील इजा करण्याऐवजीं उलट फायदेशीर होईल; मात्र काम शक्तीपलीकडे जातां कामा नये.

नीज मुळींच येऊं नये असा प्रसंग कधींना कधीं तरी बहुतेकांवर आला असेल; त्या वेळीं मन रंजिस होतें. लहानसहान अडचणी ज्यांतून पार पडण्यांत एरव्हीं आनंद वाटावयाचा त्या अपार वाटूं लागतात; मग आनंददायक गोष्टींचा मन त्रास करितें; व वाईट झालें असेल व कदाचित् होण्याचा रंग असेल त्याचा एकसारखा ध्यास घेतें. अशा वेळीं निराश होऊं नका. निद्राभावामुळें कधीं कुणी मेला असेल असें मला वाटत नाहीं. कांहीं करा पण औषधें घेऊं नका; त्यानेंच खरें संकट ओढवतें. घरांत जेवढा थोडा वेळ काढवेल, व बाहेर जेवढा जास्त काढवेल, तेवढा काढा; आजूबाजूंच्या गोष्टींपासून होतां होईल तों त्रास करून घेऊं नका. एवढें केलें तर एकाद दिवशीं तरी निद्रासुख तुम्हांस प्राप्त होईलच अशी खात्री असूं द्या. निद्राभाव फार दिवस चाललेला नसला, तर त्याबद्दल पुष्कळांशीं तुमची

फेड झाल्यासारखी होईल. कारण, निद्रासुख हें काय आहे तें तुह्मांस चांगलें कळून चुकलें असेल. बहुतकरून आपणांस निद्रासुखाची अर्धी किंमत देखील कळत नाहीं.

बऱ्याच शारीरिक रोगांची उत्पत्ति मनांत असते. वैद्यांना रोगाची परीक्षा करण्यास फक्त शारीरिक लक्षणें पाहावयाचीं नसतात, तर त्यांच्या पुढें वारंवार खालील प्रश्न उभा रहातो.

रोगी मनाला कांहीं औषध सांगतां येत नाहीं काय? मूळ धरून राहिलेलें दुःख स्मरणशक्तींतून उपटून काढितां येत नाहीं काय? मेंदूवर बिंबलेलीं संकटें खोडून काढितां येत नाहींत काय? हृदयावर ओझें लादणाऱ्या दुःखकारक गोष्टींचा विसर पाडणारें रुचकर औषध देऊन त्याचा भार कमी करितां येत नाहीं काय?

तशांत आरोग्य हें सुखप्राप्तीचें आदितत्व होय. इतकेंच नव्हे, तर सत्कृत्यें करण्यासही तें आवश्यक आहे. त्याचा त्याग करणें ह्मणजे तें फुकट घालविणें; त्यांत आपमतलबीपणाही दिसतो. वाजवीपेक्षां फाजील श्रम केले तर काम चांगल्या रीतीनें करणें अशक्य होतें; निदान आपल्या सामर्थ्यानुरूप करणें तरी अशक्य होतें व असली संवयही वाईट. कारण, अशा रीतीनें काम केलें ह्मणजे पुढें जास्त वेळ विश्रांतीची व स्वस्थतेची जरूरी लागेल. परंतु हें बाजूस ठेविलें तरी, असलें काम पहिल्या प्रतीचें उतरणार नाहीं. आणि त्यावरून त्रासलेल्याचीं व थकव्याचीं चिन्हें दिसतील. सारांश धोरण चांगलें रहाणार नाहीं. व तें काम दोघे चौघे मिळून करावयाचें असल्यास आपसांत दुही व गैरसमज होण्याचा बराच संभव आहे. एकाद्यास चित्र काढण्याचा यत्न करूं द्या कीं, आपला हात थरथरतो व कह्यांत रहात नाहीं, असें त्याला लगेच कळून येईल. असें होण्याचें कारण केवळ स्नायूंची ग्लानि नव्हे तर मेंदूचा थकवा देखील

होय. श्रम करण्यांत आनंद वाटला पाहिजे. तसा आनंद वाटावा म्हणून श्रम नियमानें व हिंमतीनें केले पाहिजेत. पण, विसांवा न घेतां श्रम करण्यांत अर्थ नाहीं. किंवा त्यांकरितां खाणेंपिणें, विश्रांति, व्यायाम, सण इत्यादींकडे दुर्लक्ष करितां कामा नये.

आरोग्य नष्ट झालें ह्मणजे किती अशक्तता वाटते व दैन्यावस्था होते हें आपण होऊन आरोग्य घालविलेलें असल्यास विशेष नजरेस येतें. उलटपक्षीं कांहीं लोक स्वतःचा मुळींच अपराध नसतां नुसत्या यातना भोगण्यासच जन्मास आलेले असतात. असल्या उदाहरणांत, शारीरिक क्षीणतेच्या मोबदलाच ह्मणून कीं काय, सृष्टीनें त्यांना निर्मळ व तरतरीत मन दिलेलें असतेंसें दिसतें. असले कांहीं दुर्दैवी लोक जगांत आढळतात. त्यांचा आनंदी स्वभाव व सालसपणा हीं, आपण जे निरोगी म्हणवितों, त्यांस धडा घालून देतात इतकेंच नव्हे, तर नेहमीं यातना भोगाव्या लागत असल्यामुळेंच जणूं असले लोक इतर माणसांपेक्षां अधिक श्रेष्ठ व पवित्र झालेले वाटतात.

# भाग ६.

## राष्ट्रशिक्षण.

ज्या काळाचा इतिहास उपलब्ध आहे अशा अगदीं प्राचीन काळापासून सर्व शहाणीं माणसें शिक्षणाचें महत्व सांगत आलीं आहेत. हितोपदेशांत सांगितलें आहे—"सर्व द्रव्यांत ज्ञान हें फार मौल्यवान् द्रव्य होय. कारण, तें चोरलें जात नाहीं, देतां येत नाहीं, अथवा संपवून टाकितां येत नाहीं." प्लेतो ह्मणतो, "सज्जन माणसास ज्या चांगल्या चांगल्या वस्तू मिळण्याजोग्या आहेत त्यांत ज्ञान हें श्रेष्ठ होय."

मॉन्टेगनें ठोकळ प्रमाणानें सांगून दिलें आहे—"अज्ञान पापाचें मूळ होय." फुलरनें[1] ह्मटलें आहे—"सर्व दानांत मोठें दान ह्मणजे विद्यादान."........

तारतम्यदृष्टीनें पाहिलें असतां अज्ञानांत घालविलेल्या आयुष्यांत औदासीन्य असतेंच असतें. उपजीविकेचें साधन ह्मणून नव्हे, तर देहसार्थक्याचें साधन ह्मणून ज्ञान माणसास हवें असें ह्मटलें आहे तें योग्य होय.

"ज्ञान मिळविणेंच मला सर्वांत जरूरीचें वाटे." असें पीलाक ह्मणे; व शेक्सपीयर देखील लार्ड सेच्या तोंडून जे वदवितो ते विचार कदाचित् स्वतःचेच असतील. अज्ञान ईश्वराचा शाप होय; ज्ञान स्वर्गास उडून जाण्याचे पंख होत.

सॉलोमन एका सुंदर कवितेंत असें ह्मणतो—ज्या माणसाला ज्ञान होतें तो सुखी; व ज्याला समज आहे तोही सुखी. ज्ञानाचा व्यापार सोन्यारुप्याच्या व्यापारापेक्षां श्रेष्ठ. त्यांत होणारा

---

१ फुलर्स वर्दीज.

नफा शुद्ध सोन्यापेक्षां अधिक मौल्यवान्; विद्या माणिकापेक्षां मौल्यवान्. ज्या ज्या गोष्टींची माणसांस वासना असते त्या त्या गोष्टी तिच्या बरोबर तुलनेस योग्य नाहींत. उदंड आयुष्य ज्ञानदेवतेच्या उजव्या हातांत; मान आणि अखंड संपत्ति डाव्या हातांत. तिच्या चालीरीती सौख्यस्वरूपी; तिचे मार्ग शांतिप्रदं.

आणखी—ज्ञान हीच मुख्य गोष्ट होय; ह्मणून, विद्यार्जन करा. इतर गोष्टी मिळवूनही समज मिळवा.

इतकें असून बहुकालपर्यंत लोकमत शिक्षणाविरुद्ध होतें. मुख्यत्वेंकरून मुलींच्या शिक्षणाविरुद्ध. जर्मन भाषेंत एक ह्मण होती, ती अशी–"बायकांचें पुस्तकालय ह्मणजे कपड्यालत्त्याचें कपाट." फ्रेंच भाषेंत दुसरी एक ह्मण होती–"मुलींस चार शुभवर्तमान प्रगट करणारांची ओळख करून द्या; अथवा चार भिंतींच्या आंत कोंडून ठेवा." अगदीं गरीब लोक किंवा सभ्य ह्मणवून घेणारे लोक ह्या दोघांचेंही शिक्षणाशीं कर्तव्य नाहीं असें मत आज काल होतें. शिक्षणाशीं फक्त धर्मोपदेशक, योगी, संन्याशी ह्यांचें कर्तव्य असें लोक मानीत. क्लार्क ह्या शब्दाचा अर्थच तो.

डॉ० जॉनसनसारख्या भल्या व समजूतदार माणसानें सिद्ध कृत्याप्रमाणें ठरवून ठेविलें होतें कीं, "प्रत्येकानें शिकण्याचें केलें तर लोकांची हेलपाटी करण्यास कोणी माणूस सांपडावयाचा नाहीं." डॉ० जॉनसन भाषाज्ञानामध्यें अधिकारी माणूस होता, आणि ह्मणून शारीरिक श्रमाचें महत्व व योग्यता त्याला कळली नव्हती.

ही एक पायरी. व्यावहारिक ज्ञानासंबंधींच शिक्षण असावें

---

१ प्रॉव्हर्ब्स.

व मुलांच्या जन्मस्थितीपलीकडे त्यांच्या इच्छा जाणार नाहींत असलें शिक्षण देण्याची खबरदारी ठेवणें जरूर आहे. गरीब मुलांस लिहिणें, वाचणें, गणित हींच फक्त आवश्यक आहेत. त्यांत लिहिणें, वाचणें धंद्याच्या बारीक सारीक गोष्टी कळण्यास व गणित हिशेब ठेवण्यास उपयोगी.

ही विचारसरणी सर्वधंद्यांसंबंधीं असे. लॉर्ड एल्डन लंदन शहरांतील पेढीवाल्यांपैकीं अत्यंत मूर्ख पेढीवाले आपला देवघेवीचा व्यवहार करण्यास निवडून काढी; व त्याहून जास्त मूर्ख माणसें सांपडल्यास त्यांच्याशीं आपण व्यवहार करूं असें ह्मणे असें सांगतात. हीं माणसें सध्यांच्या माणसांपेक्षां अगदीं भिन्न असलीं पाहिजेत. कामधंदा करणेंच कपाळीं आलेल्या मुलांस धंद्यापलीकडे मुळींच शिकवूं नये असें हॅजिलिथचें ह्मणणें होतें. "डोक्यांत धंद्यापलीकडे दुसरे कोणतेही विचार नसले तरी माणसाला पैसा मिळवितां येईल." ही दुसरी पायरी.

माणसास कारागिरीचें काम चांगलें करितां यावें, व मजुरांस माणुसकीस साजेलसें वर्तन करितां यावें, ह्मणून शिक्षण हवें असें आपण प्रतिपादित करितों. "जो शाळा काढितो तो तुरुंग बंद करितो," असें विक्टर ह्यूगो ह्मणतो तें योग्य आहे.

एक स्विस मुत्सद्दी ह्मणे—"आमच्या मुलांच्या नशिबीं जन्माचीच गरीबी, पण तीं अज्ञानांत वाढूं नयेत अशी आह्मी खबरदारी ठेवितों." इंग्लंदमध्यें देखील आतां आह्मांस शिक्षणाचें महत्व कळूं लागलें आहे. आतां ग्रे कवीला आमच्या गांवढळाविषयीं असें ह्मणतां आलें नसतें.

......हजारों वर्षांच्या लुटीमुळें ओतप्रोत भरलेलीं आपलीं पुस्तकें विद्यादेवीनें त्यांच्या डोळ्यांपुढें कधीं केलीं नाहींत. अति दारिद्र्यामुळें अज्ञानांत राहणें भाग पडलेल्याबद्दलचा

त्यांचा तो स्तुत्य त्वेष जागच्या जागीं निवाला, व मनाचा उल्हास नाहींसा झाला.

मॅथ्यू आर्नोल्ड "शिक्षण व झोटिंगबादशाही" नांवाच्या पुस्तकांत असें ह्मणतो कीं, शिक्षण, त्यापासून होणारा आनंद, व ज्ञान हीं सब झूट आहेत असें ह्मणणारे लोक अद्यापि आहेत; पण हें पुस्तक १८६९ त लिहिलें गेलें.

१८७० त शिक्षणासंबंधीं ॲक्त पास झाला. तें वर्ष आपल्या सामाजिक इतिहासांत महत्वाचें मन्वंतर होय. त्या वेळीं आपल्या प्राथमिक शिक्षणशाळांतून १४ लक्ष मुलें शिक्षण घेत होतीं. सध्यां मुलांची संख्या ५० लक्षांवर गेली आहे. आणि त्यापासून काय परिणाम झाला? पहिल्यानें गुन्हेगारांसंबंधाचे आंकडे तपासून पाहूं. १८७० पर्यंत तुरुंगांतल्या बंदीवानांची संख्या वाढेलसा कल दिसत होता. त्या वेळीं गोळाबेरीज करून गुन्हेगारांची संख्या २०८०० होती, त्या वेळेपासून सारखी उतरत आली ती आतां १३००० आहे. ठोकळ मानानें $\frac{१}{३}$ कमी झाली. आणखी, लोकसंख्या सारखी वाढत चालली आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. १८७० पासून आजपर्यंत लोकसंख्या $\frac{१}{३}$ वाढली, त्या मानानें गुन्हेगारांची संख्या वाढली असती, तर ती २८००० च्या जवळजवळ असती; ह्मणजे १३०००च्या दुप्पटीपेक्षां जास्त झाली असती. तसें झालें असतें, तर पोलीस व तुरुंगाचा बंदोबस्त ह्या संबंधानें खर्च ४० लक्षांच्या ऐवजीं ८० लक्ष पौं. असता. अल्पवयी गुन्हेगारांची संख्या आणखी जास्त कमी होत चालली आहे. १८५९ त १४ हजार अल्पवयी मुलांस शिक्षेस पात्र अशा गुन्ह्यांकरितां सजा झाली. १८६६ त ती संख्या १० हजारांवर आली, १८७६ त ७ हजारांवर व १८८१ त ६

हजारांवर आली. शेवटचा आंकडा जो मला मिळाला आहे त्याप्रमाणें ती संख्या ५१०० होय.

धर्माचें अन्न खाणाऱ्या लोकांचे आंकडे घेतले तरी १८७० त अनाथाश्रमांत रहाणाऱ्या लोकांची संख्या प्रत्येक हजारीं ४७ होती, असें आपणांस आढळून येईल. मागाहून प्रमाण हजारीं ५२ पर्यंत चढलें होतें. आतां आंकडा हजारीं २२ वर आला आहे व राजधानींत आंकडा अगदींच कमी आहे, हें सांगण्यास समाधान वाटतें. सारांश अनाथ लोकांचें प्रमाण निम्मेनें कमी झालें आहे. लोकांकडून कर घेऊन गरीबांस पोसण्याचा वार्षिक खर्च ८० लक्ष पौंड होतो. तो पूर्वीप्रमाणेंच आहे असें धरून चाललों तर तो १ कोटी १६ लक्ष, ह्मणजे ८० लक्षांच्या दुप्पटीनें पाहिजे होता. वीस वर्षांपूर्वीं जो कर देत होतों तो जर आज देत असतों, तर बंदीवानांकरितां ४० लक्ष पौंड व अनाथ लोकांकरितां ८० लक्ष पौंड अधिक खर्चावे लागले असते.

भयंकर गुन्ह्यांचे आंकडे विशेष समाधानकारक व लक्षांत ठेवण्याजोगे आहेत; असें आणखी सांगितलें पाहिजे. ठोकळ प्रमाणानें ठेपेची शिक्षा झालेल्या लोकांची वार्षिक संख्या १८६० त संपणाऱ्या वर्षपंचकांत फक्त २८०० होती. ही संख्या सारखी कमी होत गेली, व लोकसंख्या जरी बरीच वाढली तरी ती गेल्या वर्षीं $\frac{1}{4}$ ह्मणजे ७२९ भरली. खरें पाहिलें असतां जन्मठेपीच्या कैद्यांस ठेवण्याचे ८ तुरुंग निरुपयोगी झाले आहेत; व त्यांचा दुसऱ्या कामाकडे उपयोग करितात.

गुन्हे व शिक्षण ह्यांच्यामध्यें किती निकट संबंध आहे हें सिद्ध करण्यास जे आंकडे नुक्तेच मला मिळवितां आले त्यावरून १५००० लोकांना सजा झाली, त्यांपैकीं फक्त ५००० लोकांस चांगलें लिहितां वाचतां येत होतें, व ज्यांना आपणांस सुशिक्षित

मानितां येईल असे फक्त २५० च होते, हें विशेष सांगावें लागतें.

खालील कोष्टकावरून मोठ्या अपराधांबद्दल शिक्षा झालेल्या लोकांची संख्या मोठ्या प्रमाणानें उत्तरोत्तर कमी होत चालली आहे हें विशेष लक्षांत ठेवण्याजोग्या रीतीनें स्पष्ट होतें. आणखी, कैद्यांची संख्या सतत कमी होत असतां लोकसंख्या झपाट्यानें वाढत चालली आहे, ह्मणून ते आंकडे विशेष महत्वाचे आहेत—

| इग्लंद आणि वेल्समध्यें सजा झालेल्या लोकांची सरासरी संख्या. | | इंग्लंद आणि वेल्समधील लोकसंख्येचा अंदाज. |
|---|---|---|
| वर्षपंचक. | | |
| ३१ दिजेंबर १८५९ संपणारें. | २५८९ | १९२५७००० |
| ,, ,, १८६४ ,, | २८०० | २०३७०००० |
| ,, ,, १८६९ ,, | १९७८ | २१६८१००० |
| ,, ,, १८७४ ,, | १६२२ | २३०८८००० |
| ,, ,, १८७९ ,, | १६३३ | २४७००००० |
| ,, ,, १८८४ ,, | १४२७ | २६३१३२५१ |
| ,, ,, १८८९ ,, | ९४५ | २७८३०१७९ |
| ,, ,, १८९२ ,, | ७९१ | २९०५५५५० |

गुन्ह्यांमुळें जो खर्च पडतो त्याचा पोलीस व तुरुंग ह्यांमागें होणारा खर्च केवळ एक भाग होय, हें सांगण्याची फारशी जरूरी आहेसें वाटत नाहीं.

ह्या प्रश्नाचा विचार करितांना फक्त अमुक पौंड अमुक शिलिंग अमुक पेन्स वांचतील ह्याजकडे माझें लक्ष आहे असें कोणी मानणार नाहींसें मला वाटतें. शिक्षण देऊं लागलों तर जास्त पैसा खर्च होईल, असें ह्मणणाऱ्या प्रतिपक्षाच्या खंडनार्थ त्या बाबतीच्या विचाराकडे लक्ष दिलें.

बऱ्याच ठिकाणीं सूट द्यावी लागेल, इतर कित्येक गोष्टींकडे

लक्ष पुरवावें लागेल, व दिलेले आंकडे शास्त्रीयदृष्टीनें अगदीं बरोबर ठरतील असें देखील नाहीं, इत्यादि गोष्टी मला कळून चुकल्या आहेत. तरी ते आंकडे समाधान मानण्याजोगे आहेत व त्यांपासून बरेंच घेण्याजोगें आहे.

कोणत्याही देशांतील गुन्ह्यांपैकीं अगदीं थोडे गुन्हे जाणूनबुजून दुष्टपणा केल्यामुळें, किंवा अपरिहार्य मोहांत पडल्यामुळें झालेले असतात. पुष्कळ गुन्ह्यांचें मुख्य कारण ह्मणजे अज्ञान व मद्य होय. विशेष आनंद मानण्याजोगें जें शिक्षणाचें फळ आपणांस मिळालें आहे तें पुढील गोष्टींवरून होय. मुलांस शाळेमध्यें चांगळें वळण मिळतें, स्वच्छता व टापटीप ह्यांच्या संवयी मुलांस लागतात; इतकेंच नव्हे, तर त्यांना रस्त्यांत भटकून दुर्गुण शिकावयास वेळ सांपडत नाहीं; किंवा गुन्हेगार व भटक्या लोकांच्या उदाहरणाचें जें धुळीस मिळविणारें वळण त्यापासून त्यांचा बचाव होतो.

अनाथांच्या पोषणार्थ द्यावा लागणारा कर कमी होणें, तुरुंग रिकामे पडणें, ह्मणजे अनाश्रित लोकांची व गुन्हेगारांची संख्या, विशेषेंकरून अल्पवयी गुन्हेगारांची संख्या कमी होणें हे शिक्षणाचे फायदे आपल्या प्रत्ययास येऊं लागले आहेत.

तरी पण शिक्षणाची उत्तम पद्धत आपण शोधून काढिली आहे किंवा नाहीं, त्याबद्दल संशयास जागा आहे. ह्या जगांत आपणांस तीन प्रश्नांचें उत्तर पुनःपुनः द्यावें लागतें: अमुक गोष्ट बरी वा वाईट आहे? खरी आहे वा खोटी आहे? एकादी वस्तु सुरूप वा कुरूप आहे? ह्या प्रश्नांचीं उत्तरें देण्याचें सामर्थ्य शिक्षणानें आपल्या अंगीं आणिलें पाहिजे.

आयुष्याचा उपभोग घेण्यास मनुष्यमात्राची तयारी करणें हाच केवळ शिक्षणाचा हेतु नसावा; तर जें आयुष्य मनुष्य आ-

नंदात घालवितो, त्यांत कांहीं तरी सत्कार्य करण्यास त्याची तयारी करणें हा असावा.

जवळ जवळ २०० वर्षांपूर्वींच "पुस्तकें विकून टाका, व भट्टया विकत घ्या; ह्मणजे सरस्वती देवी ( मिनर्व्हा) वंध्या आहे तिला टाकून द्या, व व्यापारधंद्याचा अभिमानी देव त्वष्टा ( व्हल्कन ) ह्याचे पाय धरा" ह्मणून सांगणाऱ्या लोकांविषयीं बेकननें उल्लेख केला आहे. शारदेला मुळींच सोडून देतां कामा नये, हें खरें आहे. पण सृष्टीनें आपल्यापुढें जें पुस्तक उघडून ठेविलें आहे त्यावर आपलें शिक्षण पुरेसें बसविलेलें नाहीं.

ज्याप्रमाणें कांटा, चमचा, सुरी इत्यादि वस्तु असल्या ह्मणजे जेवण होत नाहीं, त्याप्रमाणें वाचावयास लिहावयास आलें, गणित व्याकरण आलें, ह्मणजे शिक्षण झालें असें नाहीं. एब्राहाम, इझॅक, जेकब ह्यांस लिहितांही येत नव्हतें व वाचतांही येत नव्हतें; व कदाचित् त्रैराशिक ह्मणजे काय हेंही कळत नव्हतें.

मृतभाषांच्या अभ्यासाविरुद्ध मी बोलतों असा वारंवार माझ्यावर आक्षेप येतो; पण असें मी कधींच बोललों नाहीं. मृतभाषाज्ञान हा शिक्षणाचा एक अत्यंत आवश्यक भाग आहे; व त्याची किंमत कमी लेखणें किंवा त्याकडे दुर्लक्ष करणें मूर्खत्वाचें होय. पण मृतभाषाज्ञान हेंच पुरें शिक्षण नव्हे. तरी चार्लस बक्स्टन ह्मणतो त्याप्रमाणें आपलें शिक्षण ह्मणजे "बहुतकरून २००० वर्षांपूर्वीं मृत झालेल्या मनुष्यांनीं जे शब्द वापरले असते ते शब्द फक्त शिकणें होय." मृतभाषांसाठीं इतर विषयांकडे दुर्लक्ष करणें ह्मणजे, सिसरो ह्मणतो त्याप्रमाणें, फक्त उजव्या शरीरार्धाची काळजी घेऊन डाव्या अर्धाकडे दुर्लक्ष करण्यासारखें होय. मृतभाषाज्ञान ह्या नांवाखालीं मोडणारें पुष्कळ ज्ञान खरोखर मृतभाषाज्ञान नसतें. व्याकरण घोटण्यांत इतकी मेहनत केली जाते

कीं, ग्रंथकाराच्या भावार्थाकडे लक्ष पोंहचत नाहीं. वस्तुतः व्याकरण ही शास्त्राची एक शाखा होय. पण शास्त्रीयरीतीनें किंवा त्याबद्दल अभिरुचि उत्पन्न होईल अशा रीतीनें तें शिकविलें जात नाहीं.

आणखी, सध्यांच्या पद्धतीप्रमाणें मुलांस लॅटिन किंवा ग्रीक बोलावयास शिकवित नाहीं. मूर्खपणाची इयत्ता करण्याच्याच उद्देशानें, अथवा शिक्षण जेवढें निरुपयोगी होईल तेवढें करण्यास शेवटचा उपायच ह्मणून कीं काय, रोमी व ग्रीक लोक शब्दांचे जे उच्चार करीत त्याहून निराळे, खरोखर इतर राष्ट्रांतील लोकांच्या, फार तर काय, स्कॉच लोकांच्या उच्चाराहून देखील निराळे उच्चार करण्यास मुलांस शिकवितात.

अशा पद्धतीमुळें मृतभाषाज्ञानाची अभिरुचि उत्पन्न होत नाहीं. कॉर्नहिलपासून केटोपर्यंतच्या संक्षिप्त प्रवासवृत्तांतांत ठॅकरे अशी एक कोटी करितो. ग्रीक भाषेची अधिदेवता त्याला येऊन भेटते व ॲथेन्समध्यें आल्यापासून तुला आनंद होतो कीं नाहीं असें त्याला विचारिते. त्यावर तो उत्तर करितो–"माते, लहानपणीं गुरुजीनें फार कष्ट करून आपली संगत कंटाळवाणी वाटावयास लाविली. ती इतकी कीं, आतां तरुणपणीं आपल्याशीं सलोख्यानें वागण्याचें होत नाहीं." हें बोलणें कदाचित् शिष्टाचारास अनुसरून नाहीं, पण तें खरें आहे.

मृतभाषाज्ञान महत्वाचें खरें पण तें शिक्षणाचें एक अंग होय. "मानुषी भाषाज्ञान" हा शब्दच जुन्या मताप्रमाणें, शिक्षणाचा मनुष्यप्राण्यांबद्दलच्या कळकळीशीं निकट संबंध होता, असें दाखवितो. ह्मणजे माणसांस एकमेकांशीं बद्ध करणारा जो आपलेपणा तो ज्ञानानें जास्त व्यक्त होऊं लागला पाहिजे असें दर्शवितो. शेक्सपीयरला लॅटिन थोडें येत होतें व ग्रीक ह्याहून

थोडें येत होतें हें आपणास माहीत आहे. मनन व वादविवाद ह्यापासून पुस्तकी ज्ञानाला कितीही मदत झाली, तरी पुस्तकी ज्ञान शिक्षणाचा एकच भाग आपणांस साध्य करून देतें. ज्या मुलानें केवळ पुस्तकी विद्या साध्य करून घेतली, ज्याला सृष्टीचें ज्ञान काडीचें नाहीं, ज्या जगांत आपण रहातों त्याची ज्याला मुळींच माहिती नाहीं, तो वयांत आला तरी पक्का होत नाहीं. तो अर्धवटच.

"रोपे वाढावेत ह्मणून फुलांच्या ताटव्याजवळ जाऊन वनस्पतिशास्त्राचें पुस्तक वाचून दाखवावें" ह्या प्रकारेंच आपलें बहुतेक ज्ञान आहे असें एकानें ह्मटलें आहे, तें खरें आहे.

आह्मांस पुष्कळ शिकलें पाहिजे इतकेंच नव्हे तर पुष्कळ विसरलें पाहिजे. असें बोलतों ह्मणून मी शिक्षकांचे उपकार विसरतों असें खरोखरी नाहीं. त्यांचा धंदा फार कंटाळवाणा, थकविणारा, व जबाबदारीचा आहे. मुलांबरोबर खेळण्यासारखें दुसरें आनंदकारक काम नाहीं, पण त्यांस शिकविणें त्रासदायक असतें.

व्याकरण, गणित इत्यादि शिकविणें बरेंच सोपें असेल; "होय तें सोपें आहे; पण कोंवळ्या मनास सहाय्य करणें, उत्साहास भर घालणें, आशा जागृत करणें, बुद्धिरूपी कोळसे जळते करणें, यत्नांत अपयश आल्यास नवीन नवीन विचार व एकाग्रचित्तें काम करण्याची हुरूप मनांत भरवून देणें, हें काम सोपें नव्हे; हें करण्यास अवतारी माणसें हवींत."[१]

लोकांस, वकील, धर्मोपदेशक, शिपायी, शिक्षक, शेतकरी कारागीर बनविणें हा शिक्षणाचा उद्देश नव्हे; तर माणसाच्या अंगांत माणुसकी आणणें हा होय. मिल्टन ह्मणे—"न्यायानें, कुशलतेनें, उदारबुद्धीनें, खासगी व सार्वजनिक कृत्यें, शांततेच्या

१ एमर्सन.

वेळीं त्याचप्रमाणें लढाईच्या वेळीं, करण्यास ज्याच्या योगानें मनुष्य लायक होतो त्यालाच मी पूर्ण व उदात्त शिक्षण ह्मणतों."

शब्दांच्या प्रयोगावरून गोष्टींचा निकाल लावितां येतो असें मानण्यास तत्वज्ञान्यांची नेहमीं विशेष तयारी असते. प्लुतार्कनें ह्याबद्दल एक हास्यकारक वादविवाद लिहिला आहे; तो हा—पहिल्यानें कोणाची उत्पत्ति? कोंबडीची कीं अंड्याची? ह्याबद्दल एक असा विचार झाला: कोंबडी पहिल्यानें उत्पन्न झाली; कारण, बोलतांना आपण कोंबडीचीं अंडीं असा प्रयोग करितों, अंड्याची कोंबडी असा करित नाहीं.

"खऱ्या शिल्प्याला ज्या अवर्णनीय चातुर्यानें, खडक, झाडें-झुडपें, सरोवरें, पर्वत इत्यादींमध्यें ईश्वरी सौंदर्याचा अंश दिसतो, तें चातुर्य कळण्याची योग्यता अंगीं नसावी, अशा रीतीनें मुलांस वाढविणें हें बरोबर नाहीं."

जेफरीज ह्मणतो—"बऱ्याच पुस्तकांत तुह्मांला नवीन विचार सांपडतील अशी जर तुमची कल्पना असली तर तुमची निराशा होईल. झरे, समुद्र, पर्वत, अरण्यें, सूर्यप्रकाश, अनिरुद्ध संचार करणारा वायु, ह्यांच्या ठायीं विचारांचें वास्तव्य असतें." झरे, समुद्र, पर्वत, अरण्यें, सूर्यप्रकाश, वायु, ह्यांच्याशीं आपला जितका सहवास व्हावासें आपणांस वाटतें तितका होत नाहीं. तथापि, पुस्तकांत देखील विचार भरलेले आहेतच. परंतु निवड करून त्यांचा उपयोग केला पाहिजे. विचारांचा स्फोट होण्यास भाषा हें कच्चें साधन होय. प्रत्येक मुलगा मोठा होतो असें नाहीं. गणितांतले सिद्धांत देखील सावधगिरीनें वापरले पाहिजेत.

शाळा सुटल्यावर पद्धतशीर शिक्षण चालू ठेवण्याचें पुष्कळांस होत नाहीं, त्याचें कारण सध्यांच्या शिक्षणपद्धतींतलीं जीं व्यंगें

१ व्हिटिअर.

मीं नुक्तींच सांगितलीं तीं होत. जिवांत जीव आहे तोंपर्यंत आपण शिकतच असतों, हें खरें. जुनी ह्मणही तशीच आहे; "प्राण धारण करा व शिका." पण कादंबरींतून अथवा वर्तमानपत्रांतून जें तुटक ज्ञान मिळतें तें कसेंबसें आपण मिळवितों; किंवा स्वशिक्षण व ज्ञान असें ज्याला बिनदिक्कत ह्मणतां येईल तें आपण मिळवितों हा मात्र प्रश्न राहिला आहे.

संसारसुखांत शिक्षण वाजवी रीतीनें कसें असावें ह्याबद्दल एका अधिकारी माणसाचे विचार दिलेले आहेत; व ह्या ठिकाणींही प्रो० हक्स्लेच्या त्याच विचारांचा उतारा देतोंः—

"खऱ्या शिक्षणाच्या योगानें साधारण बुद्धीचा मुलगा १५।१६ व्या वर्षीं आपली भाषा सौकर्यानें, व शुद्ध रीतीनें वाचण्यास व लिहिण्यास तयार व्हावा; जुने श्रेष्ठ ठरलेले ग्रंथकारांचा अभ्यास करून भाषेचा गुणोत्कर्ष कळण्याची ग्राहकशक्ति त्याला यावी; आपल्या देशाच्या इतिहासाची सर्वसाधारण माहिती असावी; समाजास नियमित करणारे नियम कळूं लागावेत; पदार्थविज्ञानशास्त्र व मानसिकशास्त्र ह्यांचीं मूलतत्वें माहीत असावीं; साधें गणित व भूमिति ह्यांचें साधारण ज्ञान असावें; तर्काचें ज्ञान नियमबद्ध नको, पण उदाहरणावरून झालेलें असावें; गायनकलेचीं मूलतत्वें व चित्रकलेचें ज्ञान धड्यासारखें न वाटतां करमणूक ह्मणून मिळवून घेतलेलें असावें."

ही माहिती फार रंजविणारी आहे. शारीरशास्त्रांत मोठा प्रवीण जो जॉन हन्टर त्याच्या सारखाच बहुतेकांचा अनुभव असेल, व त्याच्या सारखेंच बहुतेकांस बोलतां येईल. "मी लहान मुलगा असतांनाच ढग व निरनिराळ्या जातींचें गवत, ह्याविषयीं मला माहिती पाहिजे होती. हिंवाळ्यांत पानांचा रंग कां बदलतो ह्याचें कारण मला पाहिजे होतें. मुंग्या, माश्या,

पक्षी, बेडूक ह्यांची चालचलणूक मी बारकाईनें पहात असें; लोकांस जें माहीत नसे, किंवा लोकांस ज्याचें महत्व वाटत नसे अशा पुष्कळ गोष्टी विचारून मी लोकांस भंडावून टाकीत असें."

लॉक आपल्या शिक्षणावरील निबंधांत ह्मणतो—"शिक्षणाबद्दल मी एकच गोष्ट सांगतों ती हीः—'पुस्तकाशीं संलाप' करणें ( मग हा प्रयोग कसाका प्रचारांत आला असेना ) हा माझ्या मतें शिक्षणाचा मुख्य भाग नव्हे. त्याला आणखी दोन भाग जोडून दिले पाहिजेत. त्यांपैकीं प्रत्येक ज्ञान वाढविण्याच्या कामीं शक्त्यनुसार मदत करितो. हे दोन भाग मनन व वादविवाद होत. वाचन कच्चीं द्रव्यें गोळा करण्यासारखें आहे. त्यांत बरींच टाकाऊ बाजूस काढावीं लागतात. मनन सामानाची निवड करणें, तें मोजणें मापणें, लांकूड घडणें, त्यांचे चौरस पाडणें, दगड घडविणें, व घर बांधणें ह्यासारखें आहे; व मित्रांबरोबर त्याविषयीं वादविवाद करणें, ( कारण वितंडवाद निरुपयोगी असतो. ) घर तपासून पहाणें, खोल्यांत फिरणें, बांधणी पक्की कोठें झाली आहे, कच्ची कोठें राहिली आहे हें पहाणें, व व्यंग असेल तेथें दुरुस्ती करण्याचा उत्तम मार्ग शोधून काढणें ह्यासारखें आहे. आणखी वादविवादाच्या योगानें नवीन शोध लागतात. दोन्ही उपायांनीं जसें ज्ञान मनांत बिंबत नाहीं, तसें ह्यानें बिंबतें."

# भाग ७.

## स्वशिक्षण.

सर्व शक्ति सारख्या प्रमाणानें, व संगतवार ज्याच्या योगानें वाढतील त्याला शिक्षण ह्मणतात. शिक्षण बालपणींच सांगोपन-खोलींत सुरू होतें, शाळेंत तें पुढें चालू होतें, परंतु तें तेथेंच संपत नाहीं. आपली इच्छा असो वा नसो तें जन्मपर्यंत चालूच असतें. तेव्हां प्रश्न एवढाच उरला, आयुष्याच्या उत्तरार्धांत आपण जें ज्ञान मिळवितों तें शहाणपणानें निवडून मिळवितों कीं, सहजासहजीं मिळतें तेंच घेतों. गिबन ह्मणतो—"प्रत्येक माणसास दोन तऱ्हेचीं शिक्षणें मिळतात; एक तो लोकांकडून मिळवितो आणि दुसरें स्वतः मिळवितो, व हें पहिल्यापेक्षां अधिक महत्वाचें असतें."

मनुष्य इतरांपासून जें ज्ञान मिळवितो त्यापेक्षां स्वतः मिळविलेलें ज्ञान त्यास जास्त उपयोगीं पडतें. लॉक ह्मणतो—"गुरूच्या नियंत्रणाखालीं व अमलाखालीं राहून कोणी शास्त्रांत प्रवीण झाला नाहीं; किंवा ज्ञानांत कोणाचीही फारशी गति झालेली नाहीं."

कितीही इच्छा असली तरी तुला आपलें हृदय रिक्त, शुद्ध व साजरें ठेवितां येणार नाहीं. ह्मणून बऱ्या विचारांच्या किंवा वाईट विचारांच्या वसतीसाठीं तें तयार करावें हा प्रश्न रहातो.

ज्यांनीं शाळेंत नांव कमाविलें नाहीं, त्यांना वाईट वाटण्याचें प्रयोजन नाहीं. मोठी बुद्धि पहिल्यानेंच पक्वतेस येते असें नव्हे. नांवारूपास येण्याची मेहनत घेतली नसली तरी तुह्मी निराश व्हावें असें मी ह्मणणार नाहीं; मात्र त्याबद्दल तुह्मांला लाज

वाटावी. हातून होईल तेवढी मेहनत करून देखील यश आलें नसल्यास आणखी नेटानें उद्योग करावा. ज्यांनीं शाळेंत तरतरी दाखविली नाहीं अशीं बरीच मुलें पुढें उदयास आलीं आहेत.

वेलिंग्टन व नेल्सन हे शाळेंत असतां मंद बुद्धीचे होते असें सांगतात. सर ऐझाक न्यूतन, स्विप्ट, क्लाईव्ह, सर वाल्टर स्कॉट, शेरिडन व दुसऱ्या पुष्कळ मोठ्या लोकांची अशीच गोष्ट होती.

ह्यावरून, शाळेंत ज्यांनीं मुळींच नांव कमाविलें नाहीं, त्यांना शाळाशिक्षणाचा मुळींच फायदा झाला नाहीं असें निघत नाहीं हें उघड आहे. बुद्धिदाक्षिण्याची व्याख्या अपरिमित श्रम करण्याची योग्यता अशी केली आहे. ती बरीच खरी आहे. "नैसर्गिक बुद्धीची मदत नसली तर नुसत्या श्रमानें कांहीं व्हावयाचें नाहीं, व अभ्यास नसला तर नुसती नैसर्गिक बुद्धी व्यर्थ" असें लिली आपल्या मासलेवाईक भाषेंत लिहितो.

उलट पक्षीं पुष्कळ हुशार व तरतरीत मुलांस शरीरप्रकृति चांगली नसल्यामुळें, उद्योग न केल्यामुळें, अथवा शील चांगलें नसल्यामुळें पुढल्या आयुष्यक्रमांत अपयश येतें. गयेथी ह्मणतो अशीं मुलें "ज्या रोप्यांना पुरुष व स्त्रीजातीचीं फुलें असूनही फळें लागत नाहींत त्या रोप्याप्रमाणें" होत. असल्या मुलांस पुढें गाडीहाक्याचें हलकें काम करावें लागतें; किंवा ऑस्ट्रेलियामध्यें मेंढ्यांची लोंकर कातरीत बसावें लागतें; अथवा पोटास धड पुरेल न पुरेल इतकेंच अन्न मिळविण्यास ग्रंथलेखनाचे कष्ट करावे लागतात. ह्या मुलांच्या मानानें कमी बुद्धीचीं पण जास्त मेहनती व नेकीनें वागणारीं मुलें उत्तरोत्तर वाढतात; त्यांस हुद्याचीं कामें मिळतात; व तीं स्वतःचें नांव करून देशाचें कल्याण करितात.

कांहीं ठिकाणीं शिक्षणापासून खरोखर फायदा होतो कीं काय ह्याविषयीं संशय उत्पन्न झालेला आढळतो. त्याचें कारण डॉक्टर ऑर्नल्ड असें सांगतो—"अज्ञान ह्मणजे पापाज्ञान असें चमत्कारिक चुकीमुळें समजून लोक अज्ञानीपणाबद्दल आपलें समाधान करून घेतात. पण, खरी गोष्ट अशी आहे कीं मनुष्यांतून ज्ञान काढून घेतलें तर त्याच्या अंगीं बालपणींचें साधेपण येत नाहीं; उलटपक्षीं पशुपण येतें. इतकेंच नव्हे, तर तो पशुवर्गांतला दुष्टांत दुष्ट घातक्यांत घातकी बनतो." कारण, (अन्यत्र तोच ग्रंथकार ह्मणतो) आयुष्यांत वाटाड्याप्रमाणें जें ज्ञान उपयोगीं पडावें तें ज्ञान संपादण्यांत जर हयगय केली, तर मनुष्य आपल्या मनोविकारांचा दास बनतो; व उभय (बाल्यावस्था व तरुणावस्था) अवस्थांतील व्यंगें त्याच्या ठायीं रहातात; ह्मणजे बालपणचें अज्ञान, व तरुणपणचे दुर्गुण.

ज्याच्या शिक्षणाचा आरंभ शाळेंत योग्य रीतीनें झालेला असतो, तो आपलें शिक्षण कधीं थांबूं देणार नाहीं. क्षुल्लक तात्कालिक फायद्याकरितां शिकावयाचें, किंवा शिक्षण भातभाकर मिळण्यापुतेंच मिळवावयाचें असें मानणें ह्मणजे शिक्षणाची किंमत फार कमी केल्याप्रमाणें होय.

योग्य शिक्षणाचा हेतु सालोमन आपल्या गोड भाषेंत असा सांगतो—शहाणपण ह्मणजे काय व शिक्षण ह्मणजे काय हें जाणणें, ज्ञानबोधक शब्द उमजणें, न्यायी, विचारशील, सारासारविचार पाहणारे, व शहाणे अशा माणसांकडून शिक्षण मिळविणें, लबाडी ओळखण्याची योग्यता साध्या माणसाच्या ठायीं आणणें, तरुणास ज्ञान व प्रसंगास उचित वर्तन शिकविणें हा शिक्षणाचा हेतु असला पाहिजे.

थारो ह्मणतो "रुप्याचा एकादा डॉलर उचलण्याकरितां

मनुष्य आपल्या मार्गाच्या बाहेर बराच लांब चालत जाईल. पण हे सोन्याच्या किंमतीचे शब्द प्राचीन काळच्या शहाण्या लोकांनीं बोलून ठेवलेले येथें आहेत; व त्याची किंमत, मागून आलेल्या पिढ्यांतील सर्व शहाण्या लोकांनीं, मोठी सांगून ठेविली आहे."

"जर तरुण माणसांस शिकतां येतें तर म्हाताऱ्यांस आलें पाहिजे" अशी एक औदासीन्यप्रदर्शक म्हण फ्रेंचभाषेंत आहे. व सुशिक्षण प्राप्त झाल्यास अवश्य असणाऱ्या दोन्ही गोष्टी मिळतील. तारुण्यांत ज्ञान मिळेल व म्हातारपणीं अंगांत जोम राहील. "अनुभव फार वेतन घेणारी शाळा होय; पण मूर्ख माणसें दुसऱ्या कोणत्याही रीतीनें शिकत नाहींत" असें फ्रॅन्क्लीन म्हणे.

आयुष्यक्रमाचा आरंभ चांगला झाला कीं, जीवनकलह अर्धा संपला. "ज्या मार्गानें जावयाचें तो मार्ग मुलांस शिकवा, म्हणजे मोठेपणीं तो सोडणार नाहींत." कार्याचा आरंभ नीट रीतीनें करा म्हणजे दिवसेंदिवस तें जास्त सोपें वाटत जाईल. उलट पक्षीं जर आरंभींच चुकी केली तर पुढें चुकी सुधारून घेणें सोपें नाहीं. शिकणें सोपें, पण भलतेंच शिकलेलें विसरणें सोपें नाहीं.

पुस्तकांत, माणसांत, कल्पनांत, व संस्थेंत चांगलें घेण्याजोगतें काय तें मनांत नीट ठसवून घ्या. आपणापेक्षां इतरांस जास्त कळतें म्हणून लाज वाटावयास नको. आपणास जेवढें शिकण्याची संधि मिळाली तेवढें शिकलों नाहीं तर मात्र लाज वाटावी.

अनेक भाषा शिकलों, किंवा अनेक गोष्टी माहीत झाल्या म्हणजे शिक्षण मिळालें असें नव्हे. नुसत्या शिकण्यापेक्षां शिक्षण हा पदार्थ और, व विशेष महत्वाचा आहे. ज्ञान पुढील उपयोगाकरितां बेगमी करून ठेवितें व शिक्षण हें बीं पेरितें; त्याला ३० पटीनें, ६० पटीनें, कधीं कधीं १०० पटीनें फळें लागतात.

शहाणपण हें मुख्य आहे तेव्हां तें मिळवा. इतर सर्व मिळवा पण आधीं आकलनशक्ति मिळवा.

ज्ञान शहाणपणापेक्षां कमी योग्यतेचें आहे हें खरें, पण त्याला बऱ्याच उदाहरणांत मिळावा तितकाही मान मिळत नाहीं. उदाहरणार्थ, आपणांस असें सांगतातः—ज्ञानसंपन्न माणसास आपल्या ज्ञानाबद्दल गर्व चढतो, पण शहाण्याच्या अंगीं आपणांस कांहीं येत नाहीं ह्मणून नम्रता असते.

परंतु हें खरें नाहीं. ज्यांना जास्त ज्ञान असतें त्यांना आपलें ज्ञान किती थोडें आहे हें कळणें अधिक शक्य आहे.

बिशप बटलर देखील म्हणतो—"शोधक व कल्पक लोकांस ते जे शोध करीत असतात त्यांबद्दल भलत्याच आढ्यतेच्या कल्पना मनांत न बाळगण्याविषयीं सूचना द्यावी. सद्गुण व धर्म माणसास हवे आहेत ह्याबद्दल साधक प्रमाणें, व धर्मानें कां वागावें त्याचीं कारणें, व त्यांचा प्रसार करणें इत्यादींस मदत होऊन जर सद्गुण व धर्म ह्यांची सेवा होत असली, अथवा संसार जास्त सुखावह होत असला, किंवा ऐहिकसुखांच्या गोष्टींस भर पडत असली तर नवीन शोध लावण्यांत घालविलेल्या वेळाचें चीज झालें. नुसत्या नवीन गोष्टी उघडकीस आणणें ह्यापासून मनोरंजनापलीकडे दुसरा फायदा नाहीं.

ज्ञान निरुपयोगी कच्च्या मालमसाल्याप्रमाणें आहे; व त्या मालमसाल्यांतून निवड करून शहाणपण आपलें घर बांधितें हें ज्ञानाविषयीं ह्मटलें आहे तें अन्यायाचें आहे.

जो शिल्पकार सामान निवडून काढण्यांत हलगर्जीपणा दाखवितो तो कच्चा ह्मटला पाहिजे. आणि नव्या नव्या वस्तु दृष्टोत्पत्तीस आणण्याचा काय परिणाम होईल हेंही कोणास सांगतां येत नाहीं.

ज्ञानमार्गांतल्या बऱ्याच पायऱ्या पूर्वी कुचकामाच्या वाटत होत्या त्या हल्लीं सर्वांत महत्वाच्या ठरल्या आहेत. ज्ञान ही अतुल शक्ति होय. "तारायंत्रामुळें वेळ वांचतो; लेखनकलेमुळें मनुष्यवाणीचा उपयोग, व जाण्यायेण्याचा त्रास वांचतो; घरांतील टापटिपीच्या ज्ञानानें शिल्लक रहाते; आरोग्यशास्त्राच्या ज्ञानानें आरोग्य रहातें, व प्राण वांचतात; मानसिक श्रमनियमांच्या ज्ञानानें मेंदूची झीज कमी होते. आत्म्याच्या नियमांच्या ज्ञानानें वांचत नाहीं असें कोणतें ?

हर्बर्ट स्पेन्सर ह्मणतो—"प्रत्यक्ष आत्मसंरक्षणास, ह्मणजे आपल्या प्राणाचे व आरोग्याचे संरक्षणास, अत्यंत महत्वाचें ज्ञान शास्त्रज्ञान होय. त्याचप्रमाणें अप्रत्यक्ष आत्मसंरक्षणास ह्मणजे उपजीविकेस शास्त्रज्ञान अमोल आहे. घरांत वडील ह्या नात्यामुळें आपणांकडे जीं कर्तव्यें येतात तीं बजावण्यास शास्त्रज्ञानाकडून खरी माहिती मिळते. प्राचीन काळीं राष्ट्रें कशीं चाललीं होतीं, आज राष्ट्रें कशीं चालतात, हें समजल्याशिवाय माणसास वर्तन कसें ठेवावें हें कळणार नाहीं; पण, हें कळण्याची गुरुकिल्ली शास्त्रज्ञानाकडे आहे. निरनिराळ्या कलाकौशल्याच्या अप्रतिम वस्तु तयार करण्यास, त्या अप्रतिम आहेत असें कळण्यास, त्यापासून आनंद होण्यापुर्ती योग्यता अंगीं येण्यास शास्त्रज्ञान हवें. मानसिकश्रम, नीति, धर्म इत्यादींच्या नियमानुरोधानें वागणें ज्याच्या दीर्घ अभ्यासानें शक्य होतें, तें शास्त्रज्ञानच असें आणखी एकवार ह्मणावें लागतें."

डॉ० फिच ह्मणतो—"मी माझ्या आयुष्यक्रमाचें जेव्हां सिंहावलोकन करितों व शाळेंत आणि कॉलेजांत घालविलेल्या फार जुन्या दिवसांविषयीं विचार करितों, तेव्हां माझी अशी खात्री होते कीं,

इतिहासांतल्या गोष्टी, गणितांतले सिद्धांत, व्याकरणाचे नियम, मधुर व गोड अशा कवितेच्या ओळी, किंवा शास्त्रांतील तत्वें, सारांश ज्या कांहीं गोष्टी आह्मी त्या वेळीं शिकलों त्यांपैकीं अशी कोणतीही गोष्ट नाहीं कीं, जी कल्पनाही नसतां वारंवार ध्यानांत येऊन स्वप्नीं नसेल असा फायदा करून देत नाहीं. मी जीं पुस्तकें वाचितों, व आजकाल ज्या गोष्टी घडून येतात, त्या कळण्यास त्या सिंहावलोकनाचा उपयोग झाला आहे; व त्यामुळें हें संसारचित्र विशेष व्यापक व मनोरंजक वाटूं लागलें आहे."

शेवटला एक डीन स्टॅनलीचा उतारा देतों:—"निरपेक्षबुद्धीनें सत्याची आवड किती थोड्या ठिकाणीं आढळते. तरी पण ती किती उपयोगाची आहे! तिची किंमत आपणांस एकदम दिसून येत नाहीं. सत्याची एकनिष्ठपणें सेवा करण्याच्या उद्देशानें ज्या लोकांचीं मनें शास्त्रांकडे ओढलीं गेलीं, अशा शास्त्रज्ञांच्या शोधामुळें ह्या संसारातलें सुख किती वाढलें आहे त्याची किंमत ह्या पिढींत कदाचित् पुढच्या पिढींतही कळून येणार नाहीं."[1] शहाणे लोक श्रवण करितात, व ज्ञान वाढवितात असें सॉलोमन ह्मणतो[2] तें बरोबर आहे.

जिचा उपयोग होणार नाहीं अशी माहिती क्वचितच असेल. एक वेळ तरी पाहण्याजोगी नाहीं अशी वस्तुही क्वचित् आढळेल. खरोखर जगांत लहान वस्तु नाहीं, मन मात्र कोतें असतें.

"पेत्रीआर्कच्या ( गोत्रजनक ) स्वप्नांत दिसलेल्या गुप्तार्थद्योतक शिडीप्रमाणें ज्ञानाची एक शिडी आहे. तिचें बुंद आदिकालच्या पृथ्वीवर आहे व शिखर अंतरालांतल्या अस्पष्ट सौंदर्यांत गुरफटल्यामुळें दिसत नाहींसें झालें आहे. दंतकथेच्या युगापर्यंत

---

१ स्टॅनलेचें चरित्र. २ प्राव्हर्ब्स.

शास्त्रें, तत्त्वज्ञान, काव्य, शास्त्राध्ययन ह्यांचीं सूत्रें ज्या ज्या ग्रंथकारांकडे आहेत, ते ग्रंथकार ह्या पवित्र शिडीवरून वर खालीं जाणारे देवदूत होत; व हे जणूं पृथ्वी व स्वर्ग ह्यांच्या दरम्यान दळणवळण ठेवितात."

किती उदाहरणांत शोधांचे शोधक माहीत नाहींत ह्याचें स्मरण झालें ह्मणजे वाईट वाटतें. आपणास जें वाईट वाटतें तें त्यांच्या करितां नव्हे, तर त्यांची आठवण करून कृतज्ञता प्रकट करण्याची आपली इच्छा असते ह्मणून. मोठमोठ्या शोधकांनीं जे अपरिमित श्रम केले ते स्वतःकरितां किंवा कीर्ति मिळविण्याकरितां नव्हत.

कधीं न थकतां कधीं न भागतां त्यांनीं सत्य शोधून काढण्याचा यत्न केला. आनंदरहित मार्गानें त्यांना जावें लागलें. कोणी वंदोत वा निंदोत ह्या बुद्धीनें त्यांनीं काम केलें, व बाकीचा भार त्यांनीं देवावर टाकिला. जरी कवींनीं त्यांचीं नांवें अजरामर स्तोत्रमालेंत किंवा कथानकांत गोविलीं नाहींत, तरी त्यांच्या कृत्यांचा खरडा वर लिहून ठेविला आहे. शाश्वत सुख हें त्यांच्या पुष्पमालेप्रमाणें झालें आहे.

हें आयुष्य आनंदांत घालविण्यास अभ्यासाकडे लक्ष देणें व परिश्रम करणें जरूरीचें आहे. कामाकडे अर्धवट लक्ष दिलें तर काम करण्यास दुप्पट वेळ लागेल.

मनुष्यप्राण्याच्या सुखांत मानसिक व्यवसायामुळें किती थोडी भर पडली आहे ह्याचा विचार केला ह्मणजे वाईट वाटतें. आणि खरें पाहिलें असतां शाळा ह्या शब्दाचा अर्थ ग्रीकभाषेंत विश्रांति किंवा सुख ह्यांची जागा असा होता. जे. मोर्लेसाहेब असें ह्मणतो—"सुख व्हावें ह्मणून किंवा कर्तव्य

---

१ लार्ड बेकन्सफील्ड.

ह्मणून चांगल्या विचारांशीं आणि उदात्त भावनांशीं नेहमीं आपला संबंध असावा, हें फार महत्वाचें आहे."

माणसाचा मेंदू विचाराचें गृह व आत्म्याचा राजवाडा असावा. डॉन ह्मणतो—"ह्या देहरूपी क्षेत्राचे आपण शेतकरी आहोंत. दाणा वगैरे शिलकेस राखून ठेविला, व भरभराटीस आलों, तर भाडें देण्याच्या शेवटच्या दिवसासाठीं आपणांस बराच ऐवज ठेवितां येईल."

प्रत्यक्षवादी लोकांच्या मतांत मला बरेंच ग्राह्य नाहीं; पण त्यांचा मुद्रालेख फार उदात्त आहेः—"भूतदया हा जीवनहेतु, शिस्त हा पाया, व उन्नति हा साध्य हेतु."

तथापि एमर्सन ह्मणतो—"वाडवडिलांच्या परिपाठाप्रमाणें पुष्कळ साधे लोक ईश्वराची भक्ति करितात; परंतु आपल्या सर्व शक्तींचा उपयोग केला पाहिजे, येथपर्यंत त्यांच्या कर्तव्यकर्माविषयींच्या कल्पनेची मजल आली नाहीं."

माणूस आपणावरून जग मोजितो. मोठमोठ्या पर्वतांची उंची व समुद्राची खोली ह्याचें माप फुटांवर ठरवितो; गणितशास्त्रांतही संख्येची मोजणी आपल्या बोटांच्या संख्येवर अवलंबून असते. असें असून आपण किती क्षुल्लक प्राणी आहोंत! आपण अगदीं क्षुल्लक असून आपणांस किती मोठें होतां येईल. मनुष्यप्राणी काय करील ? आणि काय करणार नाहीं ?

पॅस्कल ह्मणतो—"मनुष्यप्राणी ज्ञेय, अज्ञेय, विधि, निषेध, नानाविध अज्ञान, वासना, प्रतिसारकत्व, कल्पनाशक्ति आणि मनोविकार इत्यादींचें एक कडबोळें होय."

आणखी एका ठिकाणीं तोच ह्मणतो—"मनुष्यप्राणी ह्मणजे कः पदार्थ! विश्वांत अति निर्बल वस्तु मनुष्य. मनुष्य कःपदार्थ, पण विचार करणारा पदार्थ. सर्व सृष्टि त्याला चिरडून टाकण्यास

तयार झाली तरी हरकत नाहीं. एकादी उचकी, पाण्याचा थेंब, त्याला ठार मारण्यास पुरेसा आहे. जरी सृष्टीनें त्यास चिरडण्याचा यत्न केला, तरी माणूस सृष्टीपेक्षां श्रेष्ठ; कारण, आपण मरतों हें त्याला कळतें. सृष्टी जरी त्याच्या विरुद्ध वागते तरी तिला त्याचा प्रभाव कळत नाहीं."

मनुष्यप्राणी पूर्णतेस येण्यास अवश्य गुण कोणते ? तर, शांत स्वभाव, दयाळु हृदय, सयुक्तिक विचार व निरोगी शरीर. शांत डोकें नसलें तर आपलीं अनुमानें अविवेकाचीं होतात. दयाळु स्वभाव नसला तर आपलपोटेपणा खास यावयाचा. शरीर निरोगी नसलें तर हातून फारसें काम होत नाहीं; व सारासारविचार नसला तर चांगलें करण्याचा उद्देश असूनही आपले हातून हितापेक्षां अहितच जास्त होतें.

मित्राची प्रशंसा करावयाची असल्यास तो सद्गृहस्थ आहे असें आपण ह्मणतों; आतां गृहस्थपणा कशांत आहे ? असा प्रश्न ठॅकरेनें केला आहे. "प्रामाणिकपणानें वागणें, अंगीं सौम्यपणा, शौर्य व शहाणपण असणें; व हे सर्व गुण असूनही बाहेर साजेल अशा रीतीनें तदनुरूप वागणें ह्याला गृहस्थपणा ह्मणतात काय ?"

तो आणखी ह्मणतो—"सभ्य माणूस सांपडणें हें आपणांस वाटतें त्यापेक्षां अधिक कठिण आहे." राजा माणसांस पदव्या देऊं शकतो, पण त्यांचे सभ्य गृहस्थ करूं शकत नाहीं. तरी आपली इच्छा असल्यास आपणांस मोठें होतां येतें.

आर्कडीकन फॅरार ह्मणतो—"मिताहार, दारूस न शिवणें, व शुद्ध वर्तन, ह्यांच्या योगानें ज्याचें आरोग्य कायम राहिलें आहे; आपल्या बांधवांनीं जे उदात्त विचार बोलून ठेविले आहेत त्या विचारांवरून, व प्रत्यक्ष अनुभवावरून मिळविलेल्या

ज्ञानाचें कोठार असें ज्याचें मन झालें आहे; ज्याची कल्पना-शक्ति ह्मणजे शुद्ध व सुंदर वस्तूंचा चित्रमहाल; ज्याचें वर्तन सदसद्विवेकबुद्धीशीं मिळून आहे; ज्याला ईश्वराची भीति नाहीं, किंवा जगाची भीति नाहीं; ज्याचा आत्मा परमात्म्याचें लीन होण्याचें देऊळ, अशा माणसास, मानवी प्राण्यास शक्य असलेली पूर्णता बहुतेक आली."

जॉन स्टुअर्ट मिल ह्मणतो—"स्वशिक्षणाची खरी पद्धत ही होय. प्रत्येक गोष्टीबद्दल खोदखोदून प्रश्न करणें; अडचण आली तरी माघार न घेणें; कोणतेंही मत, मग तें स्वतःचें असो किंवा इतर कोणाचें असो, कडक तपासणी केल्याशिवाय व टीका केल्याशिवाय कबूल न करणें; अनुमान बसविण्यांत झालेल्या चुक्या, किंवा विचारांचा गोंधळ, ह्यांची बारकाईनें चौकशी केल्याशिवाय त्या तशाच सोडून न देणें; सर्वांत विशेष महत्वाचें, कोणताही शब्द पूर्णपणें कळल्याशिवाय न वापरणें; एकाद्या विधानाचा अर्थ कळल्याशिवाय त्याला अनुमोदन न देणें." हे सर्व धडे आपणांस शिकतां येतील.

शिक्षणक्रमाच्या प्रथम चरणीं तरी सर्वांस एकच मालिकेंत रहातां येईल. ह्या ठिकाणीं संपत्ति व उच्च कुळ ह्यांचा ह्मणण्याजोगा उपयोग होत नाहीं. सर डब्ल्यू. जोन्स स्वतःविषयीं ह्मणतो—"एकाद्या शेतकऱ्याजवळ पैसे असतात तेवढे पैसे असूनही, मीं राजाला जें शिक्षण मिळतें तें मिळविलें. फार दिवसांपासून शिकण्यास राजमार्गच नाहीं असें लोक सांगत आले आहेत; परंतु शिकण्याचे सर्व मार्ग राजमार्गच आहेत असें ह्मणणें कदाचित् जास्त खरें असेल; व अंतीं मिळणारें बक्षिस किती मोठें! शिक्षणाच्या योगें जगाचा इतिहास प्रकाशित होतो, व सुधारणेचा मार्ग उज्ज्वलित होतो. सर्व जगांतील ज्ञानाचें महत्व आपणांस त्यामुळें

कळूं लागतें. सृष्टीचें पुस्तक आपल्यापुढें उघडून पडतें, व कोठेंही असलों तरी मन गढविणाऱ्या गोष्टी तें मिळवून देतें."

"तोच खरा माणूस. गुणावगुणांचा विचार केला तर त्याच्या सारखा माणूस पुनः माझ्या दृष्टीस पडावयाचा नाहीं"[१] हें लोक आपल्याविषयीं ह्मणतील असें जरी आपणांस वाटत नसलें, तरी "ह्याच्या आयुष्यक्रमांत रोजरोज वाखाणण्याजोगें सांपडतें" असें आपल्याविषयीं ह्मणणें खरें असावें; कारण, आपणां सर्वांच्या ठायीं आपलें नांव अमर व्हावें अशी इच्छा असते.

प्रत्येक उदाहरणांत शिक्षण फायदेशीर झालेलें नसलें, तर तो शिक्षणाचा अपराध नव्हे. ज्या बुद्धीनें तें देण्याचें काम होतें तिचा तो सर्वस्वी अपराध. "कारण, लोकांस शिकण्याची इच्छा झाली आहे; ही इच्छा कधीं कधीं स्वाभाविक जिज्ञासेमुळें, कधीं कधीं फाजील चौकसपणामुळें, केव्हां केव्हां मनास विसर पडावा व आनंद व्हावा, केव्हां केव्हां मान मिळावा ह्मणून व कधीं भूषणादाखल, उत्पन्न झालेली असते. पण आपल्या विचारशक्तीचें फळ, माणसाच्या फायद्याकरितां किंवा उपयोगाकरितां देतां यावें ह्यास्तव शुद्ध मनानें ज्ञानार्जनाची इच्छा नसते. चौकस व अधीर प्रकृतीला विश्रांतीस्तव जागा असावी, अथवा चंचल व सतत बदलणाऱ्या अशा मनाला, जेथून चांगला देखावा पाहण्यास सांपडेल, अशी एक फिरण्यास गच्ची सांपडावी, अथवा गर्विष्ठ मनाला आश्रयास एखादा बुरूज सांपडावा, किंवा तंटे व शब्दयुद्ध करण्यास माऱ्याचा किल्ला असावा, अथवा नफातोटा करणारें दुकान असावें, अशा उद्देशानें ज्ञानार्जन केलें जातें. ईश्वराच्या गुणानुवादाचें कोठार, किंवा मनुष्याची वस्तुस्थिति सुधारण्याचें साधन हा ज्ञानार्जनाचा उद्देश नसतो."[२]

---

१ शेक्सपियर. २ बेकन.

## भाग ८.

### पुस्तकालयें.

डर्हामचा बिशप रिचर्ड ड बुरी हा एक मोठा इंग्रज होऊन गेला. त्यानें ५०० वर्षांपूर्वीं पुस्तकांची प्रशंसा करितांना जें बोलून ठेविलें आहे तें अगदीं बरोबर आहे. "पुस्तकें गुरूदाखल आहेत. तीं अंगास छडी लाविल्याशिवाय, किंवा थापव्या मारिल्याशिवाय शिकवितात. तीं रागावत नाहींत, किंवा जड शब्द बोलत नाहींत. त्यांना पैसेही द्यावे लागत नाहींत, अथवा कपडे पुरवावे लागत नाहींत. त्यांच्या जवळ जेव्हां जावें तेव्हां हे गुरु नेहमीं जागेच असतात. ज्ञानशोधार्थ जर प्रश्न केले तर ते छपवून ठेवीत नाहींत. त्यांच्या बोलण्याचा अर्थ तुह्मांस कळला नाहीं तर ते रागावत नाहींत. तुह्मीं अज्ञान दाखविलें तर ते तुह्मांस हांसत नाहींत. तेव्हां असल्या शहाणपणानें भरलेलें पुस्तकालय दौलतीपेक्षां जास्त आहे. आपल्या इच्छित वस्तूंमध्यें त्याच्या तोडीची एकही नाहीं. सुख, शहाणपण, शास्त्रें, व धर्मबुद्धि, ह्यांचें अन्वेषण करण्याची आपणांस उत्कट इच्छा आहे असें जो कबूल करितो त्याला वाचन प्रिय असलेंच पाहिजे."

जर इतक्या प्राचीन काळीं त्याला असें ह्मणतां आलें, व त्या वेळींही जर तें खरें होतें, तर आजकाल आह्मांस काय ह्मटलें पाहिजे ? त्याच्यापेक्षां आपली स्थिति आतां किती सुधारली आहे ह्याचा आपण विचार करूं. पहिल्यानें मुद्रणसंस्थेपासून झालेला फायदा जरी एकीकडेस ठेविला तरी आतां

पुस्तकें किती स्वस्थ झालीं आहेत? थोडीशी दारू किंवा तंबाकूच्या दोनच चिलिमी मिळतील इतक्या थोड्या पैशांत महिनाभर वाचायला पुरतील इतकीं पुस्तकें किंवा वर्तमानपत्रें विकत घेतां येतील. त्या गृहस्थाच्या वेळीं पुस्तकें फारच महाग होतीं. आणखी सध्यां आपलीं पुस्तकें लहान असून सुबक असतात. त्यांचीं पुस्तकें अवजड, लांबलचक, व वाचण्यास किंवा हातांत धरण्यास सोईवार नव्हतीं. उत्कृष्ट ज्ञानानें भरलेलीं पुस्तकें देखील सध्यां एका अर्थानें वाचण्यास सोपीं आहेत; व सर्वांत विशेष महत्वाची गोष्ट ह्मणजे ड् बूरीच्या वेळीं जीं अतिशय मनोरंजक पुस्तकें होतीं, तीं असूनही सध्यां तसलीं आणखी जास्त पुस्तकें आहेत. प्राचीन ग्रंथांपैकीं बरेच गहाळ झाले होते, ते सध्यां पुनः उपलब्ध झाले आहेत. त्याच्या वेळीं कादंबरी ह्मणजे बहुतेक माहीतच नव्हती असें ह्मणतां येईल. कवितेविषयीं ह्मणाल तर आजकालचे ग्रंथकारच काय, पण शेक्सपियर, मिल्टन, बायरन, स्कॉट ह्यांच्यापूर्वी तो होऊन गेला. कॅफ्टन कुक, डार्विन, हम्बोल्ट, व इतर प्रवाशी व शोधक ह्यांचीं आनंदकारक व चटकदार प्रवासवृत्तें आह्मांस वाचायला सांपडतात. शास्त्रांत रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र हीं नवीन उदयास आलेलीं आहेत, व अनेक शोधांच्या योगें सृष्टप्राणिशास्त्र, खगोलशास्त्र, भूगोल इत्यादि इतर शास्त्रें अधिक मनोरंजक झालीं आहेत.

शापेनहार ह्मणतो—"माझ्या शास्त्रज्ञानामुळें जरी मला पैचें उत्पन्न झालें नाहीं, तरी त्यामुळें माझा बराच खर्च वांचला. राष्ट्रदृष्टीनें पाहिलें असतां, शास्त्राभ्यासामुळें आमचें उत्पन्न फारच वाढलें आहे, व अनेक प्रकारांनीं आमचा खर्चही कमी झाला

आहे, हें कृतज्ञतापूर्वक कबूल केलें पाहिजे. शाळा, पुस्तकालयें, चमत्कारिक पदार्थसंग्रहालयें, ह्यांच्यांत घातलेला पैसा खर्ची गेला नाहीं; तो ठेवीप्रमाणें आहे. आपले पैसे वांचतात ह्मणून शाळा काढाव्या, व सार्वजनिक पुस्तकालयें असावींत असें आह्मी ह्मणत नाहीं; तर आपल्या बांधवांचा आयुष्यक्रम सुखावह व सुसह व्हावा ह्मणून तीं असावींत. अगदीं गरीब मनुष्यांच्या आयुष्यांत करमणुकीच्या गोष्टी अगदींच थोड्या असतात.

पुढल्या पिढीस मोठे जंगी वाचक ह्मणजे कारागीर व मजूर असतील, असें माझें मत देतों ह्मणून पुष्कळ वेळां लोक मला मौजेनें हांसले आहेत.

पण, सार्वजनिक पुस्तकालयें सारखीं वाढत चाललीं आहेत, हें माझ्या मताला पुष्टीकरण देणारें प्रमाण नव्हे काय ? फुकट पुस्तकालयें स्थापण्यापूर्वीं सर्व लोकसमूहाचें मत घ्यावें लागतें; आणि पाद्री, वकील, डॉक्टर, व्यापारी हे मत देणाऱ्या लोकांपैकीं फारच थोडे होत. सार्वजनिक पुस्तकालयें, कारागीर, व लहान सहान किरकोळ मालाचे व्यापारी, ह्यांनीं स्थापिलेलीं असतात; व त्यांचा मुख्यत्वेंकरून तेच उपयोग करितात. आपल्या शहरांतील मजुरांस पुस्तकांची आवश्यकता आहे, कारण, त्यांचा आयुष्यक्रम कधीं न बदलणारा असतो. रानटी माणसांच्या आयुष्यक्रमांत त्यांच्या आयुष्यक्रमापेक्षां जास्त पालट होते. सावजांची चालचालणूक, त्यांचें स्थलांतर, भक्ष्य शोधण्याची जागा ह्यांची त्यांना बारकाईनें चौकशी ठेवावी लागते. कोठें मासे मिळतील, कसे मिळतील हें त्यांला शिकावें लागतें. प्रत्येक महिन्यास त्यांला नवीन धंदा करावयाचा पडतो; व नवीन नवीन खाण्याचे पदार्थ सांपडतात. त्यांला आपलीं हत्यारें तयार करावीं लागतात; घर बांधावें लागतें; अग्नि पेटविणें हें

जें आतां इतकें सुलभ झालें आहे तें करण्यास त्यांला मोठी मेहनत व अक्कल खर्चावी लागते. शेतीकाम करणारास पुष्कळ गोष्टी कराव्या लागतात. त्याला पेरणी, मळणी, कापणी इत्यादि कामें करावीं लागतात. एका ऋतूंत तो धान्य पेरतो; दुसऱ्या ऋतूंत कुऱ्हाड, कोयती ह्यांचा उपयोग करितो; मेंढरें, डुकरें, गुरेंढोरें ह्यांच्याकडे त्याला पहावें लागतें. नांगर धरणें, कुंपणें घालणें, धान्याच्या पेंढ्या बांधणें हें जितकें सोपें वाटतें तितकें नाहीं. वर्डस्वर्थविषयीं अशी आख्यायिका आहे:—एका परक्या माणसाला त्याची अभ्यासाची खोली पाहावयाची होती, तेव्हां त्याच्या मोलकरणीनें उत्तर केलें "ही माझ्या धन्याची खोली, पण ते शेतांत अभ्यास करितात." शेतकऱ्याला शेतांत बऱ्याच गोष्टी शिकतां येतात. आपणांस वाटतें त्यापेक्षां त्याला जास्त कळतें. मात्र तें ज्ञान पुस्तकांतून मिळविण्याच्या ऐवजीं शेतांतून मिळविलेलें असतें. पण त्यामुळें तें कमी योग्यतेचें असें नव्हे.

जो माणूस कारखान्यांत किंवा वखारींत खपत असतो त्याचें काम एकाच तऱ्हेचें असतें. त्याचें सर्व वर्ष एकच कृति करण्यांत, किंवा एकाद्या कृतीचा एकच भाग करण्यांत जातें. त्या कामांत बहुतेक अद्भुत अमानुषी चातुर्य त्याला येतें, ह्यांत संशय नाहीं. पण तें तितक्यापुरतेंच. ज्याला नुस्तें सजीव यंत्र बनून राहावयाचें नसेल, त्यानें साधारणपणें पुस्तकें वाचून, जरूर असणारें मनोरंजन व करमणूक करून घेतली पाहिजे. कांहीं ठिकाणीं तर मनोरंजन व करमणूक करून घेण्यास वाचणें हाच उपाय असतो. दुकानें शिवाय करून इतर धंद्यांतले कामाचे तास कमी करण्याकडे लोकांचा कल झाला आहे हें पाहून समाधान वाटतें. पण मधून मधून काम सांपडत नाहीं हें कमी समाधानकारक आहे. पण हा फुरसतीचा वेळ आळसांत घाल-

वितां कामा नये. फुरसत असणें ही मोठी ईश्वरी देणगी, व आळस हा मोठा शाप; फुरसत सुखाचें उत्पत्तिस्थान, आळस दुःखाचें उत्पत्तिस्थान. समजा गरीब माणसास कांहीं दिवस काम नाहीं; त्यानें काय करावें? त्यानें आपला वेळ कशांत घालवावा? त्याला जर पुस्तकालयांत जातां आलें, तर तो फुरसतीचा वेळ फुकट जाणार नाहीं.

मुलांस शिक्षण देण्यास जीं कारणें आहेत तींच कारणें वयांत आलेल्या माणसांस शिक्षण देण्यास आहेत. देशभर प्राथमिक शिक्षण देणाऱ्या चांगल्या शाळा झाल्या आहेत. आपल्या मुलांस शिक्षण द्यावें ह्मणून आपण होईल तितकी खटपट करितों; त्यांस वाचावयास शिकवितों; वाचनाची अभिरुचि लावण्याचा यत्न करितों. असें आपण कां करितों? तर शिक्षणापासून माणूस सुधारल्याशिवाय रहाणार नाहीं, अशी आपली खात्री असते. कारण, शिक्षणापासून माणूस चांगला कारागीर बनतो इतकेंच नव्हे, तर कारागिराच्या अंगांत माणुसकी येते. परंतु हें शिक्षण थांबतां कामा नये ह्मणून मोठ्या माणसांसाठीं पुस्तकालयें ह्या शाळा होत. आलफ्रेड राजाबद्दल एक गोष्ट आहे, ती अशीः—तो लहान असतां एकदां त्याचें मन एका पुस्तकावर गेलें; त्याची आई ह्मणाली–"जो हें पुस्तक पहिल्यानें वाचावयाला शिकेल त्याला हें पुस्तक मिळेल," आणि त्याच अधिकारानें त्यानें तें पुस्तक मिळविलें. आपलीं मुलें वाचायला शिकलीं आहेत. मग पुस्तकांवर त्यांचा अधिकार पोहंचत नाहीं काय? सोशियालिझमचें समर्थन करणारे लोक त्यापासून जे फायदे होतील असें सांगतात, ते खरोखर होतात असें लोकांस वाटलें, तर पुष्कळ लोक सोशियालिस्ट नाहींत ते सोशियालिस्ट होतील. सोशियालिझमचा नेहमीं जो अर्थ घेतात त्याप्रमाणें

जास्त लोकांस जास्त सुख होईलसें आपणांस वाटत नाहीं, ह्मणून आपण सोशियालिस्ट बनत नाहीं. परंतु जगांत ज्या अडचणी येतात त्या पुस्तकांस लागू नाहींत. एका बाईनें समुद्र पहिल्यानेंच पाहिला ते वेळीं तिला आनंद झाला, असें सांगतात. ती ह्मणाली—"जो सर्वांस पुरेल असा पदार्थ पाहणें हें मोठें नशीब." हें पुस्तकांसही लागून आहे. प्रत्येकास पुरतील इतकीं पुस्तकें आहेत, व चांगलीं पुस्तकें अतिशय स्वस्त असतात. वाचनसुखास पैशाचा फारसा उपयोग होत नाहीं. हें इतर फार थोड्या गोष्टींस लागू आहे. कामाच्या इंद्रजालांत आपण सांपडलों आहोंत तेव्हां आपणांस आहे त्यापेक्षां जास्त हवेंसें नेहमीं वाटतें; पण, दैवानें पुस्तकांत आपणांस उपयोग करितां येईल त्यापेक्षां जास्त सांपडतें.

शिक्षण आयुष्यभर रहावें, मुलांचें शिक्षण ह्मणजे नुस्तें थोडेंसें व्याकरणाचें व शब्दांचें ज्ञान इतकेंच नसावें, तर त्यांना हातांस व डोळ्यांस वळण देणारेंही शिक्षण असावें; त्याचप्रमाणें पुरुषांचें व स्त्रियांचें आयुष्य पैसा किंवा हस्तकौशल्य मिळविण्यांतच जाऊं नये, तर त्यांनीं कांहीं वेळ ज्ञान संपादण्यांत किंवा मनाची उन्नति करण्यांत घालवावा; इत्यादि गोष्टींचें महत्व आतां आपणांस कळूं लागलें आहे. विशेष, मनुष्याच्या ज्ञानभांडारांत प्रत्येक माणसानें थोडी थोडी भर कां टाकूं नये? माणसाची स्थिति कितीही गरीबीची असो त्याला हें करितां येईल. शारीरिक श्रमाची महती आपणांस अद्यापि कळत नाहीं; व शास्त्रज्ञान आपल्या आटोक्याच्या बाहेर अंतरालांत कोठें तरी आहे असा साधारण समज झालेला दिसतो; व तें तत्वज्ञान्यांच्या किंवा कुशाग्रबुद्धीच्या माणसांच्याच उपयोगाचें, अथवा फार मोलाचें प्रयोग्य साहित्य ज्यांना विकत घेण्याचें सामर्थ्य

आहे त्यांच्या उपयोगाचें, असा समज झालेला दिसतो. पण ही चुकी आहे. राष्ट्राच्या उन्नतीबद्दल आपण कोणाचे ऋणी आहोंत? अंशतः सुज्ञ राजे, सुज्ञ मुत्सद्दी, अंशतः आपलें शूर सैन्य व आरमार, ज्यांनीं वसाहतींतलें साम्राज्य स्थापण्यास मार्ग खुला करून दिला असे शोधक प्रवासी, व अंशतः विद्याव्यासंगी लोक व तत्ववेत्ते ह्यांचे निःसंशय आपण ऋणी आहोंत. ह्यांनीं जें संपादित करून दिलें तें आपण लक्षांत वागविलें पाहिजे, व त्याबद्दल कृतज्ञ असलें पाहिजे; परंतु, ब्रितिश मजुरांनीं आपल्या शक्तिमान् बाहूंनीं काम करूनही आपल्या मेंदूचा उपयोग केला, व आमचा फायदा करून दिला त्यांना विसरतां कामा नये.

वॉट हा यांत्रिक एन्जीनीअर होता; ज्याच्या गिरणींतल्या यंत्रांच्या सुधारणेमुळें राष्ट्रीय कर्जाच्या संख्येपेक्षां जास्त संपत्ति इंग्लंद देशास मिळाली तो हेन्री कोट कुंभाराचा मुलगा होता; ओंतीव पोलाद शोधून काढणारा हन्ट्समन हा घड्याळें तयार करणारा होता; क्राम्टन कोष्टी होता; वेजवुड कुंभार होता; ब्रिंडले, टेलफर्ड, मुगट, नीलसन हे मजूर होते; जार्ज स्टिफन्सनें दिवसां दोन पेन्साला गुराख्याचें काम करून पोट भरण्यास सुरुवात केली व १८ वर्षांचा होई तोंपर्यंत त्याला वाचतां येत नव्हतें; डॉल्टन कोष्ट्याचा मुलगा होता; न्युकामनही तसाच होता; फॅरडे घिसाड्याचा मुलगा होता; आर्कराइटनें हजामाचा धंदा पत्करिला होता; सर हम्फ्री डेव्ही हा वैद्याच्या घरीं शागीर्द होता; बर्मिंगाम शहराचा केवळ पिता बोल्टन हा बटनें तयार करणाऱ्याचा मुलगा होता; आणि वॉट सुताराचा मुलगा होता; ह्यांचें व ह्यांच्या सारख्या इतर माणसांचें जग ऋणी असलें पाहिजे. मोठाले लढवय्ये व

मुत्सद्दी ह्यांच्या बद्दल आपणांस जेवढा अभिमान असतो, तेवढा ह्या मजुरांबद्दल असला पाहिजे.

"सुधारलेलीं राष्ट्रें" असें आपण नेहमीं ऐकतों, आणि खरोखर कांहीं राष्ट्रें इतर राष्ट्रांपेक्षां जास्त सुधारलेलीं असतात. पण कोणत्याही राष्ट्राला "सुधारलेलें" ह्या विशेषणाच्या जवळ आपण येऊन पोंहचलों आहोंत असें ह्मणण्याचा देखील अधिकार नाहीं. आपली सुधारणा अन्वर्थक झाली पाहिजे; व पुस्तकालयें स्थापणें हें सुधारणेच्या खऱ्या मार्गांतलें पहिलें पाऊल होय.

घरधन्यांस मत देण्याच्या अधिकाराचें बिल जेव्हां पसार झालें तेव्हां लार्ड शेरब्रूक असें ह्मणाला—आपण धन्यांस शिक्षित केलें पाहिजे, पण, त्यांना स्वतःस शिक्षण देतां यावें असें करणें अधिक महत्वाचें आहे.

ज्यांचा जन्म ह्मणजे काबाडकष्ट करण्याची जन्मठेप अशीं माणसें पुष्कळ आहेत. तरी त्यांचा जन्म फुकट जावा, किंवा त्यांस सुख होऊं नये असें नाहीं. ह्याकरितां त्यांना थोड्या करमणुकीच्या गोष्टी असाव्यात व आयुष्यक्रमांत थोडा पालट व्हावा. अतएव चांगलीं पुस्तकें सहज मिळण्याजोगीं असणें हें अधिक इच्छित होय.

मोठ्या शास्त्रवेत्त्यांपैकीं एक सर जॉन हर्शल ह्मणतो—"निरनिराळ्या हालहवालीच्या वेळीं उपयोगीं पडेल; जिवांत जीव आहे तों सुखाचें व आनंदाचें उत्पत्तिस्थान होईल; कोणतेही प्रसंग आपणांवर येवोत, व जग कसेंही खावयास उभें राहो; आयुष्यांतील संकटरूपी शस्त्रांपासून संरक्षण करणारें कवच होईल; अशी अभिरुचि मला ईश्वराकडून मागून घ्यावयाची असली, तर ती वाचनाची अभिरुचि होय. माणसास ही अभिरुचि लावा, व ती तृप्त करण्याचीं साधनें त्याला द्या, ह्मणजे, तो सुखी होणार नाहीं असें क्वचित् घडेल. मात्र तुह्मीं वाईट

पुस्तकें निवडून दिलींत तर तसें होणार नाहीं. ऐतिहासिक युगांतील उत्तम लोकांशीं त्यांची मैत्री करून देतां. ज्या माणसांनीं नरजातीला सुशोभित केलें, अशा सर्वांत हुशार, सर्वांत जास्त कोमल मनांच्या, सर्वांत शूर, शुद्धाचरणी माणसांशीं त्यांची ओळख करून देतां. तुह्मी त्याला प्रत्येक राष्ट्राचा रहिवाशी, प्रत्येक युगाचा समकालीन करितां. हें जगच त्यांच्यासाठीं केलें आहे."

पुस्तकें बहुतांशीं जीवंत माणसें होत. मिल्टन ह्मणे—"पुस्तकांत सजीव प्रजा भरलेली आहे, व ज्या प्राण्यांची ती प्रजा त्या प्राण्यांइतकीच ती तरतरीत असते." मोठ्या ग्रंथकारांस कधीं मरण नाहीं. "ज्याचें तेजस्वी मन तुझ्या मनास उन्नत दशेस नेतें, तो माणूस खरोखर मेला नाहीं. जीं माणसें आपण सोडून जातों त्यांच्या हृदयांत रहाणें हें मरण नव्हे."

ड्यूक अर्बिनोनें आपल्या शहरांत मोठें पुस्तकालय स्थापिलें. त्यानें असा नियम केला कीं, प्रत्येक पुस्तक लाल रंगाच्या कापडानें बांधवावें, व त्याला रुपेरी वेलबुट्टी असावी.

पुस्तकें हा गत युगांत सांठवून ठेविलेला खजिना होय. जेवण्यापूर्वीं ईश्वराचे आभार मानितों त्यापेक्षां नवीन पुस्तक वाचण्यापूर्वीं मानणें जास्त सयुक्तिक आहे, असें लॅम्ब ह्मणे.

नुसत्या दारूमागें किती पैसा जातो हें लक्षांत आणिलें, तर पुस्तकांमागें आपण वावगा खर्च करितों असा आपणांवर कोणासही आरोप आणितां येणार नाहीं. दारू सांठवून ठेवण्याच्या तळघरांपेक्षां पुस्तकालयांस किती थोडा खर्च लागतो? सार्वजनिकगृह असें जेव्हां आपण ह्मणतों, तेव्हां दारू विकण्याची जागा हा त्याचा अर्थ असतो हें ऐकून किती वाईट वाटतें! पण, दारूचा पुरवठा करण्याच्या ऐवजीं पुस्तकांचा पुरवठा करण्याकरितां सार्वजनिक गृहें उठत आहेत हें ऐकून आनंद वाटतो.

---

# भाग ९.

## वाचन.

व्यक्तीस जशी स्मरणशक्ति तशीं राष्ट्रास पुस्तकें. त्यांमध्यें आपल्या जातीचा इतिहास, आपण शोध केले आहेत ते, कालानुकालाचा अनुभव व ज्ञान असतें. सृष्टिसौंदर्य व चमत्कृति ह्यांचें चित्र तीं आपल्यापुढें उभें करितात; संकटांच्या वेळीं मदत करितात; दुःखांच्या व शरीरक्लेशांच्या वेळीं आपलें समाधान करितात; करमत नसतां वेळ सुखांत घालवितात; कल्पनातरंगांनीं मन भरून काढितात; चांगल्या व सुखकारक विचारांनीं पूर्ण करितात; व आपणांस स्वार्थापलीकडे लक्ष देण्यास लावितात.

पूर्वेकडील एक कल्पित गोष्ट आहे. ती हीः—एक राजा होता, त्याला प्रत्येक रात्रीं मी भिकारी आहें असें स्वप्न पडे. दुसरा एक भिकारी होता, त्याला मी राजा आहें व राजवाड्यांत रहातों असें स्वप्न पडे. त्या राजाची स्थिति जास्त सुखाची होती असें माझ्यानें खात्रीनें सांगतां येत नाहीं. कल्पनाशक्तीनें मनामध्यें आणलेलें चित्र कधींकधीं प्रत्यक्ष गोष्टीपेक्षां जास्त ढळढळीत असतें. तें कांहीं असो; पण वाचतांना आपणांस राजे होऊन राजवाड्यांत रहातां येईल, इतकेंच नव्हे, तर त्याहीपेक्षां जास्त चांगली अवस्था आपणांस येईल. ह्मणजे कल्पनाशक्तीच्या सहाय्यानें श्रम, आयास व खर्च झाल्याशिवाय गिरिकंदरीं, समुद्रकिनाऱ्यावर किंवा इतर रम्य ठिकाणीं जातां येईल.

फ्लेचर ह्मणतो—मला स्वतःची करमणूक करून घेऊं द्या. ज्या जागेंत माझे मोठे मित्र पुस्तकें आहेत, ती जागा मला नं-

दनवनासारखी आहे. त्यांत पुरातनकाळच्या विद्वानांबरोबर व तत्वज्ञान्यांबरोबर तासांचे तास मी संभाषण करीत बसतों. कांहीं पालट असावी ह्मणून राजे व बादशहा ह्यांच्या बरोबर हितगूज करितों; त्यांच्या उपदेशाचा सार काढितों. त्यांनीं जर अन्यायानें जय मिळविले असले, तर त्यांस दोष देतों; व योग्यता नसतां त्यांच्या स्मारकाकरितां पुतळे उभारले असले तर माझ्या मनोराज्यांत त्यांचा विध्वंस करितों. असलें चिरस्थायी सुख सोडून नश्वर दिमाखीच्या गोष्टींकडे मी वळूं कसा? पैशाच्या राशीच्या राशी करण्याचें काम तुमचें तुह्मांला असो; ज्ञानभांडार वाढविण्याचें काम मला पुरे आहे.

पुस्तकांची वारंवार मित्रांबरोबर तुलना केली जाते, परंतु निर्दय यम प्राणधारी मित्रांपैकीं उत्तम व आनंदी मित्र हिरावून नेतो. उलट पक्षीं, पुस्तकांपैकीं वाईट पुस्तकें काळ नाहींशीं करितो, व चांगल्यांचें संशोधन करितो.

"शहाणे कविजन व विद्वान् घ्या. पुस्तकें एकीकडे ठेवून विचार केला तर त्यांची राखरांगोळी झाली आहेच. पुस्तकांच्या द्वारें त्यांचा विचार केला तर कबरस्थानांतून पुनः उठलेल्या देवदूतांप्रमाणें ते भासतात. आयुष्यमार्ग कंठित असतां ते आपल्याबरोबर येतात व आपणांस वारंवार सूचना देतात. आपण कांहीं पुस्तकांस अमर समजतों. तीं जिवंत का आहेत? हें खरें मानिलें तर तीं कालक्षेपामुळें पवित्र झालीं आहेत. पुस्तकांपैकीं खव्याळ पुस्तकें शेवटच्या समाधीस लागतात. पापरूपी वस्तु जगांत राहूं नये अशी ईशाची इच्छा आहे. नश्वर भाग नाहींसा होतो व कायमचा भाग शेष रहातो. ज्याप्रमाणें आत्म्याला वेष्टून असणारें मृण्मय शरीर खडून जातें."

ह्या जगांत जें मिळणें शक्य आहे तें ज्यांच्या जवळ आहे,

ते लोक शेवटीं असेंच सांगतात कीं, आपणांस खरें अमिश्रित सुख वाचनापासूनच मिळालें. "पंतोजी" नांवाच्या पुस्तकांत अ-श्नाम लेडी जेन ग्रेच्या शेवटच्या भेटीबद्दल अशी हृदयद्रावक गोष्ट सांगतो. सॉक्रेतीसच्या मरणाबद्दल प्लेतोनें लिहिलेला र-साळ वृत्तांत वाचीत एका दीर्घ वर्तुळाकृति खिडकीजवळ ती बसलेली त्याला आढळली. तिचा बाप व आई उद्यानभूमींत शि-कार करण्यांत गुंतलीं होतीं. शिकारी कुत्रे मोठ्यानें भुंकत होते; त्यांचा आवाज खिडकींतून ऐकूं येत होता. ती त्यांच्या बरोबर शिकारीस गेली नाहीं ह्याबद्दल अश्नामनें आश्चर्य प्रदर्शित केलें. तेव्हां ती ह्मणाली, त्यांना मैदानांत जो आनंद होतो तो मला प्लेतो वाचतांना जो आनंद होतो त्या मानानें मृगजळाप्रमाणें आहे.

मेकॉलेस संपत्ति, कीर्ति, सरदारी, अधिकार इत्यादि गोष्टी अनुकूल होत्या; तरी पण आपल्या चरित्रांत आयुष्यांतील अत्यंत सुखाचा वेळ पुस्तकें वाचून गेला, असें तो ह्मणतो. एका लहान मुलीला त्यानें एक मौजेचें पत्र लिहिलें आहे त्यांत तो असें ह्म-णतो—"फार सुरेख पत्र पाठविलेंस ह्मणून मी आभारी आहें. माझ्या छोनुकलीला सुखी करणें मला नेहमीं आवडतें. माझ्या बाळीला पुस्तकें आवडतात हें ऐकून मला जितका आनंद झाला आहे तितका दुसरा कशानेंही होत नाहीं. कारण, तूं माझ्या एवढी मोठी झालीस कीं, मुरांबे, पोळ्या, खेळणीं, खेळ किंवा जगांतले सर्व देखावे ह्या सर्वांपेक्षां पुस्तकें चांगलीं हें तुला आढळून येईल. मला कोणीं राजा केला, राहण्यास राजवाडा दिला, सुग्रास अन्न दिलें, निरनिराळीं पेयें, गाड्याघोड्या, चाकर-माणसें दिलीं, व एक अट केली कीं, मीं पुस्तकें वाचूं नये तर मी राजा होण्याचें कबूल करणार नाहीं. एकाद्या कातऱ्यांत ग-

रीबीनें राहून जवळ बरीचशीं पुस्तकें असणें, हें राजा होऊन वाचण्यास पुस्तकें नसणें, ह्यापेक्षां बरें."

पुस्तकें इंद्रजालविद्येनें निर्माण केलेलीं विचारोद्यानें देतात. जीन पॉल रिक्टर ह्मणतो—सिंहासनावरून दिसणाऱ्या देखाव्यापेक्षां शारदेचें वसतिस्थान जें पार्नासस पर्वताचें टोंक त्यावरून दिसणारा देखावा विस्तृततर आहे. एकपक्षीं, प्रत्यक्ष गोष्टीपेक्षां पुस्तकें स्पष्टतर कल्पना मनांत आणितात, ज्याप्रमाणें सृष्टपदार्थांपेक्षां त्यांचीं प्रतिबिंबें जास्त शोभायमान दिसतात. जॉर्ज मॅकडोनल्ड ह्मणतो—"सर्व आरसे भारलेले असतात, आरशांत पाहूं लागलों ह्मणजे साधी खोली देखील कवितेंत वर्णिलेल्या खोलीप्रमाणें भासते."

पुस्तक आपणांस मनोरंजक वाटलें नाहीं तर तो पुस्तकाचा अपराध असें होत नाहीं. वाचण्यांत देखील एक प्रकारचें कसब लागतें. नुस्ते शब्द वाचून जाणें फारशा उपयोगाचें नाहीं. जें वाचितों तें प्रत्यक्ष अनुभवितों अशा रीतीनें वाचलें पाहिजे. मला लिहितां वाचितां येतें असें प्रत्येकास वाटतें. पण, फार चांगलें लिहितां फारच थोड्या लोकांस येतें, व कसें वाचावें हें अगदींच थोड्या लोकांस कळतें. निष्काळजीपणानें, अर्थ समजून न घेतां नुस्ते शब्दामागून शब्द वाचले, किंवा ओळींवरून डोळे फिरविले, अथवा पानें चाळलीं ह्मणजे पुरें झालें असें नव्हे. जे देखावे वर्णिलेले असतील ते डोळ्यांपुढें प्रत्यक्ष आणण्याचा यत्न केला पाहिजे, व जीं पात्रें आलीं असतील तीं कल्पनाशक्तीच्या चित्रमहालांत हुबेहूब रंगवून उतरविलीं पाहिजेत. ॲश्चाम ह्मणतोः—"अनुभवानें जें ज्ञान २० वर्षांत मिळतें, तें विद्येमुळें एका वर्षांत मिळतें. अनुभव मनुष्यास शहाणा करितोच, पण विशेष दुःखांत लोटितो; विद्या त्याशिवाय शहाणपण देते. जो

अनुभवानें शहाणा होण्याचा यत्न करितो तो आपणांस मोठ्या धोक्यांत घालून घेतो. पुष्कळ गलबतें फुटल्यावर जो तांडेल शहाणा होतो तो दुर्दैवी होय; व पुष्कळ वेळां दिवाळें फुंकल्यावर जो व्यापारी श्रीमंत व शहाणा होतो तोही दुर्दैवी. अनुभवानें जें शहाणपण मिळतें तें महाग होय. फार वेळ भटकल्यावर जवळचा रस्ता सांपडला ह्मणजे किती दुःख वाटतें, हें अनुभवावरूनच कळतें. जो अनुभवानें शहाणपण मिळवितो तो हुशार खरा; पण तो, एकादा जलद धांवणारा असून जसा रात्रीं रस्ता सोडून कोणीकडेच भटकत जातो, व कोठें जातो हें त्याचें त्यालाच कळत नाहीं, असल्या माणसाप्रमाणें होय. आणि खरोखर ज्यांना विद्येच्या द्वारें अनुभव मिळालेला नसतो असे लोक शहाणे असून सुखी थोडेच. ज्यांनीं अभ्यासाशिवाय फारा दिवसांच्या अनुभवानें थोडें शहाणपण व सुख मिळविलें असेल, (मग तुमच्या उदाहरणाचा माणून लहान असो व मोठा असो) असल्या लोकांचा पूर्वींचा आयुष्यक्रम पहा, त्यांनीं कोणकोणते अपराध केले, कोणकोणत्या संकटांतून ते निभावले, त्याचा तुह्मी विचार करा, (व संकटांतून निभावतांना २१ पैकीं २० माणसें हार जातात.) नंतर आपल्या स्वतःच्या मुलानें सुख व शहाणपण असल्या अनुभवानें मिळविणें बरें किंवा वाईट ह्याचा विचार करा."

पुस्तकांची निवड करणें हें काम मित्रांची निवड करण्यासारखेंच कठीण आहे. आपण कर्म करितों त्याबद्दल जसे आपण जबाबदार आहोंत, तसे आपण जें वाचितों त्याबद्दलही आहोंत. मिल्टनचे पुस्तकाबद्दलचे मोठे उदात्त उद्गार पुढें दिले आहेतः—"चांगलें पुस्तक ह्मणजे अधिकारी माणसाचें मोलवान् जीवितरक्त होय. जणूं मेल्यानंतर येणाऱ्या इतर प्राण्यांसाठीं तें मसाले घालून सांठवून ठेविलेलें होय."

"मुलींचें शिक्षण" ह्या प्रकरणांत रस्किन ह्मणतोः—"सरक्युलेटिंग लायब्ररीमधलीं मूर्खत्वरूपी पुष्करणींतून उडणाऱ्या ताज्या तुषारकणांनीं चिम्म झालेलीं पुस्तकांचीं पुडकीं बाहेर निघाल्याबरोबर मुलींच्या ओटींत येऊन पडणार नाहींत अशी खबरदारी ठेविली पाहिजे."

पुस्तकांपासून शक्य असेल तेवढा फायदा व्हावा इतकेंच नाहीं, तर करमणूक व्हावी अशी इच्छा असल्यास, नुस्त्या करमणुकीखातर न वाचतां आपल्या उन्नतीकरितां पुस्तकें वाचलीं पाहिजेत. साखर हा खाण्याचा महत्वाचा पदार्थ आहे, मुख्यत्वेंकरून मुलांस; तशीं सोपीं व मनोरंजक पुस्तकें अमोल आहेत; पण, नुस्त्या साखरेवर रहातां येत नाहीं, त्याप्रमाणें नुस्तीं सोपीं व मनोरंजक पुस्तकें वाचून चालत नाहीं.

विशेष हें; अशीं कांहीं पुस्तकें आहेत कीं, त्यांना पुस्तकें ह्मणतां येत नाहीं. तीं वाचणें ह्मणजे वेळ फुकट दवडण्यासारखें आहे. कांहीं पुस्तकें इतकीं वाईट असतात कीं, तीं वाचून आपण दूषित झाल्याशिवाय रहात नाहीं; व तीं माणसें असतीं तर त्यांना लाथ मारून बाहेर काढिलें असतें. कांहीं ठिकाणीं आयुष्यांतील भुरळ पडणाऱ्या गोष्टी व संकटें ह्यांबद्दल सूचना मिळणें बरें, पण, ज्याच्या योगें आपणांस पापाचा परिचय होतो ती गोष्ट पापात्मकच होय.

सुदैवच समजावयाचें कीं, इतर पुष्कळ पुस्तकें आहेत; तीं वाचून कोणाचेंही बरें झाल्याशिवाय रहावयाचें नाहीं. माणसास धंद्यांत व कामकाजांत मदत करणारेच ग्रंथ फक्त उपयुक्त ग्रंथ असें मी समजत नाहीं. पुस्तकांचा तोही उपयोग खरा, पण, तो उत्कृष्ट नव्हे. उत्तम पुस्तकें आपणांस स्वार्थाच्या पली-

कडील विचारसाम्राज्यांत ओढून नेतात, तेथें स्वार्थाच्या गोष्टी विरघळतात, व ह्या जगांतील चिंता व संकटें आपण विसरून जातों.

अशा वेळीं व्यत्यय येणें हा निर्दयपणाच होय. ह्याच्या विरुद्ध हॅमर्टन मोठ्या कळवळ्यानें बोलतोः—समजा, एकादा वाचक एकादा ग्रंथ वाचण्यांत चूर झाला आहे. तो ग्रंथकार कदाचित् निराळ्या युगांतला असतो व भिन्न सुधारणेच्या स्थितींतला असतो. समजा, तुह्मी प्लेतोच्या ग्रंथांत लिहिलेला "साक्रेतिसाचें वादीस उत्तर" हा निबंध वाचीत आहां; तो सर्व देखावा चित्राप्रमाणें डोळ्यापुढें उभा राहिला आहे; ५०० लोकांचें तें न्यायमंडळ, ग्रीकलोकांचें तें अमिश्र बांधकाम, मनें वेधलीं आहेत अशी अथेन्सांतील प्रजा, तो दुष्ट मेलिटस, ते मत्सरी शत्रु, ज्यांचीं नांवें प्रिय व अमर झालीं आहेत असे ते साक्रेतिसाचे प्रिय विलाप करणारे मित्र, मध्यभागीं गरीबांसारखा हलक्या व साध्या कापडाचा पोषाख घातलेला तो माणूस, (हे कपडे तो हिंवाळ्यांत व उन्हाळ्यांत सारखेच घालतो) इत्यादि तुमच्या डोळ्यांपुढें दिसत आहेत; साक्रेतिसाचा तोंडवळा बहुतेक कुरूप ह्मणण्याजोगा साधा आहे, तरी पण, त्यावर खऱ्या धैर्याची व शांततेची अशी विलक्षण झांक आहे कीं, कोणत्याही नटाला तिचें अनुकरण करितांच येणार नाहीं; ते अस्खलित शब्द तुमच्या कानांत गुंगत आहेत; ज्या भागांत प्रिटेनियममध्यें ठेवून मला सरकारच्या खर्चानें पोटास मिळावें अशी साक्रेतीस स्वतःला शिक्षा देतो, तो जोरदार भाग वाचण्याचा तुह्मीं आरंभ केला आहे; अशा वेळीं वाचन संपेपर्यंत अडथळा आला नाहीं, तरच मानसिक श्रम करणाऱ्या लोकांचें बक्षिस ह्मणजे उदात्त सुख कांहीं क्षणभर तुह्मांस भोगावयास सांपडेल."

चांगलें व मनोरंजक पुस्तक वाचून माणसाला सुख झालें नाहीं, व जास्त ज्ञान मिळालें नाहीं असें होणार नाहीं. हें सुख क्षणभरच होतें असें नाहीं. त्याचें स्मरण जवळ रहातें; व एक उत्तम व सुखकारक विचारांचें भांडारच आपल्या जवळ रहातें; आणि तें वाटेल तेव्हां पुनः डोळ्यांपुढें आणितां येतें.

रक्तमांसानें एक पण अधिक योग्यतेच्या लोकांच्या वायुमय आकृति तरी आपल्यापुढें अवतरतात. जेवतेवेळीं किंवा निजतेवेळीं, प्रसन्न मुद्रेनें पाहून व हितकर उपदेश देऊन त्या आपणांवर ताबा चालवितात.

ब्रेटहार्ट दूर पश्चिमेकडल्या गोलार्धांतल्या सोनें खणून काढणाऱ्या लोकांच्या छावणीचें वर्णन पुढें लिहिल्याप्रमाणें करितो.–

"पैसा मिळविण्याच्या चढाओढीनें निस्तेज व निःसत्व झालेल्या शरीरांवर व तोंडांवर छावणींत पेटविलेला अग्नि आपल्या आरक्त ज्वाळांच्या प्रकाशानें आरोग्याची लाली चढवून, जणूं काय माणसांचा उपहास करीत होता. इतक्यांत एक उठला, व लहानशा गाठोड्यांत मोठ्या काळजीनें जपून ठेविलेलें पुस्तक त्यानें काढिलें; त्याबरोबर, खेळण्याची उमेद नसतां फक्त करमणुकीकरितां हातीं घेतलेले पत्ते लगेच खालीं पडले, व माणसें तीच गोष्ट पुनः ऐकण्यास तयार झालीं. अंधकाराचें पटल चोहोंकडून गुरफटत चाललें आहे, अग्नि प्रकाशहीन होत चालला आहे, अशा वेळीं गुरूनें लहानग्या नेलची हकीकत ज्या पुस्तकांत लिहून ठेविली आहे तें पुस्तक त्यानें मोठ्यानें वाचिलें. पोराची कल्पना ह्मणा–कारण, वाचक सर्वांत लहान होता– पण, तो वाचीत असतां सभोंवार असलेले सीडर व पाईन वृक्ष जणूं चुप राहिले आहेत, व देवदारू अंधकारांत ऐकण्याकरितां जवळ जवळ येऊं लागले आहेत असा भास झाला; व ते

छावणींतले लोक मनोराज्यांत नेलबरोबर इंग्लंडांतील कुरणांतून भटकूं लागले, व त्यांचा रस्ता चुकला. ”

इंग्रजी भाषेंतला ग्रंथसमूह इंग्रज जातीची वंशपरंपरेनें आलेली जिनगी होय. आमच्यांत श्रेष्ठ कवि, तत्ववेत्ते व शास्त्रज्ञ निपजले व निपजत आहेत. आमच्या व्यापारापेक्षां आह्मांस अधिक मौल्यवान्, व शस्त्रांपेक्षां अधिक बलवान् वाटणारा, अधिक शुद्ध, सतेज, व उदात्त असा ग्रंथसमूह दुसऱ्या कोणत्याही जातीजवळ नसेल. त्यांत आपल्या देशाचें खरें वैभव आहे. त्याबद्दल आपणांस अभिमान असला पाहिजे, व त्याबद्दल जितकें आभारी असावें तितकें थोडेंच.

---

# भाग १०.

## स्वदेशाभिमान.

ज्या देशाची मोठ्या अभिमानानें सेवा करण्यास तयार असावें असा देश ह्मटला ह्मणजे आपला होय.

अरे इंग्लदा! मूर्ति लहान पण कीर्ति मोठी ह्याप्रमाणें तुझी स्थिति; तुझें बाह्यस्वरूप तुझ्या अंतस्थ मोठेपणाचें दर्शक होय.

आकृतीच्या मानानें दर्यामें खसखस. तरी अफाट समुद्रांतल्या अर्ध्या गलबतांवर तुझें निशाण फडकतें.

भूगोलाच्या मानानें देशाची अवस्थिति फायदेशीर आहे. हवा प्रकृतीस मानणारी व अंगांत कुवत आणणारी आहे. व रुप्यासारख्या चकाकणाऱ्या समुद्राच्या पट्टीनें आपणांस पुष्कळ युद्धांतून वांचविलें आहे.

"हें सार्वभौम बेट, ही भव्य पृथ्वी, हें मंगळाचें आदिस्थान, हें दुसरें नंदनवन, हें अर्धस्वर्ग, युद्धप्रलयाचा हात लागून दूषित होऊं नये ह्मणून सृष्टीनें आपणांकरितां बांधलेला हा बळकट किल्ला होय. ही सुखी मनुष्यजाति, हें लहानसें जग, रौप्य समुद्राच्या कोंदणांत बसविलेलें हें रत्न आहे; व हा समुद्र तटाप्रमाणें आहे. जसा घराभोंवतीं चर, त्याप्रमाणें कमी सुखी राष्ट्रांच्या द्वेषापासून संरक्षण होण्यास हा समुद्र[१]."

संयुक्त संस्थानांतील एक वक्ता आपल्या देशाचें असें वर्णन करितोः—आमच्या देशाची दक्षिण सीमा विषुववृत्त, उत्तर सीमा अॅरोरा बोरिआलिस, पूर्व सीमा अॅतलँतिक महासागर, व पश्चिम

---

१ शेक्सपीयर.

सीमा अस्तास जाणारा सूर्य. ब्रितिश राज्यांत सूर्य कधीं मावळत नाहीं असें बोलणें विशेष सयुक्तिक होय.

ब्रितानियेला तटबंदी नको, किंवा कड्यावर बांधलेले किल्ले नकोत; तिचा मार्ग पर्वतप्राय लाटांवरून असतो, व तिचें घर अगाध समुद्र होय[1].

एका अमेरिकन मुत्सद्याचे पुढील शब्द आहेतः—"तिचें निशाण समुद्रासमुद्रांतून बंदराबंदरांतून फडकत आहे; व तिच्या शिपायांचा उत्थानकालचा दुंदुभिनाद सूर्याच्या गतीस अनुसरून प्रत्येक तासास इंग्लंदाच्या रणगायनास ताल देत सर्व पृथ्वीभर फिरत असतो."

आपले शिपाई सर्वत्र पसरलेले आहेत; पण, ते शत्रु ह्या नात्यानें नव्हत तर मित्र व संरक्षक ह्या नात्यानें पसरलेले आहेत, हें पाहून आपणांस अधिक आनंद वाटावा. आपल्या स्वयंसेवक शिपायांचा मुद्रणलेख "स्वसंरक्षणार्थ, अहंकारार्थ नव्हे," हा आपल्या सैन्यास व आरमारासही शोभेल.

हें मोठें राष्ट्र पायरीपायरीनें वाढत गेलें. तें आपल्या पूर्वजांच्या उद्योगामुळें व परिश्रमामुळें लब्ध झालें; व कांहीं होवो आपणांकडे जसें आलें तसें, कदाचित् जास्त सुधारून व बळकट करून, वंशजांकरितां ठेऊं अशी इच्छा जर आपल्या मनांत वागत नसली तर आह्मी कमकुवत झालों आहोंत, असें ह्मटलें पाहिजे.

गतकालच्या आपल्या इतिहासांत खेद मानण्याजोग्या बऱ्याच गोष्टी घडल्या आहेत. पण, इतर राष्ट्रांच्या इतिहासाबरोबर आपल्या देशाचा इतिहास ताडून पाहिल्यास, आपल्या देशांत रक्तपात फार थोडा झाला आहे असें दिसून येतें. प्रत्यक्ष

---

१ कॅम्पबेल.

युद्धें सोडिलीं, तर इतक्या कालाच्या इतिहासाच्या मानानें कालिमा आणण्याजोगीं आमच्या देशांत जितकीं थोडीं कृत्यें घडलीं आहेत, तितकीं दुसऱ्या कोणत्याही देशांत घडलीं नसतील. आमच्या येथें फ्रान्सप्रमाणें सार्वजनिक कत्तल किंवा भीतीचें साम्राज्य झालें नाहीं; सिसिली बेटाप्रमाणें रात्रीच्या प्रार्थना झाल्या नाहींत.

युद्धाच्या वेळीं प्रतिपक्षांवर आह्मीं औदार्य प्रकट केलें आहे. नेपोलियनाबरोबर चाललेल्या झटापटीचा अंत झाला, व फ्रान्साचें सामर्थ्य नष्ट झालें त्या वेळीं, व कटांतील मंडळींनीं पॅरिस हस्तगत करून घेतलें त्या वेळीं, ज्या अटींच्या योगानें फ्रान्सचा मुलुख व वसाहती अलग त्यांच्याकडे राहिल्या अशा अटींस आह्मी कबूल झालों; व त्यांनीं गुलामांचा व्यापार बंद करावा अशी एकच अट त्यांच्याकडून करून घेतली; आणि फ्रान्सास कर्जमुक्त केलें; ह्याच वेळीं आपण स्वतःच्या खर्चाकरितां ९० लक्ष पौंडांवर कर्ज काढिलें. ह्या अटींचें निरीक्षण करूं लागलों, ह्मणजे आमच्या मुत्सद्यांनीं इतकें औदार्य दाखविलें हा शहाणपणा केला कीं काय, ह्याबद्दल संशय उत्पन्न होतो. वाटर्लूच्या लढाईंत आमचा जय झाला असें फ्रेंच लोक ह्मणतात; ह्याचें आश्चर्य वाटावयास नको. निदान तहाचीं कलमें आमच्यापेक्षां त्यांना जास्त हितावह होतीं हें खरें.

फ्रेंच लोकांच्या वसाहती त्यांस परत दिल्या हें नुक्तेंच सांगितलें; व गुलामांचा व्यापार बंद करण्यास जे प्रयास पडले व पदरास जो खार लावून घ्यावा लागला, त्याचा हा एक भाग होय. गुलामांचा व्यापार बंद करण्यास आह्मीं पोर्तुगाल देशास ३ लक्ष पौंड व स्पेन देशास ४ लक्ष पौंड दिले. ज्या वेळीं मान मोडण्याजोगें कर्जाचें ओझें आह्मांवर होतें, व सध्यांसा-

रखी आमची आबादानी नव्हती अशा वेळीं ५० वर्षेंपर्यंत आफ्रिकेच्या किनाऱ्यावर पदरच्या खर्चानें आह्मीं आरमार ठेविलें, व त्या कामांत पुष्कळ मोठ्या लोकांचे बळी दिले. ग्लॅडस्टन साहेब खजीनदार असतांना त्यांनीं ह्या आरमाराच्या खर्चाचा वार्षिक आंकडा ७ लक्ष पौंड केला होता. वेस्ट इंदीज व मॉरिशस ह्या बेटांनीं गुलामांस बंधमुक्त करावें ह्मणून त्यांस २ कोटी पौंड दिले. ह्या नीच व्यापाराचा बींमोड करण्याच्या उदार प्रयत्नामुळें राष्ट्राला जवळ जवळ १० कोटी पौंड खर्च आला.

इतर राष्ट्रें वसाहतींपासून व आश्रित राष्ट्रांपासून बराच वसूल मिळवितात. अथेन्स आपल्या सख्यसंबद्ध राष्ट्रांपासून दर वर्षीं बराच मोठा खंड घेत असे, व राष्ट्रीय वसुलाचा तो बराच मोठा भाग होता. प्रांतांनीं राज्याचा खर्च पुरवावा हें रोमन लोकांचें कराचें मुख्य तत्व होतें. त्यांनीं सिसिली बेट घेतलें, तेव्हां शेतीच्या उत्पन्नाचा $\frac{1}{10}$, देशांत येणाऱ्या व देशांतून जाणाऱ्या मालावर ५ टक्के जकात ते घेऊं लागले. अलीकडच्या काळीं, इतर देश—स्पेन, पोर्तुगाल, हालंद—ह्यांनीं वसाहतींपासून बराच वसूल मिळविला आहे.

इंग्लंदचें वर्तन अगदीं भिन्न झालें आहे. वसाहतींकडून कर घेण्याच्या ऐवजीं उलट त्यांच्या सुखाकरितां इंग्लंदानें हजारों रुपये खर्च केले आहेत. १८५९ च्या पूर्वीं वसाहतींकरितां इंग्लंदानें किती रुपये खर्चिले हें दाखविणारे आंकडे छापून निघालेले नाहींत, असें मला मिळालेल्या माहितीवरून वाटतें. पण, १८५९ ते १८६९ पर्यंत खर्च ४ कोटी १० लक्ष पौंडांवर गेला. व त्याच्यापूर्वीं बरींच वर्षें सालिना खर्च ४ लक्षांवर झाला असला पाहिजे.

मातृदेशभूमि जी इंग्लंद तिला झालेला खर्च ह्यापेक्षां बराच

जास्त असला पाहिजे. कारण, दिलेल्या आंकड्यांत, हत्यारें, दारूगोळा, शिपायांच्या बराकी, दवाखाने इतर सरंजाम ह्यांच्यासाठीं झालेला खर्च, नवीन शिपाई चाकरीस ठेवण्यास, मुख्य ह्पीस चालविण्यास झालेला खर्च घातला नाहीं.

भूमध्यसमुद्रांत आरमार ठेवण्यास लागणारा खर्च वसाहतींचा असें क्वचितच ह्मणतां येईल, असा कोणी आक्षेप काढील; व त्याचप्रमाणें माल्ता व जिब्राल्तर ह्या ठाण्यांस लागणारा खर्च त्यांना स्वतःकरितां येईल, असें आपणांस ह्मणतां येत नाहीं. पण, तीं ठाणीं ठेवण्यास मोठें कारण ह्मणजे, हिंदुस्थान व आस्त्रेलिया ह्या देशांशीं असणारें दळणवळण कायम राखण्याची जरूरी, हें होय; हें दळणवळण कायम ठेवण्यास लागणारा खर्च आमच्याच डोकीवर कां पडावा, त्यांतला थोडा भाग हिंदुस्थान व आस्त्रेलियांतील वसाहती ह्यांनीं कां देऊं नये, असें आपणांस देखील विचारितां येईल. आणखी, वर सांगितलेला खर्च, मातृदेशभूमीच्या बाहेर सैन्यास चाकरी करावी लागते ह्मणून होतो तोच होय. पण, इंग्लंदांतलें सैन्य गरजेपुतें ठेऊन, वसाहतींच्या कामांस लावितां येईल, ह्मणून नेहमींच्या ह्या खर्चाचा थोडा भाग त्यांनीं द्यावा असें वाटणें न्यायाचें होईल.

आपल्या राष्ट्राच्या जमाखर्चांत वसाहतींकरितां आरमाराचा खर्च त्यांच्या नांवें मांडलेला नसतो; तथापि, वस्तुतः वसाहती स्वतंत्र असत्या तर जो आरमाराचा खर्च त्यांच्यावर पडला असता तो खर्च आपला देश करितो. त्यांच्या करितां समुद्रांत पोलिसचें काम आह्मी करितों. त्यांच्या किनाऱ्याजवळील जमिनीचें आह्मी संरक्षण करितों. त्यांचा खर्च किती वांचतो हें समजण्यास फारसा विचार नको. ग्रेतब्रितन व आयर्लंद ह्या देशांतील ३ कोटी ५० लक्ष प्रजा आरमाराच्या खर्चाकरितां २

कोटी रुपये देतात. वसाहती व हिंदुस्थान येथील ३० कोटी प्रजा बहुतेक कांहींच देत नाहीं.

पुनः एकवार हिंदुस्थानचें उदाहरण घ्या. राष्ट्राच्या साधारण खर्चास हिंदुस्थान प्रत्यक्ष रीतीनें कांहींच पैसा देत नाहीं हें सांगण्याची फारशी जरूरी नाहीं; त्याचप्रमाणें ज्या खर्चामुळें वसाहतींसारखा हिंदुस्थानचा नफा होतो, त्या खर्चांतला आपला भाग तो देत नाहीं. हिंदुस्थान आपल्या ताब्यांत आहे ह्मणून इंग्रज मजूरांस किंवा पट्टी भरणाऱ्यांस एक पैचा प्रत्यक्ष फायदा नाहीं, किंवा देशाच्या वसुलांत त्यांची एक पै कमी होत नाहीं.

लष्करच्या खर्चासंबंधीं देखील जेवढें लष्कर प्रत्यक्ष कामावर असेल त्यांच्या पगारास पुरेल त्यापेक्षां एक पैही हिंदुस्थानास जास्त द्यावी लागत नाहीं, अशी मोठी खबरदारी ठेविली आहे. इतक्या महत्वाच्या विषयांत देखील आश्चर्यास जागा आहे असें मानिलें, तर पुढील गोष्ट आश्चर्यकारक होय. युद्धखात्यानें आपल्या खर्चाच्या भागाबद्दल मागण्या केल्या ह्मणजे हिंदुस्थानसरकार, जरूर दिला पाहिजे तेवढा पैसा शिवाय करून बाकीच्या सर्व मागण्यांचा मोठ्या जोमानें प्रतिकार करितें.

आरमारासंबंधानें देखील हिंदुस्थानाला अतिशय उदारपणानें वागवितात. आमच्या आरमारापासून त्याचा फार फायदा होतो ह्याबद्दल संशय काढावयास नको. जो खर्च त्याला जरूर करावा लागता असा जबर खर्च त्याचा वांचतो. तथापि आरमाराच्या खर्चासाठीं तो सालिना ७०००० पौंड देतो; व ह्याशिवाय आगबोटी, नद्यांतून खाड्यांतून चालणाऱ्या बोटी, वाटाड्यांचा खर्च, बंदराचा खर्च इत्यादींसाठीं आणखी ५ लक्ष पौंड खर्चितो.

हिंदुस्थानचें राज्य तेथल्या लोकांस फायदेशीर होईल अशा रीतीनें चालवावयाचें ही आमची मनापासून इच्छा आहे, व तसा आमचा यत्नही असतो. राज्य चालवितांना आमच्या येथें जशा चुक्या झाल्या तशा तेथेंही झाल्या असतील. पण, वरील धोरणांनीं आह्मीं राज्य चालविलें आहे.

आमच्या अंमलामुळें त्यांचा फायदा झाला हें खोटें ह्मणतां येणार नाहीं. डॉ० हन्टर असें सांगतो–ओढ्या प्रांतांत उत्पन्नापैकीं शेंकडा ६० राजअंश असे. अगदीं प्रजेस अनुकूळ असें तद्देशीय सरकार शेंकडा ३३ टक्के सारा कापून घेत होतें; आपलें सरकार शेंकडा ३ किंवा ७ घेतें. तद्देशीय राजांच्या अंमलाखालीं असतांना जें सरकारदेणें होतें त्यापेक्षां सध्यां हिंदुस्थानांतील आपल्या देशबांधवांचें सरकारदेणें कमी आहे, व त्यांचें जीवित आणि मालमत्ता जास्त सुरक्षित आहे. निदान इंग्लंदच्या वसुलाकरितां हिंदुस्थान एक पैही देत नाहीं हें खास. हिंदुस्थानचे लोक आपणावर प्रीति करितात असें कदाचित् ह्मणतां येणार नाहीं; व तसें होईलसें वाटणेंही कदाचित् अशक्य आहे. पण, ते आपल्या राज्याला मान देतात हें खोटें ह्मणतां येणार नाहीं.

आपलें राज्य लोकांस आवडत नाहीं असें नाहीं, हें शिपायांच्या बंडाच्या वेळीं स्पष्ट दिसून आलें. वरच्या दर्ज्यापासून तों खालच्या दर्ज्यापर्यंतच्या साऱ्या लोकांनीं वीरांसारखें वर्तन केलें, व आपलें राज्य अन्याय व दोष ह्यांनीं दूषित झालेलें असतें, किंवा साधारणपणें आपणांवर विश्वास नसता किंवा हिंदुप्रजा आपणांस मान देत नसती, तर आपण केव्हांच समुद्रांत बुडून गेलों असतों. आपल्या शूर शिपायांचा पराक्रम, त्यांच्या नायकांचें युद्धकौशल्य ह्यांचा अशा वेळीं फारसा उपयोग झाला नसता. हिंदुस्थानच्या प्रजेनें आमच्या विरुद्ध उघड शस्त्र उचलिलें नाहीं;

आणि त्या आणीबाणीच्या प्रसंगीं त्यांनीं जें वर्तन केलें त्यावरून, आपणांवर जें काम विश्वासिलें होतें तें काम आपण कशा रीतीनें बजाविलें, ह्याबद्दल उत्तम साक्ष मिळते.

"बंडाच्या वेळीं कप्तान डी स्टुवर्टनें घोड्यावरून आग्रापासून दिल्लीपर्यंत मोठ्या धाडसाचा प्रवास केला. ते वेळीं आपलें राज्य गेलें असें समजून पुढें येणारीं संकटें व झोटिंग पादशाही ह्यांपासून बचाव करण्याच्या उद्देशानें तद्देशीय लोक गांवांभोंवतीं तटबंदी करीत होते असें त्याला दिसलें."

म० थियर्सच्या कारकीर्दींतील माजी फॉरिन सेक्रेटरी बार्थेलेमी सेंट हिलेर हा मोठा माणूस होता. त्यानें हिंदुस्थानांतील ब्रितिश अंमलाच्या उदारपणाबद्दल व न्यायीपणाबद्दल मोठ्या मनानें उल्लेख केला आहे. "मनुष्यमात्राचे व सुधारणेचे हितचिंतक असल्या गोष्टींत जेवढें यश यावें असें समजतात तेवढें यश त्यांना आलें आहे. २५ कोटी लोक जे त्यांचे देशबांधव त्यांना राष्ट्रीय व नैतिक शिक्षण देण्याच्या कामांत त्यांस अतिशय यश आलें आहे; त्या शतकांत आरंभ केलेल्या ह्या उदार प्रयत्नास पूर्ण यश येण्यास फार मेहनत करावी लागेल." तो ह्मणतो त्याप्रमाणें मोठें कठीण काम आपणांपुढें आहे; पण, निःपक्षपाती उत्तेजन देणाऱ्या सर्व लोकांकडून आपली मनापासून प्रशंसा होईल हें पाहून समाधान वाटतें.

आपल्या राज्यव्यवस्थेबद्दल इतर लोकांनीं जें मत ठरविलें आहे, तें हाँगकाँग व सिंगापूर ह्या ठाण्यांच्या इतिहासावरून स्पष्ट होतें. मि० वुड ह्मणतो—"पहिलें ठाणें पूर्वीं एक ओसाड बेट होतें. ब्रितिश लोकांस तें मिळालें तेव्हां तेथें मूठभर कोळी लोकांची वस्ती होती. तेथें आतां हजारों चिनी लोकांची गर्दी

१ राबर्टनें हिंदुस्थानांत काढलेलीं ४१ वर्षें.

झाली आहे. ब्रिटिश राज्यांत जुलुमाचे कर द्यावे लागणार नाहींत, न्यायी कायद्यांच्या अंमलांत राहावयास सांपडेल, फायदेशीर व तेजीस येणारा व्यापार करावयास मिळेल, हें जाणून चिनी लोक खाडी ओलांडून येथें रहाण्यास आले आहेत." तसेंच सिंगापूर ह्या बहुतेक निर्जन स्थळीं चीन, मॅलेद्वीपकल्प व हिंदुस्थान इत्यादि देशांतून त्याच कारणांस्तव आलेले असंख्य लोक सांपडतात.

जावा हें एक आणखी उदाहरण घ्या. हीरन ह्मणतोः--"तें पांच वर्षें ब्रिटिश अंमलाखालीं होतें; तितक्यांत त्यांचा अंमल इतका नेमस्त व सौम्यपणाचा होता कीं, तें डच लोकांस परत दिल्यावर तद्देशीय व युरोपियन लोकांस त्यांच्या अंमलाखालीं रहाणें जड पडूं लागलें. ब्रिटिश लोकांच्या अंमलांत तें थोडा वेळ होतें, तितक्यांत ह्या प्रसिद्ध बेटांत तेजस्वीतर ज्ञानप्रकाश पडला, तसा तें हालंदच्या ताब्यांत असतांना सबंध २०० वर्षांत पडला नव्हता."

अमेरिकेकडे वळून मिनेसोटाचा अमेरिकन बिशप व्हिपल ह्याच्या जोरदार पुराव्याचा मी उतारा देतों. तो संयुक्त संस्थानें व ग्रेतब्रितन ह्यांच्या आपापल्या देशांतील इन्दियनांबरोबरच्या संबंधांची पुढें लिहिल्याप्रमाणें तुलना करितोः— "सीमेच्या एका बाजूस एक राष्ट्र आहे; त्यानें इन्दियनांबरोबर लढाई करण्यांत ५० कोटी डालर्स खर्च केले. अॅतलॅान्तिक व पॅसिफिक महासागरांमध्यें असलेल्या १०० मैल लांबीच्या, ह्या राष्ट्राच्या अंमलाखालील प्रदेशांत अशी एकही जागा राहिली नाहीं कीं, ज्या ठिकाणीं इन्दियन लोकांची कत्तल झाली नाहीं. इन्दियन लोकांच्या एकाही जातीला त्यांनीं ख्रिस्ती सुधारणा दिली नाहीं. प्रत्येक शतकाच्या शेवटास इन्दियन लोकांबरोबर लढाई

करण्याचा महोत्सव तें राष्ट्र करितें. सीमेच्या दुसऱ्या बाजूस तेच अँग्लो सॅक्सन व इन्दियन लोक रहातात. त्यांनीं इन्दियनां-बरोबर लढाई करण्यांत एक डॉलर खर्चिला नाहीं. इन्दियन लोकांची कधीं कत्तल केली नाहीं. आणि असें कां? कॅनडा-मध्यें इन्दियन लोकांबरोबर झालेल्या तहांत त्या लोकांस राणीची इन्दियन प्रजा असें ह्मटलें आहे. सुधारणा त्यांच्या जवळ येऊं लागली ह्मणजे बरेच प्रतिबंध त्यांच्यावर ठेवितात. सुधारणा करण्याच्या कामीं त्यांना मदत करितात. त्यांना स्था-वर मिळकत मिळविण्याचा अधिकार असतो. त्यांना तेच कायदे लागू असतात; व कायद्यांचें त्यांना रक्षण मिळतें; त्यांच्या साठीं शाळा असतात, व ख्रिस्ती लोक त्यांच्याकरितां उत्तम शिक्षक पाठवितात."

आह्मीं आयर्लंदाचें नुकसान केलें असें कधीं कधीं ह्मणतात. पण हें बोलणें अगदीं अन्यायाचें आहे. उलट पक्षीं लोकसं-ख्येच्या मानानें व वसुलाच्या मानानें वाजवीपेक्षां जास्त मुखत्यार त्यांना पाठवितां येतात. आमचे जे कर आहेत तेच त्यांचे आहेत. ह्याशिवाय आयर्लंदाला द्यावे लागत नाहींत, पण आह्मांला द्यावे लागतात ते कर असेः—जमिनीचा धारा, घरपट्टी, रेल्वे-पट्टी, जमाबंदी; एकूण सालिना ७ लक्ष पौंड, व शिवाय किरकोळ पट्ट्या. ह्या वर्षापर्यंत आयर्लंदच्या शेतकऱ्यांस आमच्या येथल्या पेक्षां कमी इन्कमटॅक्स द्यावा लागत होता. आकारणी करिते वेळीं इंग्लंदाच्या जमिनीपेक्षां आयर्लंदच्या जमिनीची आकारणी कमी धरितात; व त्याला नेहमीं मोठ्या देणग्या मिळतात; उदाहरणार्थ दुष्काळाच्या वेळीं त्याला ८० लक्ष पौंड मिळाले. मद्यार्कावरची जकात आयर्लंदला फाजील देणें पडते असें कधीं कधीं ह्मणतात. पण, बीर दारूवरली जकात बहुतेक इंग्लंदांत भरतात. इतर

मद्यांवरील जकात शेंकडा ९२ ह्याप्रमाणें इंग्लंद देतें, व आयर्लंद फक्त शेंकडा $\frac{९}{१०}$ ह्याप्रमाणें देतें. आयर्लंदाबरोबर न्यायाचें व वाजवी उदारपणाचें वर्तन असावें असें प्रत्येक इंग्रज व स्कॉच माणसास वाटतें.

लढाई करून जसे जय मिळतात तसेच शांततेचेही जय असतात, हें आपणांस माहीत आहे; व मनुष्यजातीच्या उत्क्रमणइतिहासाकडे लक्ष फेंकलें तर आमच्या वाडवडिलांबद्दल देखील अभिमान बाळगण्यास आह्मांला पुरेशी जागा आहे.

इंग्रजी भाषेचा झपाट्यानें प्रसार होत चालला आहे, व ती मनुष्यजातीची सर्वसाधारण भाषा होईल अशी सबळ आशा आहे. तरी बेकननें "ज्ञानप्रसार" नांवाचें आपलें पुस्तक लॅतिन भाषेंत लिहिण्यास डॉ० प्लेफेअरला सांगितल्याला फारसे दिवस झालेले नाहींत. त्याचें कारण त्यानें असें दिलें होतें:—"ज्या भाषेंत तें लिहिलें आहे ती भाषा फारशी माहितींतली नसल्यामुळें वाचकांची संख्या नियमित होते, व त्याचेंच भाषांतर लॅतिनमध्यें झालें ह्मणजे पुस्तकाचा पुनर्जन्म झाल्यासारखें होईल."

आपल्या देशापेक्षां जास्त शुद्ध, जास्त जोरदार, व जास्त उदात्त ग्रंथसमूह आहे असा अभिमान कोणत्याही देशास बाळगितां येणार नाहीं. मी इंग्रज आहें तेव्हां हा माझा स्वाभिमान असें कदाचित् ह्मणतां येईल. पण, सर्वांच्या मतें लेखकसमुदायांत शेक्सपीयर अनुपम वरिष्ठ होऊन गेला. आजकालचे ग्रंथकार जरी सोडून दिले तरी चॉसर, बेकन, मिल्टन, स्पेन्सर हे आपल्या देशास वैभव आणणारे होत. नुक्तेंच एका प्रसिद्ध इताली देशांतील पत्रानें जगांतील उत्तम पुस्तकांबद्दल मतें गोळा केलीं होतीं. पुष्कळ लोकांनीं, ह्मणजे शेंकडों वर्गणीदा-

रांनीं आपापलीं मतें दिलीं; व पहिल्या आठ पुस्तकांत बायबल खेरीज करून चार पुस्तकें इंग्रजी भाषेंतलीं होतीं.

जुन्या व नव्या शोधांसंबंधीच्या इतिहासांत वाफेच्या यंत्रांविषयीं बोलते वेळीं वॉट साहेबाचें नांव यावयाचें. त्याचप्रमाणें वाफेच्या एन्जिनसंबंधानें स्टीफन्सचें, विजेच्या तारायंत्रासंबंधानें व्हेटस्टोनचें, कांतण्याच्या यंत्रांसंबंधानें आर्क राईटचें, जेनीसंबंधानें ह्रारग्रीव्हचें, फोटोग्राफीसंबंधानें फॉक्स टालबटचें नांव यावयाचेंच.

वैद्यशास्त्रांत रक्तप्रसरण हार्वेनें शोधून काढिलें; देवी टोंचण्याचें जेनरनें, बेशुद्ध करण्याचें सिम्पसननें, जखमा झाल्या असतां अथवा शस्त्रक्रिया करते वेळीं रक्त दूषित होणें बंद करण्याचें लिस्टरनें शोधून काढिलें. शास्त्रांत प्रवीण अशीं मोठीं माणसें आमच्यांत पुष्कळ आहेतः—बेकन, न्यूटन, यंग, डार्विन, डेव्ही, डाल्टन, कॅव्हेन्डीश, फॅरडे, हर्शल, वुइल्यम, स्मिथ, लायल, मर्चिसन, इत्यादि, इत्यादि.

ह्या गोष्टी स्वतःचा बडेजाव ह्मणून सांगत नाहीं तर त्या आपल्या वडिलांस भूषणास्पद आहेत ह्मणून सांगतों. आपणांस त्यांबद्दल अभिमान आहे, पण, त्यांमुळें आपणांवर एक जबाबदारी येते.

मग आपणां सर्वांस मिल्टनसारखी ईश्वराची प्रार्थना करण्यास हरकत नाहीं. "हे ईश्वरा, ज्या त्वां आपल्या खुशीनें व दयेनें बाजूंच्या बेटांसहित हें ब्रितिश सार्वभौम राष्ट्र रचिलें, व वैभवाच्या ह्या अत्युच्च स्थितीस आणिलें, त्या त्वां ह्या सुखाच्या वेळीं आमच्या ठायींच रहावें." पण, हा वर द्यावा अशी ईश्वराची प्रार्थना करून स्वस्थ बसतां कामा नये; तो वर मिळविण्याची योग्यता आपल्या अंगीं आणिली पाहिजे. अतिशय जोमाचा वेग ह्मणजे बाहेरून शांत दिसणारा असतो हें

आपणांस कळलें पाहिजे. " माणसें व त्यांचीं कृत्यें हीं शारीरिक बलानें नियंत्रित होत नाहींत, त्याला नैतिक बल हवें[१]. "

प्रत्येक मनुष्य आपलें कर्तव्य लक्षपूर्वक बजावील असें मानण्यास इंग्लंदास अधिकार आहे. आपली जन्मभूमी आपणांस असें ह्मणते:—"तुझ्याकरितां मीं एवढें करून दिलें. तूं माझ्याकरितां काय केलें आहेस?"

खरोखर गतकालच्या इतिहासाचें सिंहावलोकन केलें, तर आपल्या देशावर जें काम सोंपविलें होतें तें त्यानें शहाणपणानें व उदार मनानें बजाविलें; व लढायांत जय मिळवून राज्य संपादन केलें, ते जय मिळविण्यांत जितकें वैभव होतें तितक्याच वैभवानें तें राज्य चालविलें, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. इंग्रजी भाषा बोलणारांचें एक राष्ट्र होईल असा वेळ कधीं तरी येईल असें मानणें स्वप्नवतच का!

माझ्या देशाचा मी पक्षपात करितों, व त्याचा मला बराच अभिमान आहे, असें कदाचित् लोकांस वाटेल. पण प्रत्यक्ष गोष्टींवरून तें आपोआप बाहेर पडतें. आणखी मॉरिस ह्मणतोः—"ज्या माणसाची प्रीति आपल्या राष्ट्रावर अतिशय असते, त्या माणसाचे इतर राष्ट्रांविषयींचे विचार बहुतेक न्यायाचे असतात." स्वदेशभक्तीच्या योगें पौरजनांच्या कर्तव्यांबद्दलची आपली कल्पना विस्तृत होते, व स्वार्थ व स्वकुटुंबहित इत्यादि क्षुल्लक गोष्टींपलीकडे जाऊन, राष्ट्रजीवनाची खरी महती व वैभव हीं आपणांस कळतात. राष्ट्रमहतीचें खरें वारें वृथा डामडौलाचें नव्हे. आपली भाषा तींतले ग्रंथ ह्यांचा प्रसार करण्यांत, आपले लोक व आपला व्यापार देशोदेशीं व समुद्रांसमुद्रांतून वाढविण्यांत, अभिमान बाळगणें, व आपल्यावर आलेली जी ही जबाबदारी ती ओळखणें, हें खरें राष्ट्रमहतीचें वारें.

---

१ कार्लाइल.

# भाग ११.

## नागरिक लोकांचें कर्तव्य.

आपण ह्या देशाच्या राज्यव्यवस्थेंतला एक अंश आहों‌त; व ही जबाबदारी योग्य रीतीनें बजावण्यासाठीं आपल्या अंगीं योग्यता आणणें हें सर्वांत मोठें कर्तव्य होय. ह्यास अभ्यास, मनन, व त्याचप्रमाणें नुस्ती देशकल्याणाची इच्छा इत्यादींची जरूरी आहे. आपल्या राष्ट्राचा अतिविस्तृतपणा हें एक धोक्याचें कारण आहे. मनुष्यांच्या निरनिराळ्या जातींवर आपण राज्य करितों; त्यांपैकीं कांहींचे आचारविचार, हांवी, इत्यादि आपल्यापेक्षां भिन्न असतात. हिंदुस्थान घ्या ना. तेथील लोकसंख्या इंग्लंदच्या लोकसंख्येपेक्षां दसपट मोठी आहे, व तिचे निरनिराळ्या जाति, व धर्म ह्यामुळें भाग पडले आहेत. खरे हिंदु आपण ज्या जातींतले त्याच जातीचे, ते भाषा बोलतात ती व आपली एकाच भाषेपासून निघालेली आणि रचनेनें सारखी आहे. इतकेंच नव्हे, तर दोन्हींत सारखे शब्द अद्यापि सांपडतात. हिंदुस्थानांतील पुष्कळ शहरांच्या नांवाच्या शेवटीं पुर हा शब्द येतो. तो "बरो" शब्दासारखाच आहे. बरो हा शब्द "पुर" शब्दाप्रमाणें आमच्या भाषेंत वारंवार येतो. पण, हिंदू लोक तेथील लोकसंख्येचा एक अंश आहेत; व ते, दक्षिणेकडील द्रविडीयन लोकांपेक्षां, पूर्वेकडील मॅलोचायनीज लोकांपेक्षां, रक्तमांसानें आह्मांस जवळचे आहेत. कालपरत्वें, व देशपरत्वें, त्यांच्यांत आमच्यांत भिन्नता आली आहे. धर्माच्या बाबतींत त्यांची महमदी धर्माच्या लोकांबरोबर बरीच चुरस आहे. हे लोक राजकर्ते होते; व आह्मीं हिंदुस्थान सोडिलें तर ते कदाचित् पुनः राजे होतील.

हिंदुस्थान आमच्याकडे आहे हें जरी मोठें जोखीम तरी तें एकच जोखीम आमच्यावर आहे असें नव्हे. पृथ्वीवरील इतर मोठमोठ्या राष्ट्रांशीं आमचा व्यवहार असतो. मोठमोठे प्रश्न उद्भवतात; व पुढें देखील उद्भवतील. त्या वेळीं दोन्ही पक्षांनीं शहाणपणा, नेमस्तपणा, क्षमाशीलपणा इत्यादि बाळगले पाहिजेत. कोणत्या ठिकाणीं पड घ्यावयाची, कोणत्या ठिकाणीं हेका चालवावयाचा हें आपल्या मुत्सद्यांस कळलें पाहिजे; व कोणता पक्ष स्वीकारावा हें लोकांस देखील समजलें पाहिजे.

मोठमोठ्या राष्ट्रांची मालिका धुळीस मिळाली असें मानवी जातीच्या इतिहासावरून कळतें. इजिप्त, असीरिया, पर्शिया, रोम हीं वर्चस्वास चढलीं व नाहींतशीं झालीं. आजकाल जिनोवा, व व्हेनिस पुष्कळ अंशीं आरमार, वसाहती व व्यापार ह्यांच्या जोरावर भरभराटीस आलीं. त्याप्रमाणें सध्यां आपलें चाललें आहे. त्यांची जी दशा झाली त्यांतून आपणांस सुटावयाचें असल्यास त्यांनीं केलेले प्रमाद टाळले पाहिजेत. "राष्ट्रें रचावयास हजार वर्षें पुरत नाहींत, तींच मोडावयास क्षण पुरा होतो[१]."

आपल्या बाह्य राज्यधोरणाविषयीं ह्मणाल, तर इतर राष्ट्रांशीं मित्रत्वानें वागणें हें आपलें कर्तव्य आहे इतकेंच नव्हे, तर त्यांत आपला फायदा आहे. दुर्दैवानें राष्ट्रें एकमेकांस शत्रु मानितात. तथापि शुद्ध ज्ञानप्रकाशानें असें दर्शविलें जातें कीं, आपण सर्व माणसें आहोंत, तेव्हां आपणांस एकमेकांशीं मित्रभावानें वागलें पाहिजे. एका वेल्श पाद्र्यानें साध्या पण सहज कळण्याजोग्या रीतीनें हें तत्व उदाहरण सांगून एकदां समजावून दिलें. तो ह्मणालाः—मी एके दिवशीं फिरावयास निघालों;

---

१ बायरन.

समोरच्या टेंकडीवर मीं एक राक्षसी आकृति पाहिली, जवळ येतांच तो माणूस असावासें वाटलें, अगदीं जवळ आल्यावर प्रत्यक्ष आपला भाऊ असें कळलें.

दुसरीं राष्ट्रं माणसें आहेत इतकेंच नव्हे, तर आपले भाऊबंदांपैकीं आहेत, व पुष्कळ रीतीनें त्यांचा व आमचा फायदा एकाच गोष्टींत असतो. त्यांचा तोटा तो आमचा तोटा, त्यांचा नफा, तो आमचा नफा. जगाची आबादानी व शांतता ही ब्रितिश लोकांची आकांक्षा आहे. युद्धानलाच्या तेजानें मनुष्यजातीचे डोळे दिपून गेले आहेत. युद्धांचें महत्व व बडेजावी ह्यांबद्दल बढाया मारिते वेळीं असें सांगतात कीं, सेनानायकाचें चिन्ह प्रत्येक शिपायाच्या पिशवींत असतें इ० इ०. ह्मणून युद्धांमुळें मनुष्यजातीवर अगणित दुःखें कोसळलीं आहेत त्यांची कल्पना आपणांस होत नाहीं. युद्धांच्या योगानें जो रक्तपात होतो व जी विपत्ति भोगावी लागते तिची कल्पनाच करितां येत नाहीं. हाच शिष्टाई चांगली असें ह्मणण्यास अपरिहार्य पुरावा. सध्यास्थिति माणुसकीस काळिमा आणणारी आहे. रानटी माणसें आपलीं भांडणें शस्त्राच्या जोरावर मिटवितात; त्यांस कांहींतरी क्षमा आहे. पण सुधारलेल्या राष्ट्रांनीं असें करावें हें आपल्या नैतिक व व्यावहारिक बुद्धीस नापसंत आहे. सध्यां युरोपांत नेहमींची शांतता राखण्यास ३५ लक्ष शिपायी बाळगावे लागतात. लढाईसाठीं राखलेले लोक १ कोटीवर आहेत, व सध्यां घोळत असलेली व्यवस्था झाल्यास ते २ कोटींवर जातील. ठोकळ वार्षिक खर्च २० कोटी पौंडांवर आहे. परंतु, ज्या अर्थीं युरोपखंडांतील सैन्यांत कायद्यानें फुकट चाकरी करण्यास लागलेले लोक आहेत, त्या अर्थीं खरा खर्च ह्यापेक्षां जास्त धरला पाहिजे. तथापि ३५ लक्ष माणसें जर उपयुक्त

कामाकरितां लाविलीं असतीं, तर त्यांच्या श्रमाचें उत्पन्न, वर्षास प्रत्येकीं ५० पौंड धरल्यास १७ कोटी ५० लक्ष झालें असतें. तें पूर्वींच्या खर्चांत मिळविलें तर यूरोपखंडांतील युद्धखात्यासंबंधीं खर्चाची रक्कम वर्षास ३० कोटी ५० लक्ष होते. नुस्त्या पैशाचा विचार सोडिला तथापि आणखी महत्वाचे गंभीर मुद्दे आहेतच. पण, पैसा माणसाचे श्रम व प्राण मोजण्याचें माप होय. सध्यांच्या आरमाराची व सैन्याची व्यवस्था पाहिली ह्मणजे भावी अनर्थांविषयीं भीति उत्पन्न झाल्याशिवाय राहत नाहीं. तिच्यामुळें युद्धप्रसंग आला नाहीं, तरी दिवाळें फुंकण्याचा येईल.

यूरोपांतील मुख्य मुख्य देश कर्जांत अधिकाधिक बुडूं लागले आहेत. गेल्या वीस वर्षांत इतालीचें कर्ज ४८ कोटी ३० लक्ष होतें तें ५१ कोटी ६० लक्षांवर आलें. आस्त्रेलियाचें ३४ कोटीवरून ५८ कोटींवर आलें. रशियाचें ३४ चें ७५ कोटी झालें. फ्रान्साचें ५० कोटींचें एक अब्ज ३० कोटी. सर्व देशांचीं कर्जें एक केलीं, तर तीं १८७० त ४ अब्ज होतीं. हें कर्ज अगणित व भयंकर असून चुरडून टाकणारें आहे. पण, तें आतां किती वाढलें आहे! तें ६ अब्ज झालें आहे, व सारखें वाढतच आहे.

ह्या अगणित छाती दंग करून टाकणाऱ्या ओझ्याचा बराच भाग मोल येणाऱ्या जिनगींत टाकिलेला नाहीं; किंवा उपयोगाच्या कामीं खर्च केलेला नाहीं; तो अगदीं निव्वळ पाण्यांत टाकिलेला आहे. राष्ट्रांच्या दृष्टीनें तो युद्ध करण्यांत किंवा युद्धाची तयारी करण्यांत उधळलेला आहे. वस्तुतः खरी शांतता आपणांस नाहींच, खरोखर सध्यांचा युद्धकालच आहे. लढाया होत नाहींत व रक्तपात होत नाहीं हें केवळ नशीब. पण अत्यंत क्लेश भोगावे लागतात. आपल्या देशाचें उदाहरण घेतलें तरी राष्ट्रीय उत्पन्नाचा एक तृतीयांश पुढील युद्धांची तयारी करण्या-

कडे जातो; आणखी एक तृतीयांश मागील युद्धांसाठीं ह्मणून द्यावा लागतो; व राज्यकारभार चालविण्याकरितां फक्त एक तृतीयांश रहातो. स्वार्थनाश होईल असल्या गोष्टी अनेक आहेत, आणि राष्ट्रांच्या हिताहितांच्या गोष्टी एकमेकांशीं इतक्या चिकटून आहेत कीं, प्रत्येक युद्ध यादवी माजविण्यासारखें आहे.

कांहीं होवो पण शांतता पाहिजे असें केवळ ह्मणणारा जरी मी माणूस नाहीं, तरी होतां होईल तों शांतता राखा असें सांगणारा मी माणूस आहें, असें कबूल करावयास मला लाज वाटत नाहीं. जिवाशीं येऊन पोंहचणारे कांहीं प्रश्न असतात, ते मध्यस्थींच्या कडे सोंपवितां येत नाहींत. पण, अर्ल रसेल ह्या गोष्टींत अधिकारी माणूस आहे, तो असें ह्मणतोः—जें शस्त्रांचा उपयोग केल्याशिवाय तडजोडीनें मिटवितां आलें नसतें असें एकही युद्ध गेल्या शंभर वर्षांत झालें नाहीं.

मॉ० गँबाटाबरोबर नुक्तेंच बोलणें झालें, तेव्हां तो नेहमींप्रमाणें चेवीस येऊन बोललाः—“सध्यांचा खर्च चालू ठेविला तर असा दिवस येईल कीं, जे वेळीं फ्रेंच लोक आपल्या बराकीपुढें भीक मागत फिरतील.” हा खर्च चालू आहे इतकेंच नव्हे, तर तो वाढत चालला आहे.

यूरोपची स्थिति पाहून भीति वाटल्याशिवाय रहात नाहीं. रशियामध्यें राजघातकी पक्षाचें बंड माजलें आहे; जर्मनींत सोशालिझम (समाजस्वातंत्र्य) माजला आहे; फ्रान्समध्यें बेबंदशाही लोकांचें भय वाढलें आहे, व राष्ट्र दिवाळें फुंकण्याच्या बेतांत आहे. सध्यांच्या बेबंदशाही लोकांच्या गुन्ह्यांस सबब नाहीं, किंवा ते न्याय्य नाहींत. पण, कारणाशिवाय ह्या जगांत कार्य नाहीं. यूरोपखंडांतले मजूरांस थोड्या वेतनावर फार वेळ काम

करावें लागतें. इतालीचे नुक्तेच प्रसिद्ध झालेले खलिते जो वाचील त्याला तेथल्या शेतकऱ्यांची काय दैन्यावस्था झाली आहे हें दिसून येईल. यूरोपांत वेतन थोडें, श्रम फार. फ्रान्सांतील लहान जमीनदारांची स्थितीही फारशी चांगली नाहीं. दिवसा फक्त आठ तास काम करण्याच्या सूचनेस माझी पूर्ण सम्मती आहे. तिगस्तां हाइडपार्कमध्यें जो ठराव कबूल झाला, तो इतर सर्व राष्ट्रांस कबूल झाला पाहिजे. पण, युद्धखात्याची व्यवस्था सध्यांसारखीच राहिली तर कामाच्या तासांत कांहीं कमी होण्याचें शक्य नाहीं. आठ तास काम ठरवितां यावें एतदर्थ युद्धखात्याचा खर्च कमी झाला पाहिजे. आरमार व सैन्य ह्यांचा खर्च चालविण्यास प्रत्येक पुरुषास व प्रत्येक बायकोस दिवसा वाजवीपेक्षां एक तास जास्त काम करावें लागतें. वस्तुतः यूरोपांतला धर्म ख्रिस्ती धर्म नव्हे. युद्धाभिमानी देव शुक्र ह्याची उपासना होय. आपणांस युद्ध बंद करितां येत नाहीं! पण, निदान शांततेच्या बाजूस आपलें वजन पडलें पाहिजे, व परराष्ट्रांबरोबर नेकीनें, मित्रभावानें, सभ्यपणानें, व औदार्यानें वागण्याचा आपण यत्न केला पाहिजे.

पुष्कळ राष्ट्रें मूर्खपणें पैशाची टंचाई पडली ह्मणून युद्ध करितात.

कूपर ह्मणतोः—"जीं राष्ट्रें येरव्हीं पाण्याच्या थेंबाप्रमाणें एक झालीं असतीं, तीं पर्वताची ओळ मध्यें आली ह्मणून शत्रू बनलीं आहेत." पण राष्ट्रांनीं स्वतः होऊन एकमेकांच्या मैत्रींत विरोध आणणारे जे प्रतिबंध करून ठेविले आहेत ते अतिशय वाईट असतात. ह्मणजे करांसंबंधानें, अथवा जकातीसंबंधानें, किंवा ह्यांच्याहीपेक्षां वाईट, कोणत्याही पक्षाच्या मनांत इतराबद्दल वाईट बुद्धि वागत नसतांना ती बळेंच अंगीं लावणें व त्यामुळें जो मत्सर व जें वैमनस्य उत्पन्न होतें त्यासंबंधानें.

राष्ट्रांच्या एकमेकांबरोबरच्या व्यवहारांत जो मत्सर व वैरभाव दिसून येतो तो अंतस्थ राजकीय व्यवहारांतही दिसून येतो. पण, नुसत्या शिव्या देणें हा वादविवाद नव्हे; तसें करणें ह्मणजे आपला पक्ष हीन आहे असें कबूल करण्यासारखें होय. "जेव्हां पक्षांपक्षांतून व राष्ट्रांराष्ट्रांतून युद्धाची धमकी देऊन, अथवा चुकणाऱ्या बंधूंचा सूड उगविण्याची ओरड करून मान खालीं करून घेण्याचें आह्मी बंद करूं, व त्याच्या ऐवजीं माणसें भावंडें आहेत, व त्यांनीं एकमेकांबद्दल पूज्य बुद्धि व प्रेम बाळगावें हा ईश्वरी नियम आह्मी शिकवूं लागूं तो आनंदाचा दिवस खरा."

मोठमोठीं राज्यक्रांतीचीं कामें दरबार भरून व अत्तरगुलाब देऊन होत नसतात. तथापि ह्या जगांतल्या घडामोडींत विशेष महत्वाच्या बऱ्याच गोष्टी शस्त्रांच्या सहाय्यापेक्षां फक्त वादविवादानें झालेल्या जास्त सांपडतील; व ज्या ठिकाणीं शस्त्रांचा उपयोग पडला त्या ठिकाणीं देखील, लेखणीनेंच शस्त्र चालवावयास लाविलें. संगिनीपेक्षां विचारशक्ति जास्त बलवान् आहे.

मिल ह्मणतो—"साधारणपणें मनुष्यजाति उन्नतीच्या पहिल्या पायरींत आहे. तेव्हां ह्या वेळीं सर्व मनुष्यप्राण्याविषयीं आपलेपणाची बुद्धि मनांत वागणें अशक्य आहे. ह्या बुद्धीच्या योगानेंच आयुष्यांत, मनुष्याचा साधारण वर्तनक्रम ठरविण्यांत खरा द्वैतभाव असणें अशक्य होतें. ज्या लोकांत सामाजिक सुखाची इच्छा थोड्या प्रमाणानें तरी जागृत झाली आहे, त्यांस इतर लोक सुखाचीं साधनें मिळविण्याच्या कामांत आपले प्रतिस्पर्धी आहेत व आपला हेतु सिद्धीस जावा ह्मणून त्यांचा नाश झाला पाहिजे, इत्यादि विचार मनांत बाळगणें बरें वाटत नाहीं."

---

१ व्हिटिअर.

नागरिक कर्तव्यें नीट व शहाणपणें बजावितां यावीं ह्मणून कांहीं गोष्टी अवश्य आहेत. त्या बर्कच्या मताप्रमाणें ह्या होत. "आपल्या मनाची उन्नति काळजीनें करावी. आपलया स्वभावांत ज्या उदारपणाच्या व सत्यस्वरूपी भावना असतील त्या पूर्ण वाढीस व जोरास आणाव्या. समाजांत जी वर्तणूक माणुसकीस साजणारी असते, तीच वर्तणूक राज्यकारणीं व लोकसेवेच्या वेळीं असावी; ह्मणजे स्वदेशाभिमान अंगीं बाळगून, सभ्यपणाहि असावा. लोकांत पुढारकी घेतली कीं, हातीं सत्ता येते व त्या वेळीं तरतरी पाहिजे. जो आपल्या कामाची हयगय करितो तो, व जो शत्रूस जाऊन मिळतो तो, हे दोघेही कर्तव्यास मुकतात. आपले हक्क मागण्यापेक्षां आपलें कर्तव्य बजावणें हें चांगलें."

बोलिंगब्रूक "स्वदेशाभिमानाचें वारें" ह्या निबंधांत साक्रेतिसाचें एक मत देतो. तें असें:—"आपल्यास जो धंदा येत नाहीं, तो धंदा, मग अगदीं क्षुल्लक कां असेना, कोणी पत्करीत नाहीं. पण, सर्वांत कठिण जो धंदा राज्य चालविणें तो धंदा चालविण्यास आह्मी पुरेसे योग्य आहोंत असें प्रत्येकास वाटतें." ग्रीस देशाच्या आपल्या अनुभवावरून तो हें ह्मणतो; आज तो इंग्लंदांत रहात असता तरी देखील त्यानें आपलें मत बदललें नसतें.

फार निकडीच्या मोठमोठ्या प्रश्नांचा आपणांस निकाल लावावयाचा आहे. आपल्या मुलांबाळांस शिक्षण देण्याचें काम सुरू आहे. पण, शिक्षणपद्धति अगदीं बरोबर आहे असें कोणास ह्मणतां येणार नाहीं. भांडवलवाले व मजूर ह्यांच्यामधील भांडणांनीं आपला व्यापार बसत चालला आहे. व्यापाराचे पदार्थांस आडकाठी होते आहे; हें सारखें चाललें तर शारीरिक श्रमाची जरूरी कमी होऊन वेतन कमी होत जाईल. आपल्या

मोठमोठ्या शहरांतील आरोग्यस्थिति असावी तशी चांगली नाहीं. शास्त्रविषयांत नुक्ता कोठें प्रवेश झाला आहे.

उन्नतीचा प्रश्न एकीकडेस केला तरी समाज अव्याहत चालण्यास सारखी मेहनत पाहिजे. पार्लमेंतांतलें कामकाज, शहराची अंतस्थ व्यवस्था, अनाथ लोकांच्या व्यवस्थेचा कायदा इत्यादि समाजाच्या कामाकरितां स्वतःच्या कामाइतकीच काळजीनें व्यवस्था करावी लागते, व तीकडे तितकेंच लक्ष पुरवावें लागतें. बहुतेक कामें समाजपंचायतीच्या धोरणानें व्हावीं असा कल दिसत आहे, मग तो बरा असो वा वाईट असो.

पुनः कंगाल लोक आहेतच; पण, धर्मादाय संस्था, गरीब व श्रीमंत ह्यांचें एकमेकांवरलें प्रेम, अनाथ लोकांच्या पोटगीचा कायदा, अनिरुद्ध व्यापार व अगदीं निकृष्ट नाहीं अशी देशाची स्थिति, इत्यादि गोष्टींमुळें, इतर देशांत लोकांचा जसा सोशालिझम (समाजस्वातंत्र्य) व झोटिंग पादशाही ह्यांच्याकडे कल असतो, तसा आमच्या देशांत नाहीं.

कार्योत्साह जग हालवूं शकतो, पण निर्फल होणारे अनुभव घेण्यांत किती वेळ व पैसा मोडतो ह्याचा विचार केला तर वाईट वाटतें. अनुभवाकरितां केलेले जे प्रयोग पूर्वीं वारंवार फुकट गेले व जे, ज्यांच्या सुखाकरितां ते करावयाचे त्यांना सुख देण्याच्या ऐवजीं त्यांचें नुकसान करितात, ह्मणून कुचकामाचे ठरले, अशा प्रयोगांसाठीं किती पैसा व वेळ मोडतो ह्याचा विचार केला तर वाईट वाटतें. गरीब लोकांसाठीं काम करण्यास धर्मबुद्धीची जरूरी आहे; त्याचप्रमाणें विचाराची जरूरी आहे, हें लोक फारसें लक्षांत ठेवीत नाहींत.

त्यांची स्थिति सुधारण्यास मुख्य पैसा पाहिजे असें नाहीं. ह्या विषयावर अधिकारानें बोलण्यास योग्य मिसेस सिवेल ह्मणतेः—

"आपलें शेजार जेवढें गरीब तेवढा त्याला सुख होण्यास थोडा पैसा लागतो. निदान प्रत्यक्ष खर्चण्यास तरी थोडा लागतो. हें प्रथम दर्शनीं असत्याभासाप्रमाणें वाटेल, पण तें खरें आहेसें मला वाटतें." गरीबांबद्दलची कळकळ व ममता ह्यांची पैशापेक्षां जास्त योग्यता आहे. जे लोक आपला वेळ मोडतात ते पैसा देण्यापेक्षां जास्त काम करितात. सारांश, पैसा व कार्योत्साह हीं एकत्र असलीं, व अनुभव आणि काम करण्याची संवय नसली ह्मणजे फायदा होण्याच्या ऐवजीं नुकसान होतें. एखादें काम वाईट रीतीनें केलें, तर तें न केल्यापेक्षां जास्त तोटा होतो.

माणसास पैसा देण्यापेक्षां आशा दाखविणें व धीर देणें हें अधिक चांगलें. दुसऱ्यांचें ओझें आपण व्हाण्यापेक्षां, त्यांचें त्यांना वाहतां यावें व आयुष्यांतील संकटांस मोठ्या धिटाईनें तोंड देतां यावें ह्मणून, त्यांच्यांत धीर व हिंमत आणणें हेंच उत्तम सहाय्य. इतरांस मदत करणें हें सोपें नाहीं. तें करितां येण्यास तीव्र बुद्धि व चांगला सारासारविचार पाहिजे; व अंतःकरण उदार पाहिजे.

विपत्तींतून माणसांस सोडविण्याच्या भरांत, निढळच्या घामानें पैसा मिळविण्याची इच्छा समूळ नाहींशी न करण्याची खबरदारी ठेविली पाहिजे. माणासांकरितां कांहीं करूं लागलों ह्मणजे स्वतः मेहनत करण्याची इच्छा, व लोकांवर पोटासाठीं न पडण्याची भावना दुर्बळ होते. जे लोक इतर लोकांवर अवलंबून रहावयास शिकतात, ते दिवसेंदिवस भोजनभाऊ बनत जातात, ह्मणून होतां होईल तों मनुष्यांला पोटास भाकरी देण्याच्या ऐवजीं त्यांला दोन पैसे मिळवितां येतील अशी तजवीज करणें, व प्रत्यक्ष मदत करण्याच्या ऐवजीं, काम मिळेलसें करणें बरें. आपण माणसांस त्यांची जबाबदारी विसरण्यास लावितों, किंवा ती योग्य रीतीनें बजावण्यास त्यांस मदत करितों हा प्रश्न स्वतःला विचारावा.

ह्या जगाची रचनाच अशी गूढ आहे कीं, आपणांस बऱ्याच गोष्टींसाठीं शेजाऱ्यापाजाऱ्यांवर अवलंबून रहावें लागतें. पण शक्य असेल तितकें स्वतःच्या श्रमांवर अवलंबून रहाण्यास प्रत्येकानें शिकलें पाहिजे.

आपणांस जें उत्तम दिसतें तें लोकांस उत्तम दिसेल अशी आशा करणें फुकट आहे. ह्मणून त्यांच्या मताप्रमाणें जें उत्तम असेल तें साध्य करून घेण्यास त्यांस मदत करावी, व आत्मोन्नतीच्या त्यांच्या यत्नांस हातभार लावावा. लोक आपल्या पाठीची कटकट जावी ह्मणून—खऱ्या कळवळ्यानें नव्हे—अघळपघळ पैसा देतात. असे लोक पैशाचा दुरुपयोग करितात. पण, एकंदरींत स्वजातीसाठीं काम करणें शेवटीं फलदायकच होतें. स्वतःसाठीं जें काम करितों त्यापेक्षां इतरांसाठीं काम करण्यांत जास्त सुख वाटतें; लोकांसाठीं अगदीं थोडें काम केलें तरी तें पूज्य आहे.

काम कितीही हलक्या प्रतीचें असो तें मनापासून करा. सर टी मूर ह्मणतोः—"जें काम पत्करिलें असेल तें स्वसामर्थ्यानुरूप योग्य रीतीनें करा, व त्यांतच आनंद माना. ×××× सहवासानें अंगांत जडलेले दुर्गुण काढण्याचा यत्न करा; तसें होणें शक्य नाहींच. तरी पण ह्याकरितां राज्यकारभार सोडून देऊं नका; वादळाच्या वेळीं वारा ताब्यांत रहात नाहीं, किंवा तो बंद पाडितां येत नाहीं ह्मणून तारूं सोडतां कामा नये. प्रसंगास अनुसरून गोष्ट जितकी शहाणपणानें व चांगली करणें तुमच्या हातीं असेल तितकी करा. व जी सुधारतां येत नाहीं ती अधिक बिघडणार नाहींसें करा; सर्व माणसें चांगलीं झाल्याशिवाय बऱ्याच गोष्टी चांगल्या होणार नाहींत; व मनुष्यजाति चांगली होण्यास बरींच वर्षें लागतील असें मला वाटतें."

पण, जसजशीं माणसें कर्तव्यकर्मास अधिकाधिक जागृत

होतील, तसतशीं तीं सुधारणेच्या जवळजवळ येत जातील. आपण सर्वांनीं सुखी होण्याचा यत्न केला तर किती सुखी होऊं हें आपणांस क्वचितच कळतें.

"सर्वांस बहादुरी मारितां येत नाहीं, अथवा एखादें मोठें धाडसाचें किंवा जें जणूं भीतीस गुंडाळून ठेवितें असें काम करून सर्व जगाला थक्क करून टाकितां येणार नाहीं; पण, प्रामाणिकपणाचीं व उदारपणाचीं कृत्यें करून आपला आयुष्यक्रम भरून टाकितां येईल. उदात्त माणसांनीं करण्याचीं बरींच उदात्त कृत्यें जगांत आहेत."[1]

इंग्रज ह्मणवून घेणें हा एक मोठा हक्क आहे. इतकी स्वतंत्रता व्यक्तिमात्रास कोणत्याही राज्यांत नाहीं. न्यायदृष्टीस सर्व सारखेच आहेत. गुन्हा शाबीत होईपर्यंत प्रत्येक माणूस निरपराधी मानिला जातो. त्याच गुन्ह्यासाठीं दोन वेळ खटला होत नाहीं. चौकशी उघड झाली पाहिजे, व आरोपीस फिर्यादीबरोबर तोंडातोंडी करण्याचा हक्क आहे. स्वतःवर खटला आला असतां स्वतःला निकाल लावितां येत नाहीं. अथवा योग्य अधिकाराशिवाय कोणास शिक्षा करितां येत नाहीं.

तेव्हां, खर्चाकडे किंवा धोक्याकडे न पाहतां, देशाची सेवा करणें हें एक गंभीर कर्तव्य होय. "मरण येणारच, व सद्गुणांची कीर्ति शाश्वत आहे. त्या अर्थीं जो मनुष्य मरणाच्या किंवा संकटांच्या भीतीनें देशसेवा टाळितो, अथवा आपल्या नांवास हीनपणा आणितो, तो जिवंत रहाण्यास योग्य नाहीं."

विचार करून पाहिल्यास, आपल्या देशाची सेवा थोड्याच प्रसंगीं धोक्याची होते. चित्ताची समाधानी व फुरसत हीं कांहीं प्रमाणानें खर्चीं घालावीं लागतात, व कधींकधीं ज्यांत फारशी

१ सी. ए. मेसन.

बहादुरी दिसत नाहीं व जीं त्रासदायकही वाटतात, अशीं कामें करण्याकरितां तीं खर्चावीं लागतात. पण, तीं कामें देखील कमी जरूरीचीं असतात असें नव्हे.

सार्वजनिक कामें—ह्मणजे कमिट्या, मुकत्यारांची निवड, सभा, भाषणें, देवळाच्या व्यवस्थेबद्दलच्या सभा, प्रांतिकसभा इत्यादि गोष्टी मनोरंजनाच्या नव्हत. त्या कल्पनाशक्तीला दिपवून टाकीत नाहींत. त्यांच्यामुळें अंगांत स्फुरण येत नाहीं; पण, लढाईच्या वेळीं जसे शस्त्राघात तशीं शांततेच्या वेळीं मतें. व तीं शांततेच्या वेळचीं व त्यांच्यामुळें रक्तपात होत नाहीं, ह्मणून तीं कमी कार्यसाधक आहेत असें नव्हे. मत देणें हा आपला हक्क असें समजूं नये, तर तें आपलें कर्तव्य असें मानावें. व तें देतां यावें अतएव आपली तयारी करणें हेंही आपलें कर्तव्य.

किती सार्वजनिक काम फुकट होतें हें आश्चर्य करण्याजोगें आहे; आणि तें तसेंच चालावें. व ज्यांनीं ह्या कामास शक्त्यनुसार हातभार लाविला नाहीं, निदान थोडें तरी काम केलें नाहीं,—कारण, सर्वांस सारखी फुरसत सांपडते किंवा सारखे प्रसंग येतात असें नव्हे—त्यांस ह्या सार्वजनिक कामांपासून होणारा फायदा घेण्याचा हक्क नाहीं.

बेकन ह्मणतोः—"स्वतःसाठीं पैसा मिळविणें हा नरदेहास साजणारा मुख्य हेतु असूं शकणार नाहीं." घरेंदारें, अन्नपाणी, कपडालत्ता इतक्याच वस्तु जरूरीच्या नव्हत; किंवा त्या सर्वांत जास्त जरूरीच्या आहेत असेंही नव्हे.

अगदीं संकोचित मनानें व स्वार्थबुद्धीनें विचार केला, तरी जनसेवेमध्यें खर्चिलेला वेळ फुकट गेला असें होत नाहीं. कारण "आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांशीं ममतेनें वागणें, काम करण्याची

इच्छा असणें, मदत करणें, दानधर्म करणें, माणसाच्या हातून चुक्या होणार नाहींत असें करण्याची, त्यांची चित्तवृत्ति गुंग करून टाकणाऱ्या गोष्टींचा उलगडा करण्याची, त्यांच्या विपत्ति कमी करण्याची, व आपणांस ज्या स्थितींत जग आढळलें त्यापेक्षां तें जास्त सुखांत ठेवून मरण्याची इत्यादि इच्छा बाळगणें ह्या सुविचारांस सामाजिक हिताचे विचार असें विशेष ह्मटलें आहे; त्यांपासून इतरांचें हित होतें इतकेंच नव्हे; तर स्वतःचें देखील होतें[1]."

बिशप बटलर ह्मणतोः—"ह्या संसारांत कांहीं सुखें आहेत, तीं सर्वसाधारण असतात; उदाहरणार्थ शांतता, अबादानी, स्वातंत्र्य, आरोग्यदायक ऋतु. पण, आपल्या बांधवांवर उपकार करण्यामुळें सर्वसाधारण सुखाची खरी कल्पना येते. कारण, आपण लोकांवर जितकी प्रीति करितों तितकीं त्यांचीं सुखदुःखें आपलीं होतात. अहंभावामुळें खासगी हिताहिताची कल्पना आपणांस येते, व तें आपलेंसें वाटावयास लागतें. शेजाऱ्यापाजाऱ्यांवर प्रीति केली ह्मणजे त्यांचें हिताहित तेंच आपलें, व त्यांत आपण भागीदार आहोंत असें वाटावयास लागतें. ह्या रीतीनें औदार्यबुद्धि हा आपल्या बांधवांच्या हिताहितांकडे लक्ष पुरविण्यास लावणारा एक वकील आपल्या हृदयांत आहे."

पुढें दिलेल्या मार्क ओरिलिअसच्या उदात्त विचारांप्रमाणें "तुझ्यांत असलेला ईश्वराचा अंश, मर्दपणांत आलेल्या राजकीय कामांत गुंतलेल्या तुझ्या देहाचा रक्षक होवो. तूं जो रोमन, राजकर्ता, आपल्या नेमून दिलेल्या स्थानीं, मर्दाप्रमाणें, खुणेची वाट पहात, कोणाच्या शपथेची अथवा पुराव्याची पर्वा न बाळगतां

१ आर्नल्डचें "शिक्षण व झोटिंग पादशाही."

देह सोडून जाण्यास तयार आहेस, त्या तुझ्या शरीराचा तो ईश्वरी अंश रक्षक होवो."

सार्वजनिक कामांकडे जो वेळ लावितो तो निव्वळ स्वार्थत्याग नव्हे. त्याचें फळ मिळतेंच. "बरें करण्यापासून जें अतिशय सुख होतें तें मिळविण्यास आपण शिकतों.[1]"

"आणीबाणीच्या प्रसंगीं कांहीं प्रमाणानें सार्वजनिक हिताहित तेंच खुद्दाचें हिताहित मानणें ही फार महत्वाची गोष्ट आहे.[2]"

कांहीं लोक त्रास देतात, व कांहीं घेतात. वाटलें तर, प्रत्येकास शूर व स्वदेशाभिमानी होतां येईल; व आपल्या देशबांधवांच्या हिताच्या कोणत्या तरी चळवळीस प्रत्येकास थोडी मदत करितां येईल; व त्यांना अधिक आनंदी, अधिक निरोगी, व अधिक चांगल्या रीतीनें राहण्यास मदत करितां येईल; आणि असें केल्यावरच केव्हांना केव्हां तरी स्वतःस विचारावा लागणाऱ्या पुढील प्रश्नास समर्पक उत्तर तुह्मांस देतां येईल. तो प्रश्न हाः—

"सत्यासाठीं व न्यायासाठीं, माणसांसाठीं व देवासाठीं, तरतरीत तारुण्याच्या सुखाच्या वेळापासून तों आयुष्याच्या उतार वयापर्यंत तुह्मीं काय केलें?"

---

१ गोल्डस्मिथ. २ हार्सफॉल.

# भाग १२.

## समाजांतलें वर्तन.

प्रत्येक इंग्रज माणसाचें घर त्याच्या किल्ल्याप्रमाणें आहे, असा आपला मोठा गर्व असतो, पण तें त्याहीपेक्षां जास्त वाटलें पाहिजे; तें त्याला गृहाप्रमाणें वाटलें पाहिजे. आपलें घर त्याला किल्ल्याप्रमाणें वाटतें तें कायद्यानें दिलेल्या हक्कामुळें; पण तें खऱ्या गृहाप्रमाणें वाटावयास लावणें हें त्याच्यावर अवलंबून आहे.

आतां घर गृहाप्रमाणें कशामुळें वाटतें? एकमेकांवरची प्रीति व ममता, आणि विश्वास ह्यांमुळें. लहानपणच्या आठवणी, आई-बापांचें प्रेम, तरुणपणच्या भरपूर आशा, बहिणीचा भावाबद्दलचा अभिमान, भावाचें बहिणीवरलें प्रेम, परस्परांवरील विश्वास, साधारण आशा, हिताहित व संकटें, इत्यादींच्या योगानें घर गृहाप्रमाणें वाटतें, व त्याबद्दल पूज्यबुद्धि उत्पन्न होते.

जेथें प्रेम ही वस्तु नाहीं तो मग राजवाडा असला तरी देखील गृहाप्रमाणें वाटत नाहीं. खऱ्या गृहाचें जीवित प्रेम होय. "ज्याप्रमाणें आत्म्याशिवाय देह मनुष्य होत नाहीं, त्याप्रमाणें प्रेमाशिवाय घराला गृह ह्मणत नाहींत."

"जो आनंदी स्वभावाचा असतो त्याची नेहमीं दिवाळी असते; ईश्वराची भीति मनांत वागत असली, व जवळ थोडाच पैसा असला तरी चालेल; पण, अतोनात पैसा व तेवढेंच दुःख नको. प्रेमानें घातलेलें वरणभाताचें जेवण बरें; पण कलुषित मनानें दिलेलें मिष्टान्न नको. घरांत शांति असली ह्मणजे ओली कोरडी भाकर पत्करते; पण, तंटेबखेडे चाललेले असून जेथें यज्ञयागादि चाललें आहे असें घर नको.[१]"

---

१ प्राव्हर्ब्स.

मोठ्या माणसांच्या किंवा सरकारच्या जुलुमांपासून आपला बचाव करण्याची जागा ह्मणून सध्यां आह्मांस घराची किंमत नाहीं; तर संसारांतील काळजी व चिंता विसरण्याची जागा एतदर्थ त्याची आह्मांस किंमत वाटते. ह्या भवसागरांतून पर्यटन करीत असतां, आपणास तुफानें लागतील असें माहीत असलें पाहिजे; त्यांतून वांचविणारें हें बंदर होय.

मोठ्या भरभराटीस आलेल्या माणसास देखील असले दुःखाचे प्रसंग येतील; व नुसत्या भरभराटीच्या योगानें सुख व मनाची शांति मिळेल असें नव्हे.

माणूस एकलकोंडे असावें किंवा नेहमीं स्वर्गसुखांत असावें अशी त्याची शरीररचना नाहीं. त्याचें हृदय घरांत गुंतून असलें पाहिजे, पण घराबाहेर कामकाज असणें बरें. नित्य एकांतवासांत किंवा चारचौघांच्या सोबतींत दिवस काढावे अशी ईश्वराची मर्जी दिसत नाहीं. दोन्ही चांगले आहेत; जरूरीचे आहेत असें देखील मी ह्मणेन.

"जो सुंदर बाग मला आवडतो तो अगदीं भरवस्तीच्या जागीं नाहीं, किंवा वस्तीच्या जागेपासून अगदीं दूर नाहीं. प्राणयात्रा किंवा लग्नसमारंभ ह्यांचा सूचक घंटेचा आवाज हीच बातमी कामधंद्यांत गुंतलेल्या त्या शहरांतून आह्मांस ऐकावयास येते. गुरफटून टाकणाऱ्या हिरव्याचार पल्लवीच्या छायेमध्यें बसलें असतां देवळांतील घंटेचा नाद वाऱ्याबरोबर कानावर पडतो. तरी, तें शहर व आमचा बाग ह्यांच्या मध्यें मैलांचे मैल गवतानें आच्छादित मैदानें आहेत. त्यांतून एक रुंद नदी संथपणें वहात जाते. तींत पुष्कळ गलबतें चालतात. व हळू-हळू मारलेल्या वल्ह्यांच्या फटक्यानें पाणी उसळल्यामुळें तींतलीं कमळें हालतात. ती शेवटीं पुलाच्या तीन कमानींखालून जाते.

व त्या पुलाच्या वरल्या अंगास देवळाचीं घुमटें आकाशास लागलेलीं दिसतात.[१]"

सृष्टिसौंदर्य अविनाशी सौख्य देतें; पण, मनांत आनंदाचा प्रकाश असल्याशिवाय आकाशांतील सूर्यप्रकाश कांहीं कामाचा नाहीं.

कुटुंबासंबंधानें प्रेम, ममता व पूज्यबुद्धि वागविणें हें त्यांचें ऋण आपणांस देणें आहे. हाच सुधारणेचा मुख्य पाया; हीच उदात्त गोष्टी शिकविणारी शाळा; आपल्या उदात्त भावना व शुद्धि प्रकृति ह्यांमुळें जागृत होतात. इतरांस सुखी करण्यापलीकडे देवदूतांनीं दुसरें कोणतें काम करावें?

तुमचें घर लहानसें असो, तेथें रसिकता नसो, तेथें तुमच्यावर प्रेम करणारें माणूस नसो, तें तुह्मांस आवडणारें नसो, पण तुमची जागा तेथें, तुमचें कर्तव्य त्या संबंधानें; व कर्तव्यें बजावण्यांत जितक्या जास्त अडचणी तितकें बक्षिस जास्त.

मेहनतीचें काम करण्यापेक्षां त्रास किंवा अन्याय सहन करणें हें अधिक कठीण आहे. तो मूर्तिमंत आत्मत्याग. पैसा देण्यापेक्षां, आपला वेळ खर्चीं घालण्यापेक्षां, अथवा अपार श्रम करण्यापेक्षां तो कठीण होय.

इतरांस दुःख द्यावें असें फार थोड्या लोकांस वाटतें. असे लोक मी लिहितों तें वाचतील असा संभव नाहीं. तथापि निर्दयपणा करण्यापेक्षां बहुतकरून विचार नसल्यामुळें, अथवा काम करून घेण्याचें कसब नसल्यामुळें, पुष्कळ दुःख दिलें जातें हें शक्य आहे. हंसतमुखानें लोकांचें आगतस्वागत करा, व त्यांच्याशीं गोड बोला. जे आपणांस आवडतात त्यांच्यावर मनांत प्रीति करून चालत नाहीं, आपण प्रीति करितों असें त्यांस

---

१ "माळ्याची मुलगी" नांवाचें टेनिसनचें काव्य.

दाखविलें पाहिजे. ज्यांच्यावर आपलें अतिशय प्रेम असतें, व ज्यांस मदत करण्याची आपली फार फार इच्छा असते अशा लोकांस अजाणतेपणानें, अविचारीपणानें अथवा सारासार विचार नसल्यामुळें आपण दुःखवितों.

धीर देणारे दोन शब्द ऐकून किती हिंमत व उत्तेजन येतें, हें सर्वांस माहीत आहेच. चेस्टरफील्ड ह्मणतोः—"इतरांवर प्रेम कसें ठेवावें, व द्वेष कसा करावा ह्या दोन गोष्टींबद्दल लोकांस जेवढी कमी माहिती असेल, तेवढी फार थोड्या गोष्टींबद्दल असते, असें मला इतके दिवस वाटत होतें, व हल्लींही वाटतें. चुकीनें फार लाड करून, डोळेझांक करून, अथवा दुर्गुणांकडे कानाडोळा करून ज्यांच्यावर आपलें प्रेम अशा लोकांचें आपण नुकसान करितों; भलत्याच वेळीं राग दाखवून व आपली द्वेष-बुद्धि प्रगट करून आपण आपला तोटा करून घेतों."

संसारांत मित्र असूनही एकलकोंडे होण्याचा कल असतो. "ज्याप्रमाणें निरनिराळ्या बेटांवर रहात असावें, त्याप्रमाणें ह्या अस्थिपंजराच्या तुरुंगांत व चर्मरूपी पडद्यांत सांपडून आपण एकमेकांपासून भिन्न झालों आहोंत[1]."

आपल्या सोयऱ्याधायऱ्यांस व मित्रांस आपण कितीसे ओ-ळखतों? वारंवार एकाच कुटुंबांतील माणसांचा अर्थाअर्थीं संबंध नसतो; त्यांचीं मनें जणू समांतर रेषेनें जात असतात, व कधीं एकत्र मिळत नाहींत, त्यांचें एकमेकांशीं मतैक्य नसतें.

"आपल्या अगदीं रक्तामांसाच्या अतिशय ममताळू माणसास देखील आपणांस सुख कां झालें व दुःख कां झालें त्याचीं अर्धीं कारणें कळत नाहींत[2]."

---

१ जीन पॉल रिक्टर. २ केबल.

अंतस्थ मनाचें जें खरें राज्य त्याशीं ऐक्यता नाहीं अशा अवांतर गोष्टींविषयीं आपलें बोलणें होतें. उदाहरणार्थः—हवेचे फेरफार, पिकें, नुक्तीच प्रसिद्ध झालेली कादंबरी, शेजाऱ्यापाजाऱ्यांचें दुःखणें, त्यांचीं व्यंगें इ०. वस्तुतः जी गोष्ट जास्त क्षुल्लक किंवा फार कमी महत्वाची तिच्याबद्दल मोठा वादविवाद चाललेला दिसतो; व ज्यांस बोलण्याची योग्यता अगदीं कमी तेच जास्त वेळ बोलतांना दिसतात.

संभाषण करणें ही कला आहे हें थोड्यांच लोकांस कळतें. कुटुंबांत ऐक्य पाहिजे असलें तर फक्त प्रेम व मन शुद्ध असून चालावयाचें नाहीं; एकमेकांबद्दल कळवळा असला पाहिजे; व परस्परांच्या विचारांची अदलाबदल करण्याची युक्ति माहीत असली पाहिजे. जर लोकांपासून तुमची करमणूक होत नसली, तर त्यांची करमणूक तुह्मी करा.

मनांत येतें तें आपण बोलून दाखवितों असा पुष्कळांस गर्व असतो. व प्रत्येकानें सत्य बोलावें व सरळपणानें वागावें ह्यांत संशय नाहीं. पण, संभाषण करणें हें इतर गोष्टींप्रमाणें आहे, त्यापासून करमणूक व्हावी असें वाटत असल्यास आपणांस फार श्रम घेतले पाहिजेत.

घरांत सुख व्हावें ह्मणून प्रत्येकास कांहींनाकांहीं करितां येईल. "मनुष्यजातीस संपत्तीचें भांडार देऊन सुखी करण्याचें, त्यांना शक्ति देऊन भूषविण्याचें, अथवा त्यांचें आरोग्य राखण्याचें आमच्या हातीं नाहीं. पण इतरांचें समाधान करण्याची शक्ति देवानें सर्वांच्या ठायीं दिली आहे. फेडीची आशा न करितां, लोकांच्या बऱ्या बोलण्याची किंवा परलोकीं वाहवाकरून घेण्याची अपेक्षा न करितां, शांतपणें प्रेमाचें काम करण्याची शक्ति सर्वांस दिली आहे[१]."

---

१ ह्याना मूर.

वाईट स्वभावाचा माणूस इतरांस दुःख देण्याच्या ऐवजीं स्वतः दुःख करून घेतो.

"इतरांस नेहमीं त्रास दिल्यामुळें त्यास स्वतःस त्रास होतो; व कोणतीही गोष्ट न आवडणें ह्यांतच त्यास आनंद वाटतो."[1] कधीं मनासारखें न झाल्यामुळें त्याला कधीं सुख होत नाहीं. पण, इतरांस दुःख देण्याचें त्याच्या हातून बरेंच होतें, ह्यांत संशय नाहीं. आजुबाजूच्या मंडळीस सुखी ठेवण्यासाठीं पदरास फारसा खार लावावा लागत नाहीं; पण, नुस्तें मनांत चांगलें वागत असून उपयोग नाहीं. लोकांस सुखी करण्यास चातुर्य अनुभव व अभ्यास हीं लागतात. कोणतेंही काम—मग तें वाईट असो वा बरें असो—चांगल्यारीतीनें करण्यास संवय करावी लागते.

ममताळूपणाच्या व कळकळीच्या वर्तणुकीमुळें वाटेल तें करितां येतें. "चालचलणूकीवरून माणसांची परीक्षा होते" अशी एक जुनी ह्मण आहे. पुष्कळ माणसें आपल्या चालचलणुकीवर तरतात व पुष्कळ मरतात हें खरें आहे. मुख्य प्रधान जेव्हां आपलें मंत्रीमंडळ निवडून काढितो, तेव्हां शहाणपण, वक्तृत्व, अथवा हुशारी, व सद्गुण ह्यांच्याकडे नुस्तें लक्ष देत नाहीं; तर स्वभावाकडेही लक्ष देतो. ह्मणजे इतरांशीं मिळून रहाणारीं माणसें तो निवडून काढितो.

उद्धटपणा ह्मणजे मनःसामर्थ्य नव्हे. आपल्या अंगचा दुर्बळपणा झांकण्याकरितां कधीं कधीं माणसें उद्धटपणा स्वीकारितात. शेक्सपीयर ॲन्टनीच्या तोंडून ब्रूटसविषयीं असें ह्मणवितोः—"त्याचें वर्तन सौम्य होतें व स्वभावांतल्या प्रकृतींचें अशा रीतीनें एकीकरण झालें होतें कीं, सृष्टीनें प्रत्यक्ष प्रगटून हा "खरा माणूस" असें सर्व जगाला सांगावें."

---

१ पोप.

"एकोपा व भिन्नभाव ह्या कल्पना गायन शास्त्रांतल्या सुरैक्यता व बेसूरपणा ह्यापासून निघाल्या असें कधीं कधीं समजतात. पण त्यांत अधिक खोल अर्थ आहे; त्या मनामनाचें तादात्म्य किंवा पृथक्त्व ह्यावरून निघाल्या आहेत[१]."

लोकांच्या चुक्या काढणेंच असल्या, तर निदान गोड शब्दांनीं त्या सांगा. विशेषेंकरून मुलांच्या; कारण, "मुलांचें पाळण्यातलें तें लहानसें जग मोठ्या माणसांच्या ताऱ्यांनीं भरलेल्या आकाशापेक्षां लवकर शून्यवत् होतें[२]." असें सांगतात कीं, रुबेन चित्रकारास ब्रशाच्या एका फेऱ्यानें मुलांचें हंसतमुख रडवें करितां येत असे. संसारांत सर्वांस तसें प्रत्यक्ष करितां येतें; सर्व उदाहरणांत एक शब्द देखील पुरा होतो.

सौम्यपणें बोला, ती लहानच गोष्ट आहे. हृदयरूपी कूपांत टाकिलेली ती अगदीं लहानशी वस्तु आहे; त्यापासून काय निष्पन्न होईल व किती आनंद मिळेल तें शाश्वतीलाच सांगतां येतें[३].

दोष देणें असेल तो खासगी रीतीनें द्यावा, व स्तुति करणें असेल ती सर्वांच्या समक्ष करावी; हा नियम देखील बरा आहे. खासगत रीतीनें सांगितलेलें जास्त खपेल, व बऱ्या बुद्धीनें सांगितलें असें वाटेल; आणि त्यापासून खरोखर पुष्कळ फायदा होईल. तसेंच सर्वांच्या समक्ष स्तुती केल्यामुळें अंगांत जास्त हिंमत येते व ती जास्त किंमतीची वाटावयास लागते.

सर्वांत विशेष, दोष देण्याचें कारण पडल्यास तो गंभीरमुद्रेनें द्या, व त्याबद्दल आपणांस वाईट वाटतें असें दाखवा. साधल्यास रागावूं नका अथवा त्रासलों असें दाखवूं नका. आर्कीयटस आपल्या गुलामास ह्मणतोः—"मी रागावलों नसतों तर तुला शिक्षा

---

१ सर ए. मॅक्सवेलची मेरिडियाना. २ जीन पॉल रिक्टर.
३ लॅंग फोर्ड.

केली असती." रागावलां असल्यास क्षणभर थांबा, व विचार केल्यावर बोला. मॅथ्युआर्नल्ड उच्च शिक्षणसंस्काराचे अंगधर्म असे देतोः—"त्यामुळें आपण रेलचेल गय करितों; परिस्थितीकडे विशेष लक्ष पुरवितों; कर्माची फार कडक तपासणी करितों; पण तें कर्म करणाऱ्या मनुष्यावर दया करितों."

मृत्यु सर्वांस एकाच पदावर आणणार; तर तें पहिल्यानेंच उमजून गृहस्थास शोभेल साजेल अशा सभ्यपणानें इतरांस वागवा.

मित्र रागावला असतां, किंवा त्याच्या मनांत तुमच्याविषयीं वांकडें आलें असतां, होतां होईल तों त्याला सोडून जाऊं नका; तो शेवटचाच रामराम होण्याचा संभव आहे हें लक्षांत ठेवा.

कांहीं शब्द सूर्याच्या किरणांप्रमाणें आल्हादकारक असतात; व कांहीं विषारी बाणांप्रमाणें किंवा सर्पदंशाप्रमाणें असतात. कठोर शब्दांनीं इतके घाय पडतात, तर ममतेच्या शब्दानें किती सुख होईल बरें.

जॉर्ज हर्बर्ट ह्मणतोः—"चांगले शब्द बोलावयास पदरचें द्यावें लागत नाहीं, पण त्यांची किंमत फार असते."

"कारण, शल्यतुल्य उद्गार रोखून उच्चारलेले नसले, तरी बोलणाऱ्याच्या स्वप्नीं नाहींत अशा माणसाला लागू पडतात. व उद्देश नसतां उच्चारलेले शब्द दुःखानें द्विधा झालेल्या हृदयास शांति देतात, अथवा अधिक टोंचतात." नेहमीं तोंडानें बोलून दाखविण्याची जरूरी नसते. जेव्हां पीटरनें ख्रिस्ताचा माझा संबंध नाहीं असें ह्मटलें तेव्हां ख्रिस्तानें पीटरकडे नुस्तें पाहिलें, असें सांगतात. ती दुःखी झालेली व दोष सुचविणारी मुद्रा पुरे झाली. पीटर बाहेर गेला व ढळढळां रडला.

मुद्रेच्या योगानें शल्याप्रमाणें टोंचणारें दुःख होतें हें जसें

खरें आहे, तसें ममताप्रदर्शक मुद्रेमुळें हृदय आनंदानें उचंबळूं लागतें हेंही खरें आहे. फार वेळ एकमेकांस पाहिलें नसलें, ह्मणजे आपलें मनःपूर्वक आगतस्वागत होईल अशी जी आपली खात्री असते तीमुळें आपला जीव कसा तुटत असतो? सकाळीं जेव्हां गांठ पडते, तेव्हां आनंद व हास्यभरित मुद्रा पाहून अतिशय दुःखाचा दिवस देखील जड वाटत नाहीं.

आंतल्या गांठीचे होऊं नका. आपली ममता दर्शविण्यास भिऊं नका. बाहेरून ममता दिसत नाहीं तर आंतली प्रीति पुरेशी नाहीं. प्रत्यक्ष मदत करण्यापेक्षां नुस्ती सहृदयता दाखविल्यामुळें माणसास बरीच मदत होते. नुस्त्या पैशापेक्षां प्रीति जास्त आहे. बक्षिसापेक्षां नुस्त्या ममतेच्या शब्दानें जास्त आनंद होतो.

तूं चितारी कसा झालास असें जेव्हां बेन्जामिन वेस्टला विचारिलें, तेव्हां "माझ्या आईच्या चुंबनानें" असें तो ह्मणाला. कन्फ्यूझस ह्मणतो—"घरचीं कर्तव्यें बरोबर केलीं, तर यज्ञयाग करण्यासाठीं दूर ( तीर्थावर ) जावयास कशास हवें?"

मित्रांची निवड फार काळजीनें करा. "मित्र ह्मणजे संसाराची फार किंमतीची व सुंदर सामुग्री होय"[१] जॉर्ज हर्बर्ट ह्मणतो—"चांगल्या लोकांच्या संगतींत असा, ह्मणजे तुह्मी त्यांच्यापैकीं व्हाल." स्पॅनिश भाषेंतली एक ह्मण आहे—"कोणांबरोबर तूं असतोस तें सांग, ह्मणजे तूं कोण आहेस तें मी सांगतों." जो स्वतःशीं चांगल्या रीतीनें वागत नाहीं तो दुसऱ्याशीं वागणार नाहीं.

"उत्तम माणसांशीं मैत्री हा सर्वांत उदात्त गुण होय. त्या-

---

१ सिसरो.

च्यायोगानें आपलीं सर्व सुखें दुप्पट होतात, व दुःखें निम्मे होतात[१]."

स्त्री जातीचे मित्र चांगल्यारीतीनें निवडून काढणें हेंही तितक्याच महत्वाचें आहे. सालोमनच्या वेळेपासून पुष्कळ शहाणीं माणसें स्त्रियांच्या मोहपाशानें फसलीं आहेत. "त्यांचीं मनें मोठीं पण सुंदर मूर्तिपूजक स्त्रियांनीं पाशांत गुंतून घेतल्यामुळें तीं दुष्ट मूर्तीपुढें नत झालीं[२]." "मैत्री हा नरदेहाचा अलंकार" असें लिली ह्मणतो. मित्ररहित माणसांची कींव येते; कारण, मुख्यत्वें-करून तो आपल्याच अपराधांमुळें तसा रहातो.

"मनुष्यास माहीत नसतां त्याच्याशीं सहृदयता असणारें एक देखील माणूस ज्याला नाहीं, इतका कठोरपणा दैवानें कोणाशींहीं केला नाहीं. व इतका एकलकोंडा मनुष्यही जगांत नाहीं[३]."

केवल दुःखानें ह्मणतो त्याप्रमाणें, आपण एकलकोंडें असावें, व आपला कोणाशीं संसर्ग नसावा हें जरूरीचें नाहीं. तो ह्मणतो–"आपले जीवात्मे बैराग्याप्रमाणें आपापल्या सुखदुःखाच्या गुप्त चक्रांतच इतरांपासून निराळे भ्रमत असतात. सभोंवारची वस्तुस्थिति अंतस्थ स्थितीप्रमाणें, आपल्या डोळ्यांस उदासीन किंवा उल्लासित वाटते. व तिच्यावर आपल्या हृदयाची प्रत्येक नवी झांक मारते."

तरी मर्जी असल्यास एकटें रहाण्यास मधून मधून अवकाश असावा हें चांगलें. कारण, आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांस आपण कांहीं वेळ सोडिलें नाहीं, तर त्यांवरचें आपलें प्रेम रहाणें कठीण पडेल.

आपणांस लोकांवर रुसून बसण्यास कारणें आहेत, असें वा-

---

१ डेनहम. २ मिल्टन. ३ मिल्टन.

टणें बहुतेक ठरींव आहे. असें झाल्यास वृत्ति शांत ठेवा, व विचारानें वागा. आपल्या मित्रांच्या दृष्टीनें त्या तपासून पहा. घाईनें कांहीं करूं नका. सृष्टिनियमांत घाई नसते. "अतिघाई तेथें फार थोडी त्वरा" अशी जुनी ह्मण आहे. विशेष एवढें, विचार न करितां कोणांबरोबर भांडूं नका. बराच विचार करा; कांहीं वेळ थांबा. रात्रीं कांहीं गोष्टीमुळें डोकें संतापतें, पण त्याच दुसरे दिवशीं सकाळीं निराळ्या वाटूं लागतात.

खुबीदार, शेवटचें, पण मर्मभेदक पत्र लिहिलें असलें तर तें दुसऱ्या दिवसापर्यंत पाठवूं नका; मग बहुतकरून तें तसेंच राहील; पोस्टांत पडणारच नाहीं. सर्वांत उत्तम मित्र निवडून काढा; मुळींच मित्र नसण्यापेक्षां खराब मित्र असणें अधिक वाईट. "खलांच्या मार्गानें जाऊं नका; त्या मार्गाचा अव्हेर करा, त्याच्या वाऱ्यास जाऊं नका; मागें फिरा; दूर पळा. कारण, कांहींना कांहीं वाईट केल्याशिवाय ते निजत नाहींत; व कोणांसही खड्ड्यांत उतरविल्याशिवाय त्यांना नीज येत नाहीं. पापाचरण करून व अन्याय करून ते अन्नपाणी मिळवितात. परंतु सत्यप्रिय लोकांचा मार्ग चकाकणाऱ्या प्रकाशाप्रमाणें आहे; तो दिवसेंदिवस पूर्ण सूर्याप्रमाणें प्रकाशत जातो. खलांशीं व मूर्खांशीं मैत्री करणें चुकीचें आहे; तथापि त्यांच्याशीं शुत्रुत्व करणें हें शहाणपणाचें नाहीं; कारण खल असंख्य आहेत."

लॅंब मार्मिकपणानें ह्मणतोः—"जवळ असतात ते नकोसे होतात व नसतात ते हवे असतात." परंतु माया, धीरता, व सहृदयता ह्यामुळें अधिक फायदा होतो.

आपणांस देतां येईल तेवढें घेण्याचा मित्रांचा अधिकार आहे; पण, पैसे उसनवारीनें मागण्याचा त्यांस अधिकार नाहीं. "मित्रांस पैसे देऊंही नकोस व त्यांच्याकडून घेऊंही नकोस" असें

शेक्सपीयर ह्मणतो. कारण, "मित्रामित्रांत देवघेवीचा प्रकार झाला कीं, मित्रही नाहींसा होतो व पैसाही जातो." व वारंवार उसनवारीनें पैसा काढिल्यामुळें काटकसर मंदावत जाते." आणखी, सालोमन ह्मणतो—"जो परक्यासाठीं जामीन रहातो त्याला पदरचें द्यावें लागतें. पण जो जामिनीचा तिटकारा करितो त्याचे पैसे सुरक्षित रहातात."

मित्र तुमचें संकटांपासून रक्षण करितात व पुष्कळ दुःखें निवारितात. जेव्हां ऑगस्टसच्या मुलीनें ह्मणजे जुलियानें त्याच्या नावांस काळिमा आणिला तेव्हां तो ह्मणालाः—"मॅासेनास किंवा ॲग्रिपा जिवंत असता तर हें झालें नसतें."

चांगले मित्र मिळाल्यावर त्यांस बाळगून ठेवा. "मैत्रीची पारख केल्यावर जे मित्र रहातील, ते आपल्या हृदयाशीं जणू लोखंडाच्या सांखळीनें बांधून ठेवा." त्यांना नाखूष होण्यास थोडें देखील कारण देऊं नका.

मृत्यूनें जरी विभक्त झालों तरी स्वर्गात एकत्र भेटण्याची आशा असतेच. "प्रत्येक वर्षी जेव्हां मित्र एकामागून एक दृष्टी आड होत जातात, तेव्हां स्वर्गामध्यें आपल्या मित्रमंडळीचा समुदाय किती वाढत चालला आहे ह्याचें विश्वासानें मनन केल्यामुळें, मित्रांच्या मरणाच्या योगानें होणारा तोटा भरून निघत नाहीं, तथापि मनास आल्हाद होतो."

आयुष्यांतील अतिमहत्वाची गोष्ट ह्मणजे विवाह होय. अनुराग सृष्टपदार्थांस मोहकता आणितो; सृष्टपदार्थांत अनुरागच अनुराग दिसतो. त्यामुळें मृण्मय घुल्याचा आकाशांत भ्रमण करणारा पतंग बनतो; वसंतऋतूंत पक्ष्यांचे पिच्छ अनेक रंगांनीं खुलूं लागतात; काजव्याचा विद्युद्दीप चमकूं लागतो; पक्ष्यांत गायनबुद्धि जागृत होते; व काव्यांत प्रासादिक रसमाधुर्य येतें.

अचेतन सृष्टपदार्थांवरही तीच मोहिनी पडलेली दिसते. व पुष्पवर्ग सतेज रंगांनीं गजबजलेला दिसतो.

सायमोनायडीझ ह्मणतोः—"चांगली बायको असणें ह्यासारखें दुसरें सुख नाहीं; व अवदशा बायको असण्यासारखी यमयातना नाहीं."[1]

भरपावसाच्या दिवशीं पाण्याची सारखी धार लागलेली असणें, व कजाग बायको असणें ह्या गोष्टी सम आहेत. घराच्या कान्याच्या एका कोपऱ्यांत रहाणें बरें, पण राजवाड्यांत भांडखोर बायकोबरोबर रहाणें नको[2].

बायकोची निवड करण्याच्या बाबतींत घेण्यासारखा उपदेश करणें सोपें काम नाहीं; तथापि कांहीं गोष्टी अवश्य विचार करण्याजोग्या आहेत. अगदीं लवकर लग्न करणें बरें नाहीं. "अगदीं लहानपणीं नवराबायकोचें लग्न झालें ह्मणजे वाटाण्याच्या लहानशा एका रोप्यास आधार ह्मणून जवळ दुसरा रोपा लावण्यासारखें आहे" असें सर एच् टेलर ह्मणतो. पैशाकरितां लग्न करूं नका, पण जवळ पैसा असल्याशिवाय लग्न करूं नका. "जे पैशाकरितां लग्न करितात ते त्यापेक्षां आपली योग्यता कमी करितात. कारण, संसारांतलें सुख व तृप्ति ह्यापेक्षां ते पैसा जास्त मौल्यवान् समजतात. आपलीं दुःखें व पैसा ह्यांची तुलना करून पाहिल्यावर जें आयुष्य पैशाकरितां विकलें तें सर्व पैसा खर्चीं घालून परत घेण्यास माणसें किती आनंदानें तयार होतील[3]!"

"लग्न केल्यावर मागचाच आयुष्यक्रम आपणांस ठेवितां येईल; मात्र एक सुंदर, साधें, आनंदी, मोकळ्यामनाचें माणूस आपल्या आयुष्याचें बाह्यांग ह्मणून सांपडेल; एकटे बसण्याचा आणि आवश्यक कामाचा त्रास आला ह्मणजे करमणूक करील;

---

१ प्राव्हर्ब्स. २ प्राव्हर्ब्स. ३ जेरेमी टेलर मॅरेज रिंग.

व जरूर नसेल तेव्हां जवळ येणार नाहीं; अशी कल्पना मनांत आणूं नका. हें केवळ मनोराज्य; आनंदांत घालविलेल्या तारुण्यांतलीं हीं स्वप्नें[1]."

जेरेमी टेलर ह्मणतोः—"पतीच्या कर्तव्यकर्मास होमर गोड नावें देतो. तूं तिचा बाप, आई, भाऊ, सर्व कांहीं तूंच; व तसें असण्यास चांगलें कारण आहे. नाहींतर लग्न करणें ह्मणजे पोरकेपण घेण्यासारखें होईल. कारण, जी आपली आई, आपला बाप, आपले भाऊबंद तुझ्यासाठीं सोडून देते, तिला ह्या सर्वांचें प्रेम व तुझें प्रेम तुझ्या ठिकाणीं सांपडलें पाहिजे; नाहींतर ती पोरक्याप्रमाणें दीन होईल[2]."

ह्याबद्दल संशय असल्यास लग्न करूंच नका. लग्नानंतरची स्थिति अतिशय आनंदाची अथवा अतिशय दुःखाची होते. लग्न करणें हें जबाबदारीचें काम आहे. नुसत्या रूपाला भुलूं नये, अथवा त्याच्यावर फारसा विश्वास ठेवूं नये. "लग्न करणें ह्मणजे नुसतें तोंड पाहून हातांत हात घालणें नव्हे; विचारानें हृदयाची हृदयाशीं ऐक्यता करणें होय."

चांगली बायको फक्त व्यावहारिक बाबतींत उपयोगीं पडते असें नव्हे, तर मानसिक बाबतींतही उपयोगीं पडते. शेक्सपियर ह्मणतोः—"वाईट माणसांची एकाद्या बाईवर प्रीति जडली ह्मणजे त्याच्या मनांत सहाजिक असणें शक्य असेल त्यापेक्षां जास्त उदात्तपणा येतो." खलांच्या मनांत जर सत्कृत्यांविषयीं एवढी प्रेरणा होते, तर ज्यांचा स्वभाव मुळचाच उदात्त त्यांच्या मनांत किती होईल?

"कांहीं माणसें अशीं आहेत कीं, तीं ह्या जगाच्या पलीकडे

---

१ सर एच्यू टेलर नोटस फ्रॉम लाईफ. २ मॅरेज रिंग.

रहातातशीं दिसतात. त्यांच्या सर्व आशा तृप्त झाल्यामुळें व एकमेकांवर प्रेम असल्यामुळें जेंथे जेथें तीं जातात तेथें तेथें त्यांच्या पायांत मोहिनी भरलेली दिसते[१]."

जेरेमी टेलर ह्मणतो:—"लग्न ही संस्था ईश्वरप्रणीत आहे. त्यामुळें झालेली ऐक्यता पवित्र आहे; त्यांचें अंतस्थ गुह्य कारणही पवित्र आहे; लग्न हा शब्द प्रतिष्ठितपणाचा आहे; त्याचा उपयोग धार्मिक संस्कार असाच करितात. लग्न समाजास हितावह आहे, व ईश्वरदृष्टया पवित्रपणाचें आहे[२]."

टरटूलियन ह्मणतो:—"लग्नानंतर जर सुख झालें तर त्याचें वर्णन करण्यास शब्द कसे सांपडावे? दंपत्य जोडीनें ईश्वरभक्ति करितें, प्रार्थना करितें, एकत्र उपवास करितें, अडचणींच्या वेळीं संकटांच्या वेळीं खाण्यापिण्याच्या वेळीं एकमेकांस सोबत असतें. परस्पर परस्परांपासून गुप्त ठेवित नाहीं, परस्पर परस्परांस ओझ्यासारखें वाटत नाहींत; अशी स्थिति पाहिली ह्मणजे ख्रिस्तास आनंद वाटतो; अशांस तो आपली शांति पाठवितो; जेथें दोन माणसें अशा रीतीनें एकत्र झालेलीं असतात त्या ठिकाणीं त्याचें वास्तव्य असतें; व ज्या ठिकाणीं ईश्वराचें वास्तव्य त्या ठिकाणीं सैतानाचें नसतें."

लग्नविधींतील पवित्र व सुंदर वाक्याप्रमाणें "बऱ्यासाठीं व वाईटासाठीं, गरीबी असो व श्रीमंती असो, दुःखण्यापाण्याच्या वेळीं अथवा आरोग्याच्या वेळीं मृत्यु तुटातुट करीपर्यंत प्रीति करण्याकरितां व आपली मानण्याकरितां आपण स्त्रीबरोबर लग्न लावितों.[३]"

स्टॅन्ली ह्मणतो–"चांगली बायको मिळाली ह्मणजे आयुष्याचा नवा आरंभ झाला. सौख्य व उपयुक्तता ह्यास नवीन अंकुर फु-

---

१ केवल. २ मेरेज रिंग. ३ धर्मेचार्थेच कामेच नातिचरामि ।

टला. मागील आयुष्यक्रमांतल्या चुक्या, मूर्खपणा, अपराध ह्यांस शेवटच्या रामराम ठोकण्याची ही मोठी संधि असते. भावी आयुष्य आपल्यापुढें पसरलेलें असतें, त्यांत वरचढ करण्यास नवीन आशा, नवीन शक्ति, व नवीन धैर्य मिळतें. गृहसुख स्वर्गसुखासारखें आहे. घरांत नवराबायको, आईबाप, बहीणभावंडे, मुलेंबाळें, एकमेकांस आपापल्या रीतीनें निरनिराळ्या कामधंद्यांत मदत करितात; असली मदत दुसऱ्या कोणासही करितां यावयाची नाहीं; कारण, इतरांस तसल्या संधि व एकमेकाची स्वभाव ओळख नसते. जीं आपल्या रक्तमांसाचीं त्याचें कल्याण, कीर्ति, सुस्वभाव, व चांगुलपणा ह्यांबद्दल जशी आपणांस कळकळ असते, तशी दुसऱ्या कोणासही नसते. त्यांस सुख झालें ह्मणजे आपणांस सुख होतें. त्यांस दुःख झालें ह्मणजे आपणांस वाईट वाटतें. त्यांच्या आपमतलबी वर्तनामुळें, किंवा गयाळपणामुळें अथवा नुस्त्या प्रापंचिक गोष्टीकडील लक्षामुळें आपणांस अधमपणा येतो. त्यांचें शुद्ध वर्तन, औदार्य, व दृढ निश्चय ह्यामुळें आपण उदात्त होतों, आपणांस कर्तव्यकर्माची आठवण होते; व स्वर्ग आणि ईश्वर यांच्याकडे लक्ष जातें."

शेवटीं मुलें असणें हें मोठें जोखीम आहे तरी त्यांत सुख आहे. "एक चांगली आई शंभर मास्तरांच्या योग्यतेची असते" असें जी. हर्बर्ट ह्मणतो. देवानें दिलीं असें मुलांविषयीं कधीं कधीं ह्मणतात; व उधळपट्टी करणारीं आईबापें, "देव जन्म देतो तेव्हां खाण्यास देण्याची तजवीज करीलच" असें ह्मणून आपल्यावरली जबाबदारी उडवून टाकितात. परंतु मॅथ्यू आरनल्ड ह्मणतो तें वाजवी आहे कीं, ज्यांना मुलांस योग्य रीतीनें ह्मणजे साधारण स्थितींत, अगदींच चिंचभात खाऊं न घालतां, पाळितां येत नाहीं त्यांना मुलें जन्मास आणण्याचा अधिकार नाहीं.

मुलांस प्रेमरूपी सूर्यप्रकाशांत वाढवा. लहानपणीं जर प्रकृति उल्हासित करणारें दृढप्रेम मिळण्यापुरतें त्याचें नशीब असलें, तर त्यांना ह्या जगांतलें दुःख अधिक चांगल्या रीतीनें सहन करितां येईल.

प्रेमसांठ्याची खूण जीं प्रियकर मुलें त्यांच्याबरोबर बोबड्या शब्दांनीं बोलतेवेळीं मन रंजविणाऱ्या किती बोलांनीं हृदय उचंबळूं लागतें, हें जो मनुष्य आपल्या मुलांवर प्रीति करितो त्यालाच सांगतां येईल. ज्यांना मुलांच्या संगतींत बरें वाटतें त्यांच्या मनांत, तो पोरकटपणा, तें अडखळत बोलणें, त्यांचा थोडा वेळ रहाणारा राग, त्यांचें अज्ञान, त्यांचीं व्यंगें त्यांच्या जरूरी, इत्यादि गोष्टी आनंद व सुख ह्यांचे अंकुर उत्पन्न करितात. पण ज्याचें आपल्या बायकोवर व मुलांवर प्रेम नाहीं, तो घरांत सिंहीण पोसतो व दुःखाचीं अंडीं उबवितो. ईश्वरप्रसाद त्याला सुखकारक होत नाहीं. अतएव आपल्या बायकोवर प्रीति करा अशी जी ईश्वराची आज्ञा आहे ती आनंदास जरूर असणारी एक उत्पादक गोष्ट होयं.

---

१ टेलर.

# भाग १३.

## उद्योग.

कोणतीही गोष्ट व्यर्थ घालवूं नका. कांहीं करा पण वेळ फुकट दवडूं नका. आजचा दिवस एकदांच येतो. पुनः येत नाहीं, वेळ ही देवाची अमोल देणगी आहे. ती एकदां गेली ह्मणजे पुनः येत नाहीं.

देवाला देखील गेल्या काळावर सत्ता चालवितां येत नाहीं. कारण जें झालें तें झालें. आणि गेला संधि येऊन गेला.

पुढें पश्चात्ताप करावा लागेल अशा रीतीनें सध्यां वेळ दवडूं नका. "फार वेळ झाला" किंवा "असें झालें असतें तर बरें झालें असतें," ह्या विचारांपेक्षां जास्त दुःखकारक दुसरे विचार नाहींत. वेळ हा ठेवीसारखा आहे, व मिनटामिनिटाचा तुह्मांला हिशेब द्यावा लागेल. "नीज थोडी घ्या, अन्न थोडें खा व सर्वांत विशेष वेळाची काटकसर फार करा."[1]

नेलसन एकदां ह्मणाला—"मला जें यश येत गेलें त्याचें कारण ह्मणजे कार्यवेळेपूर्वीं अर्धा तास तयार असणें हें होय."

लार्ड मेल्बोर्न ह्मणतो—"तरुणाच्या कानीं ह्याशिवाय दुसरे शब्द पडूं नयेत; ह्या जगांत योग्यतेस चढणें तुमचें काम आहे; व अन्न मिळणें किंवा न मिळणें स्वतःच्या श्रमावर अवलंबून असतें."

आणखी यश येण्यास उद्योग जरूर आहे इतकेंच नाहीं, तर त्यामुळें नैतिकवर्तनावर चांगला संस्कार उत्पन्न होतो.

---

१ ड्रायडन.

जेरेमी टेलर ह्मणतो—“आळशी होऊं नका. फुरसुतीचा प्रत्येक भाग उपयोगी व एकाग्रता करणाऱ्या कामांत घालवा. कारण आत्मा व्यवसायमग्न नसतो व शरीर स्वस्थ असतें तेव्हां कामविकार होतो. रिकामटेकड्या, धष्टपुष्ट व स्वस्थचित्ताच्या माणसाला मोहपाश पडल्यास शुद्ध रहातां येणार नाहीं. पण सर्व व्यवसायांपेक्षां शारारिक श्रम मनांतलें सैतानाचें वारें काढून टाकण्यास अतिशय उपयोगी व फायदेशीर आहेत.”

“पृथ्वी व वेळ हीं स्वर्गप्राप्तीचीं व शाश्वतीचीं साधनें होत. ज्याप्रकारें क्षणाक्षणाचा आपण उपयोग करितों त्याप्रकारें देव आपल्या पुढील युगांचा उपयोग करील.” असें केबलचें ह्मणणें आहे. इतरांस अधिक सुखी व आनंदी करण्यास थोडा तरी हातभार लावणें ही मनुष्याच्या मनांत स्फुरण पावणाऱ्या वासनांपैकीं व आशांपैकीं उच्चतम व मनाला उदात्त करणारी वासना व आशा.

बर्फाचा पुतळा बनविण्यास पीट्रो मेडीचीनें एकदां मायकेल ॲन्जेलोला नेमिलें होतें. हा मौल्यवान् वेळाचा दुरुपयोग होय. पण जसा मायकेल ॲन्जेलोचा वेळ मौल्यवान् होता तसा आपला वेळ आपल्याला आहे; तरी बर्फाचे पुतळे करण्यासारख्या अथवा त्याहून वाईट शेणमातीच्या मूर्ती करण्यासारख्या क्षुल्लक कामांत आपण आपला वेळ घालवितों.

रोमन लोकांचा मोठा तत्ववेत्ता व मुत्सद्दी सेनेका ह्मणतो—“वेळ थोडा आहे अशी आपण नेहमीं कुरकूर करितों तरी उपयोग कसा करावा हें आपणास कळत नाहीं इतका वेळ आपणांस असतो. मुळींच काम न करण्यांत, अथवा अप्रासंगिक गोष्टी करण्यांत, किंवा जें कर्तव्य आहे तें न करण्यांत, आपलें सर्व आयुष्य जातें. दिवस थोडे राहिले अशी आपण नेहमीं बडबड करितों. पण जणूं काय दिवस अनंत आहेत असें आपलें वर्तन असतें.”

वेळाची काटकसर करून किती काम करितां येतें तें आश्चर्यकारक आहे. इराणच्या राजाच्या खुर्चीच्या मागें तिष्ठत उभा असतांना नेहेमियाला दयारूप जो सिंहासनस्थ ईश्वर त्याचा धांवा करितां आला व तो सफल झाला.

आपला वेळ कितीही शहाणपणानें व चांगल्या रीतीनें भरून काढिला, तरी पुष्कळ भाग्यवान् माणसांच्याही बऱ्याच गोष्टी करावयाच्या रहातील, पुष्कळ वाचनार्ह ग्रंथ वाचण्याचे रहातील, पुष्कळ प्रेक्षणीय वस्तु व अनेक देश पाहण्याचे रहातील.

ह्या संसारांत सुख होण्याचें व यश मिळण्याचें मोठें तत्व—मुख्य ह्मटलें तरी चालेल—ह्मणजे प्रामाणिकपणानें उपयोगीं पडेल असें काम करण्याची शक्ति अंगीं असणें हें होय. सिसेरो ह्मणे जें अवश्य पाहिजे तें धारिष्ट. कार्यारंभीं धारिष्ट हवें, कार्य चालू असतां धारिष्ट हवें, कार्याच्या शेवटीं धारिष्ट हवें. काम करूं असा विश्वास अंगीं असणें उपयोगी आहे. पण सर्व ठिकाणीं जें अंगीं पाहिजे तें, नेटानें उद्योग करणें होय, असें ह्मणणें विशेष सयुक्तिक दिसतें. ज्याप्रमाणें संसाराचें पर्यवसान खेळण्यांत नाहीं त्याप्रमाणें उद्योगांतही नाहीं. दोन्हीं एकाच परिणामाकडे नेणारीं साधनें होत.

मनाच्या शांतीस ज्याप्रमाणें काम करणें जरूर आहे त्याचप्रमाणें शरीरसंपत्तीस जरूर आहे. चिंतेंत घालविलेला एक दिवस काम करण्यांत घालविलेल्या आठ दिवसांपेक्षां जास्त थकवा आणितो. चिंतेनें शरीराची अंतस्थ स्थिति बिघडते, कामानें ती निरोगी व व्यवस्थित रहाते. स्नायूंस व्यायाम झाला ह्मणजे शरीर निरोगी रहातें, व मेंदूस व्यायाम झाला ह्मणजे मन शांत होतें. मानसिक श्रमामुळें अंतःकरण स्थिर होतें[1].

---

१ जानकोर्ट.

कांहीं तरी काम करा, मग तें कोणतेंही असो. परिस शोधून काढण्याच्या व वर्तुळाचा चतुष्कोण करण्याच्या श्रमापासूनहीं कांहीं निष्पन्न झालें आहे.

डॉ० जान्सन् ह्मणतो–"वाणी पृथ्वीची मुलगी व कृत्यें हे स्वर्गाचे मुलगे. तुह्मी जें कांहीं कराल तें पूर्ण मेहनतीनें करा. त्यांत तुमचें मन असूं द्या. तुमच्या सर्व शक्ती संशोधित करा. एक तर त्याचा उपयोग करा नाहीं तर त्या हरविण्यास तयार व्हा. झेझिकियाबद्दल सांगतात कीं आरंभलेल्या कार्यांत तो मन घाली, आणि ह्मणून त्याला यश येई[१]."

"बुद्धिकुशाग्रतेबद्दल बोलायचें ह्मणजे, संकटांना न जुमानतां एकसारखा यत्न करणें इतकेंच कायतें बोलतां येईल. बुद्धिकुशाग्रता अंगीं असलेलीं नामांकित माणसें देखिल असें आपणांस खात्रीपूर्वक सांगतात कीं, बुद्धिकुशाग्रता ह्मणजे अव्याहत श्रमापेक्षां निराळी चीज नव्हे. जॉर्ज इलियटसारखी बाई प्रेरणेनें आपलीं पुस्तकें आपण लिहिलीं ह्या कल्पनेला हंसते. येल येथील मुलांस प्रेसिडंट ड्वाईट सांगत असे कीं, बुद्धिकुशाग्रता ह्मणजे यत्न करण्याची शक्ति[२]."

भिक्षा मागणें हें, काम करण्यापेक्षां अधिक गहन आहे. व एकूण पाहिलें तर कामानें जेवढे पैसे मिळतात तेवढे त्यांत पैसेही मिळत नाहींत. तशांत प्रत्येकानें आपल्या श्रमावर अवलंबून रहाण्यास शिकावें. फ्रॅन्कलिन ह्मणे स्वतः काम करणारा एकादा कुणबी लोकांच्या विनवण्या करणाऱ्या श्रीमंत गृहस्थापेक्षां बरा.

कॉबेट आपल्या प्रसिद्ध इंग्रजी व्याकरणाविषयीं बोलतांना असें सांगतो–"रोज सहा पेन्स पगारावर शिपायाचें काम करीत असतां मी व्याकरण शिकलों. माझ्या खाटेची कडा, अथवा

१ क्रॉनिकल्स. २ गार्नेट.

पाहरेकऱ्याचा बिछाना, ही माझी वाचण्याची जागा. माझी पडशी माझें पुस्तकाचें कपाट. माझ्या मांडीवर घेतलेला एकादा लांकडाचा तुकडा माझें लिहिण्याचें टेबल. आणि त्या कामाला माझ्या आयुष्यापैकीं एक वर्ष लागलें नाहीं. मेणबत्त्या व तेल विकत घेण्यास मजजवळ पैसा नव्हता. हिंवाळ्याच्या दिवसांत संध्याकाळीं मला उजेड क्वचित् सांपडे; शेगटीचा उजेड सांपडे, पण तो देखिल माझ्या पाळीच्या वेळीं; शाई, पेनें, कागद इ० वस्तु घेण्यांत जो पैसा मी खर्ची तो तुह्मी क्षुल्लक मानूं नका. तो पैसा मला मोठ्या दौलतीप्रमाणें होता. मी आतां आहें तितकाच उंच होतों, माझी शरीरप्रकृति चांगली होती, व मी व्यायाम पुष्कळ करीत असें. बाजाराचा खर्च करण्यास जो पैसा सरत नसे तो प्रत्येकीं आठवड्यास दोन पेन्स पडे. मला पक्कें आठवतें, एकदां अगदीं जरूरीचा खर्च केल्यावर एका शुक्रवारीं मी अर्धा पेन्स मोठ्या कष्टानें राखून ठेविला; व त्याचे लालहेरिंग मासे उद्यां घ्यावयाचे असें ठरविलें. रात्रीं जेव्हां कपडे काढिले तेव्हां मला इतकी भूक लागली होती कीं, मला जीव नकोसा झाला होता; अशा वेळीं माझा अर्धा पेन्स हरवला असें मला कळलें.

"त्या घाणेरड्या पासोडीमध्यें व घोंगडीमध्यें मीं डोकें खुपसलें व एकाद्या पोरासारखा रडलों. तेव्हां मी पुनः पुनः सांगतों कीं इतक्या अडचणींतून मी ह्या कठीण कामास तोंड दिलें व तें तडीस नेलें; तर काम तडीस गेलें नाहीं त्याबद्दल सबबी सांगणारा तरुण मनुष्य ह्या जगांत आहे काय किंवा असेल तरी काय?"

कॉबेटजवळ पैसा नव्हता पण धैर्य व हिंमत होती. बेकन ह्मणतो—"पुष्कळ लोकांना आपली शक्ति किंवा आपली संपत्ति बरोबर उमगत नसते. पैशापासून वाजवीपेक्षां फाजील फायदा होण्याची लोक आशा करितात. व शक्तीपासून होणारा फायदा

मुळींच मनांत आणित नाहींत. स्वावलंबन व आत्मसंयमन हे गुण स्वतःवर अवलंबून रहाण्यास, निढळच्या घामानें रोटी मिळविण्यास, आपली पोटगी कशी मिळवावी हें कळण्यास, श्रम करण्यास, व आपल्या जवळ वापरण्यासाठीं दिलेल्या वस्तूंचा मोठ्या काळजीनें उपयोग करण्यास शिकवितील."

प्राग्देशीयाची एक ह्मण आहे, "चांगल्या श्रमाचें सार्थक होतें. कामाची टाळाटाळी करणाऱ्या सिंहापेक्षां मेहनत करणारा कुत्रा बरा."

सृष्टिदेवता माणसास ह्मणते—"प्रत्येक तासास काम करीत अस, मग पैसा मिळो वा न मिळो. काम करण्याची खबरदारी ठेव, ह्मणजे त्याचा मोबदला मिळाल्याशिवाय रहात नाहीं. तुझें काम नाजूक असो किंवा काबाडकष्टाचें असो, धान्य पेरण्याचें असो अथवा महाकाव्य लिहिण्याचें असो, तें प्रामाणिकपणानें केलें व आपल्या खात्रीचें उतरलें ह्मणजे त्यापासून आपल्या इंद्रियांना व मनाला सुख होतें. त्यांत किती वेळां जरी अपयश आलें, तरी यश येणें हें मनुष्यजातीस साहजिक आहे. चांगल्या रीतीनें बजावलेल्या गोष्टीचें बक्षिस ह्मणजे ती बनावणें हेंच होयें."

सर वॉल्टर स्कॉटनें आपणास सांगितलें आहे कीं मोठा जादूगीर जो मायकेल स्कॉट, त्याला आपल्या तैनातींत असलेल्या भूतांच्या त्रासांतून फक्त सतत उद्योगांत मग्न होऊनच सुटतां येतें, असें आढळून आलें. हीच गोष्ट आह्मांला लागू आहे. माणसाच्या शरीरांतून हांकून लाविलेलें सैतानाचें वारें जेव्हां देहरूपी गृह मोकळें सांपडलें, तेव्हां आणखी सात पिशाचांसहवर्तमान शिरलें.

आळस ही विश्रांति नव्हे. कामापेक्षां त्यामुळें जास्त त्रास होतो. रोमन लोकांची एक ह्मण होती—

---

१ एमर्सन.

कांहीं व्यवसाय नसतां विश्रांति मिळणें कठिण असतें.

कधीं घाई करूं नका. सृष्टिनियमांत घाई नसते. नवशिक्या पर्वतांवर चढणाऱ्या माणसाला स्विस वाटाड्या पहिली सूचना ही देतो व तीच तो पुनः पुनः सांगतो: माणसानें हळू पण नेटानें चढावें, जलद चालूं नये अथवा रेंगाळतही जाऊं नये. मधून मधून विश्रांती घ्यावी, कारण मस्त घोड्यालाही देखिल विश्रांति हवीच; व ज्याला आपण फर्लांग ह्मणतों त्याचा अर्थ जेवढी जमीन नांगरल्यावर बैलाला विश्रांति हवी तेवढी जागा होय. परंतु संसारांत देखील नांवारूपास येण्यास अधीर न होणें व फुकट वेळ न दवडणें हाच मोठा नियम होय. अधीरता सैतानानें उत्पन्न केली, पण सहनशीलता सुखाचें द्वार उघडणारी आहे. घाई करून वेळ वांचवितां येतो, असें पुष्कळ लोकांना वाटतेंसें दिसतें, पण ही मोठी चुकी आहे; चपळाईनें काम करणें हें बरें, पण एकादी गोष्ट नीट रीतीनें करणें हें, ती लवकर संपवून टाकण्यापेक्षां अधिक महत्वाचें आहे.

तशांत कामाविषयीं ह्मणाल तर तें अनियमितपणानें ह्मणजे आज केलें उद्यां नाहीं असें घाईघाईनें केलें, तर तें अधिक कटाळवाणें व अधिक मेहनतीचें होतें. तसें हळूहळू एकसारखें व नियमितपणानें घाई केल्याशिवाय काम केलें ह्मणजे होत नाहीं. घाई केली ह्मणजे काम खराब होतें इतकेंच नव्हे, तर आयुष्य फुकट जातें.

घाई केल्याशिवाय काम करा, व अविरत काम करा हा गएथीचा नियम होता.

"घाई करूं नका, अविचाराच्या कृत्यानें मनाच्या तरतरीला मंदावून घेऊं नका. नीट विचार करा. खरें तें निवडून काढा व नंतर नेटानें पुढें चला व आपलें सामर्थ्य ओळखा. घाई करूं

नका. अविचाराच्या एका कृत्याबद्दल देखील सर्व आयुष्याचें प्रायश्चित्त पुरें होत नाहीं."

विश्रांति घेऊं नका; आयुष्य क्षणिक आहे. मृत्यु येण्यापूर्वीं दोन हात दाखवा; कांहीं तरी मोठें व वैभवाचें काम काळास जिंकण्याकरितां ( आपलें स्मरण रहावें ह्मणून ) मागें ठेवा. हा नाशवंत देह नाहींसा झाल्यावर ह्या जगांत ( आपलें स्मरण ) रहाणें वैभवकारक आहे[१].

काम करा, पण घाईनें करूं नका, किंवा फारसा बभ्रा करूं नका व त्याच्याबद्दल फिकिरींत राहूं नका.

फ्रांसिस गॅल्टन ह्मणतो—"आपला प्रवास किती झाला ह्याबद्दलच चौकशी ठेवा, पण प्रवासाचा शेवट केव्हां होतो त्याबद्दल आतुर होऊं नका. सुधारलेल्या राष्ट्रांत परत आलों ह्मणजे आपल्या दगदगीचा शेवट झाला, व संकटांतून मुक्त होण्यास आसऱ्याचें ठिकाण मिळालें, असें मानण्याच्या ऐवजीं त्यांत आपणांस थोडें वाईट वाटलें पाहिजे; व एक सुखाचा, साहसी आयुष्यक्रम संपला असें मनांत वागलें पाहिजे. ह्या रीतीनें जीव कमी धोक्यांत घालून तुह्मी तेव्हांच पुढें जाल, वाटेंत तुह्मांला जागोजागीं ओळख करून ठेवतां येईल; देशाचें सामर्थ्य कितपत आहे हें तुह्मांला कळेल, व त्यामुळें जर घाईघाईनें परतावें लागलें किंवा पळ काढावा लागला तर अमोल उपयोग होईल. ह्या रीतीनें कांहीं महिने गेल्यावर केंवढें अंतर आपण तोडलें हें पाहून तुमचें तुह्मांला आश्चर्य वाटेल. तुह्मीं रोज सरासरी तीन मैल चालण्याचा क्रम ठेविला, तर वर्षाच्या शेवटीं १००० मैल चालून जाल. ह्मणजे तुमच्या हातून बराच भाग शोधल्याचें होईल. अफाट

---

१ गयेथी.

व अनोळखी प्रदेशांतून प्रवास करणाऱ्या लोकांकरितांच 'ससा आणि कांसव' ही गोष्ट सांगितलेली दिसते."

लवकर उठा; स्नायूंस व मेंदूला पुरेसा व्यायाम व विश्रांति मिळूं द्या; खाण्यापिण्यांत बेताबातानें वागा; पुरेशी झोंप घ्या; मनाला गोष्टी लागणार नाहींत अशी खबरदारी ठेवा; मग कामापासून तुह्मांला कोणतीही इजा होणार नाहीं, अशी खात्री आहे. दगदग, संताप, अधीरता, आतुरता ह्यांच्या योगानें काम जास्त जलद होणार नाहीं, व त्यामुळें कदाचित् अंतीं तुह्मांला मरण येईल; नाहींतर एकाद्या रोगाच्या भक्ष्यस्थानीं पडावें लागेल. परंतु ह्या संसारांत आनंदवृत्तीनें रहाल, मन शांत ठेवाल, तर मेंदूचें काम व मोकळ्या मनानें विचार करणें, ह्या दोन गोष्टी, ज्याप्रमाणें, शरीराला व्यायाम व मोकळी हवा, त्याप्रमाणें, मनाला होतील; त्यांच्या योगानें तुमचें आयुष्य कमी न होतां उलटें वाढेल.

सततची मेहनत माणसाचा स्वाभिमान जागृत ठेविते. कसें बसें काम संपविणें ह्मणजे, गंजलेलें चिलखत जुन्या चालीरीतीचें स्मारक ह्मणून नव्हे, तर फक्त त्यांचा उपहास करण्याकरितां टांगून ठेवण्याप्रमाणें आहे.

"अविश्रांत श्रम हेंच मुत्सद्यांचें डोकें, हीच वीरांची समशेर, शोधकांचें इंगित, व विद्वान् लोकांचा विद्यादेवीचीं लाविलेलीं कवाडें उघडणारा मंत्र." आमच्या परमपूज्य कैलासवासी महाराणी इतिहासांत आलेल्या राजांमध्यें उत्तम गणल्या जातात. व त्याचें कारण काय? त्यांना सारासार विचार होता, अक्कल होती, हें खरें; पण त्याचें मुख्य कारण ह्मणजे कितीहि श्रम असोत ते करण्याचें त्यांनीं नाकारलें नव्हतें. ज्या बुद्धीनें त्यांनीं श्रम केले

१ शेक्सपीयर. २ ब्रेन लिव्हिंग अंड हाय थिंकिंग.

तिचें, जॅमेसम बाईनें लिहिलेल्या चरित्रांत उतारा दिलेल्या लॉर्ड मॉन्टीगलसमोर प्रदर्शित केलेल्या उद्गारांवरून, दिग्दर्शन होतें.

"कांहीं कामास्तव आपणांस निरुपायानें तसदी द्यावी लागते" अशा अर्थाचे कांहीं उद्गार जेव्हां लार्ड मॉन्टीगलनें काढिले, तेव्हां त्या ह्मणाल्या—"तसदी हा शब्द माझ्या पुढें उच्चारूं नका. एकादी गोष्ट कशी करावयाची व ती चांगल्या रीतीनें कशी करितां येईल, तें मला सांगा मात्र, ह्मणजे मला करितां आल्यास मी ती करीन."

तर मग ह्या जगांत तुमचा कोणताही धंदा असो व कोणतेंही कर्तव्य असो, तें जेवढें चांगलें करितां येईल तेवढें करण्याचा यत्न करा. ड्यूक ऑफ् वेलिंग्टनला जे जय मिळाले ते तो मोठा दक्ष सेनानायक होता ह्मणून मिळाले, तसेंच तो कामकाजांत दक्ष होता ह्मणून मिळाले. दाणागोटा व बाजारबुणग्यांची व्यवस्था ह्यांबद्दलच्या बारीकसारीक गोष्टींकडे तो बारकाईनें लक्ष देई. त्याच्या घोड्यांना दाणा वगैरे पुरेसा असे, त्याच्या शिपायांना गरम कपडे, चांगले बांधलेले जोडे, व चांगलें अन्न असे.

सॉलोमन ह्मणतोः—"आपल्या कामकाजांत दक्ष असा मनुष्य तुझ्या माहितींतला असल्यास तो खरोखर कधीं तरी राजसन्मानास पात्र ठरेल." व सेंट पॉल देखिल आह्मांला असेंच सांगतो—"कामकाजांत आळस करूं नका. मनांत भक्ति ठेवा, आणि ईश्वराची सेवा करा."

उद्योग नेहमीं फळ देतोच; हिंदुस्थानास पश्चिमेकडून जाण्याचा रस्ता शोधतांना कोलंबसास अमेरिका सांपडली. आपल्या बापाचीं गाढवें शोधतांना सॉलला राज्य मिळालें, असें गयेथीनें सांगितलें आहे.

फ्रँक्लीन ह्मणे—"जें कर्तव्य आहे तें करण्याचा निश्चय करा. व जें करण्याचें ठरविलें असेल तें कराच करा."

बुद्धिकुशाग्रता मेहनतीच्या ऐवजीं उपयोगीं पडते असें कधीं कधीं लोक समजतात. ज्यांनीं कॉलेजमध्यें असतांना पहिलीं वर्षें खेळण्यांत घालविलीं, व शेवटला थोडा वेळ शेंडीला दोरी बांधून सडकून अभ्यास केला, व मोठ्या मानानें परीक्षा पास झाले, अशा लोकांचे वृत्तांत आपण वाचतों. परंतु पक्कें समजा, शेंडीला दोरी बांधून अभ्यास केल्याबद्दल त्यांना जब्बर प्रायश्चित्त भोगावें लागलें. तें कसेंही असो पण त्यांना शेवटीं मेहनत करावी लागलीच. बऱ्याच मोठमोठे लोकांस हुशारीपेक्षां उद्योगामुळें यश आलें आहे असें, त्यांच्या शाळेंतल्या अभ्यासक्रमावरून ठरविल्यास, ह्मणावें लागेल. वेलिंग्टन, नेपोलियन, क्लाईव्ह, स्कॉट, शेरिडन, हे शाळेंत असतांना निर्बुद्ध होते असें ह्मणतात. कांहीं माणसांस इतरांपेक्षां जास्त बुद्धि असते हें खरें आहे. परंतु दोघां माणसांस एके वेळीं ह्या संसारांत शिरूं द्या. एकाच्या अंगीं तीव्रबुद्धि असून आळस, निष्काळजी, मनसोक्त वर्तन असूं द्या, व दुसऱ्याचे अंगीं मंदपणा असून, उद्योग, काळजी व सत्यानुरूप वर्तन असूं द्या. तो दुसरा मनुष्य कांहीं वेळानें आपल्या अधिक हुशार प्रतिस्पर्ध्याला मागें टाकील. सारांश पाहूं गेलों असतां, नुस्ता उद्योगी माणूस, मग तो बुद्धिवान् का नसेना, बुद्धिवान् उद्योगास कंटाळणाऱ्या माणसांपेक्षां जास्त काम करील. उद्योग व सद्वर्तन ह्या दोन गोष्टींची उणीव, आयुष्यांतील फायद्याच्या गोष्टी, हुशारी, श्रीमंत व बलाढ्य मित्र आणि पुरस्कर्ते ह्यांच्या योगानें भरून निघणार नाहीं.

ग्रॉसेटस्ट हा लंडन शहराचा बिशप व मोठा मुत्सद्दी होता. त्याला एक आळशी भाऊ होता. तो एकदां त्याच्या जवळ आला

व मला मोठा माणूस कर असें सांगूं लागला. तेव्हां बिशप ह्मणाला—"भाऊ तुझा नांगर मोडला असल्यास नीट करण्याला पैसे लागतील ते देतों, तुझे बैल मेले असले तर दुसरे विकत घेऊन देतों; पण मला तुला मोठें करितां येत नाहीं. तूं माझ्या मतें नुस्ता धनगर ठरलास; तूं धनगरच रहाणार."

मिल्टनला बुद्धिकुशाग्रता होती इतकेंच नव्हे, तर त्याचा उद्योगही अजिंक्य होता. तो आपल्या संवयींबद्दल असें लिहितो. "हिंवाळ्यामध्यें माणसास काम करण्यास किंवा प्रार्थना करण्यास जागृत करणारी कोणत्याही देवळांतली घांट होण्यापूर्वीं मी उठें. उन्हाळ्यांत, जे पक्षी लवकर उठतात, त्यांच्या बरोबर अथवा अंमळ त्यांच्या नंतर मी उठें. व मन जागृत होईपर्यंत किंवा स्मरणशक्तीला सोसे इतकें ज्ञान मिळेपर्यंत मी चांगल्या चांगल्या ग्रंथकारांचे ग्रंथ वाचीत असें, किंवा कोणाला वाचायला सांगत असें. नतंर निवांतपणीं व मोठ्या प्रमाणानें शारीरिक श्रम करून शरीराचें आरोग्य व धडधाकटपणा राखीं; अशाकरितां कीं आपला देश व धर्म ह्यांच्या साठीं काम करण्यांत शरीरानें मनाला सतत एकसारखी फारशी दगदग न पडतां मदत करावी."

आपलें काम ह्मणजे ज्यांत गोडी नाहीं असें एक कर्तव्य असें मानूं नका; वाटल्यास तें गोड करून घेतां येईल. सर्व मन लावून तें करा, त्याची महती (अर्थ) काय ती समजावून घ्या. त्याचीं कारणें व पूर्वीचा इतिहास शोधून काढा. सर्व दृष्टींनीं त्याचा विचार करा. आपल्या अलपस्वल्प श्रमाचा कितीजणांस उपयोग होईल त्याचा विचार करा, व ज्या कर्तव्यास ह्मणजे आपलें तन मन धन अर्पण करितां येत नाहीं असें कर्तव्यच बहुधा सांपडावयाचें नाहीं. तुह्मांला आपलें काम आवडूं लागेल व आनंदानें काम करूं लागलांत ह्मणजे तें सोपें वाटेल. तें जरी

आरंभीं अशक्य वाटलें, शुद्ध ह्मारकीप्रमाणें वाटूं लागलें, तरी तुह्मांला पहिल्यानें पाहिजे तेंच तें असेल; पर्वतावरील शुद्ध हवे-प्रमाणें तुमच्या सद्वर्तनाला बळकटी आणणारें तें असेल. आपले स्कॅन्देनेव्हियामधले पूर्वज घण धारण करणाऱ्या थॉरला पूजित असत. नार्स भाषेंतल्या एका कथेंतही व्हॉलन्डनें उत्तम लोहार बनण्याकरितां आपला आत्मा सैतानाला विकला असें सांगतात. येथें कदाचित् व्हॉलंद थोडासा बहकला.

निजेस किती वेळ द्यावा हा खरोखर मोठा प्रश्नच आहे. प्र-त्येकाच्या शरीरप्रकृतीला मानेल तसें ठरविलें पाहिजे. कांहीं लोकांना इतरांपेक्षां जास्त नीज हवी असते. प्रकृतीला हवी अ-सते, ती कमी करणें अशक्य आहे; व गाढ निद्रेंत घालविलेला वेळ फुकट गेला असें ह्मणतां येत नाहीं. नीज मोठ्या आश्चर्यका-रक रीतीनें स्नायूंना पुनः कुवत आणिते. व ही कुवत शहरांत रहाणाऱ्या लोकांच्या अंगांत फारच थोडी असते. सर ई कोकनें दिवसाचे असे भाग केले होतेः—

"सहा तास निजेंत घालवा, कायद्याच्या गहन अभ्यासांत सहा घालवा, देवकार्यास चार लावा. बाकीचे सृष्टिसौंदर्याचा अभ्यास करण्याकडे लावा."

सर डब्ल्यू. जोन्सनें त्यावर पुढील सुधारणा केलीः—" सहा तास कायद्याकडे लावा, मन ताजेंतवानें करणाऱ्या निजेसाठीं सात खर्चा, व्यवहाराकडे दहा तास लावा; व इतकें करूनही सर्व तास कृष्णार्पण करा. सहा सात तास माझ्या निजेला पुरे होणार नाहींत. इतकी नीज घ्यावी कीं, तिच्या योगानें कामकाज कर-ण्यापुरती अंगांत पुनः हुशारी येईल, व शरीर ईर्षेशिवाय रहाणार नाहीं." दुःखाच्या वेळीं ज्या व्यवसायाच्या योगानें, आपल्या

विचारांचा ओघ बदलतो, त्यांपासून बरेंच समाधान वाटतें. "ह्या संसारांतलें सुख ह्मणजे कांहीं काम करावयास असणें, प्रीतीची वस्तु असणें, व भावी आशा असणें हें होय.[१]" खरोखर बरेच लोक फुरसुतीच्या वेळीं, रिकामी काळजी वाहून, किंवा फुकाच्या चिंता लावून घेऊन, स्वतःला यातना देतात. नेहमीं मन गुंतवून ठेवा.

"ह्मणजे दुःखांमुळें जी शांति मिळणें अशक्य असते ती कामकाजांत आणि विचारांत तुह्मांला सांपडेलें."

ह्मातारा लिली ह्मणतो—"शहाण्या माणसाला जो देश त्यानें पाहिला तो स्वतःच्या देशाप्रमाणें वाटतो, व शांत माणसाल कोणतीही जागा राजवाड्याप्रमाणें वाटते."

तरी पण, सृष्टिक्रमाला अनुसरून उद्योग करीत असा; त्याच्या विरुद्ध जाऊं नका. होतां होईल तों प्रवाहाविरुद्ध गलबत चालविण्यास लागूं नका. पण तसें करावेंच लागलें तर करा; मग मात्र माघार घेऊं नका. पण, आपण सृष्टिनियमांस पुरेसा वेळ दिला, तर ते आपल्यासाठीं काम करितात. "ज्याप्रमाणें सृष्टीच्या पलीकडील ईश्वरी नियमास लागून कांहीं वर्तनक्रम आहेत, त्याप्रमाणेंच सृष्टिनियमांसही लागून कांहीं आहेत. ह्मणून जो सृष्टीचा एक नियम मोडतो त्याच्या माथीं सर्व नियम मोडल्याचें दूषण येतें. जणूं सर्व सृष्टि त्याच्या बरोबर लढण्यास तयार होते; व दृश्य व अदृश्य अशीं दोन्हीं सैन्यें बरोबर घेऊन त्याबद्दल त्याचें पारिपत्य करण्यास ती तयार होते. आणि त्याच्या मागून त्याच्या मुलाचें पारिपत्य करण्यास तयार होते. मग तें पारिपत्य ती केव्हां करते, कोणत्या ठिकाणीं करिते तें त्याला कळत नाहीं. उलटपक्षीं अगदीं मनापासून सृष्टिनिय-

---

१ डॉ० चालमर्स. २ स्टर्लिंग.

मानुरूप जो वागतो, त्याला सृष्टींतील पदार्थ आपल्या बऱ्यासाठीं काम करीत आहेत असें आढळतें. बाह्य सृष्टीशीं त्याचें बरें असतें, सूर्यनारायण जो आपल्या मस्तकावर प्रकाशतो, व धूलिकण जे आपल्या पायांखालीं तुडविले जातात, ते त्याचे मदतनीस व मित्र होतात. कारण ज्यानें सूर्य, धूलिकण व इतर पदार्थ निर्माण केले, व ज्यानें त्या पदार्थांना अगदीं बाहेर जातां येत नाहीं अशा रीतीनें नियमबद्ध करून ठेविलें त्याच्या मानसाप्रमाणें व इच्छेप्रमाणें तो वागतो."

---

१ किंग्स्ले.

# भाग १४.

## श्रद्धा.

देशस्थितिविषयक पुस्तकांत असें सांगितलें आहे कीं, एक अब्ज ५० कोटी मनुष्यसंख्येपैकीं, ४० कोटी लोक बुद्ध धर्माचे आहेत; ३५ कोटी लोक ख्रिस्ती आहेत; २० कोटी हिंदु व १५ कोटी मुसलमान आहेत. परंतु सेल्डननें असें ह्मटलें आहे,— जरी तो फार पलीकडे जातो तरी तें सत्याच्या जवळजवळ येतेंच,:—"तंटेभांडणें मोडण्याकरितां बरेच लोक आपण एकाच धर्माचे आहोंत असें ह्मणत असतात. पण जर विशेष बारकाईनें शोध केला तर सर्व मुद्यांविषयीं एकच धर्ममत कबूल करणारे तीन लोक देखील कोठेंही क्वचितच सांपडतील[१]." व असें व्हावें ह्यांत आश्चर्य नाहीं. कारण, खरें पाहिलें असतां ह्या जगाबद्दल देखील आपणास इतकी थोडी माहिती असते, तेव्हां दुसऱ्या जगाविषयीं विशेष माहिती असावी असें मानावयासच नको.

लिडन पाद्री ह्मणतो:—"ह्या आश्चर्यकारक जगांत आपल्या जीविताची ही पायरी आपण चढत आहोंत—मग श्रद्धेमुळें स्वर्ग माणसाच्या डोळ्यांपुढें खेळो वा न खेळो. हें जग पुष्कळ भव्य गूढांचें एक आलय आहे. उद्यां कदाचित् तुह्मी गांवांत सहल करावयास जाल; क्वचित् ठिकाणीं उकलणाऱ्या कळ्या अथवा उघडणाऱ्या पानांचा तो हिरवाचार रंग, हीं पाहून तुह्मांला लागलेंच स्मरण होईल कीं, वसंतऋतु आपल्या वार्षिक विजयो-

१ टेबलटॉक.

त्सवाचा सुंदर देखावा तुमच्या समोर दाखवीत आहे. जी शक्ति तुह्माला दिसत नाहीं, जिला स्पर्श करितां येत नाहीं, अथवा जिची व्याख्या करितां येत नाहीं, जिचें माप करितां येत नाहीं, जी उमगत नाहीं, अशा त्या गूढ ईश्वरी शक्तीचें अस्तित्व व कार्यें ह्यांचीं द्योतकें सभोंवार दृष्टीस पडतात. ह्या शक्तीला वाणी नाहीं, तिचा आवाज होत नाहीं, ती दिसत नाहीं, तरी तींत चैतन्य आहे; वर दिसणाऱ्या प्रत्येक फांदींत, पायाजवळ जमिनीवर उगवणाऱ्या प्रत्येक गवताच्या पातींत तें चैतन्य दिसतें."

संशय खरोखर सर्व तत्वज्ञानाचा पाया होय. आह्मी गूढांनीं भरलेल्या जगांत रहातों. व साधें पुष्प कसें व्हावें, व एकादा अति क्षुद्र जंतु कसा निर्माण व्हावा हें आह्मांला सांगता येत नाहीं; मग अनंत स्वरूपी जो ईश्वर तो आह्माला कसा उमगावा? डॉ. मार्टिनो ह्मणतोः—"आकाश व निःशब्दत्व हे आपण ईश्वराचे गुण मानितों, संध्याकाळीं दंव पडूं लागलें, ह्मणजे जणूं काय त्यामुळें दिवसाची चिंतारूपी धूळ दडपून जाते, व अगदीं बारीकसारीक चिंतेमुळें डोक्यास विशेष त्रास झालेला असतो, त्याच्या ऐवजीं विस्तृत ध्यान सुरू होतें; तारकागणांनीं अंकित झालेल्या अनंत आकाशाखालीं ही धरणी एकाद्या वाळवंटाप्रमाणें निद्रित दिसते. अवर्णनीय ईश्वरी अस्तित्वाची भावना आह्मांला गुंग करून टाकिते. रात्रीं वारा सोसाट्यानें वाहत असतां, दचकून आह्माला त्याच्या सांनिध्याची आठवण होते; आकाशाचे जे फार प्राचीन दीप त्यांच्या प्रकाशांतून तो आमच्याकडे नीट टवकारून पाहत आहेसें वाटतें."

जॉन स्टुअर्ट मिल ह्मणतोः—"मानवी जीवित हें गूढांनीं व्याप्त आहे. आपला अनुभव हा अफाट समुद्रांतील बेटाप्रमाणें

आहे. ह्या अफाट समुद्र आपली मति गुंग करून टाकितो, व मोठेपणामुळें, आणि अस्पष्टपणामुळें आपल्या कल्पनाशक्तीला प्रोत्साहन देतो. आणि हें गुह्य विशेष गूढ वाटतें तें असें– ह्या जगांतलें आपलें जीवित अनंत आकाशसमुद्रांत बेटाप्रमाणें आहे, इतकेंच नाहीं तर ह्या अनादि अनंत कालसमुद्रांत देखील लहान बेटाप्रमाणें आहे.[१]"

परंतु, वारंवार आपणांला अज्ञानांत राहावें लागतें किंवा आपलें मत जरा खोळंबून ठेवावें लागतें, ह्मणून आशा सोडतां कामानये.

"आणि ह्मणून आह्मीं ह्मणतों कीं, दुस्तर्क्य जो परलोक, मग तेथें अरुणोदयासारखा ज्ञानप्रकाश असो, किंवा संध्येसारखा अस्पष्ट प्रकाश असो, किंवा भर दोनप्रहरांसारखा उज्ज्वळ असो, अथवा तेथें रात्रीसारखें अज्ञान असो, तेथें ज्या लहान समग्र वस्त्राचें आपलें जीवित एक सूत्र आहे–असें जें आपणास आपोआप कळतें—तें सूत्र तुटणार नाहीं, तर तें तेथें पुनः सांधून त्याचें एक सबंध वस्त्र विणून तयार होईल."

जें आपणांस मनांत वाटतें त्यापैकीं बरेंच आपणांस शब्दांनीं प्रदर्शित करितां येत नाहीं. हें फक्त ज्ञानकांडालाच लागून नाहीं. सेंट ऑगस्टाईन ह्मणेः—"काल ह्मणजे काय असें जर मला विचाराल तर मला सांगतां येत नाहीं. तुह्मी मला विचारूं नका. पण मला तो कळतो."

वेस्ली आपल्याविषयीं वर्णन करितोः—

"ह्या वाक्कलहाचा मला कंटाळा आला. हे विचार, हे संस्कारउपचार, हे रीतिरिवाज, हीं निरर्थक नांवें ह्यांचा मला

१ धर्मैक्यता.

कंटाळा आला. तूं जो माझा मार्गदर्शक, सत्यस्वरूपी, माझ्या संसाराचें अंतिम तत्व, ज्याविषयींच्या ममतेमुळें माझ्या साध्या हृदयास ऊत येतो, त्या तुझ्याकडे, मनांत प्रेरणा उत्पन्न झाल्यामुळें, तुझ्या संगतींत रहाण्याकरितां, व मेल्यानंतर तुझ्यांत लीन होण्याकरितां, मी धांव घेतों."

मार्टिनो ह्मणतोः—"जे माझ्यापुढें ईश्वराबद्दल पाल्हाळ लावितात, व त्याचे हेतु व त्यानें ठरविलेल्या कल्पना पूर्णपणें अवगत आहेत अशा रीतीनें जे बोलतात, प्रत्येक रचनेचें कारण अथवा प्रत्येक गोष्टींत व्यक्त झालेली ईश्वरी दया, सांगण्यास जे एका पायावर तयार असतात, विश्वांत चाललेली नेहमींची काटकसर व त्यांत दिसणारा शहाणपणा जे वानितात, वकिली शक्लीचें उत्तम उदाहरण ह्मणून जे त्याची स्तुती करितात, ईश्वरानें उत्पन्न केलेल्या पवित्र वनस्थलींतून फिरत असतां, एकाद्या बंद्या गुलामाप्रमाणें डौलानें चार पावलें टाकितात, तीं माणसें, त्यांच्या निश्चितपणामुळें, व खात्रीलायक कल्पनांनीं मला वेडावून टाकितात; मला नास्तिकपणाच्या वेदना होतात, व त्यांच्या कानीं कपाळीं ओरडावें लागतें—कमी मागत असलां तरी मी सर्व द्यायला तयार आहें. (तुह्मी सांगाल तें कबूल करावयास तयार आहें.)"

डीन स्टॅनले आपल्या आयुष्याचें सार्थक्य पुढें लिहिलेलें होतें असें ह्मणतोः—"जगांतला आस्तिकपणा व नास्तिकपणा ह्यामध्यें चालणारें जें झुंज, तें मोडून टाकणें, व ज्या पर्वतावरून देव आपणाला मदत पाठविणार त्या पर्वतावर आपली एकाग्रता करण्याचा थोडा तरी यत्न करणें."

हर्बर्ट स्पेन्सर ह्मणतो—"ज्या गूढांचा विचार करूं लागलों ह्मणजे तीं अधिकाधिक गूढ वाटूं लागतात, अशीं गूढें ह्या जगांत आहेत; तरी ज्या अनंत आणि शाश्वत आदि शक्तीपासून हें जग

निर्माण झालें, त्या आदिशक्तीच्या डोळ्याखालीं माणूस सतत असतो, हें निश्चितच आहे."

अतएव मनांत ज्या भावना होतात, ह्यांतच आनंद मानिला पाहिजे. आपणांस मनांतल्या भावनांच्या व्याख्या बांधितां येत नाहींत.

ज्या मतभेदामुळें माणसांचे निरनिराळे पंथ होतात ते धर्माचे भाग नव्हत, ते हट्टवाद होत. पॉल साधूच्या उक्तीकडे दुर्लक्ष्य करून माणसें हट्टानें बोलतात, "मी पॉल पंथाचा, मी आपोलास पंथाचा इ०."

जेरेमी टेलर ह्मणतोः—"प्रभूचें राज्य ह्मणजे नुस्तीं बायबलचीं वाक्यें सांगतां आलीं ह्मणजे येतें असें नव्हे; तर सात्विक वर्तनापासून उत्पन्न होणाऱ्या बळामुळें प्रभूचें साम्राज्य होतें. तरी सध्यां आह्मीं नवीनच तऱ्हा स्वीकारिली आहे. सर्व धर्म ह्मणजे नेमक्या गोष्टींवर विश्वास, व विश्वास ह्मणजे लोकांना अभिरुचि लावून देणें अथवा वितंडवाद करावयास लावणें होय. धर्म, ह्मणजे एका पक्षास चिकटून रहाणें व इतर जगाबरोबर भांडणें होय. आपला धर्म कोणता असें विचारल्यास, आपण कोणत्या पंथाचे आहोंत, ह्मणजे आपल्या पंथाचीं काय तत्वें आहेत, असा अर्थ घेतों. आपण आयुष्य कसें घालवितों हा घेत नाहीं. व लोक अमुक पंथाचे कट्टे भक्त असले, आणि त्याच्या बऱ्याची त्यांना आस्था असली कीं, ते फार दुर्मिळ मानिले जातात; मग ते (डॅथन) यमधर्माप्रमाणें लोभी असोत, किंवा नारदासारखे कळलावे असोत, (भ्रष्ट देवदूत) चार्वाकासारखे धर्मलंड असोत, किंवा परशुरामासारखे उन्मत्त असोत, चालतें.

शास्त्रवेत्ते लोक धर्मलंड असतात असा वारंवार आक्षेप येतो; तरी थारो ह्मणतो, वस्तुतः शास्त्रज्ञानांत जितकी धर्मबुद्धि सां-

पडते तितकें शास्त्रज्ञान धर्मांत नाहीं. शास्त्रवेत्ते जे धर्मावर विश्वास ठेवित नाहींत ते धर्माची अवहेलना करण्याच्या बुद्धीनें ठेवित नाहींत असें नव्हे. पूज्यबुद्धिप्रदर्शकच त्यांचा नास्तिकपणा असतो; त्यांत तिरस्कारबुद्धि नसते. टेनिसननें ह्याचें नीट रीतीनें वर्णन केलें आहेः—"कोणता पंथ स्वीकारावा ह्याबद्दल त्याचा अनिश्चितपणा होता; पण त्याचें वर्तन शुद्ध होतें, व शेवटीं त्यानें आपल्या हृदयांत जो कवितारस भरला होता तो बाहेर ओतला. मी खरेंच सांगतों कीं, नास्तिकपणा प्रांजलपणें कबूल करण्यांत जी पूज्यबुद्धि दिसते त्यांतली निम्मे पूज्यबुद्धि कोणत्याही पंथांत नाहीं."

उदाहरणार्थ दोन मासलेवाईक माणसें घेऊं या. प्रोफेसर तिंडल ह्मणतो—"ह्या विश्वांत जी अतुल शक्ति व्यक्त झालेली दिसते, तिला इंद्रियगोचर असें नियमित स्वरूप देऊं लागलों, मग तें आपल्या शरीरासारखें असो किंवा दुसरें कसेंही असो, ती शक्ति माझ्या हातून निसटते, व मानवी बुद्धिसामर्थ्यानें तिचे घटकावयव किंवा गुणावगुण निश्चित होत नाहींत. तिला उद्देशून "तो" असा पुल्लिंगवाचक शब्द वापरतां येत नाहीं, तिला "मन" अशा विशिष्ट नांवानें हांक मारितां येत नाहीं, तिला कार्याचें कारण असें ह्मणणें मला कबूल नाहीं, अशा रीतीनें ह्या गूढानें मी दंग होऊन गेलों आहें" प्रोफेसर हक्स्ले आमच्या उत्तम तत्वज्ञान्यांपैकीं, एक होय. तो अज्ञेयवादी होता, नेहमींच्या अर्थाच्या धर्मसंस्था त्याला बिलकूल पसंत नाहींत. पण त्यानेंही सांगितलें आहे—"ज्याच्या योगानें मनुष्यसमाजाचें कल्याण होईल अशा प्रकारचा ठरीव धर्म असावा असें मानितां येतें. त्या धर्मांतील देवळांत प्रत्येक आठवड्यास ईश्वरमीमांसेंतील नुस्त्या मतांबद्दल पुनरुक्ति कर-

ण्याच्या ऐवजीं, माणसापुढें, खरें, सचोटीचें व शुद्ध वर्तनक्रमाचें अनुकरणीय उदाहरण माडून देत असावें; त्या ठिकाणीं संसारांतील चिंतेच्या ओझ्यानें त्रासलेल्या लोकांस उन्नततर वर्तनक्रमाबद्दल स्वस्थचित्तें विचार करण्यास अवकाश सांपडावा (हा उन्नतर वर्तनक्रम थोड्यांसच साधतो, तरी तो सर्वांस साधण्याजोगा असतो); जीवनकलहांत व धंदेरोजगारांत गुंतलेल्या माणसांस आपण ज्या फायद्यांकरितां इतके परिश्रम करितों ते फायदे, मनाची शांति व दानधर्म, ह्यांच्या मानानें किती क्षुद्र आहेत असें समजण्यास वेळ सांपडावा. मी खात्रीपूर्वक सांगतों कीं, असा जर धर्म स्थापित झाला तर तो मोडून टाकण्यास कोणी खटपट करणार नाहीं."

ही धर्माची कल्पना आर्नल्ड, मॉरिस, किंग्सले, स्टॅन्ले, जॉवेट इ० धर्माधिकाऱ्यांच्या धर्मकल्पेनेपासून फारशी भिन्न नाहीं. इंग्लंडांतला राजानुशासित धर्म हळूहळू ह्याच उच्चस्थितीस येऊन पोंचत आहे. जसजशी त्याची तशी स्थिती होईल तसतसा तो बळावत जाईल.

धर्ममीमांसक जी भाषा लोकांस कळेल अशा भाषेच्या द्वारें आपले विचार प्रदर्शित करितात; व त्याचा शब्दशः अर्थ आपणांस घेतां येईल असें समजणें अन्यायाचें होईल. जेव्हां कवि सूर्य उगवतो असें ह्मणतात, तेव्हां ज्योतिषशास्त्राचा ते अव्हेर करितात असा दोष त्यांच्या माथीं मारितां येणार नाहीं. अथवा पृथ्वी फिरते सूर्य फिरत नाहीं, असें जर कोणी प्रतिपादन करूं लागला, तर तो शेक्सपीयरची अथवा टेनिसनची अवहेलना करितो असें बोलणें न्याय्य होणार नाहीं. शास्त्रांतील नवीन शोध होऊं लागले ह्मणजे नवीन भाषा देखील काढावी लागते. व नवीन तयार केलेल्या शब्दांशिवाय

जर एखादें फूल किंवा दगड ह्याचें देखील बरोबर वर्णन आपणांस करितां येत नाहीं, तर अनादि अनंत जो ईश्वर त्याला ओळखणें भाषेस शक्य नाहीं अशी आपली खात्री असली पाहिजे. अथवा त्या वेळच्या विचारांप्रमाणें जुन्या ग्रंथकारांनीं जीं कार्यें वातदोषापासून होतात, तीं पिशाचबाधेपासून होतात असें जर लिहिलें असलें तर त्यांत आश्चर्य नाहीं.

ज्याचें आपणांस कांहीं कारण सांगतां येत नाहीं, किंवा जें आपणांस समजत नाहीं, तें खरें मानण्यांत कांहीं शहाणपण नाहीं. ज्या गोष्टीबद्दल पुरासा पुरावा नाहीं ती गोष्ट खरी मानण्यांत, अथवा जें आपणांस कळत नाहीं तें आपणांस कळतें असें समजण्यांत, शहाणपण नसलें पाहिजे. खरोखर ज्याच्या बद्दल चांगलासा पुरावा नाहीं असें आपणांस कळतें तें खरें मानणें अशक्य आहे. उलटपक्षीं, ज्याबद्दल पुरावा आहे तें खरें मानणें व ज्याबद्दल पुरावा नाहीं त्याबद्दलचें मत न देणें हें आपलें कर्तव्य आहे. पुष्कळांना असें वाटतें कीं, प्रत्येक विचार खरा मानिला पाहिजे किंवा खोटा तरी मानिला पाहिजे. तथापि बहुतेक ठिकाणीं खरा ह्मणण्यास किंवा खोटा ह्मणण्यास आपणांजवळ पुरावा नसतो.

खरी श्रद्धा हा कांहीं बुद्धीचा संस्कार नव्हे. आपणाला जो धर्म लावून दिला आहे तो जागृतावस्थेंत आहे. धर्मामुळें हातून काम होत नाहीं तर तो धर्म मृत होय. सेल्डन श्रद्धा व परोपकाराचीं कृत्यें ह्यांची प्रकाश व उष्णता ह्यांच्या बरोबर तुलना करितो. "माझ्या मनांत जरी तीं पृथक् पृथक् मानिलीं, तथापि ज्याप्रमाणें मेणबत्तींत प्रकाश आणि उष्णता दोन्हीं असतात तरी मेणबत्ती मालविली ह्मणजे दोन्ही नाहींतशीं होतात." हिब्रू लोकांचें उत्तमतम जें प्रकरण त्यांत श्रद्धेविषयीं जें कांहीं ह्मटलें आहे तें

परोपकारास अनुलक्षून होय. श्रद्धेमुळें एबेलनें यज्ञ केले, तीमुळेंच नोव्हानें जहाज तयार केलें, तीवरून एब्राहामनें घर सोडिलें. ज्यावर त्यांचा विश्वास होता, अथवा जें कांहीं त्यांनीं केलें त्यांबद्दल पुरेशीं कारणें त्या सर्वांस होतीं; निदान कारणें आहेत असें त्यांना वाटलें होतें इतकें तरी प्रत्येक कबूल करील. क्लेशाचें व दगदगीचें काम आपल्यापुढें येऊन ठेपलें आहे असें पाहून त्यांनीं माघार घेतली नाहीं; व जें त्यांना वाजवी दिसलें तें इमानानें बजावलें ह्मणून त्यांची वाहवा झाली. पुरावा चांगलासा नसला तर मत न देणें हें एक कर्तव्य होय. व तें सोप्यांतलें नव्हे. पुष्कळ ठिकाणीं आपलें खास मत न देणें हा गुण जरी नाहीं तरी कर्तव्य असतें.

आह्मी ज्या पद्धति काढितों त्या कांहीं वेळ टिकतात, व त्यांचें आयुष्य भरलें ह्मणजे नाहींतशा होतात.

आमचें ज्ञान ह्मणजे ईश्वरी ज्ञानाचा तुटकसा भाग होय. व हे परमेश्वरा, तूं सर्वांहीपेक्षां जास्त आहेस.

हें अंधकाराचें पटल हळूहळू सरत आहे, परंतु असंख्य प्रश्नांविषयीं अज्ञान राहणार व त्यांतच सध्या संतोष मानला पाहिजे.

"आपणां मानवी प्राण्यांचें सुख, तुटपुंजें ज्ञान जें मिळतें आहे, तें घेऊन संतुष्ट रहाण्यांत आहे. मग तें ज्ञान स्वतःसंबंधीं देखील कां होईना. XXXXXX तमोमय पटलांत जिवंत रहाण्यास व हालचाल करण्यास समर्थ आहोंत ह्या गोष्टींवर सर्व आनंद, व कामकाज नेटानें करण्याची सर्व उमेद अवलंबून आहे. हें पटल एका जागीं सुटतें दुसऱ्या जागीं पुनः सांधतें ह्यांत आपलें समाधान आहे; व पातळ पापुद्र्यांतून शाश्वत व स्थिर वस्तूंविषयीं जें ओझरतें ज्ञान होतें त्यांतच आपला आनंद आहे. हें ज्ञान आपल्यापासून दूर ठेवण्यांत ईश्वराचें औदार्यच आहे

हें आपणाला कळतें; ज्या ठिकाणीं वाढत्या प्रमाणानें ज्ञान मिळण्याच्या ऐवजीं एकदम मिळालें असतां आपली बुद्धी भ्रमली असती, अथवा अनंत विश्व एकदम स्पष्ट दिसूं लागतांच आपली बुद्धी थकून गेली असती, अशा ठिकाणीं ईश्वरानें मोठ्या ममतेनें अंधकाराचें पटल आमच्या पुढें ठेविलें आहे, हें पाहून आह्मांला आनंद वाटतो[1]."

"ख्रिस्ती धर्माचा जो चांगला भाग ह्मणून आपण मानितों त्याविषयीं मनांत विचार केला तर मानवी प्राण्यांच्या इतिहासांत तो धर्मचालक होऊन गेला ह्या बाबतींत ख्रिस्ती धर्माचें महत्व कोणी कमी मानणार नाहीं. तो चांगला भाग कोणता ह्मणाल तर, सामर्थ्य, शांति, न्यायप्रियता, मनुष्याच्या चंचल स्वभावाबद्दल क्षमा, प्राण देखील खर्चीं घालण्यापुरती परोपकारबुद्धि, नैतिक उन्नति व शुद्धता इत्यादि गुणांनीं पूर्ण असा श्रेष्ठतम माणूस त्या धर्मानें आपल्या डोळ्यांपुढें मांडिला. ह्या सर्व गोष्टींचें प्रेषितांनीं वर्णन केलें आहे. ह्यांवर धर्मासाठीं प्राण वेंचणाऱ्या शेंकडों लोकांनीं पूर्ण विश्वास ठेविला. व त्यामुळें, सेना येथील कॅथरिन किंवा जॉन नॉक्स ह्यांसारख्या गरीब कुळांत उत्पन्न झालेल्या माणसांच्या अंगीं मोठमोठे राजे व पोप ह्यांना दोष देण्याचें धैर्य आलें" असें प्रो० हक्स्ले ह्मणतो.

सेंट मार्क अशी गोष्ट सांगतो कीं, लेखकांपैकीं एक येशूजवळ आला व ईश्वराची मोठी आज्ञा कोणती असें त्यानें विचारलें, तेव्हां येशूनें उत्तर दिलें "हे यहुद्या, ऐक, सर्वांत मोठी आज्ञा ही होयः—आपला मालक जो देव तो एक होय, व त्याच्यावर मनापासून, त्याच्या ठायीं आत्मा लीन करून

१ रस्कीन.

व सर्व सामर्थ्य खर्चून भक्ति ठेव, ही पहिली आज्ञा. व दुसरीही पहिलीसारखीच आहे—ह्मणजे स्वतःप्रमाणें आपल्या शेजाऱ्यांवर प्रीति कर. ह्यापेक्षां जास्त महत्वाची दुसरी आज्ञा नाहीं. आणि तो यहुदी ह्मणाला, माझ्या धन्या, त्वां खरें सांगितलें. कारण ईश्वर एकच; त्याशिवाय दुसरा नाहींच. त्याच्यावर मनापासून आपल्या समजुतीप्रमाणें, आपला आत्मा अर्पून सामर्थ्यानुरूप भक्ति ठेवणें व स्वतःप्रमाणें आपल्या शेजाऱ्यांवर प्रीति करणें, ह्या गोष्टी यज्ञयागापेक्षां जास्त आहेत. व त्यानें योग्य उत्तर केलें असें पाहून येशू ह्मणाला देवाच्या राज्यापासून तूं फारसा दूर नाहींस."

# भाग १५.

## आशा.

श्रद्धा व दान, ह्या गुणांसारखा आशा हा गुण मानिला आहे ह्याबद्दल आश्चर्य प्रदर्शित केलेलें मीं बऱ्याच वेळां ऐकलें आहे. श्रद्धेचा अर्थ लोक बरोबर करोत अथवा चुकीचा करोत, दानबुद्धि हा गुण आहे हें उघड होय. पण आशा हा गुण कां मानावा ?

तथापि निराश होणें हें चुकीचें आहे. जर निराश होणें चुकीचें आहे तर आशा बाळगणें योग्य होय. सोसकपणा व कार्याचे ठायीं एकनिष्ठता हे गुण अंगीं असणें ह्मणजे आशा असणें होय. एकाच शौर्याच्या कृत्यावरून—मग तें कितीही परोपकाराचें असो—माणसाच्या स्वभावाची पारख करण्याच्या ऐवजीं, सोसकपणा ही पारख करण्याची सहाण समजणें अधिक बरें. पतिप्रेम एकनिष्ठपणें बाळगणाऱ्या तरी अत्यंत क्लेश सोसणाऱ्या बायका खऱ्या सती.

गोष्टी मनास लावून घेऊं नका. हताश झाल्याशिवाय मनुष्य खरोखरी हरला असें होत नाहीं.

"आकस्मिक गोष्टीला हार जाण्यांत लाज नाहीं. तसेंच नुसत्या मणगटाच्या जोराला हार जाण्यांत नाहीं. त्याच्या योगानें माणसाचें कांहीं वाईट होत नाहीं. पण पाठ दाखवून पोबारा करणें, व स्वसंरक्षणाकरितां हात उचलल्याशिवाय हार जाणें, अथवा हल्ला केला ह्मणून हरलों ह्मणणें ह्यांत खरी लाज होय. हें माणसाच्या दैवावर अवलंबून नाहीं, ही त्याची चुकी होय."[१]

---

१ बटलर.

सिडनी स्मिथच्या अंगचा विनोद व व्यावहारिक ज्ञान ह्यांनीं भरलेला असा त्यानें एक उपदेश केला आहे. तो हाः— "खरें मर्दुमकीचें काम ह्या जगांत करणें असेल, तर कार्यरूपी नदीच्या कांठीं कुडकुडत, किंवा थंडी वाजेल व बुडूं ह्याचा विचार करीत उभे रहातां कामा नये. तर आंत एकदम उडी मारावी व कसेंही करून पलीकडच्या तीरास जावें." खऱ्या संकटास लोक घाबरत नाहींत हें चमत्कारिक आहे; काल्पनिक संकटास लोक अधिक भितात. लोकांत आपला उपहास होईल ह्याला लोक मूर्खासारखे घाबरतात.

भलत्या सलत्या गोष्टींत लाज धरूं नका. पिटरनें फॅरासीस व त्याचे शिपाई ह्यांना मोठ्या धैर्यानें तोंड दिलें, परंतु मुख्य धर्माधिकाऱ्याच्या दिवाणखान्यांतील मोलकरणी व मुली ह्यांचें हंसणें त्याला सोसलें नाहीं.

"मरण येण्यापूर्वीं भित्र्या लोकांना मरणव्यथा हजारदां होऊन जाते. शूरांना मरणव्यथा एक वेळ होते."[१]

तबेल्याच्या खिडकींतून हात बांधला गेल्यामुळें लोंबकळत असलेल्या डॉन क्विक्सटला एक भयंकर खंदक खालीं आहे असें वाटे. परंतु मॅरिटोरनीसनें जेव्हां दोरी कापिली तेव्हां जमिनी-पासून थोड्या इंचांच्या अंतरावर आपण लोंबत होतों असें त्याला कळलें. "आत्म्याच्या उन्नती[२]"मध्यें मिस्ट्रस्ट व टिमरस ( भितरे लोक ) ह्यांना ज्या सिंहाची भीति वाटली, ते सिंह साखळदंडांनीं बांधिले आहेत असें ख्रिश्चन जेव्हां धैर्यानें पुढें गेला तेव्हां त्याला कळलें.

लढाईमध्यें ज्यांनीं जय मिळविले अशा किती सैन्याची रात्रीं

---

१ शेक्सपीयर. २ पिल्ग्रिम्स प्रोग्रेस.

भीतीनें गांगरून गेल्यामुळें दाणादाण झाली आहे. पॅनिक ह्या शब्दाचा अर्थच निष्कारण भीति असा झाला आहे; व दिवसाढवळ्या देखील भीति व चिंता कारणाशिवाय आपणांस वारंवार ग्रासित नाहींत का ?

"पुष्कळ संकटें अशीं असतात, कीं त्यांचा आपण पुनः पुनः विचार केला नसता, व मोठ्या काळजीनें सांगोपन करून आपल्या हृदयांत त्यांना शाश्वत ठाव दिला नसता, तर तीं एकाद्या बुडबुड्याप्रमाणें नाहींतशीं झालीं असतीं, आणि विस्मृतिनदींत बुडून गेलीं असतीं."

"पुष्कळ दुःखें अशीं आहेत कीं तीं उद्यां नाहींतशीं होतील, मात्र त्यांना पंखें देण्यास (विसरण्यास) आपण तयार असलों पाहिजे. हीं दुःखें आगंतुकाप्रमाणें मनांत वास्तव्य करितात, मन खट्टू करितात; व आपणांस न समजतां त्यांचीं अंडीं उत्पन्न होतात व त्यांतून सर्व प्रकारच्या क्लेशकारक भयंकर वस्तु जन्मास येतात."

असंतुष्ट माणसानें स्वतःला असें विचारावें कीं "कोणा एका माणसाची स्थिती आपणांस हवी आहे ?" एका माणसाचें आरोग्य, दुसऱ्याची संपत्ति, तिसऱ्याची संतति मिळण्याची त्याला इच्छा करितां येत नाहीं. आपणाला जर आपली स्थिति आवडत नाहीं तर दुसऱ्या कोणा एकाची स्थिति एक तर सर्वस्वी घ्यावी नाहींतर मुळींच घेऊं नये.

कॉलेरिजवर जेव्हां मोठीं संकटें आलीं तेव्हां त्यानें सर हम्फ्रे डेव्हीला असें लिहिलें:—"ह्या घडामोडींत, ह्या अपमानाच्या व भीतीच्या वेळीं, ईश्वराच्या अनादित्वाबद्दलचे विचार माझ्या मनांत

---

१ क्लार्क.

दृढ आहेत, व त्यामुळें मी जें सोशितों आहे तें सर्व आशीर्वाद-स्वरूपी आहे अशी माझी बुद्धि, व आनंदवृत्ति ह्या नाहींशा झाल्या नाहींत."

तर निराश होऊं नका. निराशेशिवाय दुसऱ्या सर्व गोष्टी परत मिळवितां येईल. "जो भितरा त्याचें नशीब फुटकें" असें सिराकचा पुत्र ह्मणाला.

"धैर्य जर गळालें तर सर्व कांहीं गेलें.

मग तूं जन्मासच आला नसतास तर ठीक झालें असतें," निमूटपणें सोसणें हें आपल्या दैवावर जय मिळविण्यासारखें आहे. "दुःखभरांत भलतें सलतें न करण्याची खबरदारी ठेवा, उद्यांपर्यंत जिवंत राहिलांत, तर अतिशय संकटाचा दिवसही नाहींसा होईल."

चुक्या प्रत्येक माणूस करितो. जो चुकी करित नाहीं, त्याच्या हातून कांहीं होत नाहीं असें ह्मटलें आहे तें बरोबर आहे. पण एक चुकी दोन वेळां करण्याची जरूर नाहीं. आपल्या चुक्या धड्यांसारख्या वाटाव्या, व उत्तमतर आयुष्यक्रमाला त्या पायऱ्यांप्रमाणें व्हाव्या.

जोसेफ ह्यूम ह्मणे—१०००० पौंडांचें उत्पन्न असण्यापेक्षां आनंदी स्वभाव असणें मला बरें वाटतें.

काम करतांना सध्याचा वेळ काय तो महत्वाचा. परंतु आयुष्यक्रमामध्यें अशी एक स्थिति येते कीं, ज्या वेळीं पाठीमागें काय झालें किंवा पुढें काय होईल त्या धोरणानें वागावें लागतें. तात्कालिक गोष्टींसाठीं आपण भावी आयुष्य खर्चीं घालतों. ह्यामुळेंच आपलीं संसारांतील दुःखें उद्भवतात. ह्मणजे पुढील आयुष्यांतील

१ कूपर. २ गएथी.

सुख, क्षणिक सुखाकरितां वेंचितो. (हातांत सांपडलेला एक पक्षी बरा झाडावर असणारे दोन नको हें खरें आहे). हातचें सोडून पळत्याच्या पाठीस लागण्यास काय अर्थ? पण त्या ठिकाणीं पळतें हातीं लागणार नाहीं असा संभव असतो पण पुढलें आयुष्य येणारच. "ज्यांचें सुख ह्मणजे मागील चांगल्या कृत्यांची आठवण व ज्यांची महत्वाकांक्षा ह्मणजे स्वर्गप्राप्ति ते खरे सुखी."[1]

" मनुष्याच्या अंगीं पहिल्यानें मर्दुमकी असली पाहिजे आणि काम करण्यास इच्छा व धाडस करण्यास छाती असली पाहिजे[2].

कारण—"संशय हा फितुराप्रमाणें होय. तो यत्न करण्याची वानवा मनांत घालून जो फायदा बहुतकरून झाला असता त्याला आपणांस मुकवितो[3]."

धैर्य हा गुण आहे इतकेंच नव्हे, तर माणुसकीस अवश्य असणाऱ्या गोष्टींपैकीं एक आहे. मनुष्य माणूस आहे असें ह्मणण्यास त्याच्या अंगीं धैर्य पाहिजे. ज्याप्रमाणें स्त्रीस स्त्री ह्मणण्यास तिच्या अंगीं मार्दव पाहिजे; तरी पुरुषाच्या अंगींही मार्दव हवें व स्त्रियांच्या अंगींही धैर्य हवें.

परिणामाकडे दुर्लक्ष्य करणें हें धैर्य नव्हे. संकटांना तुच्छ मानणें ह्यांत धैर्य नाहीं, त्यांना तोंड देण्यांत धैर्य आहे. व्यर्थ धोक्यांत पडण्यांत धैर्य नाहीं. पण, संकट आलें ह्मणजे भित्रेपणामुळें तें दुणावतें; ह्मणून धैर्यानें व शांतपणानें ह्यांना तोंड देणें हा बचावाचा खरा मार्ग. लढाईमध्यें शत्रूसमोरून पळून जाणें ह्मणजे मरणें होय. बहुतकरून अकिलीझसारखें लोकांना मागूनच फक्त भय असतें.

बर्क ह्मणतो—"एकादी गोष्ट भयंकर वाटण्यास बहुतकरून

---

१ रस्किन. २ स्कॉट. ३ शेक्सपीयर.

तीं अस्पष्ट कळणारी पाहिजे. जेव्हां संकटाचा पुरा अदमास होतो, तेव्हां तें आपल्या अंगवळणीस पडतें, व बरीच भीति नाहींशी होते. " जुन्या दंतकथेंत सांगितलें आहे कीं, पिसें पाहून घाबरलेलें हरिण पारध्यांच्या हातांत सांपडलें व मेंढरांच्या कळपानें उडविलेल्या धुळीस शत्रू समजून छाप्यांत सांपडलें.

शांतवृत्ति ठेवून धैर्य धरा. "संकटरूपी काट्यांतून पुष्परूपी बचाव करून घ्या." आणि प्राच्यांच्या ह्मणीप्रमाणें "बचाव्याच्या झग्याखालीं संतोषरूपी पाय झांकून घ्या." फार मिळविण्याची इच्छा धरूं नका. गएथी ह्मणतो–"थोडी इच्छा ठेवून पुष्कळ आनंद मानण्यास शिकणें हें यशाचें गुप्त तत्व होय."

फार मिळावें व तें फार लवकर मिळावें अशी आशा करूं नका. ज्यांना धीर आहे त्यांना सर्व कांहीं मिळतें. आयुष्यांतील सर्वांत मोठीं संकटें जेव्हां माणूस आपल्या स्वतेजानें प्रकाशत असतो, तेव्हां त्याच्यावर येतात. तुह्मांला वाटेल तें करा, संकटें यावयाचींच, ह्मणून त्यांना धैर्यानें तोंड देणें हें आपलें काम आहे.

" अगदीं दुःखाच्या वेळीं अतिशय सुखाच्या दिवसांची आठवण करा" असें रिच्टर ह्मणतो.

संकटें सोसूनही तीं सोसण्यास समर्थ रहाणें ही किती श्रेष्ठ गोष्ट आहे तें लक्षांत ठेवा.

"आणखी कांहीं होवो, दिवस कितीही कठिण असोत काल जातोच[1]" असें समजण्यांत नेहमीं समाधान आहे.

कारण जॉर्ज मॅकडोनल ह्मणतो "जर आपलें मन नीट कामांवर आहे, व आपली निष्ठा जर दृढ आहे तर कामें अगदीं बिघडायचींच नाहींत. कारण जरी संकटरूपी धुकें आलें, व दुःख-

---

१ बर्क.

रूपी पाऊस पडूं लागला, तरी त्या निष्ठेमुळें पुनः आनन्दरूपी सूर्यप्रकाश मिळेलच."

"हिंवाळ्यानंतर उन्हाळा येतो. रात्रीनंतर दिवस येतो. मोठें वादळ झाल्यावर शांतता येते.[1]" आपला आयुष्यरूपी रस्ता जरी आंधारमय दिसला तरी कालामुळें मोठमोठालीं दुःखेंही गिळतां येतात हें लक्ष्यांत ठेवा. "रात्रीं दुःखांचें ओझें झालें तरी दिवसा पुनः आनंद येतोच."

" हे दुःखी हृदया, शांत हो. शोक करूं नकोस. संकटरूपी अभ्रापाठीमागें आनंदसूर्य झांकला आहे. सर्वांची स्थिति तुझ्या सारखीच आहे. प्रत्येक आयुष्यक्रमांत थोडा पाऊस पाहिजे; कांहीं दिवस दुःखांत व अंधकारांत गेले पाहिजेत.[2]"

कांहीं नवीन गोष्ट घडली, व पहिल्यानें ती संकटाप्रमाणें वाटली, तर ती तशी आहे अशी खात्री करून घ्या. नुसत्या बाह्य स्वरूपावरून वारंवार फसायला होतें. क्षुल्लक गोष्टींनीं आपला पाडाव करावा व तो आपणांस खपावा अशा जगांत आह्मी रहात नाहीं. संकटें व दुःखें हीं पुष्कळ वेळां रूपांतर केलेल्या मित्रांप्रमाणें असतात. जेव्हां परत फिरण्याकरितां दिलेली खूण नेलसनला पाहावयाची नव्हती, तेव्हां त्यानें आपल्या फुटक्या डोळ्याचाही उपयोग करून घेतला. सर ग्रॅन्ड डफनें लिहिलेल्या रेननच्या सुरस चरित्रांत असें ह्मटलें आहेः—"जिवंत असतांना ज्यांच्या आयुष्यक्रमाबद्दल आपण मुळींच काळजी करीत नाहीं, पण ज्यांचें मरण आपणाला यावेंसें वाटतें असे लोक ह्या जगांत पुष्कळ आहेत." व इतिहासांत देखील राज्यपद मिळाल्यामुळें जेवढे अमर झाले आहेत तेवढेच फांशीं दिल्यामुळें झाले आहेत.

---

१ खिस्तानुकरण. २ शेक्सपीयर.

जर आपणांस दुःख होतें आहे, तर तें आपल्या अपराधास्तव अथवा लोकांच्या कल्याणाकरितां.

" शहाणीं माणसें किती तोटा होणार ह्याचा विचार करीत बसत नाहींत, परंतु आपला तोटा भरून काढण्याचा मोठ्या आनंदानें यत्न करितात[१]. "

आणखी, आयुष्यांतील असंख्य सुखें पूर्णपणें उपभोगावीं व त्यांबद्दल आभारी असावें हें खरें, पण दुःखें व संकटें ह्या निवळ वाईट गोष्टी आहेत असें मानूं नये. नेहमीं सारखें यश आलें तर कोणालाही बरें वाटणार नाहीं, त्यापासून त्रास झाला नाहीं तरी त्यामुळें हिंमत कमी होईल व उल्हास नाहींसा होईल. अडचणी नाहींशा करणें, मोहाचा प्रतीकार करणें, धैर्यानें दुःखें सोसणें, ह्याच्या योगानें, स्वभावाची उन्नति होते, तो दृढ होतो, आणि अंगीं औदार्य येतें.

"अनंत विश्वाला तोंड द्यावयाचें पडलें ह्मणजे मोठ्या मानानें त्याकडे चालत जाणें ही एक मोठी गोष्ट आहे[२]. "

वसंतऋतूंतील चकचकीत सूर्यप्रकाश व मन्द हवा आपण मनापासून उपभोगितों, परंतु हिवाळ्यांतील बर्फ, व वादळें ह्यामुळें सृष्टीला बरेंचसें सौंदर्य व मोठेपण येतें.

किंग्स्ले एका सुंदर काव्यांत ईशान्येकडील थंड वायूचें चांगलें वर्णन करितो. " दक्षिण दिशेकडून वाहत येणारा सुखकारक वारा कामुक जनांचे दुःखाचे सुस्कारे आपल्या कानांवर पाडितो. ह्या वेळीं रिकामटेकडे कामी जन रमणींच्या नेत्रसूर्याच्या तापामध्यें सुख मानीत असतात. माणसांचीं मनें व लेखण्या मात्र त्याच्या योगानें कोमल होतात. तिखट अंगाला झोंबणारी थंडीच शूर इंग्रज तयार करिते.

---

१ शेक्सपीयर. २ जीके.

"परंतु ईशान्येकडून बर्फाच्या वादळांतून सोसाट्यानें वहात येणारा, अंगास झोंबणारा वायु आमचीं ओक लांकडाचीं गलबतें पृथ्वीसभोंवतीं समुद्रांत नेतो; व आमच्या हृदयांत असलेलें व्हायकिंग लोकांचें पाणी जागृत करितो; आमच्या मेंदूस व स्नायूंस बळकटी आणितो; ईश्वरप्रेरित वायो, संथपणें वहा."

आपलीं संकटें हा नैतिक गार वारा होय. त्यामुळें आपण बळकट होतों व अंगांत कुवत येते.

" ख्यातीच्या भपकेदार पोषाखाला मागें टाकणारीं व नायकाच्या शौर्याला भर आणणारीं, व त्याला मुकुटाप्रमाणें शोभविणारीं संकटेंच होत. हीं जर संकटें आलीं नाहींत तर एक लढाई जिंकायची राहिली व नायकाच्या मनोनिग्रहाला एक स्तुत्य जय मिळाला नाहीं."

एपिक्टेटस ह्मणतो—" जर सिंह, अजगर, हरिण, रानडुकर, आणि ज्यांना हाकून टाकण्याचें व नाहींतशीं करण्याचें प्रयोजन आहे, अशीं पशुवत् वागणारीं माणसें नसतीं तर हरक्यूलिसची काय महती! असलीं मोठीं कृत्यें करावयाचीं नसतीं तर त्यानें काय केलें असतें ? पासोडी पांघरून तो निजला असता असें नव्हे का ? असल्या ऐषारामांत सुस्थतेंत लोळत पडला असता तर तो पहिल्यानें हरक्युलीस ह्या नांवानें प्रसिद्धीस आलाच नसता. यदाकदाचित् आला असता, तरी त्याचा काय उपयोग ? त्याच्या बाहुद्वयाचा, त्याच्या इतर अवयवांचा, त्याचा सोशिकपणा, त्याचें उदार मन, इत्यादींचा, जर असल्या गोष्टींनीं व प्रसंगांनीं त्याला जागृत केलें नसतें किंवा आपलें बळ खर्चावयास लावलें नसतें, तर काय उपयोग झाला असता?"

---

१ टेलर.

सॉक्रेटिसास जेव्हा शिक्षा झाली तेव्हां अपोलोडोरस त्याला अन्यायानें शिक्षा झाली ह्मणून रडूं लागला. तो तत्ववेत्ता ह्मणाला—" तर मी अपराधी असायचें होतें असें तुला वाटतें का? "

पिटर साधु ह्मणतो–" ईश्वरावर भरवंसा ठेवून अन्यायानें दिलेलें दुःख, संकटें, माणूस भोगतो हें स्तुत्य होय, कारण आपल्या अपराधांबद्दल त्रास झाल्यावर तो शांतपणें सोसण्यांत महत्व तें कोणतें? पण जर बरें करून त्याबद्दल भोगावें लागतें, व तें तुह्मी संथपणें भोगतां तर तें ईश्वराकडे रुजू आहे. "

---

# भाग १६ वा.

## क्षमाशीलता.

ज्याप्रमाणें लोकांनीं आपलें बरें करावें असें आपणांस वाटतें त्याप्रमाणें आपण त्यांचें करावें इतकेंच नव्हे, तर ज्याप्रमाणें त्यांच्या ठायीं तुमच्याबद्दल क्षमाबुद्धि वागावी असें तुह्माला वाटतें त्याप्रमाणें तुमच्या ठायीं त्याच्या बद्दल वागली पाहिजे. जर इतरांबद्दल तुह्मी मुळींच गय करीत नाहीं, तर त्यांनीं आपणाबद्दल करावी असें कसें इच्छावें? आणखी सारासारविचार केल्यास दुसऱ्यांच्या कृत्यांबद्दल मत देतांना तीं बऱ्या बुद्धीनें केलेलीं असावींत असें मानणें, दुसऱ्या पक्षापेक्षां अधिक चांगलें दिसतें.

ज्याप्रमाणें हॅनिबॉल आल्प्स पर्वतावर शिरका ओतून ओलांडून गेला असें ह्मणतात त्याप्रमाणें ह्या आयुष्यांतील संकटांतून पार पडावें असें पुष्कळांस वाटतें. पुष्कळ माणसें स्वार्थत्याग करण्यास तयार असतात, परंतु ज्यांच्या योगानें आयुष्य सुखी व आनंदी होतें, अशा ममतेच्या व दयेच्या बऱ्याच गोष्टींकडे ते दुर्लक्ष्य करितात.

जरी कुरकुर करण्यास प्रयोजन असलें तरी घडलेला अपराध जितका मोठा आपणास वाटतो तितका मोठा तो नसतो, व त्याबद्दल सूड उगविण्याच्या यत्नानें अधिकच बिघाड होतो. सूड उगविण्याच्या यत्नानें त्या अपराधापासून होणाऱ्या नुकसानापेक्षां जास्त नुकसान होतें. दुसऱ्याचें वाईट करण्याचा बेत केल्यामुळें स्वतःचें अधिक वाईट झालें नाहीं असें कधीं होत

नाहीं. " ज्याप्रमाणें जर मधमाशी रागानें नांगी मारिते तर ती लवकर मरते[1]. "

गिधाडाला अखाद्य मांसाशिवाय दुसऱ्या कशाचाही वास येत नाहीं असें ह्मणतात. चावणारा कांसव अंड्यांतून बाहेर पडल्यापूर्वींच चावतो आणि मेल्यावरही चावतो.

कांहीं लोक ह्या जगांत छिद्रान्वेषणाचें काम करण्यांत आयुष्य घालवितात. तथापि एखाद्या गोष्टीची वाखाणणी करणें हें टीका करण्यापेक्षां बरें व नुस्तें दोषांचें अवडंबर करणें ह्मणजे खरी टीका नव्हे. एखाद्या कपाटांत हाडांचा सांपळा असला तरी त्यांत दुसरें कांहीं तरी असेलच. ( एकाद्याच्या अंगीं कितीही मोठा दुर्गुण असला तरी त्याच्या बरोबर कांहीं सद्गुण असतीलच. ) माणसाचें शरीर नुसत्या हाडांचेंच नसतें. टीका योग्य असेल पण त्यांत तेवढेंच का सत्य आहे? स्टेजवर जाणें बरें, पण नाटक पाहाण्यास ती चांगली जागा नव्हे. माणसांत व आयुष्यक्रमांत चांगलें शोधून काढण्याचा यत्न करा, वाईट शोधून काढण्याचा यत्न करूं नका, ह्मणजे तुह्मी जें शोधितां तें तुह्मांला मिळेल.

शांत वृत्ति ठेवा. मुलें पिरपिर करूं लागलीं कीं दहांत नऊंना दुःख होत असतें ह्मणून तीं पिरपिरीं होतात; व पुरुष व स्त्रिया इतर गोष्टींप्रमाणें ह्या गोष्टींतही वाढलेल्या मुलांप्रमाणें होत. बऱ्याच गोष्टींत जर सर्व वस्तुस्थिति माहीत असली व त्यांच्या मनांत काय वागत आहे हें आपणांस कळलें तर बऱ्याच तिरसट माणसांवर रागावण्याच्या ऐवजीं त्यांची आपणांस कींव येईल.

---

१ आलफ्रेड राजाचें बिइथिअसचें भाषांतर.

कोणी आजारी आहे असें कळतांच आपण किती ममता दाखवितों. कांहीं देण्यास पुढें मागें पहात नाहीं; जें जें करावेंसें वाटतें तें तें करितों; त्रास किंवा दगदग जेवढी नाहींशी होईल तेवढी करितों; पण आपण त्याच वेळीं असें कां करितों? नेहमीं जर इतक्या ममतेनें व दयार्द्र बुद्धीनें वागलों तर किती बरें होईल?

लोकांना चिंता, काळजी, दुःखाचें ओझें व गुप्त संकटें काय काय असतात हें आपणांस माहीत नसतें; तर मग कुरकुर करण्यास जागा असली तरी गय करा. पुष्कळ वेळां गय करावी लागेल असें मानायाला नको. जी गोष्ट येईल ती बरी माना व जो मनुष्य भेटेल त्याशीं चांगल्या रीतीनें वागा.

मेल्या माणसांविषयीं वाईट बोलूं नये ही उक्ति चांगली आहे पण ती मेलेल्यांनाच कां लागावी? एकाद्या माणसाविषयीं एक गोड शब्द किंवा एक चांगलें कृत्य ऐकलें, तर त्याविषयीं हजार दुष्ट अफवा व वाईट साईट टीका कानावर पडते; असें कां? मेल्या माणसांविषयीं ज्याप्रमाणें पूज्य बुद्धीनें लोक बोलतात, त्याप्रमाणें जिवंत माणसांविषयीं कां बोलूं नये?

लोकांवर दोषारोप करावयाचाच असल्यास घाईनें तरी तो करूं नका. व "कोणत्याही माणसावर दोषारोप करूं नका. त्याच्या डोक्यांतील विचार आणि त्याचें मन तुला दिसत नाहीं. जो तुझ्या अंध डोळ्याला डागसा वाटतो, तो ईश्वराच्या दिव्य चक्षूंस ज्या लढाईत तुह्मी भ्यालां असतां व हार गेलां असतां, अशा मोठ्या बहादुरीनें मारलेल्या लढाईत मिळालेल्या जखमेचा व्रण वाटेल."[१]

---

१ प्रॉक्टर.

आपली नाखुषी दाखविणें जरूर आहे अशीं प्रयोजनें असावींत व असतीलच. परंतु साधारण नियम हा असावा कीं, ज्या ठिकाणीं ममतेनें किंवा गय करून बोलतां येत नाहीं, त्याठिकाणीं मुळींच बोलूं नये तें चांगलें. एक ओळखीचा मनुष्य सिडनी स्मिथला त्याच्या पश्चात् शिव्या देत असे; त्याला त्यानें असा निरोप पाठविला कीं, माझ्या मागें तूं मला लाथा मारल्यास तरी चालतील. तथापि आपल्या समक्ष आपले अपराध दाखवावे असें बहुतेकांस वाटतें, व आपलें संरक्षण करण्यास हजर नसतां, जें आपल्याविषयीं लोक ह्मणतात त्याबद्दल त्यांना विशेष चीड असते. इतरांबद्दल वाईट साईट अफवा सांगितलेल्या ऐकून लोक हंसोत, व त्यांची करमणूक होवो, परंतु त्यांचें जें स्वाभाविक अनुमान कीं, पुढें मागें आपल्यावरही असा प्रसंग यावयाचा तें ते काढतीलच, ही खात्री ठेवा; जरी लोक तुमच्या बरोबर हंसले तरी तुह्मी त्यांना फारसे आवडणार नाहींत.

" तर मग आपले बंधु जे मानव त्यांच्यावर सौम्यपणें टीका करा, व विशेषेंकरून आपल्या भगिनी ज्या बाया त्यांवर." जरी माणसें जाणून बुजून अपराध करीत असलीं तरी त्यांच्याकडे काणाडोळा करणें चांगलें.

" बरा कोण वाईट कोण हें जोखून ठरवितांना आपण चुप असावें हें चांगलें; कारण तराजू बरोबर लावतां येणें कठीण आहे. माणसानें जें वाईट केलें त्याचा साधारण अदमास करितां येईल, पण ज्या मोहांचा त्यांनीं प्रतिकार केला ते आपणांस कळत नाहींत. "[1]

प्राण्यांबद्दलही दोन शब्द येथें लिहिले पाहिजेत. सेनिका

१ बर्न्स.

ह्मणतो—गळ, फांस, जाळीं, कुत्रे ( बंदुका असें आतां आणखी ह्मटलें पाहिजे ) इत्यादि घेऊन आपण सर्व सजीव प्राण्यांबरोबर युद्ध मांडितों. इतर कांहीं प्राण्यांना मारून आपलें जीवन करावें हें माणसास साधारणपणें जरूर आहेसें वाटतें. जर त्यांचे आपण इतके ऋणी आहोंत तर त्यांना उगाच त्रास न देण्यास जास्तच जपलें पाहिजे.

" दुःखादि विकारांची लायकी ज्यांस आहे अशा क्षुद्र जंतूंस देखील दुःख होईल, असल्या गोष्टींत आपणांस आनंद नसावा व गर्वही नसावा[1]. "

आणि अतएव " तुझें अंतःकरण जर सदय असलें, तर प्रत्येक जंतु आयुष्यसंस्कारदर्शक आरशाप्रमाणें, व पवित्र ईश्वरी कायद्याच्या ग्रंथांप्रमाणें वाटेल[2]. " प्राण्यांना आत्मा नाहीं असें आजकाल आपण बहुतेक मानितों; पण बुद्धापासून वेस्ली व किंग्स्लीपर्यंत बहुतेक जास्त लोक त्यांना आत्मा आहे असें मानीत आले.

निदान पक्ष्यांमध्यें तरी विशेष स्वर्गिक गुण दिसतात. सेंट फ्रांसिसला आपण देव आहोंत अशी खात्री होती. त्याला वाटे कीं पक्षी देखील त्याप्रमाणें दैविक असतील, त्यांना आपल्या सारखा नश्वर देह मात्र प्राप्त झाला असेल. इतक्या आश्चर्यकारक व सुंदर प्राण्याचे आह्मी नातलग आहोंत असें ममतेनें ह्मणण्यांत मनुष्यत्वाला काळिमा येणार नाहीं असें त्याला वाटे. त्याच्या जुन्या समजुतीप्रमाणें पक्षी आकाशांतील देवदूतांप्रमाणें अरण्यांतून ईश्वराची स्तुती करीत फिरत असतात.

तें काहीं असो पण, प्राण्यांना ममतेनें वागवावें व त्यांच्या

---

१ वर्डस्वर्थ. २ टामस ए केंपीस.

सोयींकडे लक्ष्य द्यावें हें निश्चित आहे. जरूर नाहीं असें दुःख त्यांना देणें ह्मणजे गुन्हा होय.

" चांगल्या माणसांच्या आयुष्यांतील उत्तम भाग ह्मणजे लहानसहान जीं सांगतां येत नाहींत व ज्यांचें स्मरण रहात नाहीं अशीं ममतेचीं व दयेचीं कृत्यें होत " असें वर्डस्वर्थ ह्मणतो. आणि कॉलेरिज ह्मणतो तेंही खरें आहेः—

"मनुष्यमात्रांवर व पशुपक्ष्यांवर जे लोक प्रीति करितात तेच खरी प्रार्थना करितात."

"ज्या देवानें सर्व वस्तु उत्पन्न केल्या आणि जो त्यांवर प्रीति करितो व आपणांवर प्रीति करितो, त्याच्याकरितां लहान मोठ्या सर्व वस्तूंवर जो माणूस प्रीति करितो तोच ईश्वराची खरी प्रार्थना करितो. "

शेक्सपीयरच्या ग्रंथांतून जे उत्तम भाग आले आहेत त्या सर्वांत दयेचें जें वर्णन केलें आहे त्यापेक्षां श्रेष्ठतम दुसरा भाग नाहीं.

" दया हा गुण ओढून ताणून येत नाहीं. ह्या जगावर आकाशांतल्या पर्जन्यधारेप्रमाणें ती हळू हळू पडते. तीपासून दोघांनाही सुख आहे. जो दया करितो व ज्या माणसावर दया होते ते दोघेही सुखी. ती बलवंतांत बलवती आहे. सिंहासनस्थ राजाला त्याच्या मुकुटापेक्षां ती जास्त शोभा आणिते. राजाचा राजदंड ह्मणजे ऐहिक सत्ता दर्शविणारें चिन्ह होय. राजतेज व भीति दर्शविणारा तो; व त्यावर राजाबद्दलची भीति अवलंबून असणार. पण दया ही ह्या राजदंडानें प्रदर्शित केलेल्या सत्तेच्या बाहेर आहे. ती राजांच्या हृत्पटलांवर खोदलेली आहे. दया ईश्वराला साजणारा एक गुण होय. न्यायदेवता जेव्हां दयेनें भूषित होते तेव्हां ऐहिक सत्ता ईश्वरी सत्तेप्रमाणें वाटूं लागते."

चॅरिटी ह्या शब्दाचा अर्थ लोक वारंवार दानधर्म करणें असा

करितात. आणि तेंही खरें आहे ह्यांत काय संशय? कांहीं प्रसिद्ध ग्रीक ओळी अशा अर्थाच्या आहेतः—“ अतिथि, व गरीब लोक हे झ्यूसचे[1] आश्रित होत; आणि दानधर्म अगदीं थोडा केला तरी तो देवाला गोड आहे. ”

परंतु धर्म करणें हा चॅरिटीचा फक्त एकच भाग होय; व तो मुख्य भागही नव्हे. नीट रीतीनें जर धर्म केला नाहीं, तर त्यापासून बरें होण्याचा ऐवजीं नुकसानच होतें. कळवळा व ममता ह्या गोष्टी जास्त महत्वाच्या होत.

“ दुसऱ्यांचे दुःखाची सहानुभूति होण्यास मला शिकवा; जीं व्यंगें मला दिसतात तिकडे काणाडोळा करण्यास मला शिकवा; व जी दया मी इतरांस दाखवितों ती दया मजवर करो[2]. ”

इतरांनीं दिलेला त्रास विसरा, पण केलेला उपकार विसरूं नका; “ कृतघ्न मुलगा असणें हें सर्पाच्या दांतापेक्षा अधिक टोंचणारें वाटतें.[3] ”

“दिवसाचा प्रकाश पहाण्यास अयोग्य असले लोक किती असतात ? तरी सूर्य उगवतोच. ”

जे इतरांस क्षमा करीत नाहींत त्यांना आपणांस इतरांनीं क्षमा करावी असें वाटूं नये. “आतां मरण येणार अशी भीति नेहमीं बाळगा. त्याचप्रमाणें आज, नग्न, सोंगेंढोंगें एकीकडे सारून पृथ्वीचा जो शास्ता त्याच्या समोर आपल्या बंधुजनां-बरोबर जें बरेंवाईट वर्तन केलें असेल त्याबद्दल जाब देण्यास उभे आहोंत असें समजा. ज्यांनीं आपलें नुकसान केलें त्यांच्यावर मुळींच दया केली नाहीं, व आपण पाषाणहृदयी

१ इंद्रदेव. २ पोप. ३ शेक्सपीयर. ४ सेनिका.

बनलों, इतरांबद्दल क्षमाबुद्धि बाळगली नाहीं, असा हा विचार मनांत आल्यावर देवाचा काय ठराव होईल ह्या-बद्दल जी भीति उत्पन्न होते त्यापेक्षां जास्त भीति दुसऱ्या कोण-त्याही गोष्टींनीं उत्पन्न होईल काय ? आणि ही क्षमावृत्तिच तुमच्या उपयोगीं पडेल; व ती तुमच्या कामीं पडावी असें तुह्मांला वाटतें ही. अशी स्वाभाविक भीति बाळगण्यास, आमच्या तारकानें लावून दाखविलेल्या कल्पित गोष्टीचा आधार आहे.

जर आपले रक्तमांसाच्या बंधुजनांचे अपराध मनापासून तुह्मी विसरत नाहींत, तर तुमचा आकाशांतील बापही ह्याच-प्रमाणें तुमच्याशीं वर्तन करील.

अपराध विसरून आपल्या शत्रूंवर प्रीति करावी अशी जी ईश्वरी आज्ञा ती जरी इतर धर्मांत नाहीं असें नाहीं, तरी ती मुख्यत्वें करून ख्रिस्ती धर्मांतलीच होय. बायबल ती आज्ञा पुनः पुनः सांगतें. जर " तुह्मी माणसांचे अपराध क्षमा कराल तर आकाशांतील प्रभु तुह्मांस क्षमा करील; परंतु तुह्मी जर क्षमा करीत नाहीं, तर तुमचा प्रभुही तुह्मांला क्षमा करणार नाहीं. "

नुसती क्षमा पुरी नाहीं. आपणांस आणखी विशेष केलें पा-हिजेः—" मी तुह्मांला सांगतों आपल्या दुष्मनांवर प्रीति करा; जे तुह्मांला शाप देतात त्यांना तुह्मी आशीर्वाद द्या; जे तुमचा द्वेष करितात त्यांचें चांगलें करा; जे तुमचा तिरस्कार करितात आणि जे तुमचा छळ करितात त्यांच्यासाठीं देवाजवळ प्रार्थ-ना करा; ह्मणजे आकाशांतील बापाचीं तुह्मी खरीं लेंकरें व्हाल. कारण, बऱ्यावाईट सर्व प्रकारच्या माणसांसाठीं देव सूर्यास प्रकाशावयास लावितो, व न्यायी व अन्यायी दोन्ही लोकांसाठीं पाऊस पाडितो."

सेंट पॉल ह्मणतो—

"क्षमाशील माणसास फार खस खावी लागते. पण त्याच्या अंगीं माया असते. तो कोणाचा हेवा करीत नाहीं, फुशारक्या मारीत नाहीं, किंवा गर्वानें फुरफुरत नाहीं; अशिष्ट असें वर्तन करीत नाहीं; आपलीच तुंबडी भरण्याचा यत्न करीत नाहीं; क्षुल्लक कारणावरून चिरडीस जात नाहीं; कोणाचें वाईट इच्छित नाहीं; त्यास अन्यायापासून आनंद होत नाहीं; सत्यांत आनंद वाटतो, तो सर्व सोसतो, सर्व गोष्टींत विश्वास ठेवतो; सर्व गोष्टीं-बद्दल आशा करितो; सर्व गोष्टी सहन करितो."

"क्षमाशीलता कधीं नाहींशी होत नाहीं. भविष्य चुकेल, वाणी बसेल, ज्ञान नष्ट होईल, फक्त धर्मबुद्धि, आशा, क्षमाशीलता ह्या तीन गोष्टी राहतील, ह्या त्रिकुटांत क्षमाशीलता मोठी[१]. "

---

१ सेंट मॅथ्यू.

# भाग. १७

## सद्वर्तन.

ह्या जगांत यश मिळविण्याचा प्रश्न असला तर सद्वर्तन व स्थैर्य ह्यांचा नुस्त्या हुशारीपेक्षां जास्त उपयोग होतो. आचरणाचें महत्व मुख्यत्वेंकरून मी ह्या कारणावरून ठरवीत नाहीं, तरी तें खरें आहेच. सत्यानें वागणें हें, सत्यानें कसें वागावें, हें समजण्यापेक्षां जास्त महत्वाचें आहे. चांगलें होण्याची इच्छा असो, अथवा भरभराटीस येण्याची किंवा सुखी होण्याची इच्छा असो आपण त्याच मार्गानें जावें. सोनेरी अक्षरानें लिहिण्याचीं कृत्यें केलीं ह्मणजे सोन्याचे दिवस येतात.

आयुष्याची किंमत नैतिक किंमतीवरून ठरवावयाची. "काय करावयाचें तें सदसद्विवेकबुद्धीनें ठरविल्यावर कांकूं करीत किंवा वाट पहात रहावयाचें नाहीं असा निश्चय करा; म्हणजे पापी माणसांना वास्तविकपणें जें सुख मिळण्याची आशा असते त्या सुखभांडाराची किल्ली तुह्मांला मिळालीच[१]."

सारांश घेतल्यास कर्तव्यकर्माची टाळाटाळी करून किंवा हयगय करून तुमचें सुख कधीं वाढणार नाहीं. चांगल्या माणसांची व त्याचप्रमाणें शहाण्या माणसांची एकच खूण असते.

" भेकडपणा तो मुळींच मनांत आणित नाहीं. ज्या ठिकाणीं कर्तव्यकर्म नेतें त्या ठिकाणीं बिनधास्त तो जातो. कर्तव्यकर्मासाठीं हजारों संकटांना तोंड देतो, व ईश्वरावर हवाला ठेऊन त्या सर्वांचा प्रतिकार करितो[२]. "

---

१ केबल. २ वर्डस्वर्थ.

आयुष्यांत खरं यश मिळविण्यास काय काय जरूर आहे?
" फक्त एकच गोष्ट हवी. पैसा नको; सत्ता नको; हुशारी नको; मोठें नांव नको; स्वातंत्र्य नको; आरोग्य हवेंच असें नव्हे; फक्त शुद्ध आचरण, चांगली संस्कृत झालेली इच्छा, हीच खरोखरी आपला बचाव करील; व ह्या अर्थानें आपलें संरक्षण झालें नाहीं तर आपण खरोखरी पापी[1]. "

तुह्मी जें आपलें आचरण ठरवाल तें तुह्मांला करितां येईल. सर्वांना कवि किंवा गवई, मोठाले कारागीर, अथवा शास्त्रज्ञ होतां येणार नाहीं.

" स्वभावतः ह्या कामाकरितां आह्मी योग्य नाहीं असें ज्या गोष्टींबद्दल आपणांला ह्मणतां येणार नाहीं अशा पुष्कळ गोष्टी आहेत. तर जे गुण तुमच्या अगदीं हातांतले आहेत ते तरी दाखवा. निष्कपटीपणा, गांभीर्य, मेहनत, सोसूकपणा, चैनबाजीचा तिटकारा, औदार्य, स्पष्टवक्तेपणा, उधळपट्टीच्या ठायीं अनादर, धरसोडपणाचा त्याग, मनाचा मोठेपणा हे तरी गुण दाखवा. किती गुण तुह्मांला लगेंच दाखवितां येतील असें तुह्मांला वाटत नाहीं का? ह्या ठिकाणीं स्वाभाविक अयोग्यता किंवा बुद्धीची कमतरता ह्यांची सबब नको. तरी तूं आपण होऊन बुद्धिसामर्थ्याच्या योग्य वाढीस येत नाहींस. सृष्टीनें कमी बुद्धि दिली ह्मणून कुरकुर करणें, नीचपणा करणें, हांजी हांजी करणें, आपल्या शरीराला दूषणें देत बसणें, लोकांना खुष करण्याचा यत्न करणें, उगाच अवडंबर करणें, मन अस्वस्थ ठेवणें इत्यादि गोष्टी करणें तुह्मांला जरूर आहे काय? ईश्वरसाक्ष अशी जरूरी नाहीं; पण ह्या गोष्टींतून तुह्मी केव्हांच पार पडलां असतां. तुह्मी

---

१ ब्ल्यॅकी.

जरी खरोखरी थोडे निर्बुद्ध असलांत व गोष्टी चटकन कळत नसल्या, तरी त्याबद्दल देखील तुह्मीं काळजी घेतली पाहिजे. त्याची हयगय करूं नये किंवा आपण निर्बुद्ध आहोंत ह्यांत संतुष्ट असूं नये. "

ज्याबद्दल तुह्मांला लाज वाटायला कारण राहील असें कांहीं-ही करूं नका. एक चांगलें मत तुह्मांला फार महत्वाचें आहे, तें कोणतें ह्मणाल तर तुमचें स्वतःचें. सेनिका ह्मणतो–"मन शुद्ध असणें ही एक नेहमींची मेजवानी होय. "

फ्रँकलीनें बऱ्याच उपदेशपर गोष्टी सांगितल्या आहेत. त्या-बद्दल आपण त्याचे ऋणी आहोंत. पण त्यानें सांगितलेली एक मसलत बरी ह्मणतां येत नाहीं. सद्गुणांचा थोडक्यांत स्पष्ट तपशील दिल्यावर तो ह्मणतो—" हे सद्गुण अंगवळणीस पाड-ण्याचा माझा बेत असल्यामुळें, ते सद्गुण एकदम मिळविण्याच्या भरीस पडून मन शतधा करूं नये, पण एकेका गुणावर पूर्ण लक्ष द्यावें, व एका गुणावर पूर्ण सत्ता मिळविल्यावर दुसरा गुण घ्यावा व ह्याप्रमाणें तेराही गुण अंगीं आणावे, हें बरें असें मीं ठरविलें." ( नेमस्तपणा, मौन, व्यवस्थितपणा, निश्चय, काटकसर, उद्योग, निष्कपटीपणा, न्याय, मिताहार, स्वच्छता, शांतता, शुद्धता व नम्रता. )

ह्या सिद्धांताप्रमाणें तो खरोखर वागला असेल असें मानणें कठीण आहे. कारण "जर सैतानाचा एक नातलग आपल्या घरीं आणलात तर बाकीचीं माणसें यावयाचींच. "

बिशप विल्सन ह्मणतो " एकाद्या गरीब माणसाला एकाद्यानें पैसा देतांना व त्याला पिठ्यांत जा व तेथें उडीव, किंवा जुगा-

---

१ मार्कस आरिलीअस.

रांत तो टाक, अथवा एकादें लहान पोराचें खेळणें घे, असें सांगतांना ऐकिलें तर आपणांस किती आश्चर्य वाटेल. मग जें काम दुसऱ्यास करावयास सांगितलें असतां आपणांस हंसतील तें काम आपण कां करावें ? "

श्रेष्ठतर गोष्टींकडे लक्ष द्या. आपल्या खालच्या पायरीकडे पाहूं नका. बेकन्सफील्ड ह्मणे—" जो मनुष्य वर पहात नाहीं त्याला खालीं पाहिलें पाहिजे. जो आत्मा वर चढण्यास धजत नाहीं त्याला खालींच रखडत राहिलें पाहिजे. "

" जोंपर्यंत त्या शब्दांत मोहिनी आहे, जोंपर्यंत त्याच्या योगानें अंग फुरफुरावयाला लागतें, हृदय वीरश्रीनें धडधडूं लागतें, जुने जे वीर त्यांच्या बद्दल विचार मनांत आल्याबरोबर तरुण बांड आळसावून पडलेल्या बिछान्यावरून ताडकन् उठतात व हात वर करून त्यांच्यासारखें वीरश्रीनें काम करूं अशी शपथ वहातात; तोंपर्यंत मोठें नांव हा वायफळ शब्द आहे असें विचार केल्याशिवाय कोण ह्मणेल ?"

मनुष्यदेहाचा सारासारविचार केला तर, महत्वाकांक्षा ज्या स्वरूपानें दृष्टीस पडते त्याचा विचार करण्याचें प्रयोजन दिसत नाहीं. खरोखर आपलीं मोठालीं माणसें शेक्सपीयर, मिल्टन, न्यूटन, आणि डार्विन ह्यांना, सरकार ज्या पदव्या देतें, त्या पदव्यांचा किंवा मोठ्या मानांचा कधीं उपयोग झाला नाहीं. साधारण महत्वाकांक्षेचें व्यंग असें आहे कीं, तिची तृप्ती होत नाहीं. ज्याप्रमाणें पर्वत चढतांना एका शिखरावर चढलों ह्मणजे दुसरें शिखर वर दिसतें. उदाहरणार्थ, सर्वांत मोठे जेते अलेक्झॅन्डर, नेपोलियन इ० हे कधीं तृप्त झाले नाहींत. भलत्याच महत्वाकांक्षेच्या

---

१ जोआना बेली.

भक्ष्यस्थानीं पडल्यामुळें त्यांची तृप्ती न होऊन त्यांना ईश्वराचे आभारी होतां आलें नाहीं. बेकन ह्मणतो—"ज्या माणसाला पुढें पुढें जाण्याची संवय आहे त्याला जर अडथळा आला तर तो स्वतःशींच रुष्ट होतो, व तो निराळाच माणूस बनतो."

तरी पण पोपसारखें ह्मणणें फारच झालें.

" वैभवयुक्त आयुष्याचा कार्यभारानें व्यापृत असा एक तास वैभवरहित संबंध आयुष्याबरोबर आहे."

स्वार्थपर महत्वाकांक्षा ही वेताळाच्या स्वारीसारखी आहे. ती फसविणाऱ्या प्रकाशाप्रमाणें होय.

" महत्वाकांक्षा ही मोठी फसवी होय. ती बुद्धिमान् तरुणांच्या खोलींत शोधित जाते. त्यांची खिडकी उघडते व आंत शिरते. खोलीच्या अरुंद भिंती मोठ्या होतात व त्यांचा विस्तीर्ण राजवाडा होतो. त्याचें छप्पर आकाशापर्यंत जातें. अदृश्य हातांनीं छतावर सोनेरी नक्शी तयार होते व सर्व वस्तूंवर सोनेरी अक्षरांनीं त्यांचें नांव पडतें × × × × × आणि ह्या सर्वांचा फायदा काय? फार झालें तर मोठें नांव मिळतें. त्याची प्रशंसा होते—पण असा वेळ येईपर्यंत कर्ण ह्मातारपणामुळें बधिर झालेले असतात. पैसा मिळतो—पण त्याच्या योगानें ज्या इंद्रियांस सुख व्हावयाचें तीं क्षीण होतात. पुष्पमाला मिळतात—ज्या केशांवर ती माला घालावयाची ते केश पांढरे झालेले असतात. मोठें नांव मिळतें—ज्या हृदयाला त्यापासून आनंद व्हावयाचा तें हृदय कठिण होतें. त्या वेळीं प्रीतीशिवाय सर्व कांहीं मिळतें; व प्रीति मात्र हवी असते. इतक्यांत मृत्यु येतो व ह्या निरुपयोगी वस्तु आपल्या आहेत असें वाटायाला लागण्यापूर्वींच तो आपणास नंगाच मसणांत नेतो[१]."

१ वुइलिस.

नुसत्या पदवीचा काय उपयोग? फ्रान्सची राणी मेरी डी मेडिची फ्रान्सची रिजंट, फ्रान्सच्या राजाची, स्पेनच्या राणीची, इंग्लंडच्या राणीची, सेव्हायच्या डचेसची आई, हिला तिच्या पोरांनीं सोडिलें, त्यांनीं तिला आपल्या राज्यांत येऊं दिलें नाहीं, व शेवटीं दुःखांत, दहा वर्षांचा त्रास सोसून बहुतेक उपासमारानें कलोन येथें ती मेली.

मुकुट ह्मणजे बहुतेक कांट्यांचेच मुकुट होत. तो मुकुट घालणारा जितका जास्त नेकीचा असतो, तितकी जबाबदारी त्याच्या मनाला जास्त लागत असते. निश्चय करितांना एकादी लहानशी चुकी झाली तर हजारों माणसांना दुःख होईल ह्या विचारांमुळें चिंता वाटल्याशिवाय रहाणें अशक्य आहे.

सुधारणा होत गेली—मग ती कितीका थोडी असेना—कीं आयुष्य आल्हादकारक वाटूं लागतें, त्याशिवाय, तें नकोसें होतें. कारण, "कांहीं काल असा असतो कीं, त्या वेळीं गायन, काव्यें, व सृष्टिसौंदर्य इत्यादि गोष्टी आत्मोन्नतीस जी जी मदत करितात त्या मदतीचा उपयोग करून घ्यावा असें सर्वांना वाटतें."

माणसाची उन्नति व्हावी असा ईश्वराचा मानस दिसतो, त्यानें तसेंच रहावें असा दिसत नाहीं. कांहीं असो पुष्कळ माणसांना एकाच स्थळीं तसेंच रहातां येणार नाहीं. पुढें गेलें पाहिजे; नाहीं तर मेलें पाहिजे. तथापि, महत्वाकांक्षा धारण करण्यापूर्वीं ज्याप्रमाणें परिणामाविषयीं आपण विशेष काळजी करितों, त्याप्रमाणें साधनांविषयीं काळजी घेतली पाहिजे; दुष्ट साधनांनीं साध्य झालेली बाह्यात्कारीं दिसणारी भरभराट खरोखर अपयशासारखी आहे. तर मग आपल्या स्वभावास लागणाऱ्या ह्या दोन गोष्टींची कशी मेळ घालावी? आत्मसंयमन करणें ही आपली महत्वाकांक्षा असली पाहिजे. हाच सर करण्याचा गड

होय; व खरी उन्नति ह्मणजे अधिक जाणण्याची, अधिक उच्च स्थितीस येण्याची, अधिक कर्तव्यकर्में करण्याची इच्छा होय. ह्या उन्नतीला खळ नको. प्रत्येक पायरीस उन्नतीचा मार्ग दृढ होत जातो; दुर्घट होत नाहीं. आपलें कर्तव्य करणें हीच मोठी व पहिली महत्वाकांक्षा माणसास असावी. "कवीचा मान त्याला मिळत नाहीं. कोणत्याही सांप्रदायानें तो बांधला जात नाहीं. स्तुती करणारें मित्रमंडळ त्याची वाहवा करण्यास तयार नसतें. त्याला दूषण देण्यास शत्रूही नसतात. ज्याच्याजवळ मोठासा भपका नाहीं किंवा सौंदर्य नाहीं, पण ज्याच्या अंगीं प्रामाणिक-पणा आहे, व जो कर्तव्यकर्मास जागृत आहे अशा त्या माणसाला मृत्यु नेतो.[१]"

वेलिंग्टननें लिहिलेल्या खलित्यांत "मान" हा शब्द मुळींच नाहीं असें ह्मणतात. "कर्तव्यकर्म" हा त्याचा आयुष्यांतला मुख्य हेतु होता. महत्वाकांक्षा न सोडितां साधुसंतांचा आयुष्य-क्रम जो होता तो असूं द्या.

"इतिहासांतील निष्फळ झालेल्या पानांवर १० हजार राज-कर्ते निपजले तर एक साधू निपजतो, असें दाखवून वृथा अहं-कारानें देखील, जें वैभव मिळविण्याची इच्छा तो करित होता, त्या वैभवाला खरा मार्ग लावून दिला.[२]"

शंभर वर्षांनंतर तुह्मी श्रीमंत होतां किंवा गरीब होतां, सरदार होतां कीं धनगर होतां, ह्याचा काय उपयोग होणार? पण योग्य तें केलेंत किंवा अयोग्य तें केलेंत ह्याचा बराचसा उपयोग नाहीं का होणार?

"आपण काय विचार करितों, आपलें किती ज्ञान आहे, आ-

---

१ क्रेक. २ बायरन.

पली धर्मबुद्धि काय आहे, हीं शेवटीं फारशीं उपयोगीं पडावयाचीं नाहींत; आपण काय करितों हें महत्वाचें आहे[१]."

"पण ज्ञान कोठें सांपडणार? व तें समजण्याची जागा कोठली? ज्ञानाची किंमत माणसास कळत नाहीं, सजीव प्राण्याच्या राष्ट्रांत (पृथ्वीवर) तें सांपडत नाहीं, अनंत जें विश्व, तें माझ्याजवळ ज्ञान नाहीं असें उत्तर देतें, सागरही तें माझ्या ठायीं नाहीं असें सांगतो. सोनें देऊन तें मिळत नाहीं; किंवा रुप्याच्या भारंभार वजनाला तें मिळत नाहीं. ×× मोतीं व पोंवळीं ह्यांची तर कथा काय? त्यांची किंमत माणकाच्या किंमतीपेक्षां जास्त आहे×××× आतां ज्ञान कोणतें ह्मणाल तर ईश्वराची भीति; व वाईटापासून दूर रहाणें, ह्याचें नांव समजूत[२]."

सचोटीनें वागा व सत्य बोला. जीन पॉल रिच्टर ह्मणतो "पृथ्वीवरील पहिलें पाप असत्य हें होय. व सुदैवेंकरून सैतानानें तें ज्ञानाच्या फळाबद्दल सांगितलें. सचोटी हाच खरा उत्तम मार्ग."

"खोटा तराजू असणें हें ईश्वराला खपत नाहीं. पण रोख चोख वजन त्याला आवडतें."

चॉसर ह्मणे—"माणसांना बाळगण्यास उत्तम वस्तु ह्मणजे सत्य होय." फॉक्लंडविषयीं क्लॅरन्डन ह्मणतोः—"सत्य त्याला इतकें पूज्य होतें कीं, असत्य बोलणें व चोरी करणें ह्या दोन गोष्टी त्याला सारख्याच होत्या." "सत्याला सोडणें ह्मणजे, माणूस ईश्वराला तुच्छ मानतो, व नंतर माणसाला घाबरूं लागतो असें मानण्यास चांगला पुरावा होय[३]."

आपण जर अन्याय केला असला तर आपणाला लाज वाटावी

---

१ रस्किन. २ जोब. ३ प्लुटार्क.

हें बरें, पण तो कबूल करण्याची लाज वाटूं नये. "माणसाला माणुसकी येण्यास, व जें काम करण्यास ईश्वरानें त्यास नेमिलें त्या कामाकरितां स्वतःला योग्य करण्यास, असंख्य गुण लागतात; पण एक गुण अंगीं असलाच पाहिजे. त्याशिवाय उत्तम आयुष्यक्रम झालाच नाहीं, त्याशिवाय कोणतेंही मोठें काम करितां येत नाहीं; तो गुण सत्य होय; तें अंतस्थ सत्य होय. खऱ्या चांगल्या व मोठ्या माणसांचीं उदाहरणें घ्या. त्यांना आपण मोठें व चांगलें कां ह्मणतों? कारण ते स्वतःला ओळखण्यास शिकले होते. व जो आयुष्यक्रम त्यांनीं पत्करला तो घेण्याचें त्यांच्यात धैर्य होतें[1]."

"सर्वांत ह्याची विशेष काळजी घ्या—स्वतःशीं सत्यपणें वागा, ह्मणजे, ज्याप्रमाणें दिवस झाल्यावर रात्र येते, त्याप्रमाणें कोणाशीं तुमचें खोटासाळपणाचें वर्तन होणार नाहीं हें आलेंच[2]."

वर्डस्वर्थ ह्मणे—"दोन गोष्टी–जरी त्या प्रतियोगिक दिसतात तरी त्या एकत्र असल्या पाहिजेत. त्या ह्या–माणुसकीस शोभेल असें इतरांवर अवलंबून रहाणें, व स्वातंत्र्य ह्मणजे इतरांवर भार टाकणें व स्वतःवर भार टाकणें."

आज्ञा पाळण्यास शिका ह्मणजे सत्ता कशी चालवावी हें तुह्मी शिकाल. कवाईत ही शरीरास त्याप्रमाणें मनासही वळण लावणारी होय; व वाईट शिपाई कधीं चांगला सेनापती होणार नाहीं.

"[3]भरभराट झाली तर गर्वानें ताठूं नका. दर्प हा नाशाचा दूत होय, व उद्दाम वृत्ती ही अपयशाच्या पूर्वीं येते."

मनोविकाराच्या ठिकाणीं आपण कर्तृत्वाची, व आळसाच्या

---

१ मॅक्समुल्लर. २ शेक्सपीयर. ३ प्रॉव्हर्ब्स.

ठायीं सहनशीलतेची भावना करितों, पण ही चुकी आहे. सहनशीलता अंगीं आणण्यास सामर्थ्य हवें, पण मनोविकार चंचल वृत्तीचा व अनियंत्रितपणाचा द्योतक होय.

तुमची अधिकाराच्या ठिकाणीं नेमणूक झाली असल्यास अगदीं न्यायानें व नम्रपणें वागा. सादी ह्मणतो— एका पाश्चात्य राजानें एका निरपराधी माणसाला ठार मारण्याचा हुकूम केला. तेव्हां तो ह्मणाला—"राजा तूं स्वतःकडे लक्ष्य दे. मला दुःख होईल पण तुला अखंड डाग लागेल."

सत्तेबरोबर जबाबदारी येते. पण केव्हांही आपल्यास काय आवडतें ह्याचा विचार करूं नका; आपण काय केलें पाहिजे त्याचा विचार करा. हाच सुखाचा खरा मार्ग.

दोन कर्तव्यांबद्दल संशय असल्यास अगत्याचें तेवढें करा. परधर्मीयांसाठीं कांहीं लोक आपल्या कुटुंबाची हयगय करितात. पण धर्मप्रमाणें भूतदया पहिल्यानें घरांतून सुरू झाली पाहिजे.

ह्या जगांत सर्व गोष्टी धार्मिकतेकडे धांव घेत आहेत. ह्याबद्दल आपली खात्री सहज करून घेतां येईल. पापाबद्दल शिक्षा होईल असें आपण बोलत असतों; पण आपणांस कोण शिक्षा करितो? आपणच स्वतःला शिक्षा करून घेतों. जगाची अशी कांहीं रचना केलेली आहे कीं, चांगुलपणा सुखकारक होतो व वाईटपणा दुःखजनक होतो. पाप करावें व त्याबद्दल शिक्षा होऊं नये असें मानणें ह्मणजे सृष्टिनियमांत व्यत्यय आणण्यासारखें आहे. पापाची क्षमा होते ह्मणजे आपणांस शिक्षा होणार नाहीं असा अर्थ नव्हे. तें अशक्य आहे इतकेंच नव्हे, तर तसें झालें, तर एक दुर्दैवच. वस्तुतः वाईट करूनही चलती असणें हें एक दुर्भाग्यच. वाईट केलें तर मागचें स्मरण पुढें तुह्मांला भूतबाधेप्रमाणें नाडील. ज्यांचें तुह्मीं नुकसान केलें ते तुह्मांला क्षमा करितील; पण तसें

करितांना तुमच्या डोकीवर आग पाखडल्याप्रमाणें होईल. कारण त्यांच्या औदार्यामुळें तुमचा अपराध अधिक ढोबळ दिसूं लागेल.

सदाचरण हेंच खरें आयुष्य; शेवटीं सुख व भरभराट त्यावर अवलंबून रहातात. बाह्य गोष्टी फारशा महत्वाच्या नसतात. आपण कसे आहोंत हें जितकें महत्वाचें तितकी आपली परिस्थिति महत्वाची नाहीं. तर मग अहर्निश स्वतःवर पहारा ठेवा. संवयी हा एक दुसरा स्वभावच होय. "कार्यरूपी बीज पेरा ह्मणजे संवयरूपी फळें संपादन करितां येतील. संवयरूपी बीज पेरा, ह्मणजे सदाचाररूपी फळ मिळेल, सदाचार मिळाला ह्मणजे दैव उघडलें." आपण रोज थोडें थोडें वाढतों. मग जास्त वाईट होतों अथवा जास्त चांगले होतों. रात्रीं, आपण बरें होत चाललों कीं, वाईट होत चाललों, हें तपासून पाहणें चांगलें आहे.

एमरसन ह्मणतो—"मनुष्यजातीचे दोन भाग पडतात. एक भाग कल्याण करणारे व दुसरा अकल्याण करणारे. तुह्मी दुसऱ्या भागापैकीं असलांत तर तुह्मी मित्रांचे शत्रु करितां. गत गोष्टींची आठवण क्लेशकारक होते, व आयुष्य दुःखमय वाटूं लागतें. जरा कारागारासारखी होते व मृत्यु भयप्रद वाटूं लागतो. उलट पक्षीं दुसऱ्याच्या मनांत जरी एक समाधानकारक सुविचार घालून दिलात, किंवा दुसऱ्याच्या आयुष्यांतील एक तास सुखाचा करून दिलात तर तुह्मीं देवदूताचें काम केलेंत."

प्रत्येक माणसानें दररोज एक तास—फक्त एकच तास,—निदान अर्धा तास तरी एकांत वासांत मनन करण्यांत व शांततेंत घालवावा. वेळ नाहीं असें ह्मणणें अशक्य आहे. कॉमन्स सभेंतून परत आल्यावर रात्रीं सर आर पील बायबलचा एक सर्ग वाचित असे. कामन्स सभा त्या वेळीं सध्यासारखी इतका उशीरपावेतों चालत नसे.

बऱ्याचा विचार करा ह्मणजे तुह्मी वाईट करणार नाहीं. "मरण, अंत्यशासन, स्वर्ग, नरक, ह्यांविषयीं जो वारंवार विचार करितो तो सुखानें मेला पाहिजे[१]." व त्याबद्दल बक्षिसही मोठें असतें.

"माझ्या मुला, माझे नियम विसरूं नकोस. पण तुझ्या हृदयांत माझ्या आज्ञा वागूं दे. (रात्रंदिवस व सर्व आयुष्यभर) त्याच्या योगानें तुझ्या सुखांत भर पडेल[२]."

हें काम लांबणीवर टाकूं नका. तारुण्य ही सबब नको. मार्गरीट दी वॅलोआ ह्मणे—"आमच्या हाडांवर चिमुटभर मांस राहिलें नाहीं ह्मणजे आपण अगदीं सद्गुणी होऊं."

तारुण्याच्या भरांत तुमच्या उत्पन्नकर्त्याची तुह्मांला आठवण होऊं द्या. आपल्या इच्छेप्रमाणें मरावें असें वाटत असल्यास योग्य रीतीनें वागलें पाहिजे. चांगल्या माणसास मृत्यूचें भय नाहीं. थर्वाल शेवटच्या दुखण्यांत, पुढील वाक्य सात भाषेंत लिहिण्यांत गुंतला होताः—"निद्रा ही मृत्यूची बहीण व ह्मणून निद्रारूपी मृत्यूंतून, व मृत्युमय निद्रेंतून जो जागृत करणारा त्याच्यावर निजतेवेळीं हवाला टाका."

सिसरो ह्मणतो—"जेव्हां सॉक्रेतीस त्याच्यावर आरोप आणणाऱ्या लोकांपुढें उभा होता, तेव्हां देहांत शिक्षा झाली आहे अशा माणसाप्रमाणें तो दिसत नव्हता. तर स्वर्गास जाणाऱ्या माणसाप्रमाणें दिसत होता."

"जर आपलें कर्तव्य शौर्यानें व उदारपणानें केलें तर तुह्मांला काय मिळेल? तें करणें तुह्मांला मिळेल." तें कृत्य तुमचें होईल. योग्य तें केलें पाहिजे. तें लाभाच्या आशेनें व शिक्षेच्या भीतीनें करूं नका, परंतु जें चांगलें आहे त्याच्या आवडीनें तें

---

१ सर वाल्टर रेले. २ प्राव्हर्ब्स.

करा. कारण, "माझ्या हृदयांतील अत्यानंद हेंच तुझ्या कृत्याचें सर्टिफिकेट असें येशू ह्मणाला आहे."

फुलर सर फ्रॅन्सिस ड्रेकबद्दल लिहितांना ह्मणतो–"त्याचा आयुष्यक्रम शुद्ध होता, तो देवघेवींत चोख होता, आपला शब्द राखणारा होता; हाताखालच्या लोकांशीं तो दयेनें वागे, व आळसासारखा तो दुसरा कशाचाही द्वेष करीत नसे. महत्त्वाच्या कामांत तो लोकांच्या देखरेखीवर अवलंबून रहात नसे, मग तो कितीही प्रामाणिक व चतुर असो. तो संकटांस तुच्छ मानीत असे, व कोणते श्रम नाकारीत नसे. ज्या प्रसंगीं धैर्य, चातुर्य, व उद्योग इत्यादींचा उपयोग लागे त्या प्रसंगीं तो हजर असावयाचाच."

आपणांस पूर्ण होतां येणार नाहीं हें आपणांस माहीत आहे, तरी पण सद्वर्तन, व इतर गोष्टींत पूर्णता अंगीं आणण्याचा आपला रोंख असावा. आणखी आपल्या देहांत कधीं न फसणारा वाटाड्या आहे, व सदसद्विवेक बुद्धीप्रमाणें चाललों तर आपण फारसे चुकणार नाहीं. प्रत्येकाला मर्जी असल्यास आपलें आयुष्य उदात्त गोष्टींत घालवितां येईल.

ह्मणून प्रत्येकानें आपल्या पुढें उत्कृष्ट उदाहरण घ्यावें.

"मनुष्यानें मनुष्यत्व विसरून वरच्या पायरीस चढण्याचा यत्न केला नाहीं तर मनुष्यप्राणी किती क्षुद्र आहे."[1]

ह्या रीतीनें–व ह्याच रीतीनें तसें होणें शक्य असल्यास–तुह्मांला असें वळण लावून घेतां येईल कीं, जर तुह्मी पुरुष असलांत तर सीझरविषयीं मार्क अॅन्टनीकडून शेक्सपीयरनें वदविलें आहे तेंच तुमच्याविषयीं ह्मणतां येईलः—

---

१ व्हॅागन.

"त्याचा आयुष्यक्रम शांततेंत गेला. आणि स्वभावाच्या निरनिराळे प्रकृतींचें असें एकीकरण झालें होतें कीं, हा खरा माणूस" असें सृष्टीला उभें राहून सर्व जगाला सांगतां आलें असतें. आणि जर तुह्मी स्त्री असलांत तर तुमच्या विषयीं असें ह्मणतां येईल—

"ती खरी स्त्री होती. तिच्या स्वभावाचे घटकावयव योग्य रीतीनें रचिले होते; ह्मणजे, तिला वेळ पडल्यास इशारत देण्याचें, वेळ पडल्यास समाधान करण्याचें, व प्रसंगीं हुकूम बजावण्याचें कळत होतें. इतकें असून तिचा स्वभाव शांत व आनंदी होता व त्यांत दैविक स्वभावाची झांक होती."

सर वाल्टर स्काटचे लाकार्टला उद्देशून शेवटचे हे शब्द होते.

"सद्गुणी हो, धार्मिक रहा आणि चांगला माणूस हो. ह्या ठिकाणीं (शेवटचा निजण्याच्या थरावर आलास कीं) दुसऱ्या कोणत्याही गोष्टीनें तुझें समाधान होणार नाहीं."

बालामची देखील हीच इच्छा होती, "मला धार्मिक माणसांचें मरण येवो व त्याच्या मरणाप्रमाणें माझा अंत होवो."

---

१ वर्डस्वर्थ.

# भाग १८.

## शांतता व सुख.

भरभराट आणि सुख हीं एका ठिकाणीं नेहमीं सांपडतात असें नव्हे. बाह्यात्कारीं सुखी होण्यास सर्व गोष्टींची अनुकूलता असून पुष्कळ लोक दुःखी असतात. आवडत्या बलवत्तमास सृष्टि हातीं असेल तें सर्व देवो, पण तिच्यानें त्याला सुखी करवत नाहीं. सुखी होण्याचें काम त्यानें स्वतः केलें पाहिजे. ऐहिक गोष्टींत यश मिळविण्यांत घालविलेला आयुष्यक्रम संकटें व चिंता ह्यांनीं भरलेला असतो. सुख मिळवून घेण्याचा गुण अंगीं नसला, तर सृष्टिसौंदर्य, तिचें नानाविधत्व, ऐहिक सुखें, व मन गुंतविणाऱ्या गोष्टी ह्यांमुळें तें त्याला मिळणार नाहीं. शॉपेनहॉर ह्मणतो—"एका माणसाला हें जग ओसाड, निरस आणि वरवरलें वाटतें, दुसऱ्याला तेंच मनुष्यांस रहाण्यास योग्य, मन रंजविणारें व अर्थयुक्त भासतें." सारंगी वाजविण्याचा अभ्यास करावा लागतो त्याप्रमाणें सुख करून घेण्याचा अभ्यास करावा लागतो. योग्य साधनें मिळविलीं तर सुख मिळतें. पण, तें तावून सुलाखून पाहण्यांत अर्थ नाहीं. "जर ऑर्फिअसप्रमाणें मागें वळून बारकाईनें पाहिलें तर सर्व उत्तम सुखें मृत्यु सुचवितातं[1]."

"सुख मिळविण्याचा यत्न करा ह्मणजे तें तुह्मांस मिळेलं[2]." स्वतःलाच मोठा समजूं नका. जगांत तुह्मीच एकटे नाहीं. रस्किन ह्मणतो—"करमणुकीच्या गोष्टी शोधण्याच्या खटपटींत

---

१ डॅलास. २ फ्रँकलीन.

पडूं नका, पण करमणूक करून घेण्यास नेहमीं तयार असा. ”

आपलें आयुष्य सुखांची एक मालिका करणें हें मोठें काम होय. मग तीं सुखें बारीकसारीक का होईनात?

उदाहरणार्थ विनोद करण्याची शक्ति ही मनुष्यमात्रांत मात्र सांपडणारी ईश्वरी देणगी होय. प्राण्यांना विचारशक्ति आहे किंवा नाहीं ह्याबद्दल संशय आहे; पण त्यांच्या अंगीं हास्यरस नाहीं हें बहुतेक स्पष्ट दिसतें. चाम्फर्ट ह्मणतो—“ज्या दिवशीं आपण मुळींच हांसलों नाहीं तो दिवस अगदीं फुकट गेला.” आनंदसूचक हास्य ऐकणें किती गोड वाटतें! त्याच्यामुळें सर्वत्र आनंदच आनंद कसा होतो!

“आनंदी माणसाला, सर्व दिवस जातो. दुःखी प्राण्याला तास कंटाळवाणा वाटतो.[1]”

आपला एक बिशप बोलतो—“आनंदी स्वभाव असला ह्मणजे १० क्रिश्चन धर्म साधला.” व तुह्मांला राग आलाच तर राग असतांना दिवस मावळूं देऊं नका. भांडणांस दोन पक्ष लागतात; तुह्मी एक पक्ष होऊं नका. कांहीं लोकांचीं नेहमीं पिरपिर असते. ते स्वर्गांत जन्मले असते तरी त्यांस कुरकुर करण्यास बरेंच सांपडलें असतें. इतर कांहीं लोक कोठें गेले तरी सुखी असतात. त्यांना सर्वत्र देवाचे उपकार व सृष्टिसौंदर्य दिसतें.

“जर भीति पृथ्वींत गडप झाली असती, व आशा व्यर्थ झाल्या नसत्या, अथवा प्रीति नष्ट झाली नसती तर हीच पृथ्वी कशी स्वर्गमय वाटली असती.[2]”

आनंदी स्वभाव हा नीतिमत्तेला पौष्टिक औषधासारखा आहे. ज्याप्रमाणें सूर्यप्रकाश फुलें उफलावयास लावितो, व फळें पक्क-

---

१ शेक्सपीयर. २ मॉरीस ऐहिक स्वर्ग. II १२२

तेस आणितो त्याप्रमाणें आनंदी स्वभाव स्वातंत्र्याच्या भावनेस व जीवित्वास पुष्टि आणितो, व आपणांत चांगुलपणाचीं जीं बीजें असतील व जें चांगलें ह्मणून असेल तें वाढीस आणितो.

आनंदी स्वभाव असणें हें इतरांस उद्देशून आपलें कर्तव्यच होय. ज्या ठिकाणीं इंद्रधनुष्याचें टोंक पृथ्वीस स्पर्श करितें त्या ठिकाणीं सुवर्णाचा पेला सांपडतो अशी एक जुनी समजूत आहे. त्याप्रमाणेंच कांहीं माणसें अशीं असतात कीं, त्यांचें हास्य, त्यांच्या बोलण्याचा नाद, त्यांचें सांनिध्य हीं सर्व सूर्यकिरणाप्रमाणें, ज्यांना स्पर्श करितात त्यांना सुवर्णमय करून टाकितात. जोंपर्यंत माणसास आनंदवृत्ति ठेवितां येते तोंपर्यंत माणूस हताश होत नाहीं. आनंदी हृदय हें त्या माणसांस व त्याचप्रमाणें इतरांसही एकाद्या मेजवानीसारखें वाटतें. फ्लॉरेन्स नायटिंगेलच्या नुसत्या वाऱ्यानें माणसें बरीं झालीं; तितकीं तिच्या औषधानें झालीं नाहींत; व आपण इतरांच्या दुःखभारास हात लाविला तर आपला दुःखभार हलका वाटतो.

आनंदी वृत्ति ह्मणजे विचारशून्यता असें मानिलेलें दिसतें. परंतु त्यांच्यांत कांहीं संबंध दिसत नाहीं. आर्नल्ड ह्मणतो— "आनंदी वृत्ति ही ह्या जगांतली एक मोठी देणगी होय. गंभीर विचार आणि अति कोमल प्रीति, ह्यांच्या सहवासांत ती वारंवार आढळते; व ईश्वरदृष्ट्या जो मूर्ख त्याची कठीण हृदयता व निर्बुद्धता ह्यांच्या सहवासापेक्षां पहिल्या सहवासांत ती जास्त शोभते."

ज्यांचा जन्म ह्मणजे सक्त मजुरीची शिक्षा असे पुष्कळ लोक असतात. पण हें फक्त गरीब लोकांस लागून नाहीं, श्रीमंत लोक सुद्धां आतां अतिशय मेहनत करितात, तशांत

ज्यांना आपला पैसा दुःखकारक वाटतो, असे लोक किती आहेत. त्यांच्या आयुष्यक्रमांत विश्रांति, शांतता व स्वास्थ्य मुळींच नसतें. ह्या जगांत दुःख टाळतां येत नाहीं, पण वाटल्यास तें सह्य करितां येतें. असें करण्यास आपल्या स्मरणशक्तिरूपी भिंतीवर सुंदर गोष्टींचीं चित्रें व आल्हादकारक आठवणी टांगून ठेविल्या पाहिजेत. सर्वांना सुख भोगावेसें वाटतें पण सुखी कसें व्हावें हें थोड्याच लोकांना कळतें; त्यांना ह्या देहाच्या महतीची व सौख्याची सानुभूति होत नाहीं.

लहान सहान संकटांचा बडिजाव वाढवून तीं असह्य प्रसंगांसमान मानूं नका. सिसरो ह्मणतो—"ज्यानें अनंत व अपार विश्वाबद्दल विचार केला आहे त्याला ह्या जगांतील कोणतें संकट मोठें वाटेल? कारण ह्या टिचभर आयुष्यांत व मानवी ज्ञानाच्या बटवींत शहाण्या माणसाला कोणती गोष्ट मोठी वाटेल? शहाण्या माणसाचें मन नेहमीं इतकें सावध असतें कीं, कोणती गोष्ट त्याला आकस्मिक वाटत नाहीं."

कोठें सालटी निघण्यापुरती जखम झाली कीं, प्राणघातक जखम झाली असें वारंवार वाटतें.

फुलर ह्मणतो—" लहानशी जखम बरी करण्यास एका वैद्याला बोलाविलें, त्यानें पलास्टर आणण्यास एकाला घाईनें पाठविलें. तेव्हां तो गृहस्थ ह्मणाला—काय जखम इतकी असाध्य आहे? वैद्यानें उत्तर केलें—नाहीं पण जरी जासूद हळूहळू आला तरी तितक्या वेळांत ती आपोआप बरी होईल." काल हा जखमा बऱ्या करितो त्याचप्रमाणें दुःखें नाहींशीं करितो.

"संस्कृत मनाला, मग तें तत्ववेत्त्याचेंच असावें असें माझें मत नाहीं, परंतु ज्या मनापुढें ज्ञानाचें भांडार उघडें झालें आहे व ज्याला आपल्या शक्तींचा उपयोग करण्याचें साधारणपणें शिक्षण

मिळालें आहे, अशा मनाला सभोंवारच्या पदार्थांत सतत करमणुकीच्या गोष्टी सांपडतीलच; ह्मणजे सृष्ट पदार्थांत, कलाकौशल्याच्या जिन्नसांत, ऐतिहासिक गोष्टींत, कवींच्या कल्पनाशक्तींत, पुरातन काळच्या व अर्वाचीन काळच्या रीतिभातींत आणि आपल्या भावी स्थितींत इ०. त्या सर्वांचा तिटकारा येणें हें शक्य आहे, व तें देखील त्यांचा हजारावा अंश संपण्यापूर्वींच; परंतु हें केव्हां घडतें? जेव्हां पूर्वींपासून ह्या वस्तूंत माणुसकीस योग्य व नैतिक असें कांहीं आहे ह्मणून चित्त वेधत नसलें, व फक्त जिज्ञासा तृप्त करण्याकरितां त्यांकडे लक्ष गेलें असलें तर होतें.[1]"

आपण रहातों त्या जगांत अनेक फुलें, झाडेंझुडपें, गवत, नद्या, सरोवरें, समुद्र, पर्वत व सूर्यप्रकाश इत्यादि वस्तु आहेत. सृष्टपदार्थ आनंदी माणसांस आनंदकारक दिसतात, व ज्यांना समाधान करून घ्यावयाचें असेल त्यांना समाधान देणारे आहेत.

"सकाळ शांत होती, सूर्यप्रकाश पडला होता, आकाश निरभ्र होतें, हवेंत थोडें धुकें होतें, पण घमघमाट सुटला होता. व सर्वत्र इतकें कांहीं शांतिमय वाटत होतें कीं, जणूं काय वसंतदेवी मरणाधीन झालेल्या वर्षास शेवटचें आलिंगन देण्यास व हताश झालेल्या जगास चुंबन देऊन सौख्याच्या मनोराज्यांत निमग्न करण्यास आली आहे.[2]"

परंतु सौंदर्याची योग्यता कळण्यास सौंदर्य काय हें कळलें पाहिजे. कुत्रे व हत्ती ह्यांच्या अकलेविषयीं आपण बरेंच ऐकतों. परंतु जगांतील उत्तम देखावा त्यांना सुखकारक वाटेल असें मानण्यास कारण नाहीं.

---

१ मिल. २ मारीस.

आपणांस उदास वाटतें, कांहीं उद्योग नाहीं, असें बोलतांना आपण लोकांना कधीं कधीं ऐकतों. पण त्या उदाहरणांत तो उदासपणा त्या माणसाच्या ठायींच असतो. "सुशिक्षित माणसाला आरोग्य, हात पाय, डोळे, फुरसुतीचा वेळ इत्यादि असतांना जर उद्योग नाहीं, तर मग ज्याला इतक्या देणग्या मिळण्याची योग्यता नाहीं अशा माणसाला ह्या देणग्या ईश्वरानें दिल्या असें ह्मणावें लागतें."

मोठी पदवी किंवा संपत्ति ह्यानें सुख मिळेलच असें ह्मणतां येत नाहीं. मनांत प्रीति नाहीं, उदार बुद्धि नाहीं, किंवा स्वास्थ्य नाहीं, मग तुह्मी, श्रीमंत, मोठे, किंवा सत्ताधीश असलांत तरी तुह्मांला सुखी होतां येणार नाहीं.

अशी एक गोष्ट सांगतात कीं, इराणच्या राजाधिराजाला उदास वाटूं लागलें; ह्मणून त्यानें जोश्याला विचारलें–व त्यानें अगदीं सुखी माणसाची बंडी घातली कीं सुख मिळेल असें सांगितलें. दरबारी लोक व श्रीमंत लोक ह्यांत बराच शोध केला, पण व्यर्थ; असा कोणीच माणूस सांपडेना. शेवटीं कामावरून परत येणारा एक मजूर त्या अटीप्रमाणें योग्य ठरला.

तो पूर्ण सुखी होता. पण अरेरे! त्याच्या जवळही तो उपाय सांपडेना! त्या गरीब माणसाला बंडीच नव्हती.

शाहाण्या लोकांनीं जें एकमतानें कबूल केलें आहे कीं, सुख पैशाला विकत मिळत नाहीं, अथवा सत्तेनें तें पकडतां येत नाहीं, तें मीं अगोदरच दाखवून दिलें आहे. राजमुकुटांना कांटे असतात. हीरो सायमोनाएडीसला ह्मणतोः–"बहुतेक लोक राजभोगाच्या बाहेरच्या भपक्यानें फसतात; व त्यांत मला आश्चर्य वाटत नाहीं, कारण समाज, लोकांना सुखी किंवा दुःखी, मुख्यत्वेंकरून जें बाहेरून दिसतें त्यावरून ठरवितोसें

मला वाटतें. राजभोग जगाला स्पष्ट दिसतो; व ज्या गोष्टी फार मोलाच्या वाटतात त्या सुद्धां स्पष्टपणें दिसतात. पण राजा आपलीं संकटें मनांतल्या मनांत दडपून ठेवितो. व त्या ठिकाणींच माणसाचें सुखदुःख रहातें. मला विचाराल तर मला अनुभवावरून पूर्ण माहीत आहे व मी खरेंच सांगतों कीं, मोठमोठ्या सुखांपैकीं राजांना अगदीं थोडें मिळतें, व मोठमोठ्या संकटांचा मोठा अंश मिळतो."

"सुखाच्या नानापरींचें वर्णन करणें किंवा चांगुलपणाची मन वेधणारी चालचर्या सांगणें हें आह्मांला मुळींच कळत नाहीं. मोठ्या चांगुलपणाबद्दल फार झालें तर इतकेंच ह्मणतां येतें कीं, अमक्याच्या अंगीं अवर्णनीय असा मोहकपणा आहे. उच्चतम सुखाबद्दल इतकेंच बोलतां येतें कीं, त्याचें वर्णन करितां येत नाहीं."[1]

योग्य विचार केला तर डॅन्टे कवीसारखें आह्मांलाही ह्मणतां येईल—

"जें माझ्या दृष्टीस पडलें तें आनंदीआनंदच होय. सर्व वस्तुमात्रांनीं एकदम हास्य करावें त्याप्रमाणें तो आनंद मला वाटला. तुलनेच्या पलीकडे गेलेला तो होता. तो शब्दांनीं बोलून दाखवितां येत नव्हता. शांतता व प्रीति ह्यांनीं भरलेलें तेथलें शाश्वतचें आयुष्य होतें. अपार संपत्ति व अमित सुख तेथें होतें."

शहाणपणाच्या व फायदेशीर अशा नियमांनीं सृष्टींतील पदार्थ बद्ध आहेत. सर्व वस्तूंची सांखळ जुळवून दिली आहे व त्यांच्या बऱ्यासाठीं सृष्टीचा यत्न चालला असतो. आपणांस जर दुःख

---

१ बेकन.

भोगावें लागतें तर तें आपल्या अपराधांकरितां, अथवा साधारण फायद्याकरितां. सेनीका ह्मणतोः—

"जें कर्तव्य बजाविलें असतां तुह्मांस जास्त सुख होणार नाहीं असें कर्तव्यच नाहीं; अथवा जिला उपाय नाहीं अशी मोहाची गोष्टच नाहीं."

सिसरोच्या मतांवरून एपीक्यूरसनें असें ठरवून ठेविलें होतें कीं, "वासना तीन तऱ्हेच्या असतात. १ स्वाभाविक व जरूरीच्या, २ स्वाभाविक असून जरूरीच्या नाहींत, ३ स्वाभाविकही नाहींत व जरूरीच्याही नाहींत. ह्या सर्व वासना अशा असतात. जरूरीच्या आहेत त्या फारसे श्रम न पडतां व खर्च न होतां तृप्त होतात. स्वाभाविक असून जरूरीच्या नाहींत त्यांना देखिल फारसें लागत नाहीं. त्या वासना पुरविण्यास जी संपत्ति पाहिजे ती संपत्ति सहज मिळण्याजोगी व पुरेशी सृष्टि उत्पन्न करिते. वायफळ वासनांविषयीं ह्मणाल तर त्यांना मर्यादा नाहीं व त्यांत मितव्ययही रहावयाचा नाहीं."

हें आयुष्य पूर्णपणें सुखांत घालवितां यावें ह्मणून आत्मसंयमन करण्यास तयार झालें पाहिजे व बाह्यात्कारीं चांगलीं दिसणारीं सुखें गाळलीं पाहिजेत.

मनोविकारांच्या आधीन झाल्यापासून जो आनंद होतो त्यापेक्षां आत्मसंयमापासून जास्त होतो. इंद्रियांच्या ठिकाणीं जरी खरा आनंद देण्याचें असतें, तरी त्यांच्या आधीन झालें असतां ज्याप्रमाणें पुरातन काळच्या नागकन्या खलाशांना खडकावर नेऊन घालित, त्याप्रमाणें इंद्रियें आपणांस आयुष्यांतील भोंवऱ्यांत व खडकांत घालतील.

"ज्याला दुसऱ्याच्या मर्जीप्रमाणें चालावें लागत नाहीं, तो सुखी जन्मास आला, व त्याला चांगलें शिक्षण मिळालें. त्याचे

मोकळ्या मनाचे विचार हेंच त्याचें कवच व साधें कृत्य हीच त्याची करामत.[1]"

आपणांला फुरसत फार थोडी मिळते हें ह्या युगाचें दुर्दैव. आपण सतत चक्रांत सांपडलों आहोंत. "माझें लहानसें शरीर ह्या अफाट जगाला त्रासलें" असें पोर्शियाप्रमाणें किती बायकांना व पुरुषांना वाटतें !

चांगलें काम घाईनें होत नाहीं. विचारास वेळ आणि शांतता पाहिजे.

किंगस्ले म्हणतो:–"आपणांस ज्याची जरूरी आहे ती अंतस्थ शांतता होय, हें मला माहीत आहे. आपल्या डोक्यास, आपल्या हृदयास विश्रांति पाहिजे. शांत, स्थिर, स्वतःशींच समाधान पावणारी व आत्मसंयमी अशी वृत्ति पाहिजे. अशा वृत्तीला उद्दीपन नको; कारण, तिला ग्लानीचा पटका नसतो. तिला मंद करणारें औषध नको, कारण ती चेवत नाहीं. तिला साधूंचे यमनियमादि नकोत, कारण ईश्वरी देणग्यांचा दुरुपयोग न करितां सदुपयोगच करण्यापुरतें सामर्थ्य तिच्या अंगीं असतें. ती वृत्ति खरी मर्यादित आहे, म्हणजे खाण्यापिण्यांतच नव्हे, तर वासना, विचार, कृत्यें इत्यादींत मर्यादित आहे; त्या वृत्तीला अमर्यादित कामविकार किंवा महत्वाकांक्षा ह्यांचें वारें नाहीं; त्यांच्या पाशांत ह्यातारा ॲडम सांपडला, व त्यांमुळें निषिद्ध मार्गांनीं ज्ञानप्रकाश व आयुष्य मिळविण्याचा यत्न त्यानें केला, व रोग व मृत्यु ह्यांच्या आधीन झाला. होय हें मला माहीत आहे; व जर ती वृत्ति सांपडली, ह्मणजे खरी शांतता सांपडते असेंही मला माहीत आहे."

---

१ वॉटन.

एपिक्टेटस ह्मणे—"झ्यूसनें ठरवून ठेवल्याप्रमाणें वागा. जर वागलां नाहींत, तर तुह्मांला दंड द्यावा लागेल व शिक्षा भोगावी लागेल; व ही शिक्षा कोणती ? कर्तव्य न करणें हीच शिक्षा. विनय, सचोटी, योग्य वर्तन ह्याबद्दलचें तुमचें नांव जाईल. ह्याशिवाय आणखी कोणता दंड हवा ?"

रस्किन ह्मणतो—"पुष्कळ गोष्टींची उणीव आहे अशी आपली कुरकुर असते. आपणांस मत देण्याचा अधिकार पाहिजे, आपणांस स्वातंत्र्य पाहिजे, करमणुकीच्या गोष्टी हव्या, पैसा हवा, परंतु आपणांस स्वास्थ्य पाहिजे आहे असें कोणास बरें कळतें व त्याची उणीव कोणास बरें भासते ? पण तें पाहिजे असेल, तर तें दोन मार्गांनीं मिळतें. पहिला मार्ग तुमच्या हातीं आहे. गोड विचारांचें पटल आपल्या भोंवतीं ठेवणें तुमच्या हातीं आहे—सुंदर विचारांचीं किती सुरेख मनोराज्यें करून ठेवतां येतील हें अद्यापि कोणालाही कळत नाहीं. कारण लहानपणीं हें आपणांस शिकविलेलें नसतें. हीं मनोराज्यें किती विपत्ति आली तरी टिकतात. आनंदजनक कल्पना, समाधानाच्या गोष्टींची आठवण, उदात्त ऐतिहासिक गोष्टी, खऱ्या ह्मणी, मौल्यवान् व शांततामूलक अशा विचारांचीं भांडारें, इत्यादि गोष्टींना काळजीमुळें व्यत्यय होत नाहीं; त्या दुःखांमुळें कंटाळवाण्या वाटत नाहींत, व गरीबी आपणाकडून हिरावून नेत नाहीं. हीं मनुष्यांच्या हस्तस्पर्शावांचून बांधिलेलीं स्थानें व गृहें होत व तीं आपल्या आत्म्याला रहाण्याकरितां आहेत."

चांगला व मोठा बादशहा अन्टोनिअस ह्यानें मरतेवेळीं पाहऱ्यावरील अधिकाऱ्याला खुणेचा शब्द ह्मणून "शांतता" हा सांगितला. ख्रिस्ताच्या आयुष्यांतील शांततेचा कशानेंही मोड झाला नाहीं.

सेंट थॉमस ए केंपिस ह्मणे–"वासना तोडा ह्मणजे तुह्मांला शांतता मिळेल. मोठ्या गोष्टींनीं आपणांस जितका त्रास होतो तितकाच बारीकसारीक गोष्टींनीं ह्या जगांत होतो."

" माणसांस शाप ह्मणून ज्या वाईट गोष्टी मिळाल्या आहेत त्यांत सर्वांत वाईट ह्मणजे त्यांचा वाईट स्वभाव होय.[१]"

सुख आपल्या बाहेर शोधूं नये. सुख स्वतःच्या ठायीं ह्मणजे मनांत शोधावें. ईश्वरी राज्य आपल्या शरीरांत आहे. आपणांस जर येथें सुखी रहातां येत नाहीं, तर पुढें आपण सुखी होऊं अशी आशा करणें व्यर्थ आहे. सध्यां देव आपली जेवढी काळजी घेतो त्यापेक्षां जास्त नंतर घेईल काय? ह्या जगांत आपण शांतता मिळवून घेत नाहीं तर ती आपणास स्वर्गांत मिळेल अशी आशा कशी करावी ? ती कशामुळें मिळत नाहीं ? गर्व, लोभ व महत्वाकांक्षा ह्यामुळें; ह्यासारख्या इतर गोष्टी जर नसत्या तर आपणांस येथें सुख मिळालें असतें. ह्या जवळ असतांना आपणांस कोठें सुख होणार नाहीं. आपणांस जें महत्वाचें वाटतें तें हरवेल ह्मणून जर ह्या जगांत आपणांस चिंता लागते, तर स्वर्गांत आपणांस किती तीव्र काळजी लागेल? ह्या जगांत इतरांशीं सलोख्यानें रहाववत नाहीं तर इतरत्र तसें रहाण्याची काय आशा आहे ?

स्वास्थ्य व सुख हीं बाह्य वस्तूंवर अवलंबून आहेत व फक्त दुसऱ्या जगांत तीं मिळतील असें आपण मानिलें, तर दुसऱ्या जगांत तिसऱ्या जगाकडे आपलें लक्ष्य नाहीं का लागणार ? व ही सतत परंपरा नाहीं का होणार ?

सुख हें तीन रीतींनीं आनन्दकारक वाटतें; पुढें मिळेल ह्मणून,

---

१ कंबर्लेन्ड.

मिळतें तेव्हां, व त्याची आठवण झाली ह्मणजे, ह्यांत संशय नाहीं. पुढें सुख मिळेल ही आशा शुद्ध आनंदाच्या उत्पत्तीची जागा होय. ज्यांच्यावर आपलें प्रेम होतें व ज्यांचा आपला वियोग झाला, त्यांना भेटण्याची आशा, जें आतां आपणांस कळत नाहीं तें कळण्याची आशा इत्यादि गोष्टींमध्यें अस्सल सुख असेल; समाधान व आनंद ह्यांचा हा झरा होय, त्याविरुद्ध मला बोलावयाचें नाहीं. परंतु ह्या जगांतल्या सुखांची किंमत कमी मानतां कामा नये, अथवा त्यांबद्दल कृतघ्न होतां कामा नये. तर स्वतःवर इतका दाब ठेवा कीं केवल कवीप्रमाणें तुह्मांला ह्मणतां येईल—"माझ्या धन्या—माझ्या देवा. तुझ्या शुद्ध इच्छेप्रमाणें कर. मी स्वस्थ बसतों. मी मुळींच हालचाल करीत नाहीं, कां कीं आधारभूत झालेला तुझा हात सुटेल, व माझ्या बापाच्या अंगाशीं अगदीं शांततेनें चिकटून एका प्रकारच्या मोहनीमुळें मी जो ब्रह्मानंदांत आहें तो नाहींसा होईल."

व अशाच रीतीनें अचल सृष्ट पदार्थांपासून तुह्मांला सुख होईल; ह्मणजे "तारकगणांनीं अंकित झालेल्या आकाशांतील शांतता, व ह्या एकांत टेंकड्यांतील निद्रामय स्वास्थ्य"[१] ह्यांपासून.

ह्या रीतीनें स्वस्थचित्त झाल्यावर ज्याप्रमाणें पुरातन काळीं मामरच्या मैदानांत देवदूत एब्राहामाजवळ आले, त्याप्रमाणें तुमच्या घरांत ते तुमच्या जवळ येतील.

"आणखी, माणसास अपरिचित अशा आनन्दजनक गोष्टी अनेक आहेत. व त्या सुधारणेच्या प्रसाराबरोबर त्याला कळूं लागतील."[२] हें संभवनीय आहे.

"कारण ज्या वेळीं आत्मा, ज्या शरीराशीं सांगड झाली असूनही

---

१ वर्डस्वर्थ. २ मॉंटेगाझा. आयडिअल्स आफ् लाईफ.

कमी योग्यतेचें आहे अशा शरीरावर शहाणपणें दाब ठेवितो, त्याला प्रेमानें वळण लावितो, त्याचा फायदा होईल अशा रीतीनें त्याची काळजी घेतो, त्याला पुरेल असें अन्न देतो, व दयार्द्रबुद्धीनें त्याला वागवितो, त्या वेळीं आत्मा व शरीर मिळून पूर्ण माणूस होतो. पण जर शरीर राजा बनलें व त्यानें वासनांच्या मस्तपणामुळें विचारशक्तीचा ऱ्हास करून इच्छा व आवडनिवड ह्यांच्यावर दाब ठेविला, तर शरीर व आत्मा ह्यांची सांगड चांगली नाहीं. व असा मनुष्य मूर्ख व दुःखी होय. जर आत्मा राजा नाहीं तर तो योग्य मित्र नव्हे. एक तर तो शास्ता होईल नाहीं तर बन्दा गुलाम बनेल.[1] ''

जर ह्या जगांत सुख झालें नाहीं तर तो आपला अपराध होय. रस्किन ह्मणतो—"सर्वांना सुख होईल, सर्वांच्या हातून मोठें काम होणार नाहीं. ''

मन स्वस्थ व सुखी राखण्यास तें शहाणपणाच्या उदात्त विचारांनीं भरून ठेविलें पाहिजे. फीड्रस नांवाच्या पुस्तकांत प्लेटो ह्मणतो—"ईश्वरत्व ह्मणजे सौंदर्य, चांगुलपणा, इत्यादींत असतें, त्यांच्या योगानें आत्म्यांच्या पंखांना जोर येतो, व तीं वाढतात; पण वाईट गोष्टीवर जर आत्म्याचें पोषण झालें, तर त्याचीं पंखें खुंटतात व तीं निकामी होतात. ''

तर मग हेतूची निवड चांगली करा. "व आनन्ददेवी घरीं आणा. आपल्या मोठ्या हृदयांत तिच्यासाठीं जागा तयार करा. तिला वाढण्यास अवकाश ठेवा. तिच्यावर प्रेम करा, मग ती तुमच्याकरितां सुरस गायन करील. तुह्मी शेतांतून काम करीत

---

१ जेरेमी टेलर.

असतां अथवा सकाळच्या शुभ वेळीं गवत कापीत असतां आनन्दी असणें हें फार बरें. आनन्द हा ईश्वराचा दागिना होय. ”

साक्रेतीस ह्मणतो—“जो आपणांस पूर्णतेस आणण्याचा यत्न करितो तो सर्वांत उत्तम माणूस; व आपण पूर्णतेस येत आहोंत असें ज्याला कळतें तो सर्वांत सुखी माणूस. ”

---

१ जीन इंगलो.

# भाग १९.

## धर्म.

ईश्वरी मीमांसेंत प्रतिपादित केलेला धर्म विद्वान् माणसांना देखील गूढ वाटतो. तरी कर्तव्यकर्मरूपी जो धर्म तो एखाद्या अजाणत्या पोरासही स्पष्ट कळतो.

जेरेमी टेलर ह्मणतो–" कर्तव्यकर्मांची दिशा अपोलोच्या कौलाप्रमाणें द्व्यर्थक नाहीं. कर्तव्यकर्मे कठीण भाषेंत प्रतिपादित केलेलीं नाहींत, त्यांचा अर्थ गूढ नाहीं. त्यांनीं सांगितलेले उपाय फसविणारे नाहींत, व एक होईलसें वाटून परिणामीं उलट होणारे नाहींत. कर्तव्यकर्मांत व्यक्त झालेली देवाची वाणी आकाशाप्रमाणें उघड आहे, चन्द्राप्रमाणें स्पष्ट आहे, सूर्याच्या संस्काराप्रमाणें मानसिक आरोग्य राखणारी आहे; निदान हें तरी खरें आहे कीं, जेव्हां एकादी गोष्टी अव्यक्त वाटूं लागते, तेव्हां सावधगिरीनें शोध करणें भाग पडतें; तरी त्यामुळें अन्याय केला असें ठरत नाहीं, जेवढा त्यांचा अर्थ स्पष्ट व्हावा त्र होतो तितकीच जबाबदारी आपल्यावर असते."

लॉक जें मुलांबद्दल ह्मणतो तेंच बऱ्याच मोठ्या माणसांस लागू पडतें:—"त्यांच्यांत ईशाबद्दल प्रीति व पूज्य बुद्धि ठसवून द्या, व हें आरंभीं पुरे आहे. त्याबद्दल जास्त समजूत घालण्याची जरूरी नाहीं. कारण तसें करण्यांत एक धोका आहे. भूतादिकांबद्दल अगदीं लहाणपणीं त्यांच्याबरोबर बोलून, व त्या अनादि परमात्म्याची अज्ञेय प्रकृति त्याला समजावून सांगण्याचा अवेळीं यत्न करून, त्याचें डोकें त्यांच्या बद्दलच्या खोट्या नाट्या विचारांनीं

भरतें, किंवा अज्ञेय वादाच्या विचारांनीं भंडावून जातें. प्रसंगानुसार ईश्वरानें सर्व वस्तु निर्माण केल्या व त्यांचा तो शास्ता आहे, तो सर्व पहातो व ऐकतो, व जे त्याची आज्ञा पाळतात व त्याच्यावर प्रीति करितात त्यांचें सर्व प्रकारें बरें करितो, इतकेंच त्यांना सांगावें. अशा ईश्वराबद्दल माहिती कळली, तर त्याच्या विषयींचे विचार साहजिक उत्पन्न होतील; त्यांमध्यें कांहीं चुकीचे दिसून आल्यास ते तुह्मी शुद्ध करा. जो परमात्मा अज्ञेय आहे असें प्रत्येकाला कबूल केलें पाहिजे, त्याच्या बद्दलच्या कल्पनांविषयीं अतिशय चौकस न होतां वर सांगितलेल्याच कल्पनांनीं समाधान करून घेतलें तर ठीक होईल. कारण अतिशय चौकसपणामुळें, ज्यांना विचारमहती नाहीं, व ज्ञेय कोणतें व अज्ञेय कोणतें ह्याचें तारतम्य ज्यांना नाहीं, ते देवभोळेपणांत पडतात अथवा पाखंडी बनतात. ते देवाला आपल्या सारखा बनवितात, अथवा दुसरें कांहीं कळत नाहीं ह्मणून तो मुळींच मानीत नाहींत. ”

जानसनचें एक वचन लॉवेल विशेष प्रशंसाबुद्धीनें उतरवीत असे—“ज्याच्यामुळे इंद्रियांच्या सत्तेंतून आपण मुक्त होतों, ज्याच्या योगानें गतकाल किंवा भावी काल हा सध्यांपेक्षां जास्त महत्वाचा भासतो त्याच्या योगानें विचारी प्राणी ह्या नात्यानें असणारी आपली महती वाढते. ”

ज्ञानकांड व कर्मकांड हे धर्माचे शास्त्रदृष्ट्या विभाग होत. पण त्यांच्यावर धर्माचें अस्तित्व नाहीं. नेहमींच्या व्यवहारांत धर्म हा आचार घालून देणारा आहे. तो भरभराटीच्या वेळीं संरक्षक, विपत्तीच्या वेळीं समाधानकर्ता, चिंतेच्या वेळीं आश्रयस्तंभ, संकटाच्या वेळीं आसऱ्याची जागा, दुःखाच्या वेळीं सुखदाता,

शांततायुक्त स्वर्ग होय. धर्म एका अर्थानें शरीर व आत्मा ह्या दोहोंसही अवश्य आहे. शरीर व आत्मा ह्या दोहोंसही योग्य मान दिला पाहिजे.

फिच ह्मणतो तें खरें आहेः—" धर्म हा इतर व्यवहारापासून विभक्त असा निराळाच व्यवसाय नव्हे. ह्मणजे तो व्यवसाय इतर व्यवसायांपासून निराळा नेमक्या दिवशीं व नेमक्या तासास करावा असें नव्हे. आपले सर्व विचार व कृत्यें ह्यांस व्यापून असणारी, त्यांस प्रोत्साहन देणारी ती एक अंतस्थ शक्तिच होय."

बायबलमध्यें जाड्या व्याख्या देऊन आपल्याला घोटाळ्यांत पाडिलें नाहीं. अशा वितंडवादापासून आपणांस दूर केलें आहे.

मोसेस ह्मणतो—" जी आज्ञा आज मी सांगतों ती तुझ्यापासून चोरून ठेविली नाहीं, ती फारशी दूर नाहीं, ती स्वर्गांत नाहीं. नाहीं तर तुह्मी ह्मणाल आह्मीं ती ऐकावी व ती पाळावी ह्मणून आह्मांसाठीं स्वर्गांत कोण जाईल व ती घेऊन येईल ? × × पण ती आज्ञा तुझ्या अगदीं जवळ आहे. तूं ती पाळावीस ह्मणून तुझ्या तोंडांत, तुझ्या हृदयांत ती ठेविली आहे. "

प्रश्न विचारणाऱ्या वकिलाला येशूनें उत्तर दिलें:—"अंतःकरणपूर्वक तुझा धनी जो ईश्वर त्याच्यावर प्रीति करा. ही पहिली व सर्वांत मोठी आज्ञा. दुसरी तिच्यासारखीच आहे. स्वतःप्रमाणें आपल्या शेजाऱ्यावर प्रेम ठेवा. ह्या दोन आज्ञांवरून सर्व कायदेकानू व भविष्यवादी ओंवाळून टाका. "

जेम्स साधु ह्मणे " अनाथ पोरेंबाळें व विधवा त्यांचें दुःखाच्या वेळीं समाधान करणें, व ऐहिक वस्तूंपासून स्वतःला डाग

लावून न घेतां रहाणें, हा शुद्ध धर्म होय. व आपला बाप देव त्याच्या दृष्टीनें अशुद्धतारहित हाच धर्म होय."

आपण आलों कोठून व जातों कोठें हें आपणांस सांगतां येत नसेल; कशावर विश्वास ठेवावा व काय विचार करावा ह्याची खात्री नसेल; पण आपलें कर्तव्यकर्म काय हें अन्तर्यामीं आपण जाणतों. आपल्या शेजाऱ्यांसंबंधाचें आपलें कर्तव्य ईश्वरासंबंधीं कर्तव्याचा एक भाग होय. मधल्या युगांतले दरवडेखोर मी ईश्वराचा मित्र पण माणसाचा शत्रु असें स्वतःविषयीं ह्मणत असत. ते ख्रिस्ती धर्माचें खरें ब्रीद अगदीं चुकत असत. त्याचप्रमाणें ज्यांना तसल्या सबबी नाहींत ते लोक चुकतात. ईश्वरावरचें प्रेम माणसांवर प्रेम करण्यांतच चांगलें व्यक्त करितां येतें."

इतरांबद्दल कुरकुर करावीसें आपणांस कधीं कधीं वाटतें, तर त्या वेळीं, "आपली इच्छा असते त्याप्रमाणें आपणांला होतां येत नाहीं, मग दुसरे लोक अगदीं आपल्या मनासारखे होतील अशी आशा कां बाळगांवी ?[१]" हें वचन लक्षांत ठेवा.

जरी कुरकुर करण्यास योग्य जागा असली तरी ज्या अर्थीं ईश्वर आपणांस क्षमा करील अशी आपणास आशा असते, त्या अर्थीं आपणांस त्यास क्षमा केली पाहिजे. व ही क्षमा पीटर ह्मणतो त्याप्रमाणें "सातच वेळ करावयाची असें नव्हे तर ७×७७ इतके वेळां करावयाची.[२]"

सुखाच्या आशेपेक्षां दुःखाची भीति बऱ्याच माणसांच्या मनावर जास्त पगडा बसविते. एव्हरशामच्या देवळांत एक जुना चमत्कारिक कबरलेख आहे तो ह्याप्रमाणें होयः—

"मऊ बिछान्यावरून खळग्यांत जाऊन पडणें व खळग्यां-

---

१ टामस ए केम्पीस. २ सेंट मॅथ्यू.

तून ज्या यातनांस अंत नाहीं अशा यातनेंत पडणें हें किती कठीण आहे, ह्याचा जो मनांत वारंवार विचार करील तो जग मिळविण्यासाठीं देखील एक पाप करणार नाहीं. "

" ज्ञानप्रकाश आणखी थोडा वेळ तुजजवळ आहे; तो आहे तोंपर्यंत पुढें पाऊल टाक, नाहीं तर अज्ञानतम येईल. व जो अंधकारांत चालतो त्याला आपण कोठें जातों हें कळत नाहीं.[1] "

" तर मग जो हीं माझीं वचनें ऐकितो, व तीं पाळित नाहीं त्याची, जो मूर्ख रेतींत आपलें घर उभारतो, त्या मूर्खाबरोबर तुलना करावी. कारण पाऊस पडतो, पूर येतो, वारा वाहतो, व तो ह्या घरावर आदळतो, आणि तें पडतें."

परंतु उलटपक्षीं, " जो हीं वचनें ऐकितो, व तीं पाळितो, त्याची तुलना खडकावर घर बांधणाऱ्या शहाण्या माणसाबरोबर मी करितों. पाऊस पडतो, पूर येतो, वारा वाहतो, व त्यावर आदळतो, व तें पडत नाहीं, कां कीं तें खडकावर बांधिलेलें असतें. "

विशेषेंकरून जो इतरांस व तशांत बालांस आड मार्गानें नेतो त्याचा सत्यनाश होवो.

" गुन्हे घडणार नाहींत हें अशक्य आहे. परंतु ज्यांच्यामुळें गुन्हे घडतात त्यांचा सत्यानाश होवो. त्यानें अज्ञान बालांस कुमार्गीं लावावें त्यापेक्षां त्यांच्या गळयांत दगड बांधून त्यांला समुद्रांत बुडवावें हें बरें.[2] "

" आपला आत्मा भ्रष्ट होऊन पृथ्वीचें राज्य मिळालें तर त्याचा काय उपयोग ? अथवा आपल्या आत्म्याचा मोबदला त्यानें काय द्यावा[3] ? '

---

१ सेंट जान. २ ल्यूक. ३ म्यॅथ्यू.

तरी पण आपल्या हातून कितीका पाप झालेलें असेना, कोणी निराश होऊं नये अशा अर्थाचे अनेक उल्लेख व अभिवचनें शास्त्रांत सांपडतात.

ख्रिस्ती धर्म आशासंमूलक होय, भीतिसंमूलक नव्हे. रॅले सुचवितो त्याप्रमाणें आपल्या विचारांत मरण व शेवटचा न्याय, स्वर्ग व नरक ह्यांचें संमीलन असावें. "जो वारंवार विचार करितो त्याचें बरें झालेंच पाहिजे."

माणसांना हांकून नेण्यापेक्षां त्यांना हातीं धरून नेणें बरें. व नुसती वटवट करण्यापेक्षां उदाहरण घालून देणें बरें. ज्यांना इन्क्वीझिशनच्या भीतीची पर्वा नाहीं त्यांना ड्रमंडच्या ह्मणण्याची सत्यता वाटेल; तें ह्मणणें हें होयः—

"दररोज ख्रिस्ताच्या सहवासांत दहा मिनिटें—निदान दोन मिनिटें तरी घालविलीं ( मग तो सहवास तादात्म्य होऊन व प्रत्यक्षाप्रत्यक्षी होऊन झाला पाहिजे ) कीं, हें सर्व आयुष्य निराळेंच वाटायाला लागेल."

बऱ्याविषयीं विचार करा ह्मणजे हातून वाईट घडायाचें नाहीं. "ज्या ज्या गोष्टी खऱ्या, प्रामाणिक, न्यायास अनुसरून, शुद्ध, रमणीय, चांगल्या ह्मटल्या असतील, त्या करण्यांत सद्गुण व प्रशंसा असली तर त्याविषयीं मनन करीत असा. मनानें गुन्हे झाल्याशिवाय ते प्रत्यक्ष कृत्यरूपानें होत नाहींत."

सेनिकानें ह्मटलें आहे—"जें माणसास कळूं नये असें तुह्मांला वाटतें तें ईश्वराजवळून मागूं नका. त्याचप्रमाणें जें ईश्वरास कळूं नयेसें वाटतें तें माणसाजवळून मागूं नका." "परंतु अनादि काल व आकाश ह्यांच्या मानानें आपण किती क्षुद्र व क्षणभंगुर प्राणी आहोंत हा विचार मनांत आला ह्मणजे स्पेन्सरप्रमाणें आह्मांला स्वतःला प्रश्न विचारावे लागतात—ईश्वराच्या ठायीं

आपल्याबद्दल काळजी आहे काय ? व ह्या नीच प्राण्याबद्दल स्वर्गींच्या प्राण्यांच्या ठायीं प्रेम आहे काय ? "

स्तोत्रकार ह्मणतो तें खरें आहे—"जेव्हां मी आकाशाबद्दल विचार करितों, तुझे हस्तकृत चन्द्र, सूर्य, व तारे, ह्यांच्याबद्दल मनन करितों, तेव्हां माणूस तो काय, कीं त्याच्याबद्दल तूं इतकी काळजी करावीस, मानवपुत्र ते काय कीं त्यांना त्वां भेट द्यावीस असे प्रश्न मनांत येतात. "

पण कॉलेरिजच्या उत्तरानें बरेंच समाधान होतें—"माणसांनीं धांवा केला तर संत मदत करितील. कारण निळें आकाश सर्वांना व्यापून आहे."

आपणांला असें अभिवचन नाहीं का मिळालें:—

"मदत मागा व दिली जाईल, ईश्वराला शोधा व तो मिळेल, स्वर्गद्वार ठोठावा व तें उघडेल. "

व आणखी " जें माझ्या नांवें मागाल तें मी करीन. " " तुह्मी जर माझ्या ठायीं रहाल तर माझीं वचनें तुमच्यांत रहातील. तुमची इच्छा असेल तें मागा व तें तुह्मांला दिलें जाईल. " आपणांस असेंही सांगितलें आहे कीं " सर्व हृदयें ईश्वराच्या दृष्टीस उघडीं आहेत व सर्व इच्छा त्याला कळतात." व तो अनुतापी हृदयाचा अनुताप तुच्छ मानीत नाहीं, व दुःखी माणसांच्या इच्छा तुच्छ मानीत नाहीं. " त्याचप्रमाणें आपली चिंता देवाला वाहा, कारण तो तुझी काळजी करितो."

स्वतःच्या हातून आळस झाला ह्मणून ईश्वर मदत करील असें मानूं नये. तरी आपणांस मदतीचें आश्वासन मिळालें आहे. इतकेंच नव्हे, तर असेंही सांगितलें आहे कीं, "ईश्वरानें घर बांधण्यास मदत केली नाहीं तर घर बांधणाऱ्याचे श्रम व्यर्थ होतील, ईश्वरानें शहराचें रक्षण केलें नाहीं तर पाहरेकऱ्यांनीं

जागून कांहीं फायदा होणार नाहीं. " तसेंच " प्रत्येक चांगली देणगी देवाकडून मिळते, व ज्ञानाचा अधिकारी जो ईश्वर त्याच्याकडून येते, त्याला दुटप्पीपणा आवडत नाहीं, माघार घेण्याचा वाराही त्याला खपत नाहीं. "

परलोकासाठीं इहलोकाचा त्याग करा असें ख्रिस्ती धर्म सांगत नाहीं. उलटपक्षीं, जें आपणांस आवडावें अशी आज्ञा झाली आहे त्यावर प्रेम ठेवण्यापासून, व ज्याची आशा धरावी त्याची आशा केल्यापासून, ह्या जगांतलें सुख साधून पुढच्या जगाचेंही सुख साधण्याजोगें आहे. व्यावहारिक ज्ञान व पारमार्थिक ज्ञान ह्यांत खरा भेद नाहीं, कारण धर्मामुळें आयुष्य पवित्र होतें.

" आपल्या सोयऱ्याधायऱ्यांना रामराम ठोकून व आपलें कामकाज आटोपून मठींत जाऊन रहाण्याची गरज नाहीं. क्षुल्लक वाटणारी परिस्थिति, व माणसांचें नेहमींचें कर्तव्य ह्या दोन गोष्टी, जें आपणांस इच्छिण्याचा अधिकार आहे तें पुरवितात. त्यांत आत्मसंयमनास जागा असते. दर रोज ईश्वराच्या जवळजवळ जाऊन पोंहचण्यास हा मार्ग आहे[१]. "

येशू आपल्या शिष्यांस ह्मणाला—"तूं माणसांना जगांतून सोडीव अशी प्रार्थना मी करीत नाहीं. तर त्यांना पापापासून दूर राख अशी प्रार्थना करितों. "

प्लेटो, ॲरिस्टाटल, एपिक्टेटस, सेनिका, मार्कस आरिलिअस इत्यादींच्या ग्रन्थांतून उदात्त तत्वें आहेत. तरी पण नव्या करारांत जें प्रीतीचें तत्व सांगितलें आहे तें त्यांत नाहीं.

माझा धर्म नवीन आहे असे येशू जें ह्मणाला तें खरें आहेः—

---

१ केवल.

"मी नवीन आज्ञा देतों, तुह्मी परस्परांवर प्रेम ठेवा, ज्याप्रमाणें माझें तुमच्यावर आहे त्याप्रमाणें तुह्मी एकमेकांवर करा. त्याचमुळें तुह्मी माझे शिष्य आहां असें जगाला कळेल."

आणखी—" ह्या गोष्टी मी तुह्मांला सांगितल्या त्या अशाकरितां कीं माझा आनंद तुमच्या ठायीं रहावा, व तुमचा आनंद पूर्ण व्हावा. ज्याप्रमाणें मी तुमच्यावर प्रीति करितों त्याप्रमाणें तुह्मी एकमेकांवर करा हीच माझी आज्ञा. आपल्या मित्रांकरितां आपला प्राण देण्यास तयार व्हावें ह्यापेक्षां जास्त प्रेम नसेल. मी सांगतों तसें कराल तर तुह्मी माझे मित्र आहां. आजपासून मी तुह्मांला माझे गुलाम ह्मणणार नाहीं, कारण गुलांमाला आपला धनी काय करितों हें कळत नसतें. परंतु मी तुह्मांला माझे मित्र असें ह्मटलें आहे. कारण माझ्या बापाबद्दल जेवढ्या गोष्टी मीं ऐकल्या आहेत त्या मीं तुह्मांला सांगितल्या आहेत."

ख्रिस्ती धर्माचे आगमनाचा पुकारा पुढील तत्वांनीं केला. " देवाधिदेवाचा जयजयकार, ह्या जगांत शांतता, व एकमेकांबद्दल प्रेमभाव. "

येशू मोसेसच्या शुभवर्तमानाबरोबर आपलें शुभवर्तमान ताडून असें दाखवी कीं, आपलें शुभवर्तमान वारंवार क्षमा करा व प्रत्यक्ष शत्रूवर प्रेम ठेवा असें सांगतें.

" तुह्मी आपल्या शेजाऱ्यांवर प्रीति करा व शत्रूंचा द्वेष करा असें सांगितलेलें तुह्मीं ऐकिलें आहे; पण मी तुह्मांला सांगतों आपल्या शत्रूंवर प्रीति करा, जे तुह्मांला शाप देतात त्यांचें बरें इच्छा, जे तुमचा द्वेष करितात त्यांचें बरें करा. जे तुमचा तिटकारा करितात त्यांच्यासाठीं प्रार्थना करा. कारण त्याच्या योगानें आकाशांतील बापाचीं तुह्मी खरीं लेंकरें ठराल. कारण तो

बऱ्या व वाईट माणसांवर सूर्य प्रकाशावयास लावितो. न्यायी व अन्यायी लोकांस पाऊस देतो. जे तुमच्यावर प्रीति करितात त्यांच्यावर प्रीति केल्यास काय फायदा होणार? दस्तुरीवाले देखील तसें करीत नाहींत काय? जर तुह्मीं आपल्या भाऊबंदांसच रामराम केला तर जास्त काय केलेंत ? दस्तुरीवालेही तसें करीत नाहीं का? तर आकाशांतील बाप जसा पूर्ण आहे त्याप्रमाणें तुह्मी पूर्ण व्हा. ”

त्रास, दुःख, चिंता, इत्यादि येतील असें तुह्मांला कळलें पाहिजे. संकटाचा अभिमान वाटला पाहिजे. कारण संकटामुळें दम धरतां येतो, त्यामुळें अनुभव मिळतो,व अनुभवामुळें आशा उत्पन्न होते. “आजचीं संकटें आमच्या ठिकाणीं स्पष्ट होणाऱ्या भावी वैभवाबरोबर तुलना करण्याच्या योग्यतेचीं नाहींत ” असें आपणांस सांगितलें आहे. आणखी, “ जे ईश्वरावर प्रीति करितात त्यांच्यासाठीं त्यानें ज्या वस्तू तयार केल्या आहेत तशा डोळ्यांनीं पाहिल्या नाहींत, कानांनीं ऐकिल्या नाहींत किंवा कोणाच्या स्वप्नीं आल्या नाहींत.”

एपिक्टेटस ह्मणतो—“आपण ईश्वराची आज्ञा पाळीत आहोंत, चांगल्या शहाण्या माणसांचीं कृत्यें शब्दांनीं व कर्मांनीं करीत आहोंत ह्या ज्ञानापासून उत्पन्न होणारा आनंद इतर आनंदाच्या जागीं आणा.” तरी असें असतांनाही धर्मासाठीं लोक किती थोडा स्वार्थत्याग करितात ? लोक धर्माबद्दल भांडतात, वादविवाद करितात, एकमेकांना शिव्या देतात, शेजाऱ्या पाजाऱ्यांना त्रास देतात, त्यांना जिवंत जाळतात, धर्माच्या नांवानें युद्धें करितात, त्यासाठीं मरतात, सर्व कांहीं करितात; त्याप्रमाणें चालत मात्र नाहींत. त्याप्रमाणें चालण्याचा यत्न देखील थोडे लोक करितात.

टामस ए केम्पीस ह्मणतोः-"थोड्या पैशाकरितां मोठा प्रवास करण्याचें पत्करितात, परंतु अमरत्वाकरितां मनुष्य एक पाऊलही टाकण्यास धजत नाहीं." इतर ठिकाणीं तो ह्मणतो-"लिहा, वाचा, शोक करा, स्तब्ध बसा, प्रार्थना करा, मोठ्या धैर्यानें व्यत्यय सोसा, अमरत्व ह्या सर्वांच्या किंमतीचें आहे, फार तर काय ? तें ह्यापेक्षां जास्त त्रासाच्याही योग्यतेचें आहे." असें असून आपणाकडून किती थोडें काम पाहिजे असतें. "कारण, न्यायानें वागणें, दया आवडणें, व ईश्वराच्या संगतीनें नम्रपणें वागणें ह्याशिवाय आपणांकडून ईश्वराला काय हवें असतें ?"

जरी आपणांपासून जास्त हवें असतें, आणखी जास्त स्वार्थत्याग हवा असता, ह्या जगांतल्या सर्व वस्तू टाकून देण्याची जरूर असती, तरी हें आयुष्य किती क्षणभंगुर आहे !

"सूर्यामुळें ढगाची पडलेली छाया ज्याप्रमाणें उन्हाळ्यांत गवतावरून नाचते, त्याप्रमाणें ह्या जगांतल्या पिढ्या, हे देवा, तुझ्या दृष्टीनें आहेत. व असंख्य वर्षांची मालिका एकामागून एक येऊं लागली ह्मणजे, उत्तम उत्तम माणसें, ज्यांच्याबद्दल जगाला अभिमान वाटतो, तीं फक्त प्रकाशाच्या कवड्याप्रमाणें चक्र करितात व नाहींशीं होतात.[१]"

ईश्वराजवळ मागण्या योग्य रीतीनें केल्या पाहिजेत.

"जणू काय तूं माझ्याजवळ आहेस ह्या बुद्धीनें मी वागण्याचा यत्न करीन; व जो वर्तनक्रम मी पत्करीन तो तुझ्या प्रीत्यर्थ होये.[२]"

"अशी वृत्ति असणें हेंच बक्षिस होय. कारण धर्मांत कबूल केलेलीं अभिवचनें परलोकाबद्दलचींच नसतात. प्रत्येकाच्या

१ ब्रायन्ट. २ थॉरो.

हृदयांत जीवंत पाण्याचा झरा असतो, फक्त त्यानें तो स्वच्छ ठेवावा."

"कांहीं भावना माणसांना दिलेल्या असतात त्या भावनांत ऐहिकपणापेक्षां दैविकपणा जास्त असतो[१]."

सिसरो ह्मणतो तें खरें आहे—"चांगल्या माणसाशिवाय कोणाला सुख नाहीं, किंवा सर्व चांगलीं माणसें सुखी आहेत हें खरें असलें, तर तत्वज्ञानाशिवाय दुसरें कोणतें ज्ञान जास्त उन्नतीस आणण्याच्या योग्यतेचें आहे ? व सद्गुणाशिवाय जास्त दैविक काय आहे ?"

माणसांच्या शक्तीच्या बाहेर त्यांची सत्वपरीक्षा होत नाहीं हें अगदीं खरें आहे; मात्र तें आपणांस विश्वसनीय वाटत नाहीं. परंतु ईश्वर सत्यनिष्ठ आहे, मोहाचा प्रतिकार करण्याचें जितकें सामर्थ्य तुमच्या अंगीं असेल त्याच्या पलीकडे तुह्मांला तो मोह पडूं देणार नाहीं, व त्यांतून तुह्मीं सुटावें ह्मणून त्या मोहाबरोबर त्यांतून सुटून जाण्याचा मार्गही दाखवून देईल.

तरी पण माणूस इतका चंचलवृत्ति आहे कीं, आपणांस असें सांगितलें आहेः—"आपल्या सत्वपरीक्षेचे प्रसंग येऊं नयेत अशी प्रार्थना करा. कारण, आत्मा परीक्षेस तयार असतो पण देह अशक्त आहे."

पूर्णतेकडे आपला रोख असला पाहिजे. ज्याप्रमाणें आकाशांतील बाप पूर्ण आहे त्याप्रमाणें तुह्मी व्हा. त्याबद्दलचें बक्षिस सन्निध आहे व तें अपरिमित आहे. आपलीं बरींच संकटें आपल्यांतच असतात. भ्रमामुळें माणूस त्रास करून घेतो. डॉनियलप्रमाणें आपल्याला ह्मणतां येईल—"माझ्या डोक्यां-

---

१ स्कॉट.

तील विचारतरंग मला त्रास देतात." आपल्यास वाटलें तर आपणांस स्वास्थ्य मिळेल, मिळालें नाहीं तर आपला अपराध होय. विश्रांति, सुरक्षितपणा, मनाचें स्वास्थ्य, चिंतेंतून सुटका, इत्यादि ह्या जगांत देखील देईन असें धर्म आश्वासन देतो. स्वर्ग पुढें येणारा लांबचा देश नव्हे, स्वर्ग आपल्यांतच आहे.

तुह्मी त्रासलांत, थकलांत तर—"जे तुह्मी, श्रम करितां, व चिंतेच्या ओझ्यानें लादलां आहांत, ते तुह्मी माझ्या ठिकाणीं या, ह्मणजे मी तुह्मांला शांति देईन." असें तुह्मांला सांगितलें नाहीं काय ? तुमचें मन अस्वस्थ होऊं देऊं नका. "तुह्मी ईश्वरावर विश्वास ठेवितां तसा माझ्यावर ठेवा."

संशयानें मन व्याकूळ होऊं देणें, ह्मणजे ईश्वरावरील विश्वासाची कमतरता असणें होय.

भीतीस खरें कारण नाहीं असें आपणांस शास्त्रांत सांगितलें आहे. "कारण, जरी मृत्यूच्या छायेच्या खिंडींतून चालतों तरी, मी संकटाला भिणार नाहीं. कारण तूं माझ्याबरोबर आहेस, तुझी काठी माझें रक्षण करील." त्याचप्रमाणें चिंतेचें कारण नाहीं—"आकाशांतील पक्षी पहा. ते पेरीत नाहींत, ते कापणी करीत नाहींत, धान्य कोठारांत सांठवित नाहींत, तरी आकाशांतील बाप त्यांना चारतो. तुह्मी त्यांच्यापेक्षां श्रेष्ठ नाहीं काय ?........मग खाण्याची काळजी का वाहतां ? कुरणांतील कमळें पहा; तीं कशीं वाढतात, तीं श्रम करीत नाहींत, तीं सूत कांतीत नाहींत आणि तरी मी असें ह्मणतों कीं, वैभवयुक्त सालोमन देखील त्यांच्या सारखा शृङ्गारलेला नव्हता. तर मग जें गवत आज आहे व उद्यां भट्टींत जातें, अशा गवताला जर देव पोषाख पुरवितो तर हे पाखंड्या, तो तुला कपडे नाहीं का देणार ?"

"खाण्याचे पदार्थ, पिण्याचे पदार्थ मिळविण्याची इच्छा करूं नका; कारण जगांतील सर्व राष्ट्रें त्या वस्तू शोधितात; व तुह्मांला त्या गोष्टी पाहिजेत हें तुमच्या बापाला कळतें. पण तुह्मी देवाचें राज्य मिळविण्याचा यत्न करा, ह्मणजे ह्या सर्व गोष्टी पुरवणाप्रमाणें मिळतील."

तोच धडा वारंवार ठसवून सांगितला आहे. तींच वचनें पुनः पुनः सांगितलीं आहेत. "जगांत स्वतःकरितां भांडार जमवूं नका, ह्या ठिकाणीं वाळवी व गंज त्याचा नाश करितात, चोर तें लुटतात; पण स्वर्गांत भांडार मिळवा. त्या ठिकाणीं वाळू व गंज नाश करीत नाहींत, तेथें चोर पेव्या फोडित व लुटित नाहींत. कारण ज्या ठिकाणीं तुमचें भांडार असेल त्या ठिकाणीं तुमचें चित्त वेधेल." आणखी "लक्ष्मी वाढूं लागली तर तीवर तुझें चित्त लावूं नकोस. वस्तुतः गरीबीपेक्षां श्रीमंती जास्त काळजीचें कारण होय. जे लक्ष्मीवर विश्वास ठेवितात त्यांना स्वर्गराज्यांत शिरणें किती कठीण पडतें!"

पर्वतावरील सर्मनमध्यें ज्यांना स्वर्ग मिळेल असें सांगितलें आहे ते—दयाळु, नम्र, शांतता करणारे, व मनाचे शुद्ध असे लोक होत.

"ईश्वराला भिऊं नका, तो आपला बाप आहे, पूर्ण प्रीति भीतीस काढून टाकिते असें आपणांस सांगितलें आहे."

आपणांस माणसास भिण्याची जरूर नाहीं. "मीं ईश्वरावर हवाला टाकिला आहे. मनुष्य काय दुखापत करील, त्याला मी भिणार नाहीं."

कोणत्याही गोष्टीनें आपणांस इजा होणार नाहीं. "जे ईश्वरावर प्रीति करितात त्यांच्यासाठीं सर्व गोष्टी बऱ्या होतात."

ह्या आयुष्यांतील संकटांच्या, चिंतेच्या, विपत्तीच्या वेळीं—

"ईश्वरानें दिलेली शांतता, जी अतर्क्य आहे, ती तुमचें मन व बुद्धि ईश्वराच्या प्रीतीच्या ठिकाणीं, व ज्ञानाच्या ठिकाणीं ठेवील" असें आपणांस खात्रीपूर्वक सांगितलें आहे; व ईश्वराचा आशीर्वाद तुमच्यावर येईल, व नेहमीं तुमच्या जवळ राहील.

हीं अभिवचनें आपणा सर्वांस दिलीं आहेत. श्रीमंतांस, मोठ्यांस, शहाण्यांस, विद्वानांसच फक्त हीं दिलेलीं नाहींत, तर सर्वांस दिलीं आहेत. कारण, देव माणसांस समान मानितो.

"लहान मुलांना माझ्या जवळ येऊं द्या, त्यांना नाहीं ह्मणूं नका, कारण देवाचें राज्य तसेंच आहे."

हे फायदे स्वतः होऊन आपण घालविले तर जातील.

"मृत्यु, आयुष्य, देवदूत, सद्यवस्तु, पुढें येणाऱ्या गोष्टी, उच्चपद, खोल जागा, अथवा दुसरा कोणताही प्राणी, हे मला ईश्वराच्या भक्तीपासून विभक्त ठेवणार नाहींत; आमची भक्ती येशू ख्रीस्त जो आमचा धनी त्याच्या ठिकाणीं ठसली आहे."

ह्याच रीतीनें आयुष्य आनंदी, शांत व सुखकारक होईल.

शुद्ध वर्तन ठेवा, व योग्य गोष्टीची काळजी करा, कारण त्याचमुळें अंतीं माणसास शांतता मिळेल.

आयुष्यग्रंथांत ज्यांचीं नांवें दाखल झालीं आहेत त्यांच्यामध्यें अशाच रीतीनें तुह्मांस रहातां येईल.

व अशाच रीतीनें संसारांत कोणत्याही ठिकाणीं तुह्मी असा व तुमची स्थिति कशीही असो, तुह्मांला सुखाची आशा आहे.

ज्या ठिकाणीं ईश्वराची दृष्टि असते अशीं ठिकाणें, शहाण्यांस विश्रांतीचीं ठिकाणें वाटतात.

किंग्सलेच्या उदात्त उक्तीप्रमाणें, चांगले व्हा—

"ज्यांना हुशार ह्मणवून घेण्याची इच्छा असेल, त्यांना मो-

ठालीं कृत्यें करूं द्या. नुस्तें यंव करूं त्यंव करूं असें वायफळ ह्मणूं देऊं नका. व ह्या रीतीनें संसार, मृत्यु, व पुढील अफाट जग, एका भव्य, रम्य, कवितेसारखें वाटूं द्या."